

# माझा देश माझे लोक

१

९९९५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. नं. 200

REFBK-0008484

# माझा देश आणि माझे लोक!

REFBK-0008484

श्रीपाद जोशी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

प्रकाशक :
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

प्रकाशक : गो. वा. कुलकर्णी
महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

मूल्य ३ रुपये

मुद्रक : गो. वा. कुलकर्णी
सेवा मुद्रणालय, १६७ बी वॉर्ड,
कोल्हापूर.

# माझा देश

# आणि माझेच लोक !

अनुक्र. ७५७०

## माझा देश माझे लोक !

आपला देश आणि आपले लोक यासंबंधी आपण नेहमींच बोलत असतों आणि विचार करीत असतों; पण आपला देश आणि आपले लोक खरोखरीं कसे आहेत, त्यांचे गुण काय आहेत, दोष काय आहेत, या देशांत सुंदर काय आहे, असुंदर काय आहे याची कल्पना आपल्यांपैकीं कितीजणांना असते ?

आपला देश आणि आपले लोक यांविषयीं नक्की माहिती आपल्याला नसली तरी त्यांच्याविषयीं आपल्या मनांत एकप्रकारची ममत्वाची, आपलेपणाची भावना मात्र निश्चित असते आणि या आत्मीयतेंमुळेंच आपण अितक्या विभिन्नतेंतहि एकता टिकवूं शकलों आहोंत. परंतु केवळ भावनेच्या बळावर ऐक्य भावना टिकवून ठेवण्यापेक्षां तिला प्रत्यक्ष ज्ञानाची, माहितीची जोड मिळाल्यास ती भावना जास्त दृढ, बळकट होईल यांत शंका नाहीं.

अशा प्रकारचें ज्ञान व माहिती आपल्याला मिळावी अशी इच्छा मात्र आपल्या देशांत खूप आहे असें माझ्या अनुभवास आलें. माझ्या प्रवासवर्णनात्मक लेखांचें जें स्वागत समाजाच्या वेगवेगळ्या थरांतील लोकांकडून झालें त्यावरून माझ्या या अनुभवास पुष्टि मिळाली आणि म्हणूनच त्यांतील कांहीं लेख आज पुस्तकरूपानें मी वाचकासमोर ठेवीत आहे.

प्रवासाची व प्रेक्षणीय स्थळें पाहाण्याची आवड माणसामध्यें उपजतच असावी. तसेंच आपण पाहिलेल्या, अनुभविलेल्या गोष्टी इतरांना सांगून त्या आनंदामध्यें त्यांनाहि भागीदार करावें हीहि वृत्ति नैसर्गिकच दिसते. परंतु प्रवास करणें आणि प्रेक्षणीय स्थळें पाहाणें ही गोष्ट जितकी सोपी आहे तितकी दुसरी म्हणजे त्यांचें रोचक वर्णन करणें ही मात्र नाहीं.

पैसा व वेळ असला कीं प्रवास करतां येतो. पण त्याचें वर्णन करण्याची कला मात्र फारच थोड्यांच्या ठिकाणीं आढळते; यामुळेंच बहुधा मराठींत काय किंवा इतर भारतीय भाषांत काय, प्रवास वर्णनांचीं पुस्तकें फार थोडीं दिसतात.

प्रवास वर्णनांचे अनेक प्रकार होऊं शकतात. आपली स्वतःची टीका-टिप्पणी न करितां पाहिलेल्या स्थळांचें किंवा अनुभविलेल्या अनुभवांचें तटस्थपणें वर्णन करणें हा सर्वसामान्य प्रकार झाला. याला कांहीं लोक 'टूरिस्ट गाईड' (प्रवाशांचें माहिती पत्रक) पद्धति म्हणून हिणवीत असले तरी या प्रकाराचें आपलें असें एक स्थान आहे हें मान्य केलेंच पाहिजे. आपण पाहिलीं पाहिजेत अशीं कोणतीं स्थळें आहेत, तेथें कसें जावयाचें, काय पाहावयाचें वगैरे माहिती जाणून घेण्यातहि वाचक कमी उत्सुक नसतो. अशा वाचकांचीं सोय या प्रकारच्या प्रवासवर्णनांनीं चांगली होऊं शकते.

याच्या दुसऱ्या टोंकाला प्रवासवर्णनांचा दुसरा प्रकार येतो. यांत लेखक अितका स्वयंकेंद्रित असतो कीं 'मी काय केलें, काय खाल्लें, कशी चैन केली' वगैरे गोष्टीचेंच वर्णन त्यांत येतें. त्या पद्धतींत लेख–काचा 'अहम्' अितका मोठा असतो कीं त्यांत प्रेक्षणीय स्थळें आणि अितर परिस्थिति यांचें वर्णन अभावानेंच विद्यमान असतें. या पद्धतीचे लेखक मुख्यतः ललित लेखन करणारे असतात आणि प्रवासवर्णन म्हणजे एखादी गोष्ट किंवा लघुनिबंध लिहिणें आहे अशी त्यांची समजूत असते. अशा प्रकारचीं प्रवासवर्णनें वाचावयास मोठीं रोचक व मजेदार असतात परंतु माहितीच्या दृष्टीनें त्यांत कांहींच नसतें. एखादा ललित निबंध वाचल्याचें सुख वाचकाला त्यांत अवश्य लाभतें, परंतु प्रवासवर्णन वाचण्याचा मूळ हेतूच असफळ झाल्यामुळें एक प्रकारची चुटपुटहि त्याला लागून राहाते. ललित लिखाणाचा नमुना या दृष्टीनें अशा प्रकारचीं प्रवासवर्णनें स्वागतार्ह असलीं तरी तीं वाचकाचें समाधान करूं शकत नाहींत यांत मुळींच शंका नाहीं.

वाचकाला काय हवें असतें? या बाबतींत माझा असा अनुभव आहे

कीं प्रवासवर्णनाच्या वाचकाला माहितींहि हवी असते आणि लालित्यहि हवें असतें. किंबहुना लालित्य थोडें कमीं असलें तरी त्याची तक्रार नसतें; पण त्याला माहिती मिळविण्याची इच्छा असते. या दृष्टीनें विचार करितां लेखकानें मिळविलेली माहिती आणि घेतलेले अनुभव जर त्याला आकर्षक पद्धतीनें वर्णन करतां आले तर प्रवासवर्णन लेखनामध्यें तो यशस्वी झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कसोटीवर घासून पाहातां माझे हे लेख कितपत यशस्वी ठरतात हें वाचकांनीच ठरवावयाचें आहे.

मला स्वतःला प्रवासाची जितकी आवड आहे त्यापेक्षां जास्त प्रवासवर्णने वाचण्याची व लिहिण्याची आवड आहे. प्रारंभीं मी केवळ वर्णनात्मक लेख लिहीत असें. ' माझी विजापूरची सफर ' वगैरे शाळकरी पद्धतीचे लेख मी त्यावेळीं लिहीत असें. पुढें ललित पद्धतीचें आकर्षण वाढलें आणि प्रेक्षणीय स्थळें अथवा लोक यांच्या ऐवजी प्रवासांतील गमतीजमतींचीच वर्णनें मी लिहूं लागलों. ' भारताच्या बगीच्यांत ' ही ' ध्रुव ' मासिकांत प्रसिद्ध झालेली माझी लेखमाला अशा प्रकारची होती. परंतु लौकरच या पद्धतींतील दोष मला कळून आला आणि या दोन्ही पद्धतींच्या समन्वयासाठीं मी धडपडूं लागलों. हल्लींचीं माझीं प्रवासवर्णनें या प्रकारची असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं.

' माझा देश माझे लोक 'मधील लेखांची निवड माझे प्रकाशक मित्र श्री. गो. वा. कुलकर्णी यांनीं केलेली आहे. त्यांना वर्णनात्मक लेख विशेष पसंत पडल्यामुळें असेच लेख यांत घेतलेले आहेत. हे सर्व लेख ' केसरी ', ' भवितव्य ', ' ध्रुव ', ' चित्रमयजगत् ', 'नवशक्ति ', ' रविवार सकाळ', ' स्वराज्य ', ' लोकसत्ता ', ' पुरुषार्थ ', ' हंस ', वगैरे नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. चर्चात्मक किंवा विवादात्मक लेख या संग्रहांत घेतलेले नाहींत. तरीपण जातां जातां प्रसंगानुसार वेगवेगळ्या लोकांसंबंधीं माझीं मतें व अनुभव यांचे उल्लेख आलेले आहेत. त्याबाबतींत मला हें सांगितलें पाहिजे कीं कोणत्याहि धर्माच्या, पंथाच्या अथवा प्रांताच्या लोकांबद्दल अनास्था अथवा अनादर दाखविण्याचा माझा हेतु कधींहि नव्हता. फक्त त्या त्या लोकांबद्दल मला काय वाटलें तें मी सांगितलें

आहे. यांतील कांहीं अभिप्राय कदाचित् चुकीचेहि असण्याचा संभव आहे. पण ते लोकहि माझेच आहेत ही भावना मी कधींच दृष्टीआड होऊं दिलेली नाहीं. त्यांच्या ठिकाणीं मला जे दोष दिसले ते मी मोकळ्या मनानें मांडले एवढेंच. त्यांत त्यांना कमी लेखण्याचा मुळींच हेतु नव्हता व नाहीं. म्हणून आपला देश आणि त्यांतील लोक कसे आहेत यासंबंधीं अचूक माहिती जरी या लेखसंग्रहावरून येऊं शकली नाहीं तरी अशा प्रकारची माहिती आपण मिळवावी आणि ती इतरांना सांगावी अशी इच्छा जरी कांहीं लोकांच्या मनांत या पुस्तकामुळें उत्पन्न झाली तरी मी स्वतःला कृतार्थ समजेन.

पृष्ठसंख्येच्या मर्यादेमुळें माझे सर्वच लेख या पुस्तकांत येऊं शकलेले नाहींत. म्हणून याचे आणखी कांहीं भाग काढून त्यांत इतर लेख द्यावेत असा विचार आहे. मराठी वाचकांकडून या संग्रहाचें कसें काय स्वागत होतें यावर पुढील भाग निघणें न निघणें अवलंबून आहे. मी स्वतः मात्र पुष्कळच आशावादी आहे आणि यापुढचे भाग लौकरच निघतील अशी मला आशा वाटते.

माझे बालमित्र नवोदित चित्रकार श्री. शं. धो. आफळे यांनीं मुखपृष्ठावरील सुंदर चित्र काढून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. प्रकाशक श्री. गो. वा. कुलकर्णी यांनीं हा संग्रह काढल्याबद्दल त्यांचाहि मी खूप आभारी आहे. 'भवितव्य'च्या चालकांकडून मिळालेले कांहीं चित्रांचे ब्लॉक या पुस्तकांत वापरले आहेत. त्यांच्या या मेहेरबानीबद्दल मी त्यांचाहि आभारी आहे.

४२ नारायण, पुणें २
२ ऑक्टोबर १९५५

—श्रीपाद जोशी

# शुद्धिपत्र

| पान | ओळ (वरून) | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | ४ | उभ्या | उभ्यानें |
| ८ | २४ | होय ठार | होय = ठार |
| १५ | १७ | प्रमाणें तोंड | प्रमाणें देवाचें तोंड |
| २३ | १३ | मूर्ति पूर्ण | मूर्ति घडावली ती पूर्ण |
| २५ | १३ | आठ | साठ |
| ३१ | १२ | पुण्यवस्तु | पण्यवस्तु |
| ४६ | ७ | आहे | होतें |
| ४९ | ११ | १५६८ | १७५३ |
| ९२ | २० | ते | हें |
| ९४ | १ | हर्शवर्धनाच्या | हर्षवर्धनाच्या |
| ११२ | २१ | ५ इंच लांब ४ फूट | ६ इंच लांब, ५ फूट |
| १४७ | २८ | रवींद्रबाबूंचें | रथींद्रबाबूंचें |
| १५२ | १८ | बलिदेवी | बलिवेदी |
| १५४ | ५ | अबूल फजील | अबुल फजल |
| १५७ | १५ | स्नान आपण | स्नान केल्यानें आपण |
| १६० | २४ | श्री. प्रकाश | श्री. श्रीप्रकाश |
| १६६ | १८ | होता. | होता असें समजतें. |
| १७० | ४ | बौद्ध | बुद्ध |

# श्रीपाद जोशी
यांची
## कांहीं इतर पुस्तकें.

**स्वतंत्र**

सुरंगा ( कादंबरी )
मी पाहिलेले गांधीजी
उर्दू कवितेची तोंडओळख
काजी नजरूल इस्लाम
उर्दूचीं नवरत्नें
उर्दूके अदीब
उर्दू लिपी परिचय

**संपादित**

मराठीं—हिन्दुस्तानी कोश
विद्यार्थी हिंदी—मराठी कोश
जीवन—दीक्षा
सन्तवाणी
सन्तोंका प्रसाद

**भाषांतरें**

बंडखोर आत्मे ( खलील जिब्रान )
सलमा ,,
वेडा ,,
हिरे आणि हिरकण्या ,,
आणि माणसाचा मुडदा पडला ( रामानंद सागर )
उल्लूका पठ्ठा ( विनोदी कथा )

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कन्याकुमारीच्या परिसरांत ... ... | १ |
| २ | हळेबीड व बेलूर ... ... ... | ८ |
| ३ | उडपीचें कृष्णमंदिर ... ... ... | १५ |
| ४ | वेणुर व कारकळ ... ... ... | २२ |
| ५ | केरळांत ... ... ... ... | २७ |
| ६ | तामिळनाडांत ... ... ... | ३४ |
| ७ | बावनगजा ... ... ... ... | ३७ |
| ८ | जगन्नाथपुरी ... ... ... | ४० |
| ९ | कोणार्क ... ... ... ... | ५२ |
| १० | भुवनेश्वर ... ... ... ... | ६५ |
| ११ | साक्षीगोपाळ ... ... ... | ७१ |
| १२ | जय-राजेंद्रांच्या कर्मभूमींत ... ... | ७५ |
| १३ | पावापुरीचें जलमंदिर ... ... ... | ८५ |
| १४ | नालंदा हसतीव सर्व नगरी ... ... | ९० |
| १५ | गया ... .. ... ... | ९७ |
| १६ | बोधगया ... ... ... ... | १०७ |
| १७ | राजगृहांतील अर्धा दिवस ... ... | ११४ |
| १८ | बिहारची राजधानी-पाटणा ... ... | १२२ |
| १९ | बंगालच्या राजधानींत ... ... ... | १२९ |
| २० | तीन स्मारकें ... ... ... | १३७ |
| २१ | शांतिनिकेतन ... ... ... | १४३ |
| २२ | प्रयाग ... ... ... ... | १५० |
| २३ | काशी ... ... ... ... | १५७ |
| २४ | सारनाथ ... ... ... ... | १६३ |

# कन्याकुमारीच्या परिसरांत :

अनुक्रम ...... १

## भारताचें दक्षिण टोंक.

कन्याकुमारी अथवा केपकामोरीन हें भारताचें दक्षिण टोंक. येथून दक्षिणेकडे हिन्दी महासागर सुरू होतो. पूर्वेकडून बंगालचा उपसागर, दक्षिणेकडून हिंदी महासागर आणि पश्चिमेकडून अरबी समुद्र यांचें सुंदर मीलन कन्याकुमारीच्या मंदिरासमोर झालेलें आहे. परंतु या समुद्रांच्या पाण्यांत कांहीं फरक नसल्यामुळें सर्वत्र एकच एक समुद्र पसरलेला आहे असें दिसतें. आपल्या डोक्यांतील नकाशाच्या सहाय्यानें, केवळ कल्पनेनेंच या तीन सागरांचें पृथक् पृथक् दर्शन घ्यावयाचें! आपल्या मनावरील संस्कार इतके सखोल व प्रबल असतात कीं, क्षणभर तीन वेगवेगळे समुद्र प्रेमानें एकमेकांना भेटत असल्याचें दृश्य आपण डोळ्यांनीं पाहूं शकतों. येथें भारताची दक्षिण सीमा संपली. किंबहुना भूमीचें राज्य संपून पाण्याचें साम्राज्य सुरू झालें. शेकडो मैल विस्तार असलेला आपला देश येथें संपला, यापुढें आपलें कांहीं नाहीं या कल्पनेनें मन किंचित् उदास होतें आणि आपल्या लोभीपणाची जाणीव होतांच आपलें आपल्यालाच हसूं येतें. या ठिकाणीं समुद्र खूप खोल असून तो सदैव खवळलेला असतो; यामुळें उघड्या सागरांत पोहण्याची अथवा स्नान करण्याची हिंमत कोणाला होत नाहीं. भाविक भक्तांना समुद्र-स्नानाचें पुण्य लुटतां यावें परंतु जीव गमवावा लागूं नये या हेतूनें कन्याकुमारीच्या देवळासमोर थोड्याशा जागेभोंवती चोहोंबाजूनीं जाडजूड लोखंडी साखळदंड बांधून कुंडासारखी स्नानाची जागा तयार केली आहे. उत्तरेस देवळाच्या पायऱ्यांनीं बनलेला घाट आणि दक्षिणेस पंधरा–वीस फुटावर विवेकानंद खडक नांवाचा भक्कम खडक असल्यानें हिंदी महासागराच्या लाटांचा जोर पुष्कळ कमी झाला आहे. परंतु तरीहि एखादे वेळीं इतकी प्रचंड लाट येते कीं विवेकानंद खडकाला स्नान घालून ती स्नानकुंडांत प्रवेश करते. येथील पाण्याची खोली एक पुरुषापेक्षांहि कमी असल्यानें बुडून मरण्याची भीति फारशी नसते.

परंतु एखाद्या जोराच्या लाटेसरशीं वाहून खोल समुद्रांत जाण्याची शक्यता मुळींच नसते असें नाहीं. लोकांना समुद्रांत पोहण्याची हौस भागवून घेतां यावी यासाठीं येथून जवळच सिमेंट–काँक्रीटचा एक पोहण्याचा तलाव बांधलेला आहे व त्यांत समुद्राचें पाणी खेळतें ठेवलें आहे. तेथें पोहण्याबद्दल प्रत्येकीं चार आणे फी द्यावी लागते. बरेच शोकीन लोक या सोयीचा फायदा घेत असतात.

## लंका कोठें आहे ?

शाळेंत शिकत असतांना हिंदुस्तानच्या थेट दक्षिणेस लंका असल्याचें पाठ केलें होतें. नकाशांतहि कन्याकुमारीच्या भुशिरा समोर थेट दक्षिणेस लंका ऊर्फ सिलोन हें बेट असल्याचें पाहिलें होतें. यामुळें कन्याकुमारी-जवळ उभे राहून दक्षिणकडे पाहिल्यास लंकेंतील सोनें जरी दिसलें नाहीं तरी तिच्या अस्तित्वाचा कांहींतरी मागमूस लागेल अशी भाबडी आशा मनांत होती. परंतु तेथें गेल्यानंतर कळले कीं, कन्याकुमारीपासून थेट दक्षिणध्रुवापर्यंत जमिनीचा लहानसा तुकडादेखील समुद्राच्या पृष्ठभागावर नाहीं. लंका हिंदुस्थानच्या पूर्णपणें दक्षिणेस नसून किंचित् आग्नेयेस आहे. तिला जोडणारी सामुद्रधुनी रामेश्वराजवळ आहे. आणि रामेश्वर हें ठिकाण दक्षिणेस नसून आग्नेयेस, मदुरेच्या थेट पूर्वेसें आहे. आम्ही मदुरेहून दक्षिणेस शे–दीडशे मैल आलों होतों. येथून लंकेकडे जाण्यासाठीं मार्ग नाहीं. रामेश्वर, लंका व कन्याकुमारी यांची निश्चित स्थानें या दाक्षिण भारतांतील दौऱ्यानें लक्षांत आलीं हाहि एक लाभच म्हटला पाहिजे. येथून उत्तर ध्रुवाचें दर्शन घेणेंहि महत्त्वाचें आहे. कारण ही जागा विषुववृत्ताला जवळ असल्यानें ध्रुवतारा क्षितिजापासून फारच थोड्या अंतरावर दिसतो. कन्याकुमारीपासून कांहीं मैल दक्षिणेस समुद्रांत गेल्यास ध्रुवतारा मुळींच दिसणार नाहीं.

## कन्याकुमारीची सुंदर मूर्ति

समुद्राच्या अगदीं कांठावर कन्याकुमारीचें विशाल मंदिर आहे. दक्षिणेकडील इतर मंदिरांच्या तुलनेनें हें मंदिर अगदींच सामान्य आहे, परंतु त्याचें भौगोलिक स्थान हें त्याच्या माहात्म्यास कारणीभूत आहे.

या मंदिरांतील कुमारीची मूर्ति काळ्या दगडाची आहे. परंतु तिला चंदन लावल्यामुळें ती गोरीपान दिसत होती. तिचा मोहक व हंसरा चेहरा फारच सुंदर दिसतो. तिच्या उजव्या हातांत टपोऱ्या मण्यांची माळ (किंवा पुष्पहार) असून ती उभ्या जप करीत आहे. देवीच्या दर्शनासाठीं आंत जातांना सर्व शिवलेले कपडे बाहेर काढून ठेवून जावें लागतें. फक्त धोतर व उपरणें एवढेंच अंगावर ठेवतां येतें. ही वस्त्रें जवळ न बाळगणाऱ्या प्रवाशाला दर्शनासाठीं जाणें कठीण होऊन बसतें.

## एक आख्यायिका

कन्याकुमारीविषयीं अशी आख्यायिका आहे कीं भगवान् शंकर देवी पार्वतीसहित कैलास पर्वतावर राहत असतां मयासुराची पत्नी पुष्पकाशी हिनें शंकराची आराधना केली. आपल्या आनंदाश्रूंचा अभिषेक केला, स्मिताचें पुष्प, श्वासोच्छ्वासाचें चंदन, शरीराच्या सुवासाचा धूप, मधुर वचनांचा नैवेद्य व दृष्टींचा दीप बनवून तीन युगें तिनें शंकराची पूजा केली, तेव्हां शंकरानें तिला विचारलें, "मुली, तुला काय हवें? तूं हवा तो वर माग." त्यावर पुष्पकाशीनें उत्तर दिलें, "हे भगवान्! सृष्टीच्या संहारकाळीं आपल्याबरोबर क्रीडा करण्याचें सुख मिळावें अशी माझी इच्छा आहे. तेवढी आपण तृप्त करावी." त्यावर 'तथास्तु!' असें म्हणून शंकरानें वर दिला आणि सांगितलें, "तीनशें पासष्ट दिवसांचें एक वर्ष होतें. चार लाख तेहतीस वर्षांचें कलियुग बनतें. त्याच्या दुप्पट वर्षांचें द्वापर युग, त्याच्या दुप्पट वर्षांचें त्रेता युग आणि त्याच्या दुप्पट वर्षांचें एक चतुर्युग बनतें. अशा प्रकारचीं दोन हजार चतुर्युगें लोटलीं कीं ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. अशा तीस दिवसांचा एक महिना व बारा महिन्यांचें वर्ष होतें, अशीं शंभर वर्षें झालीं म्हणजे प्रलय होईल. अशा दहा प्रलयांनंतर एक विष्णु जन्म घेतो. असे बारा विष्णु जन्मास येऊन निजधामास गेले म्हणजे तो शिवाचा एक क्षण बनतो. हा क्षण म्हणजेच सर्व संहाराची वेळ. त्यावेळीं आपण दोघे क्रीडा करूं. तोंपर्यंत तूं दक्षिण समुद्राच्या काठीं तपस्या करीत राहा.' शंकराची ही आज्ञा शिरसावंद्य मानून पुष्पकाशी दक्षिण समुद्राच्या कांठावर येऊन तपस्या करूं लागली.

त्याकाळीं बाणासुर नांवाचा दैत्यांचा राजा अत्यंत प्रबळ होता. त्याच्या गुप्तचरांनीं पुष्पकाशीच्या सौंदर्याची प्रशंसा त्याच्याजवळ करतांच तो त्या ठिकाणीं गेला व त्यानें प्रथम लाडीगोडीनें व नंतर जबरदस्तीनें पुष्प-काशीला वश करून घेण्याचा प्रयत्न चालविला; परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. अखेर त्याच्याशीं युद्ध करून पुष्पकाशीनें त्याला यमसदनास पाठविलें व ती फिरून तपश्चर्या करीत उभी राहिली. तीच ही कन्याकुमारी!

## सूर्यास्ताचें अप्रतिम दृश्य

कन्याकुमारीचें धार्मिक महत्त्व बरेंच असलें तरी या स्थानाचें खरें महत्त्व येथील सूर्योदय व सूर्यास्त पाहण्यामध्यें आहे. दरसाल हजारो लोक सूर्योदय–सूर्यास्त–दर्शनाचें सुख लुटण्यासाठींच कन्याकुमारीला जात अस-तात. मी या भागांत प्रवासाला जात आहे हें कळतांच माझे मित्र कवि बोरकर मला म्हणाले, ‘ तुम्ही कन्याकुमारीला तर जालच, परंतु तेथील सूर्योदय व सूर्यास्त पाहतां येईल अशा तयारीने जा. निदान सूर्योदय किंवा सूर्यास्त यांपैकीं एक तरी तुम्ही अवश्य पाहिलाच पाहिजे. ’ त्या-प्रमाणें आम्ही सूर्यास्ताची वेळ गाठून कन्याकुमारीस पोचलों.

परंतु निरभ्र क्षितिजावरील सूर्योदय पाहण्याचें भाग्य फारच थोड्यांना लाभतें. आमचेंहि भाग्य फारसें नीट नव्हतें. यामुळें ऐन सूर्यास्ताच्या क्षणीं क्षितिजाजवळ ढग जमले आणि काळ्याभोर ढगांच्या जाड थरानें सूर्याला पूर्णपणें आच्छादून टाकलें. आम्ही सगळेजण अगदीं निराश झालों आणि हळहळूं लागलों; परंतु इतक्यांत आमच्या लक्षांत आलें कीं, त्या जाड थराचा मधला भाग पुष्कळच पातळ आहे आणि कदा-चित् आम्हांला सूर्यास्त दिसूंहि शकेल म्हणून आम्ही पुन: आशेनें तिकडे पाहूं लागलों आणि खरोखरीच थोड्या वेळांत एखाद्या झिरझिरीत काळ्या कपड्यांच्या बुरख्याआडून सोनचाफ्याच्या फुलासारखा रंग अस-लेलें सुंदर मुख दिसावें तसा सूर्य दिसूं लागला. नेहमींच्या सूर्यास्ताकडे पाहतांना डोळे थोडे तरी दिपतात, परंतु आज सूर्य काळ्या चष्म्यांतून पाहिल्यासारखा दिसत होता. कांहीं मिनिटांनीं क्षितिजाजवळील थरहि पातळ झाला आणि सोन्याच्या घागरीप्रमाणें सूर्य समुद्रांत बुडी मारूं

लागला. ती सूर्याची घागर भोवऱ्याप्रमाणें स्वतःभोवतीं फिरत इंचाइंचानें समुद्रामध्यें अंतर्धान पावत होती. ढगांचा पातळ पडदा असल्यामुळें सूर्याचे किरण पाण्यावर चमकत नव्हतें; यामुळें सूर्यास्ताच्या दर्शनांत तेवढाहि अडथळा होत नव्हता. आपण चित्रकार अथवा कवि नाहीं, याबद्दल मला आज हळहळ वाटली तितकी यापूर्वीं कधींहि वाटली नव्हती. आजच्या सूर्यास्ताचें हुबेहूब चित्र रेखाटणाऱ्या चित्रकारानें कदाचित् या एकाच चित्राच्या जोरावर जागतिक कीर्ति मिळविली असती. भारतीय संसदेचे माजी केरळीय सभासद श्री. शिवन् पिल्ले हे आमच्या बरोबर होते. ते तेथून जवळच एका खेड्यांत राहतात. ते म्हणाले, ' मी आजपर्यंत शेकडो सूर्यास्त पाहिले आहेत. परंतु आजच्या इतकें अद्भूत नि मोहक दृश्य मला आजवर कधींच पाहावयाला मिळालें नाहीं. ' इतका सुंदर सूर्यास्त आपल्याला पाहावायस मिळाला याबद्दल आम्ही सर्वजण अत्यंत संतुष्ट झालों.

## सूर्यदर्शनांतील वैशिष्ट्य

वस्तुतः दररोज भारताच्या सर्वच पूर्व किनाऱ्यावर सूर्योदय आणि पश्चिम किनाऱ्यावर सूर्यास्त यांचें दर्शन होत असतें. त्यामुळें येथील सूर्योदय व सूर्यास्त यांचा इतका बडिवार कशाला ? असें कोणालाहि वाटण्याचा संभव आहे. त्याचें उत्तर असें कीं, पूर्व किनाऱ्यावर समुद्रांतील सूर्यास्त दिसत नाहीं आणि पश्चिम किनाऱ्यावरील भागांत समुद्रस्नान करून पावन झालेल्या सूर्याचें दर्शन होत नाहीं. कन्याकुमारीला सूर्योदय व सूर्यास्त दोन्ही दिसतात. इतकेंच नव्हे तर पौर्णिमेच्या दिवशीं पश्चिमेकडे जलस्नानासाठीं खालीं उतरणारा सूर्य आणि पूर्वेकडून समुद्रस्नान करून ओलेत्यानें वर येणारा पूर्णबिंब चंद्र दोन्ही एकाच वेळीं दिसूं शकतात हें या स्थानाचें वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारचें दृश्य जगांत कोठेंहि दिसत नाहीं असें म्हणतात. कदाचित् ही थोडी अतिशयोक्ति असली तरी निदान हिंदुस्तानांत अन्यत्र असें दृश्य दिसूं शकत नाहीं हें खरें. शिवाय पूर्वापार परंपरेनें चालत आलेली व जन्मजात संस्कारांनीं पोसलेली एक विशिष्ट भावना आम्हां भारतीयांच्या मनांत या स्थानाविषयीं अद्भुत

आकर्षण व आपलेपणा निर्माण करतें ही गोष्टहि महत्त्वाची आहे.

## समुद्रांत गोडें पाणी

कन्याकुमारीच्या मंदिरापासून पश्चिमेस सुमारें अर्ध्या मैलाच्या अंतरावर एका विशिष्ट ठिकाणीं समुद्राच्या कांठीं हातांनीं उकरल्यास गोडें पाणी मिळतें असें श्री. शिवन् पिल्ले यांनीं आम्हांला सांगितलें व म्हणून आम्ही त्यांना बरोबर घेऊन त्या ठिकाणीं गेलों. श्री. पिल्ले यांचें बालपण या भागांत गेल्यामुळें त्यांना येथील खडान्‌खडा माहिती आहे. त्यांच्याशिवाय इतरांना कोणालाच ती जागा माहीत नव्हती अथवा तेथें गोडें पाणी आहे याची कल्पनाहि नव्हती. आम्ही त्या ठिकाणीं जाऊन स्वतः हातांनीं वाळू उकरून पाणी काढलें. सुमारे चारपांच इंच खोल जातांच किनाऱ्या-कडील बाजूनें झुळूझुळू पाणी येऊं लागलें. चाखून पाहातां नदीच्या पाण्याइतकेंच तें गोड आहे असें आम्हांला आढळून आलें. परंतु थोड्याच वेळांत समुद्राकडील भागांतून खारे पाणी तेथें आलें आणि सर्व झऱ्याचें पाणी खारट झालें. भरतीच्या वेळीं हा भाग पाण्याखालीं बुडून जातो. तरी तेथें गोडें पाणी सांपडते ही विशेष गोष्ट आहे. येथून कांहीं मैलांवर असलेल्या शुचींद्रांच्या मंदिरांतील तें तीर्थ आहे असें भाविक लोक समजतात.

आम्हांला येथील सूर्योदय पाहण्याइतकी सवड नव्हती. म्हणून दुधाची तहान ताकावर भागवावी या हेतुनें आम्ही येथील चंद्रोदय पाहावयाचें ठरविलें. फाल्गुन वद्य द्वितीया असल्यामुळें वस्तुतः सुंदर चंद्रोदयाचें दर्शन घडण्यास कांहींच हरकत नव्हती. परंतु सूर्यास्ताच्या दर्शनामुळें आम्हांला जो अपार आनंद लाभला होता त्याचा हेवा वाटूनच कीं काय, ढगांनीं चंद्राची अगदीं कडेकोट नाकेबंदी केली आणि तो क्षितिजापासून कासराभर वर येईपर्यंत आम्हांला दिसू शकला नाहीं. तेव्हा सूर्यास्ताचें दृश्य पुनः पुनः नजरेसमोर घोळवीत आम्ही परत फिरलों.

## शुचीन्द्र

कन्याकुमारीहून परत येत असतां वाटेंत शुचींद्र या ठिकाणीं स्थाणु-नायर देवाचें ( विष्णुचें ) भव्य मंदिर पाहिलें. अहिल्येच्या भानगडींत इंद्राला शाप मिळाला तेव्हां त्यानें येथें येऊन तपश्चर्या केली व तो शुद्ध

झाला म्हणून या स्थानाचें नांव शुचींद्र ( शुचि+इंद्र ) पडलें असें म्हणतात. हें मंदिर फार सुंदर आहे आणि या ठिकाणचे दगडांतील कोरीव काम अप्रतिम आहे. मारुती व गणपति यांच्या पंधरा ते वीस फूट उंचीच्या दगडी मूर्ती येथें आहेत. येथील खांबहि अत्यंत आकर्षक आहेत. एका दगडामध्यें कोरलेल्या एका भव्य खांबामध्यें कांहीं लहान लहान खांब कोरले आहेत. त्यांच्यावर आघात करतांच त्यांतून जलतरंगासारखा मधुर ध्वनि निघतो. दुसऱ्या एका दगडी खांबामध्यें कोरलेल्या हत्तीच्या तोंडांत एक वाटोळा दगड आहे. तो तोंडांतल्या तोंडांत गोल गोल फिरतो; परंतु बाहेर येत नाहीं. याचा अर्थ तो तसा तोंडांत ठेवूनच ती मूर्ति कोरलेली आहे. अशा प्रकारें मनाला थक्क करणाऱ्या कारागिरीचे अनेक नमुने या मंदिरांत पाहावयास मिळतात. आम्ही मंदिरांत पोंचलों त्या वेळीं मंदिर बंद होण्याची वेळ झाली होती, यामुळें आम्हांला घाईघाईनेच सर्व पाहून घ्यावें लागलें. परंतु तेथील दगडावरील नक्षीकामानें तेवढ्या त्या अल्प वेळांतहि आमच्या मनावर कायम टिकणारी छाप पाडली यांत मुळींच संशय नाहीं.

★ ★ ★

# हळेबीड व बेलूर : २

वस्तुत: आम्ही तमिळनाड व केरळच्या दौऱ्यासाठीं गेलों होतों, यामुळें कर्नाटकांतील प्रेक्षणीय स्थळें पाहण्याची संधि लाभेल अशी मला कल्पना नव्हती. आम्ही तिरुपुरहून बेंगळूरला ता. २३ मार्च १९५२ ला सकाळीं पोचलों. त्या दिवशीं रविवार असल्यामुळें तेथें कांहींच पाहतां येणार नव्हतें. रविवारीं म्हैसूरच्या उद्यानांत रोषणाई केली जाते, यामुळें कृष्णराज सागर व म्हैसूर पाहण्यास जावें असा एक विचार सुचला; परंतु त्यासाठीं बराच खर्च येणार होता आणि वेळहि पुरला नसता म्हणून सहजासहजी पाहतां येण्यासारखीं दोन स्थळें पाहून घ्यावयाचें ठरलें. बेंगळूरहून आम्हीं सर्वजण सकाळीं साडेनऊच्या एक्सप्रेसनें निघालों आणि अर्सीकेरी या स्टेशनवर दुपारीं १-३० ला पोचलों व मोटारीनें हळेबीडकडे रवाना झालों.

## होयसळेश्वर

गचाळ रस्ते, मोटारींतील भयंकर गर्दी आणि त्यांचा चीड येण्याइतका अनियमितपणा यामुळें अर्सीकेरीहून चिकमंगळूरपर्यंतच्या सुमारें सत्तर मैलाच्या प्रवासानें आम्हांला अगदीं रडकुंडीस आणलें; परंतु हळेबीड व बेलूर या ठिकाणचें अप्रतिम शिल्प पाहून आम्ही लौकरच प्रवासाचा शीण विसरून गेलों आणि त्या सुंदर कलाकृतींचा सुगंध आमच्या मन:पटलावर दरवळत राहिला.

अर्सीकेरीहून हळेबीड ३५ मैल आहे. आम्ही तेथें सायंकाळीं पोंचलों. येथील होयसळेश्वराचें भव्य मंदिर अतिप्रेक्षणीय आहे. कर्नाटकच्या होयसळ राजांनीं तें बांधलेलें आहे. होयसळ या शब्दाची उत्पत्ति मोठी मजेशीर आहे. या राजघराण्यांतील पहिल्या पुरुषाचें नांव सळ असें होतें. त्याच्या आईनें त्याला धीट बनविलें आणि एका प्रसंगीं त्याला एका सिंहाला ठार मारण्यास सांगितलें. (होय ठार मार!) 'हे सळा, सिंहाला ठार मार.' त्याप्रमाणें सळानें सिंहाशीं झुंज खेळून त्याला ठार मारलें. त्यावरून त्याच्या घराण्याला होयसळ असें नांव पडलें. हा

मूळपुरुष सिंहाशीं झुंज खेळत असल्याचीं लहान मोठीं शिल्पें हळेबीड व बेलूर या दोन्ही ठिकाणीं पाहावयास मिळतात.

## अश्लील चित्रें

या मंदिराचे दोन भाग आहेत. दोन्हीं भागांत प्रत्येकीं एकेक शिव-लिंग आहे आणि त्याच्या समोरच्या मंडपांत एकेक नंदी आहे. हे दोन्ही नंदी बसलेले असून त्यांपैकीं उत्तरेकडे असलेल्या नंदीची उंची सुमारें आठ फूट असून, दक्षिणेकडील नंदीची उंची सुमारें बारा फूट आहे. आपण उभे राहिलों असतां लहान नंदीच्या नाकपुडीपर्यंत व मोठ्या नंदीच्या तोंडापर्यंत आपला हात पोचतो. या दोन्ही नंदीच्या मूर्ति अत्यंत प्रमाणबद्ध व मोहक आहेत. त्या पाहतांना त्या सजीव असल्याचा भास होतो. उत्तरेकडील दरवाजानें प्रवेश करतांच समोर उजव्या बाजूला आठ हातांचा गणपति आहे आणि डाव्या बाजूला एक दीड फूट रुंद व आठ दहा फूट लांब पट्टी आहे. तिच्यावर अश्लील स्वरूपाचीं चित्रें आहेत. समोरच्या बाजूसच अशा प्रकारचीं असभ्य व किळसवाणी चित्रें कां कोरलेलीं असावींत याची कांहीं कल्पना येत नाहीं. बाहेरील सुंदर शिल्पाला कोणाची दृष्ट लागूं नये म्हणून त्यांना हें गालबोट लावलेलें असावें. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं मंदिराच्या निम्म्या म्हणजे पूर्वभागांतच अधुनमधून हीं अश्लील चित्रें आहेत व दुसऱ्या अर्ध्या म्हणजे पश्चिम भागांत मोठमोठीं शिल्पें आहेत.

## पट्ट्यांवरील कोरींव काम

मंदिराचा सारा बाह्य भाग लहानमोठ्या मूर्तींनीं भरलेला आहे. सुमारें एक दीड फूट रुंदीच्या पट्ट्या देवळाच्या सभोवार आहेत. त्यांतील पहिल्या पट्टींत हत्तींची रांग आहे. हजारो हत्ती ओळीनें एकामागून एक चालले आहेत; परंतु प्रत्येकाची “ पोझ ” स्वतंत्र आहे. त्याच्यावरील पट्टींत सिंह आहेत, त्यावर घोडेस्वार, त्यावर नृत्य, वाघ किंवा युद्ध, त्यावर मोर अशा प्रकारच्या एकूण बारा पट्ट्या आहेत. येथील कोरींव काम अत्यंत बारीक व कलापूर्ण आहे. दागदागिने व स्त्रियांच्या केश-रचना यांच्या इतक्या पद्धति (फॅशन्स) याठिकाणीं पाहावयास मिळतात

कीं आधुनिक तरुणीनाहि त्या आत्मसात् करण्याचा मोह व्हावा. चौथ्या किंवा पांचव्या पट्टीमध्यें पौराणिक चित्रें आहेत. भागवतापासून सुरुवात करून महाभारत, रामायणापर्यंत चित्रें कोरलेलीं आहेत. त्यांपैकीं समुद्र-मंथन, अभिमन्युवध, रणक्षेत्रावरील श्रीकृष्णार्जुन, अनंतशयनम्, विष्णु-लक्ष्मीला घेऊन जाणारा गरुड, गोवर्धनधारी श्रीकृष्ण वगैरे चित्रें मोठीं सुंदर आहेत. मंदिराच्या दक्षिणेस मंदिरापासून वेगळा ठेवलेला एक सुंदर गणपति असून त्याच्यासमोर होयसळ राजवंशाचा आदिपुरुष सिंहाला मारीत असल्याचें चित्र आहे.

## गजचर्मांबरधारी शिव

मंदिराच्या पश्चिम भागांत जीं मोठीं शिल्पें आहेत त्यांतील अर्जुनाचा मत्स्यवेध, वीणाधारी सरस्वती, ऐरावतावरील इंद्रइंद्राणी, वगैरे चित्रें अत्यंत प्रमाणबद्ध व भावप्रदर्शक आहेत. गजासुराचा नाश करून त्याच्या कातड्याच्या पार्श्वभूमीवर नृत्य करणाऱ्या शिवाचें चित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. या चित्रांतील हत्तीचें मुंडकें तळाशीं असून चारहि बाजूस चार पाय दिसतात; यामुळें तें मेलेल्या हत्तीचें कातडें आहे हें चटकन् लक्षांत येतें. या शिवाला गजचर्मांबरधारी शिव म्हणतात. हें चित्र आपल्याकडे सहसा आढळत नाहीं. महिषासुरमर्दिनी, नृसिंहावतार, वामनावतार वगैरे चित्रें आपल्या नेहमीच्या परिचयांतील आहेत. परंतु वामनावताराचें चित्र अत्यंत वास्तवतापूर्ण आहे. वामनाने एका पावलाने स्वर्ग व्यापिलेला आहे आणि दुसऱ्याने भूमि व्यापिलेली आहे. एका कोपऱ्यामध्यें सम्राट बळी नम्रपणें गुडघे टेकून नमस्कार करीत आहे. बळी पाताळामध्यें गेला आहे हें दाखविण्यासाठीं समुद्राचें दृश्य कोरलेलें आहे. त्यांतील तरंगणारे लहान लहान मासे समुद्राचा जिवंत आभास निर्माण करतात. याच विषयावरील दुसऱ्या एका चित्रांत असें दाखविण्यांत आलें आहे की, लंगोटी नेसलेल्या छोट्या वामनाच्या हातावर वैभवशाली बळीराजा झारींतील पाण्यानें उदक सोडीत आहे आणि देवांच्या कपटनीतीला पूर्णपणें ओळखून असणारा दैत्यगुरु शुक्राचार्य हताशपणें त्याच्याकडे पाहत आहे. वामनपंडितानें आपल्या काव्यामध्यें अमर केलेला हा प्रसंग

अनुक्रम
दिनांक

महाराष्ट्रापासून इतक्या दूर अंतरावर चित्रबद्ध झालेला पाहून मनाला विशेष आनंद झाला. डोक्यावर कैलासपर्वत घेऊन शिवाला प्रसन्न करण्यासाठीं नृत्य करणाऱ्या रावणाचें चित्रहि अत्यंत भव्य व भावपूर्ण आहे. अनंतशयनम् शेषशाई विष्णूची मूर्तिहि मोठी मोहक आहे. अशा प्रकारें या मंदिराचा बाहेरील भागच अत्यंत प्रेक्षणीय आहे. आंतील बाजूस मोठमोठे खांब आणि छतामध्यें कोरलेली देवादिकांची सुंदर चित्रें आहेत. नंदीप्रमाणेंच शिवलिंगेंहि खूप मोठी व भव्य आहेत. सध्या हें मंदिर वैराण अवस्थेंत आहे. तरीपण किंवा त्यामुळेंच येथें अस्वच्छता मात्र दिसत नाहीं.

## बस्तीहळ्ळी

हळेबीडपासून अर्ध्या मैलावर बस्तीहळ्ळी नांवाचें एक खेडें आहे. बस्ती म्हणजे जैन मंदिर आणि हळ्ळी म्हणजे खेडें. बस्ती हळ्ळी म्हणजे जैन मंदिर असलेलें खेडें. येथील जैन मंदिरांत अनुक्रमें तेरा व पंधरा फूट उंचीच्या शांतिनाथ व पार्श्वनाथ या तीर्थंकरांच्या दोन दिगंबर मूर्ति आहेत. त्यांचीं मंदिरेंहि वेगवेगळीं आहेत. त्यांपैकीं पार्श्वनाथाच्या मंदिराचे खांब सामान्य माणसाला थक्क करून सोडणारे आहेत. ते खांब इतके गुळगुळीत व तुळतुळीत आहेत कीं, त्यावर पाण्याचा बोळा फिरविल्यास त्यांत आरशांतल्याप्रमाणें आपलें स्पष्ट प्रतिबिंब दिसतें. असे पांचसहा खांब तेथें आहेत. त्यांपैकीं एका खांबांतील प्रतिबिंब नेहमीच्या साध्या आरशाप्रमाणें असतें. दुसऱ्या खांबापुढें उभे राहिल्यास एकाच वेळीं पाण्यांत पडलेल्या झाडाच्या प्रतिबिंबासारखी खालीवर झालेली प्रतिबिंबें दिसतात. तिसऱ्या खांबासमोर उभे राहून विशिष्ट पद्धतीनें हात हलविल्यास माणसाची आकृति अदृश्य होऊन केवळ दोन नाग खालीं डोकें करून वळवळत पाण्यामध्यें नृत्य करीत असल्याचा भास होतो. चौथ्या खांबासमोर उभे राहिल्यास आपले फक्त हात व पाय दिसतात; मधलें शरीर दिसत नाहीं. अशा प्रकारें प्रत्येक खांबाचें कांहीं ना कांहीं वैशिष्ट्य आहे.

## बेलूरचें चन्नकेशवमंदिर

हळेबीडहून दहा मैलांवर असलेल्या बेलूर या गांवीं आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडेदहा वाजतां पोचलों. येथील सुप्रसिद्ध चन्नकेशव-

मंदिर शिल्पकलेच्या बाबतींत अप्रतिम समजलें जातें. हळेबीडचे देऊळ शैवांचें असून बेलूरचें वैष्णवांचें आहे. प्रवेशद्वारावरील गोपुर मदुरेच्या मीनाक्षी–मंदिराभोंवतीच्या गोपुरांप्रमाणें भव्य आहे. दक्षिणेकडील अत्यंत श्रीमंत मंदिरापैकीं हें एक आहे. हजारो लाखो रुपयांचे दागदागिने व जडजवाहीर देवाच्या अंगावर असल्यामुळें त्याला भरभक्कम कुलपें असलेल्या जाडजूड दरवाजाच्या आंत बंदिस्त करून ठेवलेलें आहे. ठरावीक वेळाव्यतिरिक्त देवाचें दर्शन घ्यावयाचें म्हणजे पुजाऱ्याला भरपूर बक्षिसी द्यावी लागते.

या मंदिराच्या बाहेरील भिंतीवरील पुष्कळशीं चित्रें, उदाहरणार्थ कैलास पर्वत डोकीवर घेऊन नाचणारा रावण, नृसिंहावतार, गजचर्मांबरधारी शिव, शेषशायी भगवान् वगैरे पाहण्यास मिळालीं; परंतु येथील चित्रांमध्यें कोमलता व मार्दव हीं जास्त आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे येथें अश्लील चित्रें मुळींच आढळलीं नाहींत. कदाचित् शैव (शाक्त) व वैष्णव पंथीयांच्या नैतिक दृष्टिकोनामधील हा फरक असावा. या मंदिरांत नृत्याचीं व हावभावाचीं अनेक दृश्यें आहेत. शंखिनी, पांझनी, डाकिनी व नागिनी या चार प्रकारच्या स्त्रियांचीं चार अप्रतिम सुंदर शिल्पें देवळाच्या आंतील बाजूस आहेत. त्यांच्या हातांतील बांगड्या, डोकींतील फूल वगैरे आभरणें इतक्या कुशलतापूर्वक कोरलेलीं आहेत कीं, तीं खरोखरीच्या दागिन्यांप्रमाणें हलतात. छतामध्यें कोरलेलीं धार्मिक अवतारांचीं चित्रेंहि या मंदिरांत आहेत.

होयसळ राजा विष्णुवर्धन यानें सुमारें नऊशें वर्षांपूर्वीं हें मंदिर बांधलें. तें पूर्ण होण्यास एकशेतीन वर्षें लागलीं असें म्हणतात; आणि त्याचा एकूण व्याप व भव्यता पाहतां हा अवधीहि अल्पच वाटतो. जकणाचारी व डकणाचारी या पितापुत्राकडे या मंदिराच्या शिल्पकलेचे श्रेय जातें. कांहीं लोकांच्या मतें या दोन व्यक्तींनीं हीं मंदिरें बांधलेली नसून त्यांच्या परंपरेंतील शिष्यांनीं तीं बांधलीं असावींत.

## हरिजनांना मंदिर–प्रवेश

या मंदिराच्या उत्पत्तीविषयीं अशी कथा सांगतात कीं, वेला व चैला

नांवाचे दोन परम भगवद्भक्त होते. त्यांच्या भक्तीवर संतुष्ट होऊन परमेश्वरानें त्यांच्या स्वप्नांत येऊन असें सांगितलें कीं, ‘माझ्या दर्शनासाठीं तुम्हांला कोठें जावें लागूं नये म्हणून मी स्वतःच तुमच्याकडे येत आहे;’ आणि होयसळ राजा विष्णुवर्धन याच्या स्वप्नांत जाऊन देवानें त्याला असा आदेश दिला कीं, ‘वेला व चेन्ना यांच्या मालकीच्या जागेवर तूं माझें देऊळ बांधून माझी प्राणप्रतिष्ठा कर.’ त्याप्रमाणें त्या ठिकाणीं मंदिर बांधण्यांत आलें आणि हरिजनांच्या या भगवद्प्रेमाची कदर करण्यासाठीं वर्षांतून दोन-तीन वेळां सर्व हरिजनांस मंदिरांत प्रवेश करण्यास परवानगी देण्यांत आली. आतां कायद्यानें सर्वांनाच मंदिरांत जातां येतें; परंतु पूर्वींहि ठरावीक दिवशीं हरिजनांना मंदिरांत जाऊन देवदर्शन घेतां येत असे. चेन्नाच्या नांवावरून देवानें आपलें नांवहि चेन्नकेशव किंवा चन्नकेशव असें ठेवून घेतलें आणि वेलाच्या नांवावरून त्या गांवाला वेलूर (ऊरु-गांव) किंवा बेलूर असें म्हणूं लागले. या भक्तांची स्मृति कायम राहावी म्हणून देवळाच्या भिंतीवरील चित्रांमध्यें समोरच्या बाजूसच एका मृत पशूला वाहून नेणाऱ्या चेन्ना व वेला यांचेंहि एक लहान चित्र कोरलेलें आहे.

## मोहक शिल्पकृति

या मंदिरांतील सर्वांत मोठें आकर्षण म्हणजे निरनिराळ्या स्थितींतील स्त्री-पुरुषांच्या मोहक व सजीव प्रतिमा होय. आरशांत पाहून सौंदर्य-प्रसाधन करणारी रमणी, जिच्या ओल्या केसांच्या शेंड्यावर बारीक बारीक थेंब गोळा झाले आहेत अशी स्नान करून बाहेर आलेली तरुणी, शिकारी नृत्य करणारी नवयौवना वगैरे चित्रें अत्यंत भावपूर्ण आहेत. त्या सर्वांत अधिक प्रभावशाली असें एक शिल्प तेथें आहे. त्याचा मनावर उमटलेला ठसा कधींच पुसणें शक्य नाहीं. एक सुंदर तरुणी स्नान केल्यानंतर वस्त्र नेसूं लागतें. इतक्यांत त्यांत एक भयंकर विषारी विंचू असल्याचें तिला दिसतें. त्याबरोबर भीतीनें ती वस्त्र झटकते व खालीं पडलेल्या विंचवाकडे पाहूं लागते. या चित्रांतील स्त्रीचें प्रमाणबद्ध शरीर, खालीं पडलेला विंचू व तिच्या डोळ्यांतील भेदरटपणा या गोष्टी प्रेक्षकांच्या मनांत ठसून राहतात.

इतर अनेक नाजूक व सूक्ष्म कलाकुसरीचीं चित्रें येथें आहेत. एका चित्रांतील चिंचोक्याएवढ्या फणसावर बसलेली सूक्ष्म माशी अगदीं हुबेहूब जिवंत माशीसारखी भासते. स्मित करणाऱ्या युवतीच्या मुखांतील कुंद-कळ्यासारखे नाजूक दांतहि आपण पाहूं शकतो. एका मूर्तीच्या वेग-वेगळ्या अंगांवर हलका प्रहार केल्यास सप्त स्वर निघतात तर दुसऱ्या एका दगडी खांबांतून धातूच्या खांबासारखा आवाज निघतो. यांतील दोन शिल्पें पुरुषांचीं असून ते नृत्य करीत आहेत. येथील नृत्याच्या 'पोझेस' शिकण्यासाठीं उदयशंकर व रामगोपाल हे जागतिक कीर्तीचे नर्तक येऊन गेले व येथील नृत्यसौंदर्यानें वेडावून गेले असें सांगतात.

या देवळाच्या आवारांतील इतर चिल्लर देवळें काढून टाकल्यामुळें या मंदिराच्या भव्यतेंत व विशालतेंत भरच पडली आहे. देवस्थान खूप श्रीमंत असल्यामुळें मंदिराची व्यवस्थाहि समाधानकारक आहे. स्वच्छता व टापटीप यामुळें नास्तिक मनालाहि येथें प्रसन्नता वाटेल.

★ ★ ★

# उडुपीचें कृष्णमंदिर : ३

सबंध हिंदुस्थानांत हॉटेलें आणि खानावळी चालविण्यांत प्रसिद्ध असलेल्या उडुपी ब्राह्मणांचें हें गांव आहे. येथील श्रीकृष्णाचें देवालय फार प्रसिद्ध आहे. देवाच्या मूर्तीवर इतके दागिनें अलंकार घातलेले असतात कीं मूर्तीचें सौंदर्य सामान्य डोळ्यांना दिसतच नाहीं. सबंध मंदिरांत ब्राह्मणांचें राज्य चालत आहे. दर दोन वर्षांनीं मंदिराचा स्वामी बदलत असतो. तोच या मंदिराचा मुख्य अधिकारी. तो जेव्हां देवाला प्रदक्षिणा घालतो तेव्हां त्याचा एक शिष्य पेटलेली मशाल हातांत धरून त्याच्यापुढें चालत असतो. वाटेंतील लोकांना दूर होण्याची सूचना म्हणून तो तोंडानें 'हूं ऽ, हूं ऽ' असें करीत असतो. त्याच्या त्या हुंकारमधून इतका दर्प, इतकी घमेंड आणि इतरांविषयीं इतकी तुच्छता व्यक्त होत असते कीं तो ऐकून कोणाहि सामान्य माणसाला चीड व किळस यावी.

मंदिराच्या समोरच्या बाजूस एक लहानसें तळें असून तें चोहोंबाजूनीं दगडांनीं बांधलेलें आहे. या तळ्यांतील पाणी हिरवट असल्यामुळें त्यांत स्नान करण्याची इच्छा स्वच्छताप्रिय माणसाला सहसा होत नाहीं. या तळ्याचें नांव 'मध्यसरोवर' आहे.

मंदिराचें प्रवेशद्वार पूर्वेंच्या बाजूस आहे; परंतु सर्वसामान्य देवळांप्रमाणें तोंड मात्र दरवाजाकडे नसून पश्चिमेच्या बाजूस आहे. याचें कारण असें सांगतात कीं फार वर्षांपूर्वी कनकदास नांवाचा एक अस्पृश्य संत श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी उत्तर कर्नाटकांतून येथें आला होता. तो जातीनें कोळी ( मच्छिमार ) होता. यामुळें आपल्या परिश्रमाचें फळ देवाच्या चरणीं वाहण्यासाठीं त्यानें एक उत्तम जातीचा मासा आपल्याबरोबर आणला होता. त्याच्या हातांतील मासा पाहतांच मंदिराच्या पुजाऱ्यांनीं त्याला तेथून हांकून लावलें. तेव्हां तो तेथून निघून देवळाच्या मागील बाजूस जाऊन ईश्वरभजन करीत बसला. त्यानें कित्येक दिवस अन्नपाण्यावांचून काढले. भगवानाचें दर्शन घडल्याशिवाय अन्नोदकस्पर्श करावयाचा नाहीं असा त्याचा निर्धार होता आणि ईश्वरगुणगानापुढें त्याला खाण्यापिण्याची

आठवण तरी कशी होणार? अखेर एके दिवशीं सकाळीं पुजारी येऊन पाहतात तों देवानें तोंड फिरवलेलें! सर्वांना मोठा आश्चर्याचा धक्का बसला. त्यांना वाटलें कीं देव रागावला आहे. म्हणून त्यांनीं जोरजोरानें स्तोत्रें गाऊन व षोडशोपचारें पूजा करून देवाला प्रसन्न करण्याचें प्रयत्न केलें; परंतु सर्व व्यर्थ. इतक्यांत अशी आकाशवाणी झाली कीं, 'माझा खरा भक्त देवळाच्या बाहेरच आहे. त्याला दर्शन देण्यासाठीं मी तोंड फिरविलें आहे.' त्याबरोबर लोकांनीं मोठ्या प्रेमानें व आदरानें कनकदासाला मंदिरांत आणलें आणि देवाचें दर्शन घेऊं दिलें. त्यानंतर देव पुन्हां पूर्वीप्रमाणें तोंड फिरवील असें त्यांना वाटत होतें; परंतु तसें कांहीं घडेना म्हणून त्यांनीं आंतील रचना बदलून घेतली. आणि देवळाच्या मागील भिंतीस एक खिडकी पाडून हरिजनांना दर्शन घेण्याचा मार्ग मोकळा करून दिला. याचा अर्थ कनकदासाशिवाय कोणत्याहि हरिजनाला या मंदिरांत प्रवेश मिळाला नव्हता. परंतु नुकताच मद्रास सरकारनें एक हुकूम काढून हें मंदिर अस्पृश्यांना मोकळें असल्याचें जाहीर केलें आहे.

असें सांगतात कीं एकदां श्रीमध्वाचार्य उडुपीजवळच्या मल्पें बंदरावर समुद्रस्नानास गेले होते. त्याच वेळीं एक बोट बंदराजवळून जात होती. इतक्यांत जोराचें वादळ सुटलें आणि ती बोट वादळांत सांपडून बुडूं लागली. बोटीवरील लोकांनीं देवाचा धांवा सुरू केला. तें पाहून श्रीमध्वाचार्यांनीं आपला उजवा हात वर केला आणि आपल्या तपःसामर्थ्यानें वादळ शांत केलें. बोटीच्या कप्तानानें जेव्हां हा चमत्कार पाहिला तेव्हां त्याला आचार्यांबद्दल आदर व कृतज्ञता वाटून त्यांना गोपीचंदनाचे तीन तुकडे दिले. आचार्यांनीं ते तीन तुकडे घेऊन कापले. त्याबरोबर त्यांतून तीन मूर्ति निघाल्या. पैकीं एक बलरामाची होती. तिची स्थापना त्यांनीं तिथेंच बंदरावर केली. दुसरी श्रीकृष्णाची. ती त्यांनीं उडुपीस नेऊन तेथें तिची प्रस्थापना केली आणि तिसरी एका देवीची मूर्ति होती. ती त्यांनीं जवळच्या कुंजार नांवाच्या डोंगरावर नेऊन स्थापिली. एका वर्षाआड मकरसंक्रांतीच्या दिवशीं जेव्हां उडुपीचा स्वामी बदलतो तेव्हां तो प्रथम कुंजारला जाऊन त्या देवीचें दर्शन घेतो आणि गांवाच्या बाहेर

येऊन थांबतो. तेथें त्याच्या स्वागतासाठीं जुना स्वामी व इतर पुजारी आलेले असतात. ते नव्या स्वामीला वाजत गाजत मंदिरांत घेऊन येतात आणि त्याच्याकडे मंदिराचे अधिकार सोंपवितात.

परंतु उडुपींतील कांहीं शैव सांप्रदायी लोकांचें म्हणजे असें आहे कीं वरील दंतकथा खोटी असून वैष्णवांनीं आपलें महत्त्व वाढविण्यासाठीं रचलेली आहे. उडुपीचें श्रीकृष्णमंदिर फार पुरातन आहे हें खरें; पण त्यांतील श्रीकृष्णाची मूर्ति शुभ्र दगडाची व मुरलीधर होती. आणि मंदिरावर शैवांचा अधिकार होता. तो सहन न झाल्यामुळें श्रीमध्वाचार्यांनीं जुनी मूर्ति हलवून तिच्या जागीं ही काळ्या दगडाची व गदाधारी मूर्ति स्थापन केली. कांहीं लोक तर असेंहि म्हणतात कीं जुनी मूर्ति अद्यापिहि त्या देवळांत लपवून ठेवलेली आहे. तर कांहींचें म्हणणें असें कीं ती म्हैसूरच्या राजवाड्यांत आहे. आणि मग तिच्या समर्थनासाठीं कनकदासाची गोष्ट तयार केली. वस्तुतः कनकदास इकडे आलाहि नाहीं.

उडुपी येथील सार्वजनिक रेडिओघरहि प्रेक्षणीय आहे. खूप मोठ्या मैदानांत एक टॉवर उभारून त्यांत रेडिओ ठेवण्यांत आला आहे. रोज सायंकाळीं तो सुरू करण्यांत येतो. यामुळें लोकांना मोकळी हवा, जगाची माहिती, संगीत वगैरे सर्व गोष्टींचा आनंद एकाच वेळीं लुटतां येतो.

उडुपीपासून तीन चार मैलांवर मल्पे नांवाचें बंदर आहे. किनाऱ्यापासून पश्चिमेस तीन मैलांवर समुद्रांत किनाऱ्याला समांतर अशी उत्तर–दक्षिण टेकड्यांची रांग आहे. यामुळें त्याच्या दरम्यानचा समुद्र उघड्या समुद्राच्या मानानें खूपच शांत असतो. हें बंदर मंगळूरच्या उत्तरेस आहे. जेव्हां समुद्रांत वादळ सुरू होतें तेव्हां बोटी मंगळूरकडे न जातां मल्पेच्या बंदरांत थांबतात; कारण या ठिकाणीं वादळाची भीति नाहीं. त्या तीन टेकड्यांपैकीं मधल्या टेकडीवर खूप जंगल असून तेथें टिपूचा किल्ला आहे व त्यावर एक तोफ आहे. उत्तरेकडील टेकडीवर एक उंच दीपस्तंभ आहे. तेथून येणाऱ्या–जाणाऱ्या बोटीची पाहणी करण्यासाठीं व रात्रीं दिवा लावण्यासाठीं एका माणसाची नेमणूक केलेली आहे.

बोट येण्याची वेळ झाली कीं तो दुर्बिणींतून पाहतो आणि बोट दिसूं लागली कीं निशाणाच्या सांकेतिक भाषेनें बंदारावरच्या लोकांना सूचना देतो. त्याची सूचना मिळाली कीं तिकिटविक्री सुरूं करण्यांत येते.

सध्या पावसाळा असल्यामुळें बोटी बंद आहेत; परंतु तो माणूस त्या टेकडीवर असतोच. त्यानें त्या ठिकाणीं चार महिन्यांची बेगमी करून ठेवलेली आहे. त्याला आतां किनाऱ्याला येतां येणार नाहीं. त्याला किनाऱ्यावरील लोकांना जर कांहीं निरोप पोंचवावयाचा असेल तर त्यानें तो निशाणांच्या सहाय्यानेंच पोंचविला पाहिजे. सगळ्या जगापासून दूर राहण्याची त्याला जी एक ऐच्छिक शिक्षा भोगावी लागते तिच्याबद्दल त्याला काय वाटत असेल याचा विचार मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

मप्लेला नुसता एक प्लॅटफॉर्म बांधण्याचीच जरूर आहे. तेवढें झालें म्हणजे जास्त खर्च करावयास नको. हा प्लॅटफॉर्महि अनेक मैल लांब बांधणें शक्य आहे; कारण हा किनारा सरळ व सपाट आहे. मुंबईचा समुद्र-किनारा तुकडे तुकडे असल्याप्रमाणें भासतो; पण हा किनारा एकसांधी आहे. मुंबई आणि मद्रास हे दोन समुद्रकिनारे मी पाहिलें आहेत. त्या दोहोंपेक्षांहि मल्पेचा किनारा मला जास्त रमणीय व सोईस्कर वाटला. येथें बंदर झाल्यास तें हिंदुस्थानांतील पहिल्या नंबरचें होईल असें म्हणतात.

असें असतांहि पुष्कळ लोक मप्लेऐवजीं मंगळूरलाच बंदर बनवावें असें म्हणतात.

याचें कारण मंगळूरला व्यापार फार मोठा आहे. आणि तेथें बंदर बनल्यास व्यापाऱ्यांचा खूप फायदा होणार आहे. पश्चिम किनाऱ्यावरील भटकळ, मंगळूर आणि मप्ले या तीन ठिकाणांपैकीं कोठेंतरी एके ठिकाणीं मोठें बंदर बांधण्याची मध्यवर्ति सरकारची योजना आहे. त्यामुळें प्रत्येक बंदराजवळचे लोक आपल्याच बंदराची उभारणी कशी होईल या खट-पटींत आहेत त्यांत मंगळूरच्या बाजूला मोटमोठे श्रीमंत व्यापारी व वजनदार कॉंग्रेस पुढारी असल्यामुळें बहुधा तेंच बंदर बनेल असा अंदाज आहे.

मप्लेच्या किनाऱ्यापासून चार मैलांवर एक लहानसें बेट असून एक

नारळीची बाग आहे. अथांग सागरांतील हें हिरवेगार बेट किनाऱ्यावरून फार मोहक दिसतें. निळ्या कोंदणांत बसवलेला हिरवा पाचूच जणूं !

येथून जवळच एक मंदिर आहे. बलरामाची मूर्ति त्या मंदिरांत आहे असें समजल्यावरून आम्हीं तें मंदिर पाहण्यास गेलों. या मंदिराच्या घडणावळीवरून तें उडुपीच्या कृष्णमंदिरापेक्षां खूपच जुनें असावें असें वाटलें आणि तेथील पुजाऱ्यानें आमच्या मतास पुष्टि दिली. तो पुढें म्हणाला, 'हें मंदिर बलरामाचें नसून द्वैतमतानुयायी सुब्रह्मण्यस्वामींचें आहे. ही मूर्तिहि बलरामाची नसून स्वामींचीच आहे; परंतु अद्वैतवादी वैष्णवांनीं जबरदस्तीनें या मंदिरावर ताबा मिळवून त्याला बलरामाचें मंदिर बनविलें व त्यासाठीं मध्वाचार्यांची खोटी गोष्ट प्रसृत केली. हिंदुस्थानांत कुठेंतरी बलरामाचें मंदिर पाहिलें आहे काय ? मग इकडे लांब दक्षिण देशांतच बलरामाचें मंदिर असण्याचें कारण काय ?' अर्थात् या इतिहास-संशोधनांत मला कांहीं गम्य नसल्यामुळें मी स्वतःच्या डोक्याला फारसा त्रास दिला नाहीं आणि उडुपीस परत आलों.

या ठिकाणीं श्रीकृष्णाच्या मंदिराव्यतिरिक्त शंकराचीं दोन देवालयें आहेत; परंतु सध्या त्यांना कांहीं महत्त्व उरलेलें नाहीं. देवालयाच्या भोंवतीं मोठमोठे मठ असून त्यांतून संस्कृत पाठशाला चालविल्या जातात. आश्चर्याची गोष्ट अशी कीं कृष्णमंदिराच्या मागील बाजूस असलेल्या कनकदासाच्या खिडकीसमोर असलेल्या कनकदासाच्या झोपडींतहि एक पाठशाला चालविली जाते.

उडुपीपासून चारपांच मैलांवर मणिपाल म्हणून एक लहानसें गांव आहे. तेथें श्री. उपेंद्र पै यांनीं स्थापन केलेली "दि कॅनरा इंडस्ट्रियल अँड बँकिंग सिंडिकेट" नांवाची एक संस्था आहे. मणिपालच्या ओसाड व खडकाळ माळरानाचें नंदनवन बनविण्याची जणुं त्यांनीं प्रतिज्ञाच केलेली आहे आणि त्याप्रमाणें त्यांनीं अत्यंत पद्धतशीरपणें काम सुरू केलें आहे. इमारतीच्या दगडासाठीं जमीन खणावयाची आणि त्या ठिकाणीं उत्तम शेत बनवावयाचें असा सपाटा त्यांनीं चालविला आहे. मंगळूरी कौलांचा एक कारखानाहि येथें आहे. श्री. पै यांचें एक वैशिष्ट्य असें आहे

कीं इमारतींना लागणारे दगड, लाकूड, चुना वगैरे सामान तर ते येथें तयार करतातच; पण शिवाय लोखंडी कड्या, बिजागऱ्या वगैरे वस्तूहि स्वतःच तयार करतात. यामुळें माल जरी थोडा महाग पडला तरी त्यांत स्वावलंबन असल्यानें तें जास्त सोईस्कर वाटतें. लाकडी नांगर व चरखे वगैरेहि ते करीत असतात. मणिपालच्या कॉलनींत एका हरिजनास घर बांधून देण्यांत आलें आहे. कौलारू घर रहावयास मिळालेला हाच एक भाग्यशाली हरिजन असावा; कारण इकडे हरिजनांचीं घरें मातीचीं व त्यावर गवताचें छप्पर असतें. कौलाचीं घरें बांधण्याची त्यांना ऐपतच नसते; कारण त्यांना कॉफीच्या मळ्यांत अथवा अन्यत्र मजुरी करण्याव्यतिरिक्त दुसरा कांहींच उद्योग नाहीं. यामुळें त्यांचें पोटच कसेंबसें भरत असतें. महाराष्ट्रांतील हरिजन त्या मानानें फार सुखी म्हटले पाहिजेत; कारण त्यांच्यापैकीं पुष्कळांजवळ वंशपरंपरागत जमिनी आहेत. आणि कांहींजण तर चांगले जमीनदार आहेत. त्यामुळें त्यांच्या जीवनाला चांगलें स्थैर्य लाभलेलें आहे. त्यांच्याशीं तुलना करतां इकडील हरिजनांची स्थिति फारच निकृष्ट आहे असें म्हणावें लागेल.

मणिपालच्या टेकडीवरून समुद्र फारच छान दिसतो. श्री. पै यांच्या माडीवर एक मोठा आरसा आहे. जेव्हां हवा स्वच्छ असते तेव्हां समुद्रांतून जाणाऱ्या–येणाऱ्या बोटीहि त्या आरशांत स्पष्टपणें दिसतात.

उडुपीहून आठ–दहा मैलांवर कांपू म्हणून एक स्थान आहे. त्या ठिकाणीं एक मोठा दीपस्तंभ आहे. या दीपस्तंभावरील दिवा शेंकडों मैल दूर असलेल्या एडनहून दिसतो असें खलाशी लोक सांगतात. आम्ही आज पहांटे तो दिवा मणिपालहून पाहिला. लुकलुकणाऱ्या ताऱ्यासारखा तो फिरता दिवा मोठा छान दिसतो.

मणिपालहून परततांना श्री. नारायणराव यांच्या नांवाच्या प्रारंभीं असलेल्या एच् म्हणजे हिरियडक् गांवीं थांबलों. या भागांत आपल्या नांवाच्या प्रारंभीं आपल्या गांवाचें नांव लिहिण्याची प्रथा आहे. बापाचें नांव कोणीच लिहीत नाहीं. कांहीं कांहीं जातींत आडनांव लिहिण्याची मात्र पद्धत आहे. पै, प्रभु, नायक, राव, चेट्टी, चेट्टियार वगैरे आडनांवें

प्रसिद्ध आहेत. एखादा गांव मोठा असला तर गांवाचें नांव न लिहितां आपल्या गल्लीचें नांव लिहिण्याची प्रथा आहे. उदाहरणार्थ, मूडबिद्रीमध्यें बेट्टिकेरी नांवाची गल्ली आहे. त्या गल्लींत रहाणारे लोक नांवाच्या प्रारंभीं एम्. (मूडबिद्री) न लिहितां बी. (बेट्टिकेरी) असें लिहितात.

हिरियडकजवळ एक झरा असून त्याचें पाणी फार उत्तम आहे असें समजलें जातें. आम्ही त्या ठिकाणीं मनसोक्त स्नान केलें. त्याच दिवशीं श्री. नारायणराव यांच्या नात्यांतील एका तरुणाचें लग्न होतें. म्हणून आम्ही लग्नघरीं जेवावयास गेलों. आपल्याकडे ऋतुशांतीच्या वेळीं ज्याप्रमाणें मखर करण्यांत येतें त्याप्रमाणें येथेंहि मखरांतच लग्न लावण्याची प्रथा आहे. बाहेर मंडप वगैरे घालण्यांत येतो; परंतु बोहलें वगैरे कांहीं नसतें आणि लग्न घरांतच लागतें. जेवणांत अनेक भाज्या, भात व पुरणाची पोळी होती.

उडुपीस एक नवीन गोष्ट समजली, ती ही कीं या प्रांतांत कायद्यानें वेश्याव्यवसाय बंद केलेला आहे. यामुळें समाजांतील एक हिडिस अंग अंतर्धान पावलेलें आहे. नाहींतर पूर्वीं उडुपीच्या वेश्या गोव्याच्या कलावंतिणीप्रमाणेंच या भागांत महशूर होत्या. त्यांनीं सबंध वातावरण दूषित करून ठेवलें होतें. चौकशी करतां असें समजलें कीं येथील पुष्कळशा बाया मुंबईत गेल्या असून कांहीं खेड्यापाड्यांतून गेल्या आहेत.

★ ★ ★

# वेणूर व कारकळ : ४

वस्तुतः २७ मे १९४८ ला येथें आलों असतां येथील बाहुबली गोमटे-श्वराची मूर्ति पाहून गेलों होतों; परंतु त्यानंतर जेव्हां १० जूनला वेणूरची गोमटेश्वराची मूर्ति पाहिली तेव्हां त्या दोहोंमध्यें थोडासा फरक आहे असा संशय आल्यावरून तो संशय दूर करून घेण्यासाठीं म्हणून आज परत येथें आलों आहे.

मूडबिद्रीहून वेणूरहि अकरा मैल आहे आणि कारकळहि अकरा मैल आहे. दोन्ही ठिकाणीं गोमटेश्वराच्याच भव्य व अजस्त्र मूर्ति आहेत. दोन्हीहि पांढऱ्या दगडाच्या आहेत. आणि सर्व सामान्य प्रेक्षकाला त्या दोहोंत कांहीं फार फरक असेल अशी शंकाहि येणार नाहीं आणि अंध-भक्तांना तर मुळींच येणार नाहीं.

या दोन मूर्तींपैकीं वेणूरची मूर्ति छत्तीस फूट उंच असून कारकळची बेचाळीस फूट उंच आहे. अशाच प्रकारची तिसरी एक गोमटेश्वराची मूर्ति म्हैसूर संस्थानांत श्रवणबेळगोळा येथें असून तिची उंची सत्तेचाळीस फूट आहे असें सांगतात; परंतु मी ती अद्याप पाहिलेली नाहीं, यामुळें तिच्यासंबंधीं या वेळीं कांहीं लिहिणें शक्य नाहीं. या तीन मूर्ति एकाच खेपेस पाहून त्यांचें तुलनात्मक दृष्ट्या अध्ययन करण्याची माझी फार इच्छा होती; परंतु अनेक कारणांमुळें तें जुळलें नाहीं. असो.

या दोन्ही मूर्ति जरी पांढऱ्या दगडाच्या असल्या तरी पाऊस आणि ऊन यांच्या सतत माऱ्यामुळें त्या काळ्या पडल्या आहेत; परंतु दोन मांड्यांमधील व कांखेंतील भाग पांढरा शुभ्र दिसतो. त्यावरून दगडाच्या मूळ रंगाची स्पष्ट कल्पना येते. या मूर्तींसाठीं वापरलेला दगड येथीलच आहे कीं तो दुसरीकडून आणला असावा? या मूर्ति एका अखंड दगडांतून तयार केलेल्या आहेत आणि दोन्हीहि लहान लहान टेकड्यांवर आहेत. वेणूरची टेकडी त्या मानानें कमी उंच आहे; परंतु कारकळची टेकडी बरीच उंच आहे. तिच्या माथ्यावर जाण्यासाठीं एकशें ऐंशीं पायऱ्या चढाव्या लागतात यावरून तिच्या उंचीची थोडीफार कल्पना

येईल. जर हे अजस्र दगड दुसऱ्या ठिकाणचे असतील तर ते या टेकड्यांवर कसे चढविले गेले असतील ? शिवाय या मूर्ति तयार करून वर चढविण्यांत आल्या असतील कीं दगडच वर आणून मग मूर्ती बनविल्या गेल्या असतील? जमिनीच्या पृष्ठभागावर चाळीस फूट उंच दगड उभा ठेवावयाचा म्हणजे त्याला पाया हवाच. त्यासाठीं त्या दगडाचा निदान एक चतुर्थांश भाग तरी जामिनीच्या पोटांत गेला असला पाहिजे. म्हणजे तें धूड कांहीं लहान सहान नसणार.

मूडबिद्रीच्या आसपास जें डोंगर आहेत त्यांच्यावर अशा प्रचंड अखंड शिला दृष्टीस पडतात. त्यावरून माझी कल्पना अशी झाली आहे कीं वेणूर व कारकळलाहि तशा शिळा पूर्वीं असाव्यात व त्या ठिकाणींच कोरून बसविल्या गेल्या असाव्यात.

असें सांगतात कीं एका जैन राजाच्या आज्ञेवरून एका कारागिरानें प्रथम कारकळची मूर्ति पूर्ण होतांच त्या कारागिरानें पुन्हां अन्यत्र तसली मूर्ति बनवूं नये म्हणून त्या राजानें त्या कारागिराचा उजवा हात तोडून टाकला. तें वर्तमान समजतांच वेणूरच्या राजानें त्या कारागिराला बोलावून घेतलें आणि उरलेल्या एका हातानेंच दुसरी मूर्ति घडविण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें त्या कारागिरानें नुसत्या डाव्या हातानेंच वेणूर ( वेणु+उरु =गांव=वेळगांव ) ची मूर्ति बनविली. तें याहून त्या राजाला आश्चर्य वाटलें आणि त्यानें त्या कारागिराचा दुसरा हातहि तोडून टाकला. अर्थात् यानंतर श्रवणबेळगोळाची मूर्ति त्या कारागिरानें हातांचा उपयोग न करतांच बनविली कीं दुसऱ्याच एकाद्या कारागिराची ती कलाकृति आहे तें या दंतकथेंत नसल्यामुळें ती थोडीशी अपूर्ण वाटते.

वेणूरचें स्थान मात्र अगदींच गद्य व सामान्य वाटतें. याच्या उलट कारकळच्या टेकडीवरून फार सुंदर देखावा दिसतो. गांधीजींनीं मंगळूरच्या आपल्या व्याख्यानांत या भागाला दिलेलें ‘ भारताचा बगीचा ’ ( Garden of India ) हें नांव किती सार्थ आहे याची प्रचीति गुरुपूरच्या टी. बी. जवळून, मंगळूरच्या कंदरी टेकडीवरून आणि कारकळच्या गोमटेश्वर टेकडीवरून फार उत्तम प्रकारें येते. ज्यांच्याकडे जमिनीवरून पाहिलें

असतां जीं आकाशाला शिवायला व ढगांना धरायला वरवर चालली आहेत असा भास होतो तीं नारळी–पोफळीचीं झाडें येथून अगदीं लहान लहान हिरव्यागार छत्र्यांसारखीं इवलीशीं दिसतात. टेकडीच्या पायथ्याशींच एक मोठें तळें आहे. त्यांत सुसरीमगरीहि आहेत असें लोक सांगतात. या तळ्याचें पाणी माशांच्या वाढीला फार चांगलें असल्यामुळें या ठिकाणीं हिंदुस्थान सरकार नाना प्रकारचे मासे पाळण्याचा प्रयोग करणार आहे असें ऐकण्यांत आलें.

वेणूर व कारकळच्या मूर्तींमध्यें सर्वांत महत्त्वाचा फरक म्हणजे कारकळच्या मूर्तीच्या तोंडावर कांहीं भावनाच दिसत नाहींत. तें एक प्रकारचें गांभीर्य असावें असें मनाला पटविण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु तें कांहीं गळीं उतरेना. दुःख, शोक, खेद, आनंद–कसलीच भावना या मूर्तीच्या चेहऱ्यावर नाहीं. यामुळें ही मूर्ति कांहींशीं निर्जीव वाटते.

याच्या उलट वेणूरच्या मूर्तीचा चेहरा भावपूर्ण असून तोंडावर स्मितहास्य आहे. यामुळें मूर्ति लहान असली तरी सजीव वाटते. कितीहि वेळ या मूर्तीकडे पाहिलें तरी मनाची तृप्ति होत नाहीं. एक प्रकारचें अद्‌भुत आकर्षण या मूर्तीच्या चेहऱ्यामध्यें आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे कारकळची मूर्ति अत्यंत ओबडधोबड असून शरीरांतील अवयवांना कांहीं आकार नाहीं. पाय ताडाच्या झाडांसारखे सरळसोट असून हातांवरहि विशिष्ट उंचवटे नाहींत. यामुळें गुडघे, कोपर वगैरे अवयव त्या शरीरांत नसावेतच असें वाटतें. त्या मानानें वेणूरची मूर्ति अधिक नाजुक व तुलनात्मकदृष्ट्या जास्त प्रमाणबद्ध आहे. अर्थात् वर उल्लेखिलेले ढोबळ दोष तिच्यांतहि आहेतच; परंतु ते एकदम डोळ्यांत भरत नाहींत. कारकळच्या मूर्तींत एकच गोष्ट बरी आहे आणि ती म्हणजे मूर्तीची छाती चांगली भरदार व पुष्ट आहे. याच्या उलट वेणूरच्या मूर्तीची छाती विशेष आकर्षक नाहीं. कदाचित् एकूण शरीराच्या दृष्टीनें तशीच छाती असणें जास्त नैसर्गिक असेल.

दोन मूर्तींमध्यें आणखी एक लहानसा फरक आहे. तो असा कीं वेणूरच्या मूर्तीच्या दोहों बाजूस मांडीपर्यंत एक एक मोठा नाग कोरलेला

आहे. हे नाग आपल्या शेपटीवर उभे आहेत. कारकळच्या मूर्तीमध्यें मात्र नागाच्या जागी एक एक वेल आहे आणि त्याला दोन तीन पानें आहेत. अर्थात् मूर्तीच्या पायांत उगवून तिच्या मांड्यांना व शरीराला वेढून दंडापर्यंत वर गेलेले दोन वेल दोन्ही मूर्तींत आहेत. त्यांचा या वेलाशीं कांहीं संबंध नाहीं. आणि पायाशीं गर्दी करून बसलेल्या व बदकाप्रमाणें दिसणाऱ्या सापांचा वरील नागांशींहि कांहीं संबंध नाहीं.

या दोन मूर्तींच्या आणखीहि कांहीं अवयवांमध्यें फरक आहे; परंतु त्याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे.

गोमटेश्वराच्या मूर्तीखेरीज कारकळला इतरहि अनेक स्थळें पाहण्यांसारखीं आहेत. पैकीं सर्वांत महत्त्वाचें म्हणजे हिरियंगडीचा मानस्तंभ. हा स्तंभ कोणी, केव्हां व कां उभारला याची माहिती आम्हांला मिळाली नाहीं; परंतु एकाच दगडांत कोरलेला एवढा मोठा खांब इतर कुठें असल्याचें ऐकिवांत नाहीं. या चौकोनी स्तंभाची बाहेरील उंची सुमारें आठ फूट आहे आणि याचें एक वैशिष्ट्य असें कीं याच्या खालच्या बाजूस ज्या लांबीरुंदीचा दगड आहे, बरोबर त्याच लांबीरुंदीची शिला त्या स्तंभाच्या डोक्यावर आहे. खालच्या दगडाचें क्षेत्रफळ सुमारें एकशेंचव्वेचाळीस चौरस फूट ( १२ × १२ ) आहे. याचा अर्थ इतकेंच शेत्रफळ असलेली एक अखंड शिळा या मानस्तंभानें आपल्या शिरावर धारण केलेली आहे. तिच्याकडे खालून पहातांनाच डोळे गरगरूं लागतात. या स्तंभावर मुसलमानी पद्धतीसारखी वाटणारी नक्षी कोरलेली आहे. स्तंभाच्या चारी बाजूस महावीर स्वामींच्या दिगंबर मूर्ति कोरलेल्या असून त्याच्याखालीं एका बाजूस नंदी व दोन बाजूस मारुती कोरलेले आहेत. जैनांच्या स्तंभावर वैष्णवांचा मारुती व शैवांचा नंदी असणें ही खरोखर आश्चर्याची गोष्ट आहे. ( चौथ्या बाजूस फक्त फूल आहे. )

दुसरें प्रेक्षणीय स्थान म्हणजे येथील श्रीवेंकटरमणाचें मंदिर होय. मी मूर्तिपूजक नसल्यामुळें मला त्या मंदिरांत विशेष आकर्षित करणारें कांहीं नसणार अशी माझी कल्पना होती; परंतु तेथें जातांच माझी ही कल्पना खोटी ठरली; कारण तेथील श्री. गोपाळ शणै नांवाच्या एका स्थानिय कलावंतानें

त्या देवालयांत चार दगडी खांब तयार करून उभे केले आहेत ते अत्यंत प्रेक्षणीय आहेत. या खांबावर गरुड, हनुमान, नारद व तुंबर यांच्या लहान मूर्ति असून इतरहि भालदार – चोपदारांच्या मूर्ति आहेत. इतर नक्षीहि भरपूर आहे; पण सर्वांत थक्क करून सोडणारी गोष्ट म्हणजे प्रत्येक खांबाच्या भोंवती एक एक सांखळी कोरलेली असून ती अगदीं हुबेहुब लोखंडी सांखळीसारखी दिसते. ज्या दगडांतून ते खांब कोरलेले आहेत त्याच एका दगडांतून ती सांखळीहि कोरलेली आहे. आणि तिचे दुवेहि लोखंडी सांखळीप्रमाणें अगदीं सुटे सुटे आहेत. सतत दोन वर्षें परिश्रम करून श्री. शणै यांनीं हे चार खांब तयार केले आहेत आणि विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनीं या कामाबद्दल कांहींहि मोबदला घेतलेला नाहीं.

या मंदिराच्या समोरच सुप्रसिद्ध बलभीमाचें मंदिर आहे. सध्या या मंदिराची दुरुस्ती चालू आहे. मारुतीची मूर्ति अगदींच ओबडधोबड व कशीबशी ओळखूं येण्यासारखी आहे. या देवळाचें वैशिष्ट्य हें कीं हैदरानें या देवळास वर्षासन दिलें असून तें अद्यापहि चालूं आहे. अशाच प्रकारचीं वर्षासनें हैदरानें इतरहि देवळांना दिल्याचें ऐकिवांत आहे. या भागांतील जैनांचीं व हिंदूंचीं मंदिरें किती सुस्थितींत आहेत हें पाहिलें म्हणजे हैदर व टिपू हे परधर्माच्या बाबतींत किती उदार व सहिष्णु होते याची सहज कल्पना येते.

★ ★ ★

## नंबूद्री ब्राह्मण

नंबू म्हणजे होडीचा एक भाग आणि ऊरी म्हणजे काढून घेतला, यावरून 'नंबूरी' आणि त्यापासून 'नंबूद्री' हा शब्द बनला. केरळमधील सर्व ब्राह्मणाना नंबूद्री असें म्हणतात. त्यांच्या या नांवासंबंधीं असें सांगतात कीं फार प्राचीनकाळीं सारा केरळ प्रांत समुद्राच्या पाण्याखालीं होता. परशुरामानें आपल्या परशूच्या प्रहारानें समुद्र मागें हटविला आणि ती भूमि ब्राह्मणांना दान दिली. त्यावेळीं हे ब्राह्मण मत्स्याहारी होते व मासे पकडण्यासाठीं होडींतून समुद्रामध्यें जात. जमीन मिळाल्यामुळें त्यांनीं आपल्या होड्या ठेवून दिल्या आणि ते स्थायिक झाले. तेव्हांपासून लोक त्यांना नंबूरी अथवा नंबूद्री असें म्हणूं लागले.

## विचित्र प्रथा

या नंबूद्री ब्राह्मणामध्यें एक विचित्र प्रथा आहे. ती अशी कीं, प्रत्येक घराण्यांतील फक्त वडील भावासच लग्न करण्याचा अधिकार आहे. सर्व लहान भावांना आजन्म अविवाहित रहावें लागतें. एकत्र कुटुंब पद्धतीचें बंधनहि या जातीमध्यें अत्यंत कडक आहे. वडिलार्जित संपत्तीच्या वांटण्या होऊं शकत नाहींत. ती फक्त वडील भावाला मिळते. याचा फायदा असा झाला कीं संपत्तीचे–जमिनीचे लहान लहान तुकडे झाले नाहींत. परंतु फक्त थोरल्या भावाला लग्नाची परवानगी मिळाल्यानें बेकायदेशीर संबंधांना उत्तेजन मिळालें. इतर बंधु घराबाहेर रखेल्या ठेवतात व त्यांच्याशीं संसार करतात. या पद्धतीला 'संबंधम्' असें म्हणतात. या रखेल्या नायर, मेनन वगैरे ब्राह्मणेतर जातीच्या असतात व त्यांच्यापासून होणारी संततीहि नायर, मेनन वगैरे जातीचीच समजली जाते. त्या मुलांना आपल्या बापाचें नांव लांवतां येत नाहीं. आईचें नांव लावावें लागतें. हे जरी बेकायदेशीर संबंध असलें तरी असें बहुतेक स्त्रीपुरुष जन्मभर पति–पत्नीप्रमाणेंच राहतात, आणि नंबूद्री पुरुष आपली सारी स्वकष्टार्जित मिळकत आपल्या रखेलीला व तिच्या मुलांना देऊं शकतो.

नुकताच वडिलार्जित संपत्तीच्या विभाजनास परवानगी देणारा कायदा पास झाला आहे. यामुळें आतां धाकट्या भावांच्या लग्नांवरील बंधनेंहि नष्ट होऊं लागलीं आहेत. या संबंधापासून निर्माण होणारीं संकरजाति अत्यंत बुद्धिमान व कर्तबगार असतें असें अनुभवानें ठरलें आहे. केरळच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनांत याच नायर व मेनन लोकांचें वर्चस्व आहे. आमच्या विधायक कार्यकर्त्यांमध्येंदेखील ब्राह्मण कार्यकर्ता क्वचितच सांपडतो.

## संस्कृतचे पंडित

नंबूद्री लोक संस्कृतचे जाडे पंडित व बुद्धिमान समजले जातात. कांहीं वर्षांपूर्वीं हे लोक संस्कृत भाषेचा उपयोग परस्पर व्यवहारांत करीत असत, आणि आजहि केरळमध्यें संस्कृतच्या अध्ययनाकडे सर्व जाती-जमातींचें विशेष लक्ष आहे. मोठमोठ्या संस्कृत पाठशाळा आहेत आणि त्यांतून शेंकडों विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्कृतच्या प्रसारामुळें मल्याळम् भाषेंत संस्कृतचे शब्द प्राचुर्यानें सांपडतात व आमच्यासारख्या परभाषियांना ती समजण्यास तामिळपेक्षां सोपी जाते.

नंबूद्री ब्राह्मणांमध्यें मुलीच्या मुलाला वारसा हक्क मिळतो. याला मक्कनायम् असें म्हणतात. यामुळें नवऱ्याला बायकोच्या घरीं नांदावयास जावें लागतें. पालघाटजवळील एका खेड्यांत आम्ही सकाळच्या फराळास गेलों होतों. ज्या घरांत आमची व्यवस्था करण्यांत आली होती तें एक प्रकारे आंतरजातीय होतें. घरचा कर्ता पुरुष नंबूद्री ब्राह्मण होता परंतु त्याची पत्नी नायर असल्यामुळें त्यांच्या दोन मुलीहि नायरच होत्या. त्यापैकीं एकीचा नवरा नंबूद्री ब्राह्मण आणि दुसरीचा अय्यर ब्राह्मण होता. अर्थात् त्यांची सर्व संतती नायरच समजली जाणार ! केरळमध्यें ब्राह्मणांपेक्षां ब्राह्मणेतरांचें व ख्रिश्चनांचेंच वर्चस्व अधिक आहे. यामुळें येथें तामिळनाडप्रमाणें निव्वळ जातीय अथवा प्रांतीयतेच्या आवरणाखालील जातीय वृत्ति आढळत नाहीं.

मलबारमधील स्त्रिया पांचवारी किंवा नऊवारी लुगडीं न नेसतां पुरुषाप्रमाणेंच अडीच वारी लुंगी नेसतात व तसलीच दुसरी एक लुंगी खांद्यावरून

घेऊन नेसलेल्या लुंगीला (कमरेजवळ) खोंचतात. यामुळें पांचवारी पातळ नेसल्या आहेत असाच भास होतो. आपल्याकडील बायकांप्रमाणेंच त्या ब्लाऊझहि वापरतात. मात्र घरांत वावरतांना त्या पदर वापरीत नाहींत. त्यामुळें नुसतें परकर–पोलकें नेसलेल्या मुलीप्रमाणें त्या दिसतात. गरीब स्त्रिया मात्र पदर वापरीत नाहींत. फक्त अडीचवारी लुंगी नेसून अंगांत बनियंनसारखा बिनबटणांचा ब्लाऊझ घालतात. (वस्तुतः तो ब्लाऊझ नसून ती बनियनच असते !) मलबारमधील सर्व हिंदू स्त्री-पुरुष फक्त पांढरेच कपडे वापरतात. मुसलमान (मोपला) पुरुष व स्त्रिया रंगीत लुंग्या व कपडे वापरतात.

येथील स्त्रिया लुंग्या वापरीत असल्या तरी त्यांना आमच्यापेक्षां कमी कपडा लागतो असें मात्र समजण्याचे कारण नाहीं. लुंगीच्या आंत दुसरा एक दोन अडीच वारी कपडा–परकरासारखा असतो आणि त्याच्या आंत चड्डी अथवा लंगोटी असते. यामुळें सामान्यतः त्यांना तेवढेंच कापड लागतें. परंतु एक मोठ्या लुगड्याऐवजीं तीन लहान लहान तुकडे असल्यामुळें ते धुणे त्यांना फार सोपें जातें आणि आलटून पालटून नेसतां येत असल्यामुळें ते लवकर फाटत नाहींत. अशा प्रकारें हे तुकडें सोयीचे व आर्थिक दृष्ट्या फायद्याचे होतात.

पुरुषांचा पोषाखहि फार साधा आहे. कमरेला एक लुंगी व अंगावर एक उपरणें ! कांहीं लोक तर उपरणेंहि अंगावर घेत नाहींत. शाळा–कॉलेजांतील मुलें व शिक्षक आणि इतर पांढरपेशे लोक अलीकडे सदरे वापरूं लागले आहेत. परन्तु कोट–टोपी औषधालाहि सांपडत नाहीं. कपडेच नसल्यामुळें ते अडकविण्यासाठीं भिंतीला खुंट्या असण्याची कांहींच गरज येथें नसते. केरळची समशीतोष्ण हवा आणि वाळूमिश्रित माती यामुळें येथील लोकांना वाहणा किंवा बूटहि वापरावे लागत नाहींत. आपल्याकडे गरीब माणूसहि वाहणा वापरतो परंतु येथें उच्च व श्रीमंत वर्गांतील लोकहि पादत्राणें वापरीत नाहींत.

या भागांत स्त्रीस्वातंत्र्य अधिक आहे असें ऐकलें होतें परंतु अनुभव मात्र उलट आला. पांढरपेशा समाजांतील स्त्रिया घराच्या चार भिंतींच्या

आंतच स्वतःला कोंडून घेण्यांत धन्यता मानतात. इतकेंच नव्हे तर आपल्या घरीं जेवावयास आलेल्या पाहुण्यांना वाढणेंहि त्या पसंत करीत नाहींत.

**पद्मनाभपुरम्‌चा राजवाडा**– सुमारें ४५० वर्षांपूर्वी मार्तंडवर्मा नांवाच्या केरळच्या राजानें बांधलेला एक सुंदर राजवाडा पद्मनाभपुरम् येथें आहे. बाहेरून पाहतां तें एखादें बैठे घर असावें असा भास होतो. परंतु प्रत्यक्ष आंत जाऊन पाहिल्यानंतर त्याचे वैशिष्ठ्य ध्यानांत येतें.

केरळच्या इतिहासावर आधारलेली व राजा रविवर्मा यांनीं चितारलेलीं भव्य तैलचित्रें येथें पहावयास मिळतात. स्प्रिंगच्या मदतीशिवाय चालणारें एक घड्याळ येथें आहे. सुमारें चारशें वर्षांपूर्वी येथील एक माणूस आंधळ्याचें सोंग घेऊन फ्रान्सला गेला व घड्याळ बनविण्याची कला शिकून परत आला. त्यानेंच हें घड्याळ तयार केलें. एका दोराच्या टोकांला खूप वजन असलेले मोठमोठे दगड बांधून त्यांच्या सहाय्यानें घड्याळाचे कांटे फिरत ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे. स्प्रिंगच्या घड्याळाप्रमाणें तासाचे ठोके पडण्याचीहि सोय त्यांत आहे. हें घड्याळ तिसऱ्या मजल्यावर आहे, तेथून तळमजल्यापर्यंत दोर आहेत. दर आठवड्यास दोराच्या एका टोंकास बांधलेला दगड खालीं येऊन टेकतो. तो परत तिसऱ्या मजल्यापर्यंत वर नेला कीं झालें. तीच त्याची किल्ली. वाड्याच्या एका भागांत जुन्या ( भग्न ) मूर्ती शिलालेख यांचें म्यूझियम् आहे आणि दुसऱ्या भागांत १००१ ब्राह्मण एकाच वेळीं जेऊं शकतील असा मोठा हॉल आहे. अगदीं परवापर्यंत या ठिकाणीं शेंकडों ब्राह्मणांना मोफत भोजन दिलें जात होतें.

**देवाचें राज्य**–केरळच्या प्रतापी मार्तंडवर्मा नांवाच्या राजानें आपलें राज्य पद्मनाभाला अर्पण करून त्याच्यातर्फे म्हणून राज्यकारभार चालविला. तेव्हांपासून त्रावणकोरचे राजे स्वतःला पद्मनाभ दास म्हणवितात व वर्षांतून दोनदां पद्मनाभ रथांत अथवा पालखींत बसून समुद्रावर स्नानास जातो त्यावेळीं त्रावणकोरचा राजा त्याच्यापुढें चालत असतो. यामुळेंच त्रावणकोरचें राज्य विलीन करण्यास विरोध करतांना सर सी. पी. रामस्वामींनीं असा एक मुद्दा मांडला होता कीं वस्तुतः हें राज्य ईश्वराचें

असून राजा हा त्याचा सेवक आहे. यामुळें ते विलीन करणें राजाच्या हातीं नाहीं. असो.

त्रिवेंद्रम् येथें अनंतशयनमूर्चें मंदिर पहाण्यास आम्हीं गेलों होतों. दक्षिणेंतील वैष्णवाचीं देवळें भयंकर कर्मकांडी व कट्टर आहेत. प्रत्येक देवळांत प्रवेश करतांना अंगांतील कपडे काढून व धोतर नेसून जावें लागतें. शेषशाई विष्णूची सुमारें १२ फूट लांबीची आडवी मूर्ति येथें आहे. मूर्तीच्या डोकीकडील भागांत एक लहान दरवाजा आहे, पोटाच्या भागांत त्याहून मोठा दरवाजा आहे आणि पायाकडील भागांत लहान दार आहे. यामुळें हप्त्याहप्त्यानें दर्शन घ्यावें लागतें; एकदम सबंध मूर्ति दिसत नाहीं. वस्तुतः मधल्या दरवाजाची कांहींच गरज नाहीं. परंतु पुजाऱ्यांना देवापेक्षां त्याच्या अंगावरील दागिन्यांची चिंता नेहमींच अधिक असते. किंबहुना देव ही देखील त्यांच्या दृष्टीनें एक पुण्यवस्तु च असते, यामुळें भक्तांच्या मनाचा विचार न करितां दागिन्यांच्या संरक्षणाचाच ते जास्त विचार करतात.

खालील शेष व त्यावर उताणी झोंपलेली विष्णूची मूर्ती ही सर्व लाकडीं आहेत. परंतु तिला सदैव तेल लावण्यांत येत असल्यामुळें ती काळ्याकुळकुळीत दगडासारखी दिसते. विष्णूचा चेहरा मात्र फार गोंडस व आकर्षक आहे आणि तो खरोखरीच शांत-प्रसन्न निद्रेंत असल्याचा भास होतो. गाभाऱ्याच्या समोर एका अखंड दगडांत बनविलेला एक चबुतरा आहे. सर सी. पी. यांच्या प्रयत्नामुळें कित्येक वर्षांपूर्वींच हें मंदिर हरीजनांना खुलें झालेलें आहे.

## दुष्काळ नसतांहि उपासमार

संबंध केरळ प्रांत (त्रावणकोर, कोचीन व मलबार (मद्रास), पश्चिम समुद्र किनाऱ्यावर पसरलेला असल्यामुळें येथें भरपूर पाऊस पडतो. कालवे वगैरे काढण्यांत आल्यामुळें कांहीं भागांत दोन दोन पिकेंहि काढण्यांत येतात. यामुळें या भागांत कधींहि दुष्काळ पडूं शकत नाहीं. परंतु तरीहि येथें गरीबीचें व उपासमारीचें प्रमाण फार मोठें आहे. येथील गरिबीचें व सर्वसामान्य कारण संपत्तीची विषम वांटणी हेंच आहे.

मोठमोठ्या नारळीच्या बागा व भातशेतें असलेल्या लोकाजवळ पैसा गोळा झालेला आहे व भूमिहीन लोकाची संख्या जास्त आहे. दुसरें मुख्य कारण येथील लोकसंख्येची अफाट वाढ हें होय. बंगालप्रमाणेंच केरळमध्येंहि लोकसंख्या भरमसाट वाढत आहे. त्या सर्वांना काम मिळणें शक्य नाहीं; यामुळें बेकारी व उपासमार वाढत आहे. तिसरें एक कारण असें कीं गेल्या कांहीं वर्षांत नारळाचे भाव एकदम चढल्यामुळें येथील लोकांनीं भातशेती करण्याचें सोडून नारळीच्या बागा लावण्याकडेच लक्ष केंद्रीत केलें. त्यामुळें शेतीचें काम कमी झालें व बेकारी वाढली आणि अन्नधान्याची टंचाई तीव्रतेनें भासूं लागली. त्यामुळें गरीब लोकांना कंदमुळावर जीवन कंठणें भाग पडूं लागलें. रताळ्यासारखीं असणारीं टॉपओका नांवाचीं जीं कंदमुळें युद्धापूर्वीं येथील लोक जनावरांना खाऊं घालीत असत अथवा स्टार्च काढण्यासाठीं उपयोगांत आणीत असत तींच आतां गरीबांचें मुख्य अन्न बनलें आहे.

## कोचीन आयलंडमध्यें महाराष्ट्रीय कुटुंबें

त्रावणकोर व कोचीन यांच्या सीमेवरील खाडी पार करीत असतां नांवेवर गोखले नांवाचे एक महाराष्ट्रीय गृहस्थ भेटले. ते रत्नागिरी-कडील असून अनेक वर्षांपासून कोचीनमध्यें स्थायीक झालेले आहेत. त्यांच्या मल्याळी पोषाखावरून ( लुंगी व हाफशर्ट ) आणि चेहऱ्यावरून ते केरळचेच रहिवासी आहेत असे मी समजलों परंतु आम्हांला मराठी बोलतांना ऐकून त्यांनीं आमच्याशीं मराठींत बोलण्यास सुरवात केली. मराठी बोलताना त्यांना खूपच अडचणल्यासारखें होतें व ते अडखळत बोलत होते. त्यांना सर्व कारभार मल्याळम् भाषेंत करावा लागत असल्या-मुळें त्यांची अशी त्रेधा उडाली असली पाहिजे. त्यांच्याकडून असें समजलें कीं कोचीन बेटावर १५–१६ महाराष्ट्रीय कुटुंबें असून ते सर्व-जण व्यापार अथवा नोकरी करीत असतात. ही सगळीं कुटुंबें एक कॉलनी बनवून एके ठिकाणींच राहतात. पूर्वीं त्यांच्या मुलासाठीं एक मराठी शाळाहि चालत असें परंतु हल्लीं मुलांची संख्या कमी झाल्यामुळें ती शाळा बंद पडली आहे व मुलें मल्याळी भाषेंतूनच शिकत असतात.

त्यांना घरांमध्यें मराठीचें जेवढें शिक्षण मिळेल तेवढेंच.

येथील कृत्रिम कोचीन बेट ( कोचीन हार्बर आयलंड ) म्हणजे एक अद्‌भुत आश्चर्यच आहे. पूर्वी कोचीनच्या किनाऱ्यापासून खूप दूरवर बोटी थांबत असत व तेथपर्यंत जाण्यासाठीं लहान मोठ्या होड्या वापरीत. ही अडचण दूर करण्यासंबंधीं विचार करितां कृत्रिम धक्का बांधण्याची कल्पना सुचली व त्याप्रमाणें कोचीन आयलंड व एरनाकुलम् यांच्या मधोमध कृत्रिम कोचीन बेट बांधण्याची खटपट सुरू झाली. पहिल्या महायुद्धाच्या वेळीं एका मोठ्या गाळ काढण्याच्या जर्मन यंत्रानें ( ड्रजरनें ) ३–४ वर्षें पर्यंत समुद्रांतील गाळ काढून तो एके ठिकाणीं टाकण्यास सुरवात केली. परंतु तो खड्डा लगेच भरून येई व समुद्र उथळच राही. अखेर खाडीमध्यें एक मोठा लंबगोलाकार दगडीबांध घालून त्याच्यामध्यें सभोंवारचा गाळ टाकण्यांत आला. व अनेक वर्षांच्या परिश्रमानंतर हें कृत्रिम बेट तयार झालें. रात्रीच्या वेळीं तें फार सुंदर दिसतें. एरनाकुलम् जवळील समुद्र खूप खोल आहे व त्यांत भयंकर छुपे प्रवाह ( Under Currents ) आहेत. मात्र वरून समुद्र अगदीं शांत भासतो. यामुळें येथें कोणी पोहण्यास धजत नाहीं. वर्षांतून एकदांतरी या खाडीमध्यें अपघात घडून येतो. आणि एखादी होडी उलटून तिच्यातील सर्वच्यासर्व माणसें समुद्राच्या तळास जातात.

१९१४ दि. २०० १९१५

## मदुरेचें मीनाक्षी मंदिर

ज्याप्रमाणें पुणें हें महाराष्ट्राचें सांस्कृतिक केंद्र समजलें जातें त्याप्रमाणें मदुरै अथवा मदुरा हें तामिळनाडचें सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र आहे. मीनाक्षीच्या जगप्रसिद्ध भव्य मंदिरामुळें त्याला धार्मिकदृष्ट्याहि महत्त्व आहेच. तमिळ भाषेच्या शिक्षणाचें व विकासाचे सतत प्रयत्न येथें होत असतात.

मीनाक्षीच्या मंदिराभोंवतीची अवाढव्य गोपुरें व आंतील अफाट विस्ताराचे मंदिर पाहिल्यानंतर मन थक्क होऊन जातें. इतकें विशाल मंदिर उत्तरेकडे पहावयास मिळत नाहीं. कदाचित् मुस्लिम आक्रमकांनीं उत्तर भारतांतील मंदिरें नष्ट करून टाकल्यामुळें तेथें एवढें प्रचंड मंदिर शिल्लक राहिलें नसेल.

## सबंध महाभारत

येथील तिरुमलै नाईक यांचा वाडाहि अत्यंत मोठा व भव्य आहे. सध्या या वाड्यांत सरकारी कचेऱ्या आहेत. या ठिकाणीं शिल्पकला किंवा चित्रकला फारशी आढळत नाहीं. मीनाक्षीच्या मंदिरांत मात्र चित्रकलेचे उत्कृष्ट नमुने पहावयास मिळतात. सारे महाभारत त्या ठिकाणीं चित्रित केलेलें आहे. मोठमोठ्या ओवऱ्या व सभामंडप यांनीं हें मंदिर गजबजलेलें आहे. हजार खांबाचा एक मंडपहि येथें आहे.

मीनाक्षीचें मंदिर अत्यंत प्राचीन असून पांड्य आणि नायक राजानीं वेळोवेळीं त्याचा जीर्णोद्धार केला आहे. तिरुमलै नाईक (इ. स. १६२३-१६५९) यांनी सध्याचें भव्य देवालय बांधलें. या देवळाला १४ लहान-मोठीं गोपुरें असून सर्वांत उंच गोपुर १५४ फूट उंच आहे. हें देऊळ मदुरै शहराच्या मध्यभागीं असूनहि अत्यंत विस्तृत व ऐसपैस आहे. त्यानें सुमारें चौदा एकर जागा व्यापलेली असून त्याच्या आवारांत हजारों माणसें एकावेळीं एकत्र जमूं शकतात.

भारतांतील चार सुप्रसिद्ध शक्तिदेवींच्या देवळांपैकीं हें मीनाक्षीचें मंदिर प्रमुख आहे. येथें मीनाक्षी व सुंदरेश्वर यांच्या सुंदर मूर्ती आहेत. असें सांगतात कीं मीनाक्षी ही मलयध्वज नांवाच्या पांड्य राजाची कन्या होती व तिचा जन्म यज्ञकुंडांतून झाला होता. मदुरैची राणी म्हणून तिनें अनेक वर्षें राज्य केलें आणि शेवटीं सुंदरेश्वराशीं लग्न केलें. त्यांच्या अलौकिक पुण्यशीलतेमुळें त्यांना देवत्व प्राप्त झालें.

तामिळ ही भाषा संस्कृतपासून पूर्णपणें भिन्न आहे. तिचा मूळ आधारच स्वतंत्र आहे. तिच्यांत संस्कृत शब्द क्वचितच आढळतो. यामुळें तामिळ भाषीयांची संस्कृति अन्य भारतीयांच्या संस्कृतिपेक्षा सर्वस्वी भिन्न आहे अशा प्रकारची वृत्ति येथें आढळतें. येथील लोकांमध्यें वाचनाची गोडी खूपच आहे. वस्तुतः तामिळ भाषीयांची संख्या मराठी बोलणाऱ्यांच्या संख्येहून कमीच आहे. परंतु तामिळमध्यें साहित्याचा प्रचार मराठीच्या अनेक पट आहे. साठ पानांचें व चार आणे किंमतीचे 'कल्की' नांवाचें साप्ताहिक याचे उदाहरण म्हणून देता येईल. या साप्ताहिकाच्या दोन लाख प्रती दर आठवड्यास विकल्या जातात. असाच खप असलेली इतरही नियतकालिके येथें आहेत. मराठीतील वि. स. खांडेकर व साने गुरुजी यांचें बरेंच साहित्य तामिळमध्यें आल्याचे समजलें.

## 'सौराष्ट्र' खिचडी !

मदुरेस मजबरोबर राहून वाटाड्याचे काम करणारा पद्मनाभम् हा मुलगा सौराष्ट्र जातीचा होता. त्याची भाषाहि सौराष्ट्रीय आहे. या सौराष्ट्र लोकांची वस्ती येथें खूप मोठी आहे. सुमारे ५–६ लाख लोक असतील. त्यांची भाषा म्हणजे हिन्दी, मराठी व गुजराती यांची खिचडी आहे. ते आपल्या घरांत व आपापसांत ही सौराष्ट्रीय भाषा बोलतात. परंतु शाळेत व इतरत्र तामिळ भाषेचाच उपयोग करतात. हे लोक अनेक शतकांपूर्वीं व्यापारधंद्याच्या निमित्तानें सौराष्ट्रांतून इकडे आले असावेत असा अंदाज आहे. त्यांना हिन्दीचें थोडेंफार ज्ञान असल्यामुळें पुस्तकी हिंदी शिकणें अवघड जात नाहीं. यामुळें या भागांतील हिन्दी प्रचारकांमध्यें सौराष्ट्र जातीच्या कार्यकर्त्यांची संख्या खूपच मोठी आहे.

येथून जवळच पत्तमडै नांवाचें एक गांव असून तेथील चटया फार प्रसिद्ध आहेत. सहाशे रुपये किंमतीचीहि चटई येथें बनते असें म्हणतात. या चटईची घडी करून ती खिशात ठेवता येते. ५०–६० रुपयांच्या चटया तर सर्रास तयार केल्या जातात. त्यांच्याहि घड्या घालता येतात.

## सुगंधी केळीं

नागर कोईलचीं केळीं फार प्रसिद्ध आहेत. दोन इंचापासून एक दीडफूट लांबीचीं केळीं येथें पाहण्यास मिळतात. केळ्याच्या ५६ जाती येथें आहेत असें सांगतात. मोठीं केळी उकडून अथवा पिकवून खातात. तीं खूप पौष्टिक आहेत असें समजलें जातें.

व्यक्तिशः मला मोठ्या केळ्यांपेक्षां येथील सर्वांत लहान सुगंधी केळीं विशेष आवडली. हीं केळीं आपल्याकडील सोनकेळ्यांच्या आकाराचीं पिवळीं धमक असतात. यांना एक विशेष प्रकारचा सुगंध येतो. आंब्याला आलेला मोहर आणि चंदन या दोहोंच्या सुवासाच्या मिश्रणानें जो एक सुगंध निर्माण होऊं शकेल तशा प्रकारचा सुगंध या केळ्यांना येतो. पचावयालाहि हीं केळीं फार चांगलीं आहेत. इतर केळीं पोटांत वायु निर्माण करतात परंतु हीं केळीं सहजासहजीं पचून जातात. स्वस्ताईच्या काळांत दोन आण्याला शंभर या भावानें हीं केळीं मिळत. हल्लीं याचा भाव पैशाला एक असा आहे. येथें फणस व अननस यांचें पीकहि भरपूर आहे.

या ठिकाणीं कॉफी ऐवजीं जापी नांवाचें एक पेय पिण्यास मिळालें. सुंठ, मिरी, धणे व साखर (आणि शक्य असल्यास दूध) घालून केलेला हा एक प्रकारचा काढाच असतो. रुचि चांगली असते. शिबिरांतील विद्यार्थ्यांना कॉफी ऐवजीं हेंच पेय पिण्यास दिलें जातें.

★ ★ ★

ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत बाहेरून आलेल्या मोंगलांनीं ताजमहाल व गोलघुमट (विजापूर) यांसारखीं अद्भुत शिल्पें निर्माण करून जगामध्यें भारताचा दर्जा वाढविला त्याप्रमाणें येथील जैनांनीं आपल्या स्वामींचे विशाल व भव्य पुतळे उभे करून देशोदेशींच्या लोकांचें लक्ष आपल्या धर्माकडे वेधून घेतलें आहे. आतांपर्यंत माझी अशी कल्पना होती कीं, म्हैसूर संस्थानांतील श्रवणबेळगोळा येथील बाहुबली गोमटेश्वराची दगडी मूर्ति हीच हिंदुस्थानांतील सर्वांत उंच मूर्ति होय. परंतु १९४९ सालीं राऊच्या सर्वोदय समाजाच्या संमेलनाच्या निमित्तानें आचार्य दादा धर्माधिकारी यांच्याबरोबर मध्यभारतांत हिंडण्याची सुवर्णसंधि मिळाली असतां त्या प्रवासांत बाहुबलीच्या मूर्तीपेक्षांहि मोठी अशी प्रस्तरमूर्ति पाहण्याचा योग लाभला. ही मूर्ति गोमटेश्वराच्या मूर्तीहून जवळ जवळ दुप्पट उंच आहे.

या मूर्तीचें लोकपरिचित नांव बावनगजा असें असून ती स्वामी ऋषभदेव यांची आहे. या मूर्तीची उंची ८४ फूट आहे. पूर्वींच्या काळीं एक हात म्हणजेच एक कच्चा गज असें मानण्यांत येई आणि ही मूर्ति बावन हात उंच आहे. यामुळें लोकांनीं तिला बावनगजाजी असें नांव दिलें व तेंच रूढ झालें. ही मूर्ति संपूर्णपणें नग्न असून तिच्या शरीराच्या वेगवेगळ्या अंगांचीं मापें पुढीलप्रमाणें आहेत:—

मूर्तीची उंची ८४ फूट, एका खांद्यापासून दुसऱ्या खांद्यापर्यंतचें अंतर २९ फूट ९ इंच, खांद्यापासून मधल्या बोटापर्यंतचें अंतर ४६ फूट २ इंच, कमरेपासून टांचेपर्यंतचें अंतर ३७ फूट, डोक्याचा घेर २६ फूट, पंजाची लांबी १३ फूट ६ इंच, नाकाची लांबी ३ फूट ११ इंच, डोळ्याची लांबी ३ फूट ३ इंच, एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंतचें अंतर १७ फूट ६ इंच, कानाची लांबी ६ फूट ८ इंच.

ही मूर्ति मध्यभारतांतील बडवानी शहरापासून ५ मैल दूर असलेल्या चूलगिरी या डोंगरांत आहे. चूलगिरी हा डोंगर सातपुडा पर्वतांत

असून त्याचें शिखर हें सातपुड्याचें सर्वोच्च शिखर आहे; परंतु मूर्ति शिखरावर नसून सातपुड्यांपैकीं एका पुड्यांमध्यें—टेकडीमध्यें—एका व अखंड शिळेंत ती कोरलेली आहे; डोंगरावरील पाण्याच्या प्रवाहामुळें मूर्ति झिजून जाऊं लागल्यामुळें तिच्यावर छप्पर बांधलेलें आहे. सुमारें अकराशें वर्षांपूर्वीं कोरलेली ही मूर्ती आजहि पूर्वींइतकीच नवी व ताजी वाटते. या डोंगरांत जंगली मधमाशा खूप आहेत. त्यांचीं पुष्कळ पोळीं या मूर्तीच्या अंगावर आहेत. यामुळें लांबूनच या मूर्तीचें दर्शन घ्यावें लागतें. जवळ जाऊन अभिषेक करतां येत नाहीं. या माशांना कसें हाकलून लावावें हा येथील जैन भक्तांपुढें एक मोठा प्रश्न आहे. जाळ, धूर वगैरे मार्गांनीं माशा उडवून लावावयाच्या तर त्यांत हिंसा होते आणि जैन लोक तर 'अहिंसा परमो धर्मः' असें मानणारे आहेत. शिवाय एकदा उडवून लावलेल्या माशा पुन्हः येऊन बसतातच. यामुळें ही एक फार मोठी समस्या झालेली आहे.

ही मूर्ति श्रवणबेळगोळा, कारकळ व वेणूर येथील मूर्तीहून अधिक उंच असली तरी तेथील बाहुबलीच्या मूर्तींत जें सौंदर्य व प्रमाणबद्धता आहे तिचा अंशहि या मूर्तींत आढळत नाहीं. या मूर्तीचें वैशिष्ट्य म्हणजे तिचा अवाढव्यपणाच होय. श्रवणबेळगोळ्याची मूर्ति डोंगराच्या शिखरावर असून ती एका व अखंड दगडाची आहे. तिला मागेंपुढें कसलाच आधार नाहीं. यामुळें ती मूर्ति जितकी जमिनीच्या वर आहे तिच्या निंम्यानें तरी जमिनीच्या खालीं असली पाहिजे. इतका मोठा दगड डोंगराच्या शिखरा-वर कसा नेण्यांत आला असेल हाच प्रश्न माणसाला गुंग करून टाकतो. शिवाय शेंकडों वर्षांपासून वर उल्लेखिलेल्या तीन मूर्ति ऊन व पाऊस सहन करीत आल्या असूनहि त्यांच्यावर त्याचा कांहींच परिणाम झालेला नाहीं. याच्या उलट बावनगजाजीची मूर्ति डोंगरात कोरलेली आहे. तिला मागच्या बाजूनें डोंगराचा आधार आहे आणि तिचा कोणताहि अवयव आधाररहित नाहीं. सर्व अवयव मागील डोंगरावर आधारलेले आहेत. मूर्तींत जिवंतपणा असल्याचा भास होत नाहीं. पाय हत्तीच्या पायांसारखे सरळ सोट, हात केळीच्या खांबासारखे, पिळदारपणाचा

संपूर्ण अभाव, छाती मैदानासारखी सपाट व चेहऱ्यावर कसलेच भाव नाहींत अशी ही मूर्ति आहे.

या मूर्तीच्या डोंगराच्यावर अत्यंत उंच असें शिखर आहे. येथून नर्मदा नदीचें विशाल पात्र फार सुंदर दिसतें. या ठिकाणचे वैशिष्ट्य म्हणजे येथून सातपुड्याच्या एकामागून एक व एकाहून एक उंच असलेल्या अशा सात आठ रांगा अगदीं स्पष्टपणें दिसून येतात. शिखराची चढण अगदीं सरळ व अवघड आहे. यामुळें वर चढतांना फार थकवा येतो, परंतु एकदा वर चढल्यानंतर निसर्गाचें जें भव्य स्वरूप पहावयास मिळतें त्याच्यामुळें सर्व श्रमाचा परिहार तात्काळ होऊन मन उल्हसित होतें. प्रत्येकानें एकदा तरी हें स्थान अवश्य पाहिलें पाहिजे.

★ ★ ★

# जगन्नाथपुरी : ८

हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर राहणाऱ्या आम्हां महाराष्ट्रीयांना सायंकाळच्या वेळीं रविराज सागरांत उडी घेतांना पहायला सांपडतात. परंतु सकाळच्या ताज्या वातावरणांत, मंद वाहणाऱ्या मादक वाऱ्याच्या झुळुकींबरोबर समुद्राचें पाणी सोनेरी करीत, पाण्याच्या लाटांवर हेलकावें खात, हळूंच डोकावून पहात वर चढणारा सूर्यनारायण पाहण्याचें भाग्य आपल्याला कधींच लाभत नाहीं. हा सोहळा साधावा म्हणून आम्ही धांवपळ करीत जगन्नाथपुरीच्या समुद्रकिनाऱ्यावर गेलों. परंतु पूर्व दिशा ढगांनीं व्यापल्यामुळें आमची निराशा झाली. तरी पण आम्ही ढगाच्या पलीकडे असलेल्या सूर्याची हालचाल पाहण्याचा प्रयत्न करीतच राहिलो. आणि आमच्या या तपश्चर्येवर खुष होऊन किंवा इतक्या दूरून आलेल्या आपल्या भक्ताचा विरस होऊं नये म्हणून थोड्याच वेळांत सवित्याने आम्हांला दर्शन दिलें. त्याबरोबर आम्ही आनंदाने टाळ्या पिटून नाचूं लागलों. कारण तें दृश्य खरोखरीच नयनमनोहर होतें. समुद्राच्या पृष्ठभागावर बालरवीचे सोनेरी किरण पडल्यामुळें सबंध पाणी सुवर्णरसाप्रमाणें चमकत होतें. भरतीची वेळ असल्यामुळें लाटा पुढें पुढेंच सरकत होत्या. आम्हांला वाटलें, सूर्यनारायणाचा संदेशच आम्हांला सांगण्यासाठीं त्या आमच्याकडे येत आहेत. त्याच्या प्रेमाची परतफेड करण्यासाठीं आम्हीहि कपडे काढून त्यांच्या सामोरे गेलों आणि त्यांना कडकडून भेटलों. त्या वेळचा तो आनंद काय वर्णावा !

येथील समुद्र फारच उथळ आहे. यामुळें जलमार्ग या दृष्टीनें त्याला मुळींच महत्त्व नाहीं. येथेंच नव्हे तर सबंध ओडिसा प्रांतांत एकहि मोठें बंदर नाहीं. कारण समुद्रकिनारा वाळवंटी, उथळ आणि उघडा असल्यामुळें वादळांची भीति सदासर्वकाळ टांगत्या तलवारीसारखी प्रस्तुत असते. यामुळें या प्रांताला दक्षिणेकडील आंध्राच्या विशाखापट्टन (ज्याला विझगापट्टण असेंहि म्हणतात ) बंदरावर आणि इशान्येकडील बंगालच्या कलकत्ता बंदरावर अवलंबून राहावें लागतें. येथील समुद्रकिनारा

दिसायला मात्र फार छान दिसतो. याच्यापुढें मुंबईची चौपाटी अगदींच भिकारडी वाटते. एका रेषेंत आंखल्यासारखा इतका लांब समुद्रकिनारा क्वचितच पहायला मिळतो. सुमारें दोन वर्षांपूर्वी मंगळूर जिल्ह्यांत हिंडत असतां मंगळूरपासून जवळच असलेलें पश्चिम किनाऱ्यावरील माल्पे ( Malpe ) नांवाचें बंदर पाहण्यांत आलें होतें. या बंदराचा किनाराहि असाच लांबलचक व शोभिवंत वाटला.

परंतु त्याच्या पेक्षांहि पुरीचा किनारा अधिक आकर्षक वाटतो, समुद्राकडे पहात उभा राहिलों असतां मनांत एक चमत्कारिक विचार येऊन गेला. वाटलें, ' संपली आपल्या देशाची सरहद्द. याच्यापुढें आपला हिंदुस्तान राहिला नाहीं. ' म्हणजे येवढा मोठा आपला देश असूनहि, हजार दीड हजार मैल भूमि ओलांडून आल्यानंतर आपल्या देशाची हद्द संपल्याबद्दल मनाला एक प्रकारचा विषाद वाटला. याच्यापुढेहि आपला देश असता तर बरें झाले असतें असा विचार मनांत आला. शंभर वर्षे जगलेल्या माणसाच्या मनांतहि मरतांना असेच विचार येत नसतील काय?


येथें सूर्योदय व सूर्यास्त दोन्ही फार लवकर होतात. पहाटे पांच वाजतांच उजाडते आणि साडेपांचच्या सुमारालाच दिवस मावळतो आणि तासाभरांतच अंधार पडूं लागतो. वस्तुतः एकूण दिवस तेवढाच असतो, परंतु मनगटी घड्याळाबरहूकूम हालचाल करणाऱ्या आम्हां शहरीं लोकांना त्यामुळें थोडें चुकल्याचुकल्यासारखें वाटतें एवढेच.

श्रीमत् आद्यशंकराचार्यांनी स्थापन केलेला एक मठ येथें आहे. हिंदुस्थानांतील इतर तीर्थक्षेत्राप्रमाणें हें क्षेत्रहि घाणीचें, अस्वच्छतेचें, लांडीलबाडीचें माहेरघर आहे. येथें आल्यानंतर मनांत पावित्र्याची, श्रद्धेची भावना निर्माण होण्याऐवजीं किळस आणि चीडच उत्पन्न होते. आम्ही उतरलेली दूधवाल्याचीं धर्मशाळा मात्र त्या मानाने बरीच स्वच्छ आहे.

### जगन्नाथाची मूर्ति इतकी विद्रूप कां?

सुप्रसिद्ध जगन्नाथाच्या मंदिरांत एकच मूर्ति नसून, बलराम, श्रीकृष्ण आणि सुभद्रा, या तीघांच्या तीन मूर्ति एकत्र आहेत. सुभद्रा मध्यभागीं असून तिच्या उजव्या हातास बलराम व डाव्या हातास श्रीकृष्ण आहे.

देवळामध्यें राधाकृष्ण, रामसीता, शंकरपार्वती अशा जोडप्यांच्या मूर्ति पुष्कळांनीं पाहिल्या असतील. परंतु भावाबहिणीच्या मूर्ति एकत्र असलेलें हें एकच मंदिर असावें. यांतील बलराम व सुभद्रा यांचा रंग गोरा असून कृष्णाचा रंग काळा आहे. मूर्ति लाकडाच्या बनविलेल्या असतात आणि रोजच्या स्नानामुळें त्या खराब होत असतात. यामुळें दर बारा वर्षांनीं त्या बदलल्या जातात. या मूर्ति बनविण्याचें काम एकच सुतार घराणें शेंकडों वर्षांपासून करीत आलेलें आहे असें सांगतात.



**श्रीकृष्ण, सुभद्रा व बलराम**

या मूर्ति इतक्या कलाशून्य, भेसूर व विद्रूप दिसतात कीं मुलांना भीति दाखविण्यासाठीं त्यांचा उपयोग करावा. कदाचित् तें भेसूर रूप पाहूनच भक्तगण त्यांच्यापुढें हात जोडीत असतील. त्या मूर्ति पाहून मला तर हंसूंच कोसळलें आणि क्षणभर विषादहि वाटला कीं असल्या मूर्तींचें दर्शन घेण्यासाठीं सबंध देशांतून लोक येथें येतात.

या मूर्ति अशा विद्रूप कां यासंबंधी थोडासा खुलासा पुढील दंतकथेंत आढळेल. ही दंतकथा स्कंदपुराणाच्या उत्कलखंडांत आहे. नारदपुराण आणि कूर्मपुराण यांतहि ती आढळते. नैमिषारण्यांत एकत्र जमलेल्या देवांना श्रीविष्णु या क्षेत्राचें महत्त्व नि पावित्र्य वर्णन करून सांगतात.

ही कथा अशीः—

फार प्राचीन काळीं पुरी हें एक फार मोठें अरण्य होतें. त्या अरण्याच्या मध्यभागीं नीलाचल नांवाची एक टेकडी होती. त्या टेकडीवर एक मोठा कल्पवृक्ष होता आणि त्या वृक्षाखालीं विष्णूची एक अत्यंत मनोरम व सुंदर मूर्ति होती. या मूर्तीचें नांव नीलमाधव. अशा प्रकारची अप्रतिम मूर्ति त्या ठिकाणीं आहे हें माळव्याचा सूर्यवंशी राजा इंद्रद्युम्न याला समजतांच त्यानें अवन्तीहून–म्हणजे आपल्या राजधानींतून, तिच्या शोधासाठीं सर्व दिशांना ब्राह्मण धाडले. त्यांपैकीं पूर्व दिशेला गेलेल्या विद्यापति नांवाच्या ब्राह्मणाखेरीज बाकीचे सर्वजण लौकरच हात हलवीत परत आले. विद्यापति एकसारखा तीन महिनेपर्यंत प्रवास करीत राहिला आणि अखेर शेवटीं सवरा ( शबर ) नांवाच्या आदिवासी लोकांच्या राज्यांत जाऊन पोचला. त्या ठिकाणीं तो विश्वावसु नांवाच्या एका सबराच्या घरीं उतरला. हा विश्वावसु रोज नियमानें फुलें, फळें वगैरे पूजासाहित्य बरोबर घेऊन गुप्तपणें जंगलांत जात असे. तो कोठें जातो व कोणत्या देवाची पूजाअर्चा करतो हें इतर कोणालाच माहीत नव्हतें. विद्यापतीने त्याचा छडा लावण्याचा खूप प्रयत्न केला परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं.

तेव्हां त्यानें कपटाचा मार्ग स्वीकारला आणि तो भोळा शबर त्याला बळी पडला. देवदानव आणि आर्यअनार्य यांच्यांतील घटनांची पुनरावृत्ति झाली. त्याने विश्वावसूच्या मुलीला आपल्या प्रेमजालांत अडकविलें. आणि तिला तिच्या बापाला गळ घालावयास लावलें. एकुलत्या व लाडक्या मुलीचा शब्द मोडणें जिवावर आल्यामुळें विश्वावसूनें विद्यापतीला आपल्याबरोबर पूजास्थानीं नेण्याचें कबूल केलें. मात्र त्याला कांहीं दगाफटका करतां येऊं नये म्हणून त्यानें विद्यापतीचे डोळे बांधून त्याचा हात धरून चालवत नेले. परंतु विद्यापतिहि कांहीं कच्च्या गुरूचा चेला नव्हता. त्यानें आपल्या वस्त्रामध्यें थोडें मोहरीचें बी लपवून घेतलें आणि त्या गुप्त स्थानाकडे जातांना तो त्यांतील थोडें थोडें बी वाटेच्या कडेला टाकीत गेला. मूर्तीजवळ जातांच विश्वावसूनें त्याच्या

डोळ्याची पट्टी सोडली. कल्पद्रुमाखालीं असलेल्या भगवान् नीलमाधवाची ती निळ्या दगडाची सुंदर मूर्ति पाहून विद्यापति थक्क होऊन गेला. त्याचवेळीं एक चमत्कार दृष्टीस पडला. एक कावळा झाडावरून मरून खाली पडला आणि लगेच त्याचा आत्मा वैकुंठाला निघून गेला. याचा अर्थ, त्या ठिकाणीं मरणाऱ्याला हमखास मुक्ति मिळत असे. तें पाहतांच विद्यापतिहि झाडावर चढून खाली उडी मारूं लागला. इतक्यांत एक आकाशवाणी झाली. 'हे ब्राह्मणा, मरण्यापूर्वीं तूं जें कार्य हातीं घेतलें आहेस तें पूर्ण कर. तुला मी साऱ्या जगाचा नाथ (जगन्नाथ) या ठिकाणीं सांपडलों आहे ही सुवार्ता तूं आपल्या राजाला जाऊन कळव.' त्यानंतर ते दोघे घरीं परत गेले. दुसरे दिवशीं विश्वावसु नित्याप्रमाणें पूजाअर्चा करण्यास गेला. परंतु त्यादिवशीं नीलमाधवानें रोजच्याप्रमाणें त्याच्या नैवेद्याचा स्वीकार केला नाहीं. म्हणून तो देवाची करुणा भाकूं लागला. परंतु देव प्रसन्न होण्याऐवजीं त्याला पुढीलप्रमाणें आकाशवाणी ऐकूं आली, 'माझ्या एकनिष्ठ व प्रामाणिक भक्ता! मी तुझ्या जंगली फुला-फळांना कंटाळून गेलों आहे. आतां मला शिजविलेला भात आणि मेवामिठाई खाण्याची इच्छा झाली आहे. यापुढें मी तुला तुझ्या नीलमाधवाच्या रूपांत कधीं दिसणार नाहीं. आतां मला जग 'जगन्नाथ' या नांवाने ओळखील.' हें ऐकतांच विश्वावसूला फार वाईट वाटलें आणि हें सगळें विद्यापतीचेंच कारस्थान असावें असें समजून त्यानें त्याला कित्येक दिवसपर्यंत कैद करून ठेवलें. परंतु त्याच्या मुलीनें त्याच्यापुढें पदर पसरून आणि आंसवें ढाळून विद्यापतीबद्दल रदबदली केली. तेव्हां विद्यापतीची सुटका होऊन तो अवन्तीला परत आला. त्यानें राजाला सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून राजाला फार आनंद झाला आणि तो लाकूडतोड्यांची एक भली मोठी फौज बरोबर घेऊन नीलमाधवाच्या शोधास निघाला. आपल्या स्वतःच्या सामर्थ्यासंबंधीची त्याची घमेंड आणि उद्धटपणा पाहून जगन्नाथाला राग आला आणि अशी आकाशवाणी झाली कीं, 'हे राजा, तूं माझें देऊळ अवश्य बांधशील, परंतु माझें मात्र तुला दर्शन घडणार नाहीं.' आणि त्यानंतर ती नीलमूर्ति अदृश्य झाली. तेव्हां अत्यंत निराश

होऊन राजाने देवाला प्रसन्न करण्यासाठीं उग्र तपश्चर्या आरंभिली. कांहीं दिवसपर्यंत त्याची अशी सत्त्वपरीक्षा पाहिल्यानंतर आकाशवाणीच्या रूपानें परमेश्वरानें त्याला आदेश दिला कीं, 'हे राजा, जर तूं एक हजार अश्वमेध यज्ञ केलेस तर मी तुला नीलमूर्तीच्या रूपाने नव्हे तर कांहीं ठराविक खुणा असलेल्या लाकडाच्या रूपानें दर्शन देईन.' हें ऐकतांच राजाने एक हजार अश्वमेध यज्ञ केले. तेव्हां समुद्रांतून एक मोठा ओंडका वाहात वाहात किनाऱ्याला लागला. त्यावर आकाशवाणींत सांगितल्याप्रमाणें खुणा होत्या. तो ओंडका बाहेर काढून ज्या ठिकाणीं अश्वमेध यज्ञ करण्यांत आले होते त्याठिकाणीं मोठ्या समारंभाने त्याची स्थापना करण्यांत आली. ही जागा म्हणजेच हल्लीचें जगन्नाथाचें मंदिर होय.

नंतर राजानें देशांतील सर्व मोठमोठ्या कारागिरांना बोलावून आणून त्यांना त्या ओंडक्यांतून जगन्नाथाची मूर्ति निर्माण करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें सुतार पुढें सरसावले परंतु त्यांच्या पटाशीचा स्पर्श लाकडाला होतांच तिचे तुकडे तुकडे होऊन जात. अखेर परमेश्वरालाच राजाची दया आली आणि तो एका वृद्ध सुताराचें रूप घेऊन त्याच्याकडे गेला आणि म्हणाला, "राजा, मी एकवीस दितसांत तुला हवी आहे तशी मूर्ति तयार करून देतों. मात्र एकवीस दिवस पूर्ण होईपर्यंत तूं मला एका खोलींत बंद करून ठेव. त्या अवधींत कोणीहि त्या खोलींत डोकावयाचें नाहीं." त्या सुताराने आपलें नांव अनंत महाराणा असें सांगितलें होतें. सर्व प्रयत्न निष्फळ झाल्याने राजा निराश झाला होता. म्हणून त्यानें त्याचें म्हणणें मान्य केलें आणि त्याला त्या लाकडांसह एका खोलींत कोंडून ठेवलें.

चार दिवस झाले, आठ दिवस निघून गेले, दहा, बारा, पंधरा दिवस झाले तरी खोलींतून कसलाच आवाज ऐकूं येईना. सुतार काम करतो आहे कीं झोपीं गेलाय, कांहींच कळेना. यामुळें राजा अगदीं अस्वस्थ झाला आणि मुदत पूर्ण होण्यापूर्वींच त्यानें दार उघडलें. आंत जाऊन पाहतो तों काय, सुतार नाहीं नि कांहीं नाहीं. मात्र तीन लाकडी मूर्ति अर्धवट तयार झालेल्या स्थितींत तेथें होत्या. राजाला आपल्या

अधिरपणाबद्दल पश्चाताप वाटला आणि तो सुतार पुन्हः परत येईल म्हणून त्यानें अनेक वर्षेंपर्यंत वाट पाहिली. परंतु तो परत आला नाहीं. अखेर त्या अर्धवट मूर्तींचीच देवळामध्यें स्थापना करण्यांत आली.

## सिनेमाने केलेला कथेंतील फरक

आम्ही येथें ‘श्री जगन्नाथ’ नांवाचा उडिया भाषेंतील एक बोलपट पाहिला. (गेल्या आठ दहा दिवसांच्या परिश्रमाने सिनेमा व त्यांतील संवाद समजण्याइतकें उडिया भाषेचें ज्ञान मी मिळविलें आहे.) या सिनेमाने स्कंदपुराणांतील या कथेंत थोडासा फेरफार करून विद्यापतीला इंद्रद्युम्नाचा सेनापति व विश्वावसूला सवरा लोकांचा राजा बनविलें आहे. आणि विद्यापति व विश्वावसूची मुलगी ललिता यांच्यांतील प्रेमप्रसंगाचें चित्रीकरण केलें आहे. सिनेमांतील नीलमाधव ‘मला तुझ्या जंगली फुला–फळांचा कंटाळा आला आहे व शिजविलेला भात नि मेवामिठाई खाण्याची इच्छा झाली आहे’ असली अरसिक आकाशवाणी करीत नाहीं. तर विद्यापतीच ललितेकडून त्यांच्या घराण्यांतील दिव्य अंगठी घेऊन तिला फसवितो आणि मूर्ति घेऊन पळून जातो. सिनेमा पाहिल्या-नंतर आर्यांचा नीचपणा व हलकी बुद्धि चटकन डोळ्यांत भरतात. असो.

## हें आदिवासींचें दैवत असेल काय ?

जगन्नाथाची कहाणी म्हणजे मूर्तीच्या विद्रुपपणाबद्दल सबब सांगण्या-साठीं तयार केलेली बनावटी गोष्ट वाटते. अर्थात् आपल्या बहुतेक लहान-मोठ्या देवस्थानांवर हा आरोप करतां येईल. परंतु येथें तो विशेष डोळ्यांत भरण्यासारखा आहे. यावरून अशी एक कल्पना मनांत येतें कीं हें दैवत मूलतः भूतपिशाचांची पूजा करणाऱ्या आदिवासीचें दैवत असावे किंवा मूळच्या जंगली लोकांच्या स्वपक्षनिदर्शक अथवा स्वजातिनिदर्शक पशु-पक्ष्यादिकांच्या आकृतीहि असण्याची शक्यता आहे. आणि लोकांना खुष ठेवण्यासाठीं धूर्त आर्यांनीं त्यांचा स्वीकार केला असावा. जगन्नाथाच्या मूर्ति नेहमीं ब्राह्मणांच्या ताब्यांत असल्या तरी मुख्य यात्रेच्या व उत्सवाच्या वेळीं स्थानिक अस्पृश्यांच्या ताब्यांत असतात असें म्हणतात. याचा अर्थहि असाच असला पाहिजे.

बौद्ध धर्माचा प्रसार सर्वांत प्रथमच ओरिसांत झाला आणि जैन पक्षहि कांहीं काळपर्यंत या भागांत प्रबळ होता. यामुळें सर्वसामान्य लोकांवर ब्राह्मणी संस्कृतीची छाप फार थोडी पडली. आजहि येथें सोवळ्या-ओवळ्याचें प्रस्थ फारसें आढळत नाहीं. शिजविलेलें अन्न खरकटें मानलें न जातां सर्वत्र वावरूं शकतें. जगन्नाथाचा प्रसाद मुख्यतः भात हाच असतो. हा भात रोज संध्यासाळीं लहानमोठ्या मडक्यांतून भक्तांना विकला जातो. तीनचार आण्याचें मडकें घेतल्यास दोन माणसांना पोटभर अन्न आजहि मिळतें. भाताबरोबरच्च भाजी, डाळ, तांदळाच्या भाकरी वगैरे पदार्थहि प्रसाद म्हणून विकले जातात. एखादा भाजीबाजार किंवा मासळीबाजार बसावा त्याप्रमाणें हा प्रसादबाजार बसलेला असतो आणि 'भगत गण' अथवा 'फुकटे' लोक या प्रसादाचा सौदा करीत हिंडत असतात. प्रसादावर घाणेरड्या माशा घोंघावत असतातच. यामुळें तें दृश्य पाहून उच्च अभिरुचीच्या माणसाला ओकारीच येते. जो भात विकला न गेल्यामुळें उरतो तो वाळवून पुन्हां प्रसाद म्हणून विकण्यांत येतो.


## देवाचा सौदा–एक सामान्य बाब–

हा खरकट्याचा व्यापार आम्हां महाराष्ट्रीय लोकांना जरी नवीनच वाटला तरी देवाचा सौदा कांहीं आम्हांला नवीन नाहीं. पंढरीच्या विठोबाचा सौदा करणारें किंबहुना काळाबाजार करणारें बडवे आपल्या येथें आहेतच. रोज संध्याकाळीं विठोबाचा लिलाव कसा होतो, जास्त बोली बोलणाऱ्याला देवापुढें गोळा होणारा पैसा घेण्याचा हक्क कसा देण्यांत येतो आणि मग देवदर्शनासाठीं येणाऱ्या भोळ्या भक्तांकडून बडवे किती निर्दयपणें व निर्लज्जपणें पैसे उकळतात, वारीच्या दिवसांत जास्त पैसे घेऊन मागील दारानें कसे दर्शन घडवितात वगैरे गोष्टी आपल्याला माहीत आहेतच. यामुळें जगन्नाथाच्या मंदिरांत जे बाजारीपणाचें दर्शन घडतें त्याचें आपल्याला आश्चर्य वाटणार नाहीं. आम्ही सगळेजण गंमत म्हणूनच गेलों होतों आणि देवापुढे पैसे ठेवण्यानें पुण्यलाभ होतो यावर आमचा कोणाचाच विश्वास नसल्यामुळे आम्ही कोणी पैसा ठेवला नाहीं हें पाहतांच तेथील पुजाऱ्यांचें पित्त खवळलें आणि ते हातघाईवर आले,

परंतु आम्ही १५-२० जण होतों आणि ते ४-५ जण होते यामुळें आम्ही त्यांना दाद दिली नाही. परंतु त्यांची ती आधाशी व नीच वृत्ति पाहून मला इतकी किळस आली कीं देवळासकट सारें पुजारी नष्ट होऊन जातील तर किती चांगलें होईल असा विचार क्षणभर चमकून गेला.

## मंदिराच्या निर्मितीचा ऐतिहासिक आधार

वर जगन्नाथाची जी कहाणी दिली आहे तिला ऐतिहासिक आधार कांहींच नाहीं. तिचें महत्त्व दंतकथेंइतकेंच समजलें पाहिजे. जगन्नाथाच्या मंदिरासंबंधीं एक ऐतिहासिक आधार नुकताच सापडला आहे. त्यावरून



**पुरीचे जगन्नाथ मंदिर**

असें सिद्ध होतें कीं अनंग भीमदेव या महापराक्रमी राजाने (इ. स. ११८९ ते १२२३) इ. स. ११९८ सालीं हें मंदिर बांधून पूर्ण केलें.

याचें कारण असें नमूद करण्यांत आलें आहे कीं अनंग भीमदेवाच्या हातून चुकून ब्रह्महत्या घडली असतां त्या हत्येचें परिमार्जन म्हणून त्यानें फार मोठा अश्वमेध यज्ञ केला आणि अनेक लहान मोठीं देवळें बांधलीं. त्यांपैकींच पुरीचें जगन्नाथ मंदिर हें एक होय. तो वैष्णवपंथी असून त्याने ब्राह्मणी संस्कृतीचा पुनरूद्धार केला. त्याने पंडित संकर्षणनंद नांवाच्या ब्राह्मणाला दिलेला एक ताम्रपट नुकताच सांपडला आहे. हा जगन्नाथाच्या मंदिराच्या उद्घाटनाच्या उत्सवप्रसंगीं हजर होता. या मंदिरावर बंगालचा सुभेदार हुसेनशहा याने इ. स. १५०९ सालीं पहिला हल्ला केला. त्यानंतर कालापहाड या बाटग्या मुसलमानाचा हल्ला झाला आणि इ. स. १५९८ पासून इ. स. १७४२ पर्यंत मुसलमानांनीं अनेकदां हल्ले केले. पुढें इ. स. १५६८ सालीं ओडिसावर मराठ्यांचें साम्राज्य प्रस्थापित झाल्यानंतर हे हल्ले थांबले आणि मराठ्यांच्यानंतर इंग्रजच आल्यामुळें पुन्हां हल्ले झाले नाहींत.

## आणि तीं अश्लील व बीभत्स चित्रें !

पुरीला येण्यांत ज्या अनेक उत्सकता होत्या त्या सर्वांत जगन्नाथाच्या मंदिरावरील अश्लील चित्रें पाहण्याची उत्सुकता अधिक प्रबल होती. गांधीजींनी या चित्रांवर टिका केलेली आहे, आचार्य काका कालेलकर यांनींहि तीं हीन अभिरूचीचीं आहेत असें कुठेसें लिहून ठेवलेलें आहे. श्री. आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या तोंडूनहि त्यांची निंदा मी ऐकली होती. श्री. शेजवलकर यांनीं एप्रिल १९५० च्या नवभारतच्या अंकांत ओडीसासंबंधी लिहिलेल्या लेखांत या चित्रांचा सविस्तर उल्लेख केला आहे. यामुळें हीं एवंगुणविशिष्ट चित्रें आहेत तरी कशीं हें पाहण्याचें कुतूहल अत्यंत तीव्र होतें. मध्येंच कोणीतरी सांगितलें कीं, ‘ आता जनतेच्या सरकारने तीं चित्रें झाकून टाकलीं आहेत. ’ हें ऐकतांच खूपच विरस झाला. परंतु जेव्हां जगन्नाथाच्या मंदिरावर बाहेरच्या बाजूस सहज डोळ्यांना दिसतील अशा जागींहि तीं घाणेरडीं चित्रें जशींच्या तशींच असलेलीं पाहून जनतेच्या सरकारला मनाने शतशः धन्यवाद दिले ! हीं चित्रें

स्त्रीपुरुष संभोगाचीं आहेत म्हणून त्यांची निंदा केली पाहिजे अशा मताचा मी नाहीं. तीं कलाहीन आहेत, तीं पाहिल्यानंतर मनांत कामविकार निर्माण होण्याऐवजीं किळसच उत्पन्न होते. म्हणून तिरस्करणीय व निंद्य आहेत असें मला वाटतें. कोणार्क व भुवनेश्वर येथेंहि असलींच चित्रें आहेत. परंतु त्यांत कला आहे, कारागिराची कुशलता आहे. त्यामानानें पाहतां जगन्नाथाच्या मंदिरावरील चित्रें हीं फारच हलक्या दर्जाचीं वाटतात. तीं पाहिल्यानंतर शाळा-कॉलेजांतील शौचकूप अथवा रेल्वेच्या डब्यांतील संडास या ठिकाणीं जी चित्रकला (!) दृष्टीस पडते तिची हटकून आठवण येते. कांहीं किळसवाणे देखावे पाहिल्यानंतर मला आधुनिक मराठी काव्यांतील एक उदीयमान महाकवि श्री. वसंत हजरनीस यांच्या ' वशा म्हणे ' या काव्यसंग्रहांतील कांहीं ओळी आठवल्या आणि त्यांना विसाव्या शतकांत ज्या कल्पना सुचल्या त्याच आमच्या पूर्वजांना शेकडों हजारों वर्षांपूर्वीं सुचलेल्या पाहून छाती अभिमानानें भरून आली !

देवळाच्या वरच्या बाजूस असलेलीं हीं चित्रें कलाहीन व डोळ्यांत खुपण्यासारखीं आहेत. समाधानाची गोष्ट एवढीच कीं सगळीं ओंगळ चित्रें चटदिशी दृष्टीस पडण्यासारखीं नाहींत. बरीचशीं चित्रें कोनाकोपऱ्यांत दडलेलीं आहेत आणि मुद्दाम पाहिल्याशिवाय तीं दिसत नाहींत. आमच्याबरोबर कांहीं भगिनी असल्यामुळें त्यांना गुंगारा देऊन तीं चित्रें कशीं पहावयाचीं ही एक समस्याच होती; परंतु त्यांना आसपासचे दुय्यम देव पाहण्यांत गुंतवून आम्हीं हीं चित्रें पाहून घेतलीं. तीं पाहून झाल्यानंतर लक्षांत आलें कीं इमारतीच्या खालच्या बाजूला जमिनीपासून दोन तीन फुटांवर देखील अशींच चित्रें दगडांत कोरलेली आहेत. देवळावरील चित्रें दगडी किंवा शाडूच्या पुतळ्यासारखी आहेत. त्यांच्यावर तांबडा रंग फासल्यामुळें तो दगड आहे कीं शाडू हें समजलें नाहीं. परंतु तीं मागून बसविण्यांत आलीं असावीत असें वाटतें. कदाचित् मुसलमानांच्या हल्ल्यांत देऊळ पडल्यानंतर पुन्हां बांधतांना तीं उभारलीं असावीत. परंतु दगडांत कोरलेलीं व सहजासहजी लक्षांत न येणारीं लहान लहान

चित्रें मात्र फार जुनीं असावींत असें वाटतें. त्यांतहि बहुतेक सर्व संभोगाचीं आसनेंच आहेत. हीं आसनें बसवितांना माणसापेक्षां जनावरांच्या संभोगक्रियांचेच कारागिरांनीं जास्त परिशीलन केलें असावे असें वाटतें. एकाच वेळीं एक नग्न पुरुष दोन नग्न स्त्रियांशी शृंगार करीत असलेलीं चित्रें पाहून कलावंताच्या बुद्धीचें कौतुक वाटलें आणि अशाच एका संभोगाच्या चित्राची–( आणि हें चित्रहि दारांतून आंत प्रवेश केल्याबरोबर अगदीं समोरच आहे )– गंधाफुलांनीं पूजा केल्याचें पाहून कपाळावर हात मारून घेतला. हीं अश्लील चित्रें देवळावर कां कोरलीं असावींत यासंबंधी वेगवेगळ्या विद्वानांचीं वेगवेगळीं मतें आहेत. त्यासंबंधीचें सविस्तर विवेचन ‘ कोणार्क ’ वरील लेखांत येईल.

येथें देवळांत भिकाऱ्यांचाहि खूप त्रास होतो. विशेषतः भिकाऱ्यांच्या अल्पवयीन मुली सभ्य नागरिकांशी असभ्यपणें लगट करतात, शरीरस्पर्श करतात हें दृश्य भयंकर तिरस्करणीय व किळसवाणे वाटतें.

★ ★ ★


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## कोणार्क : १

### सूर्यमंदिराच्या परिसरांत

सूर्यांचें असें मंदिर आतांपर्यंत कधीं कोठें पाहिलें नव्हतें. यामुळें कोणार्कचें सूर्यमंदिर पाहण्याची विशेष उत्सुकता होती. परंतु सूर्याची मूर्ति गाभाऱ्यांत पाहावयास मिळाली नाहीं. मंदिराच्या भिंतीवर सूर्याचीं जीं चित्रें पहावयास सांपडलीं त्यांत सूर्याच्या पायांत बूट दिसले आणि कांही कांहीं मूर्तींना झरतुष्ट्रासारखी दाढी दिसली. यामुळें या मंदिरावर इराणी शिल्पकलेची छाप पडली असावी असें वाटतें. एकेकाळीं हें मंदिर समुद्रांत किंवा समुद्राच्या अगदीं काठावर असलें पाहिजे असें आसपासच्या रेतीवरून वाटतें. आतां समुद्र येथून मैल दीड मैल दूर हटलेला आहे. मंदिरावर चढून पाहिल्यासच तो दिसतो. मंदिराच्या परिसरांत मोडक्या तोडक्या मूर्तींचे खूपच अवशेष इतस्ततः पडलेले दिसतात. त्यांमध्येच एका मोठ्या व अखंड शिळेवर नवग्रहांच्या मूर्ति कोरलेल्या आहेत. या शिळेची लांबी सुमारे पंधरा फूट असावी. या मूर्ति अगदीं रेखीव आणि भावपूर्ण आहेत. या शिळेवरून पंडितांमध्यें मतभेद निर्माण झाले आहेत. मि. एम्. एच्. ॲरनॉट आणि मि. पर्सी ब्राउन यांच्या मतें, ' हें मंदिर कधी पूर्णच झालेलें नव्हतें. कारण त्याच्या शिखरावर बसविण्यासाठीं ज्या शिळा तयार करण्यांत आल्या होत्या त्या योग्य ठिकाणीं बसविण्यापूर्वीच मंदिराचा पाया रेतींत खचूं लागला. या शिळा जर वरून खाली पडल्या तर त्या अशा अभंग राहिल्या नसत्या. ज्या अर्थी त्या जशाच्या तशा आहेत त्या अर्थी त्या कधीं वर चढल्याच नाहींत. ' परंतु अशा प्रकारच्या शिळा भुवनेश्वराच्या पूर्ण मंदिरांतूनहि आढळतात. यामुळे त्या जास्तीच्या अथवा नको असलेल्या असणें शक्य आहे. शिवाय ' तीर्थचिंतामणि ' या पुस्तकाचा लेखक वाचस्पति मिश्र याने असें लिहून ठेवलें आहे कीं, ' या मंदिराभोंवती भक्तांनीं प्रथम तीन प्रदक्षिणा घालाव्यात आणि मग ओंजळींत फुलें घेऊन शुद्ध मनाने आंत प्रवेश करून सूर्यनारायणाची पूजा करावी '. यावरून

एके काळीं–निदान तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत हें मंदिर पूर्ण स्वरूपांत असावें आणि येथील मूर्तींची पूजाअर्चा होत असावी असा निष्कर्ष



**कोणार्कचे सूर्यमंदिर**

निघतो. येथील मुख्य मूर्ति कोठें गेली याचा मात्र कांहीं पत्ता लागत नाहीं.

## रथाचीं चाकें असलेलें मंदिर

या मंदिराचें वैशिष्ट्य म्हणजे याच्या दोन बाजूंना असलेलीं रथचक्रें हें होय. मंदिराचें तोंड पूर्वेकडे आहे. त्या बाजूला पूर्वी गाभाऱ्यांत शिरण्यासाठीं मोठा दरवाजा होता. तो दरवाजा मोडून गेला आणि आंत मूर्तिहि राहिली नाहीं. यामुळें दरवाज्याच्या जागीं भिंत बांधून दरवाजाचे कांहीं तुकडे तिच्यांत बसविले आहेत. या तुकड्यांवर इतकी बारीक व नाजुक नक्षी व कलाकुसर केलेली आहे कीं ती पाहून मन थक्क होऊन जातें. या साऱ्या मंदिरांतच कलेने अगदीं परमोच्च बिंदु

गांठला आहे असें वाटतें. आणि म्हणूनच या मंदिराला ' The greatest achievement of the Eastern Schaol of Architecture ' असें संबोधण्यांत येतें.

उत्तर दक्षिणेच्या बाजूस १३ फूट २ इंच उंचीच्या जोत्यामध्यें [ Plinth ] सुमारें बारा फूट उंचीचीं रथाचीं चाकें अशा कांहीं खुबीने बसविलेलीं आहेत कीं दूरून पाहणाऱ्याला सारें मंदिर या चाकांवरच उभारलेलें आहे असा भास व्हावा. प्रथम असें वाटतें कीं प्रत्येक चाक हें एका व अखंड दगडांत कोरलेलें असावें. परंतु जवळ जाऊन पाहिल्यानंतर ते अनेक लहान मोठ्या दगडांचें बनलेलें आहे असें आढळून येतें. या चाकांवरहि कारागिरांनीं आपल्या कलापूर्ण हातांनीं अत्यंत सूक्ष्म व गुंतागुंतीची कलाकुसर केलेली आहे आणि प्रत्येक दगड वेगवेगळा असूनहि नक्षीकामांतील एक रेघहि इकडे तिकडे सरकली नाहीं. ही कलाकुसर पाहूनच मि. पर्सी ब्राउन या इंग्रजानें असें उद्‌गार काढले असावेत कीं, " Few buildings can boast of such an unrestrained abnndance of plastic decoratiou as this vast structure, every portior of the exterior being moulded and chiselled either in the form of abstract geometrical ornament conventional foliage, mythical animals, fabulous beings half human with half serpant coils, figures satanic and figures divine, of every conceivable motif and subject known to the Indian mind and in a technique which ranges from patterns cut with minute precision of a cameo to powerfully modelled groups of colossal size "

( Percy Brown-- Indian Architecture P. 126 )

## जगन्नाथाच्या मंदिरापेक्षांहि उंच

शिल्पकलेच्या बाबतींत जगन्नाथाचें मंदिर या सूर्यमंदिराच्या पासंगालाहि उतरणार नाहीं इतकी येथील कला प्रगत झालेली आहे. उंचीच्या बाबतींतहि याने जगन्नाथाच्या मंदिराला मागे टाकलें आहे. याचा वरचा भाग कोसळला असल्याने आज तें तितकें उंच राहिलेलें नाहीं. परंतु याच्या इतर अवशिष्ट भागांवरून त्याची उंची २२७ फूट होती असें

दिसून येतें. जगन्नाथाच्या देवळाची उंची २१[illegible] फूट व साडे आठ इंच आहे.

समुद्राच्या खाऱ्या पाण्याचा परिणाम होऊन या मंदिराचे खालचे दगड मुरुमाप्रमाणें भुसभुसीत झाले आहेत. यामुळें खालच्या भागांतील कलाकुसर तितकीशी आकर्षक वाटत नाहीं. वरच्या भागावरील दगड मात्र अगदीं तुळतुळींत व चमकदार राहिला आहे. विशेषतः ज्या ठिकाणीं पाऊस व ऊन्ह यांचा प्रवेश होऊं शकत नाहीं त्या ठिकाणीं कोरलेल्या ६ ते १० फूट उंचीच्या देवी–देवतांच्या, गायक–गायिकांच्या, वादक–वादिकांच्या मूर्ति अगदीं जिवंत व रसरशीत वाटतात. विष्णु व लक्ष्मी यांच्याप्रमाणेंच गौतमबुद्धाचीहि मूर्ति या ठिकाणीं दिसली. यामुळे हें एकाच कट्टर पंथाचें मंदिर नसून त्यांत सर्व पंथाचा समन्वय अथवा समावेश करण्यांत आला असावा असें वाटतें.

## कहाणी व दंतकथा

कपिलसंहिता आणि सांबपुराण यांमध्यें या सूर्यमंदिराचा उल्लेख आढळतो. अर्थात् त्यांनीं हा संबंध पार द्वापार युगाशी नेऊन जोडलेला आहे ती कहाणी अशी–

श्रीकृष्णाचा मुलगा सांब याने गोपींशी कांहीं चावटपणा ( किंवा अतिप्रसंग ) केल्यामुळें कृष्णाने त्याला असा शाप दिला कीं 'तुला रक्त-पिती ( महारोग ) होईल.' परंतु सांबाने आपली चूक कबूल करून क्षमा–याचना केली. तेव्हां कृष्णानें त्याला असा उःशाप दिला कीं, 'तूं मैत्रेय वनांत जाऊन सूर्यनारायणाची उपासना केलीस म्हणजे तुझा महारोग नाहींसा होईल.' त्याप्रमाणें सांबाला रक्तपिती झाल्यानंतर तो मैत्रेयी वनांत सूर्यनारायणाच्या मूर्तींचा शोध करीत चालला असतां त्याला चंद्रभागा नदींतून वाहात चाललेल्या एका कमळाच्या फुलामध्यें सूर्याची मूर्ति दिसली. त्याने ताबडतोब नदींत उडी मारून तें कमळ हस्तगत केलें आणि त्याच नदीच्या कांठीं एक भव्य मंदिर उभारून त्यांत त्या सूर्यमूर्तींची स्थापना केली. पुढे त्या सूर्यनारायणाची उपासना केल्या-नंतर त्याची पित्याच्या शापांतून सुटका झाली आणि तो रोगमुक्त झाला.

अर्थात् सध्यांच्या मंदिराशी या कहाणीचा कांहीं संबंध नाहीं हें स्पष्ट आहे. कारण हें मंदिर कोणी व केव्हां बांधलें असावें या संबंधीं थोडा-फार ऐतिहासिक पुरावा उपलब्ध झालेला आहे. या कहाणीचा इत्यर्थ एवढाच कीं ज्या जागीं सध्याचें सूर्यमंदिर आहे तो भाग फार प्राचीन-काळापासून पवित्र व पुनीत मानला गेलेला आहे. आजहि येथें चंद्रभागा नदी वाहात आहे परंतु ती सध्याच्या मंदिरापासून समुद्राइतकीच मैल दीड मैल लांब आहे.

दुसरी एक दंतकथा मंदिराच्या शिखरासंबंधी आहे. असें सांगतात कीं बाराशे कारागीर सतत बारा वर्षेपर्यंत कोणार्कचें मंदिर बांधत होते. सम्राट नरसिंह देवाने ठराविक मुदतींत मंदिर पूर्ण करण्याची आज्ञा दिलेली होती. परंतु मंदिरावर कळस मात्र कांहीं केल्या ठरेना. अखेर मुख्य स्थपति बिसु महाराणा याचा बारा वर्षांचा मुलगा धर्मपद याने तें काम आपल्या अंगावर घेतलें आणि रात्रींतल्या रात्रींत कळस चढवून दिला. त्यानंतर आपला गौरव करण्यांत येऊन आपल्या पित्याचा व इतर गवंड्यांचा अपमान केला जाईल या भीतीनें धर्मपदानें कुणालाहि थांगपत्ता लागूं न देतां आत्महत्या केली.

ही कहाणी खरीखोटी कशीहि असली तरी तिच्यांत एक उदात्त बोध आहे. आत्म्याच्या महानतेचें दर्शन आहे. यामुळें त्या अज्ञात धर्मपदाला आदरानें मनांतल्या मनांत प्रणाम करण्याची इच्छा होते.

## ऐतिहासिक आधार

कोणार्क हें स्थान पुरीच्या ईशान्येस आहे. पुरीहून समुद्रमार्गानें त्याचें अंतर फक्त वीस मैल आहे. परंतु आम्हांला पुरीहून भुवनेश्वर-कटककडे जावयाचें होतें. यामुळें आम्ही मोटार मार्गानें येथें आलों. मोटारनें हें सुमारें अठ्ठेचाळीस मैल पडतें. मंदिराच्या आसपास कांहीं मैलपर्यंत मुळींच वस्ती दिसली नाहीं. अशा या कोपऱ्यांतल्या वस्तीपासून दूर असलेल्या ठिकाणीं हें मंदिर कां बांधण्यांत आलें असावें याची कांहीं कल्पना येत नाहीं. कदाचित् सांबपुराणांतील उल्लेखामुळें ही जागा पसंत करण्यांत आली असावी. या भागांत दगड अथवा डोंगर पर्वतहि

आढळत नाहींत. यामुळें या मंदिरांत वापरलेला सगळा दगड फार दुरून आणला असला पाहिजे हें उघड आहे. ओरिसा प्रॉव्हिन्शियल म्यूझियम, भुवनेश्वरचे क्युरेक्टर श्री. कालिंदीचरण प्राणिग्राही यांनीं आपल्या 'कोणार्कचें सूर्यमंदिर' या लेखांत म्हटल्याप्रमाणें हें मंदिर नुसत्या धार्मिक भावनेनें उभारलेलें नसून कीर्तिस्तंभ या स्वरूपांत त्याची निर्मिती झाली असणें शक्य आहे.

वेगवेगळे शिलालेख आणि दंतकथा यांवरून असें सिद्ध होतें कीं हें मंदिर गंगवंशांतील सम्राट नरसिंह (पहिला) (इ. स. १२३७ ते १२६४) याने बांधलें होतें. मुसलमानांची आपल्यावर स्वारी करूं देण्यापूर्वीं आपणच त्यांच्या प्रांतावर स्वारी करणारा सम्राट नरसिंह हा कांहीं एकटाच उत्कलीय राजा नव्हता. परंतु याच्याइतकें यश इतरांना आलें नाहीं. बंगालच्या सुभेदाराचें सैन्य मलिक इझ्झुद्दीन याच्या आधिपत्याखाली नरसिंहाच्या सैन्याला अडविण्यास पुढें झालें परंतु काटसिन या ठिकाणीं जोराची लढाई होऊन मुसलमानांचा पराभव झाला आणि मलिक इझ्झुदीनला जीव घेऊन पळावे लागले. शत्रूच्या मुलुखांत शिरून लढाई करण्याचें तंत्र एकदां अवगत करून घेतल्यानंतर सम्राट नरसिंहाने एकसारख्या मुस्लिम बंगालवर स्वाऱ्या करून त्यांचा बराचसा भाग आपल्या राज्यास जोडला आणि मिदनापूर, हावरा, हुगळी वगैरे दक्षिण बंगालचे जिल्हे ओडिसा साम्राज्यांत समाविष्ट झाले. नरसिंहाचे हेंच धोरण त्याच्या वंशजांनी स्वीकारल्यामुळे ओडिसा प्रान्तात मुसलमानांचा शिरकाव होऊं शकला नाहीं.

अशा प्रकारें विश्वविजयी मुसलमानांना धूळ चारल्यानंतर भव्य कीर्तिस्तंभ उभारण्याची कल्पना सम्राट नरसिंहाच्या मनांत आली नसती तरच आश्चर्य. त्याप्रमाणें त्यानें राज्यांतील सर्व कारागिरांना एकत्र आणून जगन्नाथाच्या मंदिरापेक्षाहि भव्य असें सूर्यमंदिर बांधण्याचा आदेश दिला आणि अनेक वर्षांच्या परिश्रमानंतर तें पूर्ण झालें.

अशा या कलाकुसरीने नटलेल्या भव्य कीर्तिस्तंभावरहि जगन्नाथ मंदिराप्रमाणेंच शृंगारिक व बीभत्स चित्रें आहेत हें पाहून मन जरा

खट्टू झालें. अर्थात् येथील चित्रें अत्यंत कलापूर्ण व पुष्कळच सुरुचिपूर्ण वाटलीं. तरी पण हीं चित्रें येथें कां असावीत हा प्रश्न मनांत घोळतच राहिला. श्री. सी. एम्. आचार्य हे आपल्या 'पुरी' संबंधीच्या लेखांत शेवटीं म्हणतात, "Such obscence figures, it is believed, were intended to protect the structures against lightning, cyclone or other visitations of nature. This view finds support from the authoritative passages in Utkal Khanda, Agni Puran and Brihat Samhita." म्हणजे ज्याप्रमाणें आपल्याकडे नव्या इमारतीला दृष्ट लागूं नये म्हणून चिंध्यांचें बाहुलें उलटें टांगतात त्याप्रमाणें देवळावर निसर्गाची अवकृपा होऊं नये म्हणून हीं अश्लील चित्रें कोरलीं असावींत असें त्यांचें मत आहे. मि. पर्सी ब्राऊन या इंग्रज विद्वानांच्या मतें ज्या काळीं हीं चित्रें कोरलीं गेलीं त्याकाळीं हिंदू समाज नैतिक दृष्ट्या अगदीं रसातळाला जाऊन पोहोंचला होता आणि ते लोक दगडावर कोरलेलीं हीं संभोगासनें प्रत्यक्ष आचरणांत आणीत असत. (Mr. Percy Brown has even gone to the length of doubting the survival of the demoralised race of people who were responsible for curving them in stone and who, according to him, might have carried into practice the gross vulgarities displayed by these figures.)

परंतु ओडिसाचा इतिहास असें सांगतो कीं हें अनुमान चुकीचें आहे. ज्या गंगवंशातील सम्राट नरसिंहानें हें मंदिर बांधलें त्या वंशांत त्याच्यामागून इतके महापराक्रमी सम्राट उदयास आले कीं इतिहासांत त्याला तोड सापडणार नाहीं. या वंशांतील सम्राट गजपति कपिलेंद्र देव याचें साम्राज्य (एका बाजूला मुस्लिम आक्रमक आणि दुसऱ्या बाजूला हिंदू साम्राज्यपिपासू दबा धरून बसलेले असतांनाहि) दक्षिणेस अर्कॉट व तंजावर जिल्ह्यापासून उत्तरेस हुगळी नदीच्या किनाऱ्यापर्यंत पसरलेलें होतें. म्हणजे हें मंदिर बांधलें गेल्यापासून सुमारें तीनशें वर्षेपर्यंत ओडिसाची भरभराटच होत होती. तेव्हां हीं चित्रें जनतेच्या ऱ्हासाला कारणीभूत झालीं अथवा जनता अधोगतीला गेल्याचें तीं सूचित करतात असें

म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं आणि अशीं चित्रें कांहीं फक्त ओडिसांतच नाहींत. मध्य-भारतांतील खजुराहो, मदुरा, खानदेशांतील बलसाने, नाशिक शिल्ह्यांतील सिन्नर ( अश्वेरा ) वगैरे ठिकाणच्या मंदिरावरहि असलीं चित्रें आढळतात. बंगाली वैष्णवांच्या लाकडी रथांवरहि तीं असतात आणि आधुनिक नेपाळी मंदिरावरहि तीं पहावयास सांपडतात. यामुळें त्या बाबतींत कोणी कोणाला नांवें ठेवण्यास जागा आहे असें म्हणतां येत नाहीं.

ओडिसांतील अतिप्राचीन मंदिरांमध्यें हीं चित्रें आढळत नाहींत. बौद्ध धर्मांतील तंत्रमार्गी महायान पंथियांचें वर्चस्व या प्रदेशावर प्रस्थापित झाल्यानंतरच हीं चित्रें उदयास आलीं. यामुळें या तंत्रमार्गाचा (Tantrism) विचार केल्यास या चित्रांचें कारण लक्षांत येऊं शकेल.

या संबंधीं मि. हॅरिसन फोरमन या गृहस्थांनीं आपल्या Through Forbidden Tibet या पुस्तकांत जे विवेचन केलें आहे तें सुज्ञांच्या विचारांना चालना देणारें आहे. Buddhist-Tantric temples of Tibet या संबंधीं पृ. १०७ वर ते लिहितात:—

" As I became more friendly with the Lamas at Lhabrang I learned, by judicious questioning, something of what the obscene Ihol house looked like inside and something of the awful esoteric rites performed therein.

The idol house is filled with obscene images. To put it very bluntly, those idols represent all the postures the mind of a man has been able to conceive having to do with copulation. When a lama has reached the point in his spiritaul training where he believes that he can look upon the flesh without desire or emotion, he enters the Obscene Idol house for ' post-graduate examinations ' and to conduct ' experimental researches.

Extremely life=like figures in the most lewed postures are calcuated to prove to him definitely just how much good his years of concentration upon the negation of things worldly,

how much his endless meditation and training in the things intellectual has done for him. After hours of chanting and meditation, it does not take too much imagination almost to see the idols move. The Tibetan artists and sculptors have done excellent work in depicting what theyth wis to show. The nude figures of volupluous women play a large part in this deeply serious rite, seem in sex play with the gods and demons; for it is an attempt to make copulation a visual aypeal to the senses.

Should the lama find that he can look unmoved at the obscene idols he may then take up the next stage. Living wemen are selected and trained for this very purpose. They are beautiful, even by our standard accomplished, and well congnigant of the seriousness and significance of their dutics.

To begin with, they dance. And they know all the dances calculated to stir the busts of men. Usually a lams sits alone before them, though some times small groups of lamas will perform these strrnge rites at the same time. So, then, the lama seated Buddhawise upon a littles dias, watches and studies his sensual reactions, knowing all the time that girls are his to do. There is a deliberate exhibition wherein the trained girls show all the arts and wiles of womanhood such as men always seek but so seldom find. The very acme of lustful desire is here pictured.

And the lama who looks upon this without interest has certainly made progress.

As a climax, the girls marshall all the arts and wiles of the courtesan whose duty in life is to please men and hurl them upon the lamas in training before them, regardless, in any way and every way possible.

Should the lama successfuly 'pass examinations' and thus prove to himself that he is at least above temptation, he is then entitled to progress to next stage-that of 'experimental research' which is self-explanatory. "

याचें तात्पर्य एवढेच की एखादा मनुष्य देवदर्शनासाठीं मंदिरांत प्रवेश करण्यास योग्य आहे कीं नाही याची परीक्षा घेण्यासाठीं अशीं शृंगारिक चित्रें देवळाच्या बाहेर कोरलीं जात आणि तीं पाहून ज्याचें मन विचलित न होईल तोच आंत प्रवेश करण्यास पात्र समजला जाई.

या अश्लील चित्रांचा मूळ उद्देश असा असणें शक्य आहे, परंतु नंतर जेव्हां मंदिरें हीं अनीतीचीं माहेरघरें बनली तेव्हां या चित्रांचा अगदीं उलटच परिणाम झाला असला पाहिजे. आणि आजच्या घटकेस तर त्यांचें कांहीच औचित्य शिल्लक उरलेलें नाहीं. ज्या देवळांत लहान मुलें व अविवाहित तरुणतरुणी दर्शनासाठीं जात असतात त्याठिकाणीं हें निर्लज्ज व किळसवाणें प्रदर्शन चालू ठेवण्यांत काय अर्थ आहे तें सरकारच जाणे. वस्तुतः एकतर हीं चित्रें झांकून टाकलीं पाहिजेत किंवा तेथून काढून स्वतंत्र म्युझियममध्यें ठेवलीं पाहिजेत. परंतु लोकांनाच जर तें सर्व हवें असेल तर लोकांचें प्रतिनिधि असलेलें सरकार त्यांत ढवळाढवळ कशी करणार ? म्हणून या बाबतींत जनतेनेंच पुढाकार घेतला पाहिजे.

## आणि तें अविस्मरणीय छोटेसें चित्र

या घाणेरड्या चित्रांतच एक फार उदात्त नि मधुर भावनांचें चित्र सूर्यमंदिराच्या जोत्यावर ( Plinth ) पाहावयास मिळालें. एका उंच वृक्षाखाली एक शेतकरी उभा आहे, त्याच्या खांद्यावर नांगर आहे, त्याच्या शेजारीच त्याची गृहलक्ष्मी उभी आहे आणि तिच्या कडेवर त्या दोघांच्या प्रीति–वेलीला आलेलें फूल–बालक आहे. घाणेरडीं व किळसवाणीं चित्रें बघून थकलेल्या व विटलेल्या दृष्टीला भारतीय संस्कृतीचें प्रतीकच असें हें चित्र पाहून किती सुख, किती समाधान वाटलें यांचें वर्णन करणें शक्य नाहीं, बाकीची चित्रें कालांतराने मनःपटलावरून पुसून जातील. परंतु हें कौटुम्बिक जीवनाचें पुण्यपावन चित्र कधीच विस्मृत होणार नाहीं.

## लोहचुंबकाचा कळस आणि हत्ती–घोडे

असें सांगतात कीं जुन्याकाळीं या मंदिराच्या कळसावर अत्यंत सामर्थ्यवान असा लोहचुंबक होता. त्यामुळें समुद्रांतून जाणारीं जहाजें




कोणार्क येथील हत्तीचे भव्य चित्र


किनाऱ्याकडे खेंचून घेतली जात. जकात चुकविणारी अथवा चांचेगिरी करणारीं जहाजें अशा प्रकारें सरकारी पहाऱ्यांतून निसटूं शकत नसत. जर ही गोष्ट खरी असेल तर त्यावेळीं ओडिसा सरकाराची समुद्रावरहि कशी सत्ता चालत होती याची कल्पना येईल. आजहि तेथे एक भला मोठा लोखंडी गोळा पडलेला दिसतो. तोच पूर्वी लोहचुंबकत्वाचें कार्य करीत होता असें सांगतात.

मंदिराच्या एका बाजूला दोन घोडे आणि दुसऱ्या बाजूला दोन हत्ती आहेत. त्यांपैकीं घोडे फारच सुंदर व प्रमाणबद्ध आहेत. त्यांनीं आपल्या पायाखालीं शत्रूसैनिकांना चेंगरून टाकलें आहे आणि त्यांची एकूण pose अशी आहे कीं ते विश्वविजय करण्यासाठीं विजलीच्या वेगानें धावणार आहेत, परंतु त्यांच्या जवळच्या सैनिकाने, त्यांच्या मालकाने त्यांना महत्प्रयासानें आवरून धरलें आहे. म्हणूनच ते थांबले आहेत असें वाटतें. हत्ती त्या मानाने सौम्य वाटतात. परंतु त्यांच्यातहि गतिमानतेचा भास होतो. त्यांच्या सोंडेंत मानवी शरीरें आहेत, परंतु तीं नष्ट करण्यासाठीं वर उचलली आहेत कीं सहज क्रीडा म्हणून धरलेलीं आहेत हें सांगणें कठीण आहे. अर्थात् ज्याअर्थी घोड्यांनीं माणसांना चेंगरून टाकलें आहे त्याअर्थी हत्ती हेहि नरसंहारच करूं इच्छित असलें पाहिजेत असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

### कालाय तस्मै नमः

अशा प्रकारचें हें भव्य मंदिर ज्या काळीं बांधलें गेलें, त्या काळीं हा प्रांत राजकीय व कलात्मक बाबतींत किती पुढें गेलेला असेल याची आपण कल्पना करूं लागलों म्हणजे मन एकीकडे थक्क होऊन जातें आणि दुसरीकडे आजची स्थिति आठवून विषण्ण होतें. भव्यता आणि कलेची सूक्ष्मता या दोहोंचा इतका मधुर संगम क्वचितच आढळेल. हें देऊळ ओसाड प्रदेशांतील खंडहरा प्रमाणें विस्कटलेले दिसतें. परंतु ज्यावेळीं त्याचा चालता काळ होता त्यावेळीं ह्या ठिकाणीं सौंदर्याचा कसा पूर वाहात असेल याची कल्पना करूं लागलों कीं, तोंडातून 'कालाय तस्मै नमः' हें वाक्य सहजगत्या बाहेर पडतें.

ज्यावेळीं हें मंदिर संपूर्ण स्वरूपांत अस्तित्वांत होतें त्यावेळीं तें कसें दिसत असेल याचें रेखाचित्र मि. पर्सी ब्राऊन यांनीं कल्पनेनें व भग्नावशेषाच्या मदतीनें तयार केलें आहे. त्यावरून या मंदिराच्या अवाढव्य विस्ताराची कल्पना येण्यासारखी आहे. अर्थात् या ठिकाणापासून समुद्र दूर हटल्यामुळें आणि मुख्य वाहतुकीच्या मार्गापासून लांब पडल्यामुळें



**कोणार्क येथील सूर्यमंदिराचे रेखाचित्र**

या स्थानाला पुनः पूर्वीचें महत्व आणून देण्याचा प्रयत्न कोणी करूं म्हणेल तर तें शक्यहि नाहीं, इष्टहि नाहीं नि आवश्यकहि नाहीं. मात्र जे कांहीं अवशेष राहिले आहेत ते कसे टिकतील याची काळजी घेणें जरूर आहे. कारण खाऱ्या पाण्याचा परिणाम होऊन मंदिराच्या खालच्या बाजूचे दगड भुसभुशीत झाले आहेत. त्यामुळे उरलेला भागहि कोसळून पडण्याची किंवा रेतींत खचण्याची भीति सदैव राहणार. त्या दृष्टीने प्रांतिक व केंद्रीय सरकारांनीं इकडे लक्ष देणें जरूर आहे.

★★★

# भुवनेश्वर : १०

## होऊं घातलेल्या राजधानींत

कटक ते पुरी या रेल्वे रस्त्यावर कटकपासून अठरा मैलावर भुवनेश्वर आहे. या ठिकाणीं ओडिसाची नवी राजधानी वसविण्यांत येणार असल्याची वार्ता बरेच दिवसांपासून कानावर आलेली होती. यामुळें हें स्थान आहे तरी कसें हें पाहण्याची उत्सुकता लागून राहिलेली होती. परंतु येथें आल्यानंतर असें ऐकलें कीं नवी राजधानी बनविण्याचें काम जरी सुरूं झालेलें असलें तरी इतर निकडीच्या कामामुळें यापुढें त्या कामाला फारसें महत्व दिलें जाणार नाहीं. असें जरी असलें तरी या ठिकाणीं रस्ते व इमारती बांधण्याचें काम चाललेलें दिसतच होतें.

भुवनेश्वर हें फार प्राचीन कालापासून एकाम्रकानन अथवा स्वर्णाद्रि या नांवांनी प्रसिद्ध असून बौद्ध, जैन, शैव, वैष्णव, आणि गाणपत्य या पांच पंथांच्या लोकांचें तें तीर्थस्थान बनलेलें आहे. सनातनी लोकांच्या मतें लिंगराज मंदिरापासून दहा मैलाच्या तिज्येने जो परिसर बनतो तेवढ्या क्षेत्रफळामध्यें हें शहर पसरलेलें होतें. यांतील अतिशयोक्ति जरी वगळली तरी सुमारें पांचसहा मैलाच्या परिसरांत वेगवेगळ्या काळीं हें शहर भरभराटलेलें असावें असे तेथें सांपडणाऱ्या अवशेषांवरून वाटते. इसवीसनापूर्वी तिसऱ्या शतकापासून इसवीसनाच्या सोळाव्या शतकापर्यंत म्हणजे जवळ जवळ दोन हजार वर्षेंपर्यंत हें ठिकाण गजबजलेलें होतें. यामुळे या परिसरांत जितकी धार्मिक व ऐतिहासिक स्थळांची दाटी झालेली आहे तितकी अन्यत्र कोठेंच आढळत नाहीं. या स्थानाचा इतिहास तेजस्वी व स्फूर्तिदायक असल्यामुळेंच नूतन ओडिसाची राजधानी येथे नेण्याची इच्छा उत्कलीय जनतेच्या मनांत उत्पन्न झाली असावी.

येथून दक्षिणेस पांच मैलावर धौली या नांवाची सुप्रसिद्ध टेकडी असून तेथे अशोकाचे कोरलेले शिलालेख सांपडले आहेत. धौलीपासून तीनचार मैलावर आणि भुवनेश्वराहून एक मैलावर शिशुपालगढ नांवाचा प्रत्येक

बाजू पाऊण मैल लांब असलेला भुईकोट किल्ला आहे. हिंदु लष्करी शिल्पशास्त्राचा नमुना या दृष्टीनें या किल्ल्याला फार महत्व आहे. परंतु तो आतां जवळ जवळ नामशेषच झाला आहे असें समजतें.

भुवनेश्वराच्या पश्चिमेस पांच मैलावर उदयगिरी आणि खंडगिरी नांवाच्या प्रसिद्ध टेकड्या आहेत. तेथे जैन साधूंना राहण्यासाठीं जयविजय गुंफा, पणस गुंफा, स्वर्गपुरी हत्तीगुंफा, गणेश गुंफा, राणीगुंफा कोरलेल्या आहेत. या ठिकाणीं खारवेल या जैन सम्राटाचेंहि शिलालेख सांपडतात. त्यामध्यें खारवेलनें दोन वेळां मगधावर स्वारी करून अशोकाच्या विजयाचा कसा सूड उगवला आणि दुसऱ्या खेपेस आपले विजयी हत्ती पाटलीपुत्रांतील मगध सम्राटाच्या सुसनाग राजवाड्यांत घुसवून एकानंद राजानें कलिंग देशांतून पळवून नेलेली जैनमूर्ति कशी परत मिळाविली वगैरे इतिहास सापडतो. इसवी सनापूर्वी चौथ्या शतकांपासून इसवी सनाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकापर्यंत म्हणजे पांचसहाशें वर्षांच्या काळांत मगध आणि कलिंग ( बिहार व ओडिसा ) हीं दोन राज्यें अत्यंत प्रबळ होतीं आणि त्यांच्यांत सदोदित लढाया चालू असत. हा सगळा इतिहास उदयगिरी–खंडगिरी पाहिल्याने आठवतो.

## भुवनेश्वर हें मंदिरांचें नगर

परंतु पुरी व कोणार्क पाहून आम्ही थकून गेलों होतों आणि पुढचे कार्यक्रम ठरलेले असल्यामुळें भुवनेश्वर पाहण्यामध्यें घालविण्यास आमच्याजवळ कांहीं तासच शिल्लक होते. म्हणून आम्ही भुवनेश्वराच्या आसपासचीं स्थळें पाहण्याचा मोह बाजूस सारून भुवनेश्वरच जितकें पाहून घेतां येईल तेवढें घेण्याचें ठरविलें. त्यामुळें मनांत एक प्रकारची अतृप्ति राहिली खरी परंतु पुन्हां या भागांत येण्यास ते एक कारण झाले हेंहि खोटें नाहीं. 'या खेपेला फार घाई झाली. पुन्हां केव्हां तरी सवड काढून येथें आलें पाहिजे' असे प्रत्येक स्थळ सोडतांना आम्हांला वाटलें आणि त्या अतृप्तीच्या तंतूनें आमचीं मनें व हृदयें त्या स्थानांशीं बांधून टाकलीं.

सध्यां भुवनेश्वराची लोकसंख्या वीस हजार आहे. पण ती फारशी पसरलेली नाहीं. येथील मंदिरें मात्र खूप दूर दूरपर्यंत पसरलेलीं आहेत.

या शहराच्या परिसरांत निश्चितपणें किती देवळें असावींत हें कोणीच सांगू शकत नाहीं. श्री. एम्. एम्. गांगुली या गृहस्थांनीं या मंदिरांची पद्धतशीर मोजणी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनीं ही संख्या सुमारें पांचशें असल्याचें जाहीर केलें आहे. परंतु त्यांत सर्व लहानमोठीं मंदिरें आलीं असतील कीं नाहीं, किंवा एकाच मंदिरांतील बारीक सारीक मंदिरें स्वतंत्र मोजल्यामुळें ही संख्या फुगली असेल हें कळण्यास मार्ग नाहीं. परंतु त्याचा अर्थ एवढाच कीं भुवनेश्वर हें मंदिराचें शहर आहे. यामुळें त्याला The Temple Town of Bhubaneswar म्हणतात. आमच्याजवळ वेळ फार थोडा असल्यामुळें आम्ही निवडक व सुप्रसिद्ध अशीं चार पांच देवळें पाहिलीं.

## राजाराणीचें छोटेसे पण अप्रतिम मंदिर

आम्ही सर्वांत प्रथम गांवापासून दूर असलेलें राजाराणी मंदिर पाहिलें. या देवळांत सध्यां मूर्ति नाहीं. गाभारा रिकामाच आहे. परंतु येथें एके-काळीं शिवाची अथवा नटराजाची मूर्ति असावी असा अंदाज आहे. मात्र शिवालिंग नव्हतें एवढें खास. कांहीं विद्वानांच्या मतें हें मंदिर विष्णूचें असावें, परंतु मंदिराच्या दारावर चंड आणि प्रचंड हे दोन शैव द्वारपाल कोरलेले आहेत आणि नटराज, लिंगपूजा आणि निशा पार्वती यांचीं लहान लहान चित्रें मंदिराच्या भिंतीवर कोरलेलीं आहेत. शिवाय शिव-पार्वती विवाहाचेंहि एक चित्र येथें पहावयास मिळतें. यावरून हें मंदिर शैवपंथाचेंच असलें पाहिजे याविषयीं शंका उरत नाहीं. या मंदिराला राजाराणीचें मंदिर असे नांव कां पडलें असावें या संबंधीं श्री एम्. एम्. गांगुली यांचें म्हणणें असें कीं या मंदिरामध्यें जो पिवळसर रंगाचा रेताड दगड ( Yellowish Sand stone ) वापरलेला आहे त्याला स्थानिक लोक 'राजरानिया' दगड असें म्हणतात. त्यावरून या मूर्ति-विहीन मंदिराला राजाराणीचें मंदिर असें नांव पडलें असावें.

या मंदिरावरहि संभोगाचीं चित्रें आहेत. परंतु तीं जगन्नाथाच्या मंदिरा-वरील चित्रांप्रमाणें हिडीस अथवा बीभत्स नाहींत. त्यांच्यामध्यें कोणार्कच्या मंदिरावरील चित्रापेक्षांहि अधिक मार्दव व सौंदर्य आहे. यामुळें तीं

पाहतांना मनामध्यें किळस उत्पन्न होत नाहीं. रसिक मनुष्य तटस्थवृत्तीनें तीं पाहूं शकतो. शिवाय हीं चित्रें अगदीं डोळ्यांत भरण्यासारख्या ठळक जागीं नाहींत. तीं मुद्दाम शोधावी लागतात आणि ऊन्ह पावसापासून सुरक्षित राहिल्यामुळें तीं अगदीं नवीन व ताजीं वाटतात.

या मंदिरावरील इतर कलाकुसरहि अगदीं वाखाणण्यासारखी आहे. या बाबतींत श्री. कालिंदीचरण पाणिग्राही लिहितात, " In the sculptures of Rajarani, the Orissan pictorial art reached its zenith. The images and other specimens of art are no doubt the superb products, but in the midst of the grandeur, certain defects are also to be noticed. In some of the glamorous ALASA KANYAS or decorative female figures that adorn the edifice, the hips are found to have been attenuated rather than accentuated, which is contrary to both convention and realism. "

## केदारगौरी मंदिरः ओडिसाचे शीरींफरहादः

राजाराणी मंदिर पाहिल्यानंतर आम्ही केदारगौरी मंदिर पहावयास गेलों. या ठिकाणीं मंदिरांचा एक झुबकाच आहे. हीं मंदिरें इतकीं एकमेकांना चिकटलेलीं व एकमेकांत मिसळलेलीं आहेत कीं एक मंदिर कुठे संपलें आणि दुसरें कुठें सुरू झालें हें कळतच नाही. मुक्तेश्वर परशुरामेश्वर, मार्कंडेश्वर, शिशिरेश्वर वगैरे देवांचीं देवळें जवळ जवळच आहेत. सर्व ठिकाणीं महादेवाची पिंडीच आहे मूर्ति नाही. यामुळे फरक फक्त मंदिरावरील कारागिरींत आहे. मुक्तेश्वराच्या आवारांत कांहीं रिकामी छोटीं छोटीं देवळें किंबहुना मोठे कोनाडे आहेत. त्यांत नटराज, नाग, कार्तिकेय वगैरे घरेंदारेंस्वतःची देवळें—नसलेल्या अथवा स्वतःच्या देवळांतून निर्वासित झालेल्या मूर्ति ठेवलेल्या आहेत. या देवळांच्या समूहांत कांहीं देवळें अशीं आढळली की ज्यांच्यावर संभोगाचीं किंवा शृंगाराचीं मुळींच चित्रें नाहीत. त्यामुळे ती मंदिरें बौद्धांच्या महायान पंथाचा प्रसार होण्याच्या पूर्वींचीं असावीत असा अंदाज आहे.

केदारगौरीच्या देवळांत तसें कांहीं विशेष नाही. परंतु तें नांव लक्षांत

राहण्याचीं दोन कारणें आहेत. एक म्हणजे या मंदिराच्या आवारांत एक औषधीपाण्याचें टाकें आहे. हें पाणी शुभ्रनिळसर दिसतें. याच्या औषधी गुणामुळें तें रोज कलकत्याला नेलें जातें असें समजलें.

दुसरें कारण म्हणजे केदारगौरीची कहाणी. ही दंतकथा ऐकून मला फारसी वाङ्मयांतील शीरीं–फरहाद, लैला–मजनू वगैरे प्रेमी युगूलांची आठवण झाली. विशेषतः शीरीं फरहादच्या कथेशीं विलक्षण साम्य आहे. ही दंतकथा अशी:—

एका राजाला गौरी नांवाची एक अत्यंत रूपवती कन्या होती. तिचें केदार नांवाच्या एका गरीब तरुणावर प्रेम बसलें हें राजाला आवडलें नाहीं. त्यानें तिला त्या प्रेमापासून परावृत्त करण्याची खूप खटपट केली परंतु गौरीनें आपला हट्ट सोडला नाहीं. तें पाहून राजानें केदारचा काटा काढण्याचा प्रयत्न चालविला. परंतु आपण त्याचें कांहीं बरें वाईट केलें हें गौरीला अथवा इतर कोणालाहि कळूं नये अशी त्याची इच्छा होती म्हणून त्यानें एक युक्ती योजली. केदार शिकारीसाठीं जंगलांत जात असतो हें त्याला माहित होतें. म्हणून त्यानें आपल्या शिकार-खान्यांतील एक सिंह त्याच्या वाटेवरील जाळींत लपवून ठेवण्यास आपल्या एका विश्वासू नोकराला सांगितलें. त्याप्रमाणें तो सिंह तेथें नेऊन ठेवण्यांत आला. थोड्या वेळानें केदार त्या वाटेनें जाऊं लागतांच नोकरानें सिंहाला चवताळून त्याच्या अंगावर सोडलें. केदार असावध होता. त्यामुळें तो प्रथम गांगरला परंतु लौकरच स्वतःला सावरून त्यानें सिंहाशी झटापट आरंभिली. त्या झटापटींत तो भयंकर जखमी झाला आणि खाली पडला. तें पाहतांच राजाचा नोकर सिंहाला घेऊन परत शिकारखान्यांत गेला. गौरीला ही बातमी समजतांच ती धांवतच जंगलांत गेली. परंतु त्या ठिकाणीं केदार नव्हतां, त्याची पगडी आणि अंगांतील कपडे फाटलेल्या स्थितींत इतस्ततः पडलेले पाहून सिंहाने केदारला खाऊन टाकलें असावें असें समजून तिनें दुःखातिशयाने स्वतःच्या गळ्याला गळफांस लावून घेतला आणि त्याच ठिकाणीं आत्महत्या केली.

इकडे जखमी केदारला जंगलांतील लोकांनीं आपल्या झोपडींत नेऊन

त्याच्यावर औषधोपचार केले. पुढें तो बरा झाल्यानंतर राजधानींत येऊन चौकशी करतो तों गौरींच्या आत्महत्येची हकीगत त्याला कळली. तेव्हां त्याला त्या बातमीनें धक्का बसून त्याची हृदयक्रिया बंद पडली व तो मरून गेला. अशा प्रकारें दोन प्रेमी जीवांचा असा हृदयद्रावक शेवट होतो. पुढें कांहीं दिवसांनीं राजाला असें स्वप्न पडतें कीं कोणीतरी दैवी पुरुष येऊन आपल्याला असें सांगत आहे कीं, 'हे राजा, तुझ्या दुष्टपणामुळें दोन निःष्पाप जिवांची हत्या झाली. या पापाचें प्रायश्चित्त म्हणून तूं शिवमंदिर बांध.' त्याप्रमाणें त्या प्रेमी युगुलांचें स्मारक म्हणून राजा एक महादेवाचें देऊळ बांधतो. हेंच केदारगौरी मंदिर.

## लिंगराजाचें भव्य मंदिर

भुवनेश्वरांतील मुख्य मंदिर लिंगराजाचें आहे. या लिंगराजमंदिराची उंची १२७ फूट आहे. यामुळे गाडींतून जातांनाहि खूप दुरून हें मंदिर दृष्टीस पडतें. कलिंग पद्धतीच्या स्थापत्याचा हा अगदीं उत्कृष्ट नमुना समजला जातो. या मंदिरावरील नक्षीकाम व कलाकुसरहि मोठीं प्रेक्षणीय आहे. या मंदिराचें आवार ५२० फूट लांब आणि ४६५ फूट रुंद असून त्यांत पुष्कळ लहान मोठीं देवळें आहेत. या मंदिरांतील पार्वती, कार्तिकेय वगैरे देवदेवतांच्या मूर्ति मोठ्या सुरेख आहेत.

या मंदिरामध्यें स्वयंभू महादेवाचें लिंग आहे. यामुळें हें देवस्थान जागृत समजलें जातें आणि खूप दूरदूरचे लोक दर्शनासाठीं येत असतात.

अशा प्रकारचीं अनेक लहानमोठीं मंदिरें येथे आहेत. तीं पाहून त्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यास विद्वानांना वाव आहे. आमच्यासारख्या वरवर पाहून जाणाऱ्या प्रवाशांना त्यांत फारसे समजण्यासारखे नाही आणि तो आपला विषयहि नव्हे हें जाणून आम्ही घाईघाईनें थोडी मंदिरें डोळ्याखाली घातली आणि कटकला गेलों.

★ ★ ★

## साक्ष द्यावयास गेलेल्या गोपालाचें देऊळ

पुरीहून कोणार्कला जातांना पुरीपासून दहा मैलांवर साखीगोपाल अथवा साक्षीगोपाल हें लहानसे गांव असून तेथें राधाकृष्णाचें देऊळ आहे. यांतील वृंदावनच्या गोपालाची काळ्या पाषाणाची मूर्ति फार सुंदर आहे. परंतु तिला जरीची टोपी वगैरे पोरकट वस्त्रें घालून पुजाऱ्यांनीं त्याचा अगदी नाच्या पोऱ्या करून टाकला आहे. मुरलीधर कृष्णाच्या समोर डाव्या बाजूस राधेची मूर्ति आहे. परंतु तिला रूप वगैरे कांहीं नाहीं आणि तिच्या शरीरावर वस्त्रालंकार (खरे कीं खोटे पुजाऱ्यांना माहीत) तर वरातीचें घोडें सजवावें त्याप्रमाणें घातलेले असतात. यामुळें ती अगदीच कळाहीन कोल्हाटणीसारखी दिसते. या कृष्णासंबंधींची कहाणी अशी आहे:—

एकदां दोन वृद्ध ब्राह्मण वृंदावन वगैरे तीर्थक्षेत्राची तीर्थयात्रा करावयास गेले. वृंदावनाला गेल्यानंतर त्यापैकीं श्रीमंत असलेला ब्राह्मण आजारी पड़ला. तेव्हां दुसऱ्या गरीब ब्राह्मणाने त्याची खूप सेवाशुश्रूषा केली त्यायोगें तो आजारांतून बरा झाला. पुढें तो हिंडूं फिरूं लागल्यानंतर आपली सेवाशुश्रूषा करणाऱ्या मित्राला म्हणाला, 'गड्या, तूं माझी सेवाशुश्रूषा केली नसतीस तर मी कांहीं या आजारांतून वांचलों नसतों. तुझे हे उपकार कसे फेडावेत हेंच मला कळत नाहीं. तरीपण आपल्या दोघांचे संबंध अधिक दृढ व्हावेत म्हणून मी माझी मुलगी तुझ्या मुलाला देण्याचा निश्चय केला आहे.' हें ऐकून त्या गरीब ब्राह्मणाला फार आनंद झाला. त्यांचें हें बोलणें वृंदावनाच्या देवळांत झालें. तेथें त्यावेळीं त्यांच्याखेरीज इतर पुष्कळ मंडळी होती. परंतु त्यांचें बोलणें कोणीच ऐकलें नाहीं. फक्त श्रीकृष्णाचेंच तिकडे लक्ष होतें.

कालांतराने ते दोघे तीर्थयात्रा पूर्ण करून आपापल्या घरीं गेले. घरीं पोचतांच श्रीमंत ब्राह्मणाची बुद्धि फिरली आणि तो आपल्या मुलीचें लग्न दुसऱ्या एका श्रीमंत ब्राह्मणाच्या मुलाशीं ठरवूं लागला. हें कळतांच

गरीब ब्राह्मणाने त्याची भेट घेऊन त्याच्या वचनाची त्याला आठवण करून दिली परंतु श्रीमंत ब्राह्मणाने दोन्हीं कानावर हात ठेवले आणि आपण असें कधींच बोललों नव्हतों असें सांगितलें. तेव्हां गरीब ब्राह्मणाने कोर्टांत जाऊन त्याच्यावर फिर्याद ठोकली. फिर्याद सुरू झाल्यावर न्यायाधीशाने विचारलें, 'तुझ्या म्हणण्याला पुरावा काय? तुझ्या बाजूचा एखादा साक्षीदार आहे काय?' त्यावर तो म्हणाला, 'सरकार, आम्ही जेव्हां बोलत बसलो होतो तेव्हां इतर कोणाचेच आमच्याकडे लक्ष नव्हतें. याला फक्त भगवान कृष्णच साक्षी आहेत.' न्यायाधीशानें सांगितले, 'तर मग तूं भगवान कृष्णाची साक्ष काढ. नाहीतर तुझें म्हणणें खरे आहे हें सिद्ध होणार नाहीं.'

त्या ब्राह्मणाला आपल्या सत्यवादित्वाचा अभिमान होता म्हणून तो परत वृंदावनाला गेला आणि पोटांत अन्नपाणी न घेतां देवापुढें धरणें धरून बसला. 'परमेश्वरा, माझ्या बाजूनें साक्ष द्यायला तूं चल.' प्रथम कांहीं दिवस कृष्णानें त्याला दाद दिली नाहीं. परंतु पुढें जेव्हां तो म्हातारा फुकट मरून जाणार असें दिसूं लागलें तेव्हां त्यानें आकाशवाणी करून त्याला असें सांगितलें कीं, 'हे माझ्या भक्तवरा, मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहे आणि तुझ्या इच्छेप्रमाणें तुझ्या गांवीं साक्ष देण्यास यायला मी तयार आहे. मात्र एका अटीवर. तूं पुढें पुढें चालावयाचें नि मी मागून यावयाचें. परंतु तूं मागें वळून पाहतां कामा नये. ज्या ठिकाणीं तूं मागें वळून पाहशील तेथेंच मी अदृश्य होईन."

अशा प्रकारें करारमदार झाल्यानंतर तो ब्राह्मण चालूं लागला व त्याच्या मागोमाग गोपाळहि चालू लागला. गोपाळाच्या पायांत घुंगूर असल्यामुळें तो आपल्या मागून येत आहे किंवा नाहीं हें त्या ब्राह्मणाला सहज कळत असे. म्हणून त्याला मागे वळून पाहण्याचें प्रयोजन वाटलें नाहीं. पुढें एके ठिकाणीं नदीचें वाळवंट लागलें. तेथें येतांच कृष्णाच्या पायांतील घुंगूर रेतींत घुसल्यामुळें वाजण्याचें बंद झालें. तेव्हां भटजीबोवांना अशी शंका आली कीं या खट्याळ कान्ह्यानें बहुधा मागच्या मागेच आपल्याला गुंगारा दिला असावा. म्हणून त्यानें मागें वळून पाहिलें.

त्याबरोबर जिवंत कृष्ण अदृश्य झाला आणि त्याठिकाणीं त्याची फक्त दगडी मूर्ति उभी राहिली. इकडे वृंदावनांत श्रीकृष्ण न दिसल्यामुळें राधाराणी बेचैन झाली आणि तीहि त्याच्या पावलाचा मागोवा घेत त्या ठिकाणीं येऊन पोहोंचली.

याच गोष्टींत थोडासा फरक करून कांहीं लोक ती अशी सांगतात कीं, साक्ष देण्यासाठीं श्रीकृष्ण कांजीवरमला गेला आणि तेथेंच राहिला. पुढें पुरीच्या एका राजानें कांजीवरमच्या राजाला जिंकून तेथून गणेश आणि गोपाळ या दोघांनाहि आपल्याबरोबर नेलें. त्यांतील गणेशाला जगन्नाथाच्या मंदिरांत ठेवलें ( आजहि हा काळ्या कुळकुळीत दगडाचा तुळतुळीत गणपति जगन्नाथाच्या मंदिरांत आहे. ) पण कुंजवनांत राहिलेल्या गोपाळाला गजबजलेल्या पुरी शहरांत चैन पडेना म्हणून तो येथील निवांत जंगलांत येऊन राहिला.

## गोपबंधु दासांचें ‘ सत्यवादी ’ विद्यालय

आम्हाला वस्तुतः या कृष्णाच्या देवळांत कांहीं रस ( Interest ) नव्हता. आम्ही मुख्यतः येथील सुप्रसिद्ध सत्यवादी विद्यालय पाहण्यासाठींच थांबलों होतों. सत्यवादी हें विद्यालयाचें विशेषण नसून तें साखीगोपाल गांवाचेंच दुसरें नांव आहे. बाहेरच्या लोकांना यात्रेच्या निमित्तानें साखीगोपाल हें नांव परिचित आहे तर स्थानिक जनतेमध्यें सत्यवादी हेंच नांव अधिक रूढ आहे. यामुळें ‘ सत्यवादी दवाखाना ’, ‘ सत्यवादी पोलिसठाणें ’ वगैरे गमतीदार पाट्या येथें वाचावयास मिळतात.

कै. गोपबंधु दास हे आधुनिक उत्कलचे पिताच होत. त्यांनी गांधीजींचें नेतृत्व पत्करून त्यांच्या तत्त्वांनुसार सबंध प्रान्तांत जागृतीचें काम केलें. त्यांच्यानंतर त्यांचे सहकारी व शिष्य असे श्री. होताजी, आचार्य हरिहरदास, श्री. हरेकृष्ण मेहताब, श्री. गोपबंधु चौधरी वगैरे सौम्य व सात्विक प्रवृत्तीचे लोक उत्कलचें नेतृत्व करीत आहेत. यामुळें वरच्या बाजूस दहशतवादी क्रांतिकारक बंगाल आणि खालच्या बाजूस अत्याचारी कम्युनिस्टांचा आंध्र असूनहि या प्रांतांतील जनता सनदशीर मार्गानेंच आपले प्रश्न सोडविण्याची श्रद्धा बाळगून आहे.

या गोपबंधु दासांनी १९०८ च्या राष्ट्रीय चळवळींत या ठिकाणीं राष्ट्रीय शिक्षणाची एक शाळा काढली. तिचें नांव सत्यवादी विद्यालय. या विद्यालयाचें वैशिष्ट्य असें कीं येथील वर्ग उघड्यावर गर्द झाडांच्या छायेंत चालत असत. येथील जंगल किंवा कुंजवन फारच दाट आहे. वडाची व बकुळीचीं उंचउंच झाडें येथें आहेत. त्याच्या गर्द व दाट छायेंत प्राचीनकालीन गुरुकुलांप्रमाणें वर्ग चालत. उन्हाचा त्रास तर होत नसेच पण मामुली पावसाचाहि उपसर्ग पोंचत नसे. विद्यार्थ्यांना निसर्गाच्या निकट सान्निध्यांत तपस्वी गुरुकडून पवित्र ज्ञान मिळे. शिक्षणाकरितां वीटचुन्याची खुर्ची आणि मेज तयार करून ठेवलेले असे. सध्यांहि येथें तेंच विद्यालय चालू आहे. आम्ही गेलों त्यावेळेस शाळा सुटलेली होती तरी पण मुलांचीं डेस्कें वगैरे सामान बाहेर उघड्या जागेंत झाडांच्या छायेमध्येंच होतें. त्यावरून या शांतिनिकेतन पद्धतीच्या शाळेची थोडीशी कल्पना आली. परंतु सध्यां या विद्यालयांत कांहीं जीव उरलेला नाहीं, तें एक सामान्य सरकारी हायस्कूल झालेलें आहे आणि आचार्य हरिहरदास वगैरे जुनी मंडळी त्यांतून बाहेर पडलीं आहेत.

अर्थात् सत्यवादीं विद्यालयाचा संबंध तुटला तरी या गांवाशीं या राष्ट्रीय कार्यकर्त्यांचा संबंध आहेच. गोपबंधु दास यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्थापन करण्यांत आलेल्या ‘ गोपबंधु दरिद्रनारायण संघ ’ या संस्थेचें मुख्य केंद्र याच ठिकाणीं आहे. या संघाच्या शाखा सर्व उत्कल-प्रांतांत पसरलेल्या असून त्या जनजागृतीचें काम अव्याहतपणें करीत आहेत.

★ ★ ★

# जय-राजेंद्रांच्या कर्मभूमींत : १२

## भगवान् बुद्ध-महावीरांची तपोभूमि

भारताच्या इतिहासांत व भूगोलांत बिहारचा जो उल्लेख येतो तो वाचून लहानपणीं या प्रदेशाबद्दल मनामध्यें एक प्रकारचें कुतूहल व आदराची भावना निर्माण झाली होती. भगवान् गौतम बुद्धांना याच प्रदेशांत बोधिगयेला ज्ञानप्राप्ति झाली आणि बौद्ध धर्मानुयायांच्या मठ-विहारांमुळेच या प्रांताला बिहार असें नामाभिधान प्राप्त झालें. जैनांचें चोवीसावे तीर्थंकर भगवान् महावीर यांचीहि कर्मभूमि व निर्वाणभूमि (पावापुरी) येथेंच आहे. यामुळें जरी कोठल्याहि विशिष्ट धर्माबद्दल मनांत विशेष प्रीति अथवा अप्रीति नसली तरी या दोन धर्मसंस्थापकांनीं भारतीय समाजाच्या सुधारणेसाठीं व उन्नतीसाठीं जे परिश्रम घेतलें त्याची छाप मनावर कायमच राहिली आहे. अशा या महापुरुषांची तपोभूमि इतक्या स्वस्थपणें पाहतां येईल अशी कल्पना कधीं मनांत आली नव्हती. यामुळें जेव्हां अशी संधि मिळाली तेव्हां डोळे, कान व हृदय खुलें ठेवून या भूमीचें मीं दर्शन घेतलें. वस्तुतः मीं फक्त दक्षिण बिहारचाच कांहीं भाग पाहिला. आणि तोहि फार थोड्या अवधीमध्यें. यामुळें या प्रांतांसंबंधीं कांहीं लिहिणें धाष्टर्याचेंच समजलें जाईल. परंतु ह्या ओझरत्या दर्शनांत मला बिहारच्या सद्यःस्थितीची जी माहिती मिळाली ती नमूद करून ठेवावी म्हणूनच हा लेख लिहीत आहे.

## जय-राजेन्द्राची कर्मभूमि

मी मुख्यतः विधायक कार्यकर्त्यांच्या सहवासांतच राहिलो. हें विधायक कार्यकर्ते राजकारणाशीं संबंध असणारे व एके काळीं राजकारणांत भाग घेतलेले असेच आहेत. यामुळे बिहारच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीविषयीं त्यांच्याकडून मिळालेली माहिती पुष्कळच जबाबदारीची व वस्तुस्थितीची निदर्शक अशी समजण्यास हरकत नाहीं. बिहारमध्यें हिंडल्यानंतर एक गोष्ट चटकन् लक्षांत येते कीं, या प्रान्तावर राष्ट्रपति राजेन्द्रप्रसाद आणि प्रजासमाजवादी पुढारी बाबू जयप्रकाश नारायण या

दोघांचीहि विलक्षण छाप पडलेली आहे. आज हे दोन महापुरुष वेगवेगळ्या राजकीय गोटांत असले तरी दोघांबद्दलहि सामान्य जनतेला सारखीच आपुलकी व आदर वाटतो. राजेन्द्रबाबू व जयप्रकाश हे एकाच कायस्थ जातीचे आहेत, इतकेंच नव्हेतर एकमेकांचे नातेवाईकहि आहेत. ही गोष्ट जेव्हां मला कळली तेव्हां या योगायोगांची मला मोठी गंमत वाटली. बुद्ध महावीरांच्या या भूमींतील लोकावर धर्माचा व आध्यात्मिकतेचा पगडा असणें स्वाभाविकच आहे. यामुळे राजेद्रबाबूंची धार्मिक व आध्यात्मिक प्रवृत्ति पाहून आश्चर्य वाटत नव्हतें. परंतु एकेकाळीं मार्क्सवाद व भौतिकवाद यांचे कट्टे पुरस्कर्ते व अनुयायी असलेले जयप्रकाश जेव्हां आध्यात्मिकतेच्या गोष्टी बोलूं लागले तेव्हां अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. बिहारची परंपरागत पार्श्वभूमि माहीत असणाऱ्यांना मात्र याचें आश्चर्य वाटणार नाहीं; कारण येथील व्यक्तींचा पिंड धर्म व अध्यात्म यांच्या खुराकावर पोसला व वाढला जातो. यामुळें सर्वसामान्य बिहारी माणूस अखेर शेवटीं धर्म व अध्यात्म यांचीच कास धरतो.

## शेंडी व जानवें

परंतु त्याचें हें धर्मप्रेम कधी कधी आत्यंतिक टोकाला जाऊन पोचतें. राजेंद्रबाबूंचा हिंदु कोड बिलाला असलेला विरोध सर्वश्रुतच आहे. परंतु त्यापेक्षांहि आश्चर्याची गोष्ट शेंडी व जानवें यांबद्दल बिहारी लोकांत असलेली आसक्ति होय. बिहारमध्यें व उत्तर प्रदेशांत सामान्य लोकच नव्हे तर सोशालिस्ट व कम्युनिष्टे लोकहि शेंडी ठेवतात व जानवें घालतात! मग बिचारे कॉंग्रेसवादी व विधायक कार्यकर्ते यांची काय कथा! आधुनिक पद्धतीनें केस ठेवून भांग पाडणारे तरुणहि लहानशी स्वतंत्र शेंडी ठेवतातच. येथील लोक जानवें नुसतें घालूनच थांबत नाहींत तर त्यांचा कानांवर अडकविण्यासाठी उपयोगहि करतात. जानवें घालणारे लोक ब्राह्मणच असतात असें नव्हे तर भूमिहार, रजपूत, कायस्थ वगैरे जातींचे लोकहि आपण ब्राह्मणांपेक्षां कांहीं कमी नाहीं हें दाखविण्यासाठीं जानवें वापरतात. महाराष्ट्रांतील हिंदुधर्माभिमानी तरुणहि शेंडी-जानव्याची फारशी पर्वा करीत नाहींत, असें जेव्हां मी येथील मित्रांना सांगितलें

तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. शेंडीशिवाय संस्कृति–संरक्षण होऊं शकतें यावर बहुधा तिकडील कम्युनिस्टांचाहि विश्वास नसावा !

## सामान्य रंगरूप

सर्वसामान्य बिहारी लोकांचा रंग काळा असून रूप सामान्य- प्रतीचें असतें. उत्तर प्रदेशांतील लोक त्या मानाने अधिक रूपवान् आणि गोरे असतात. राजेंद्रबाबूंचें रंगरूप हें बिहारचें प्रतिनिधिक रंगरूप समजण्यास हरकत नाहीं. पुरुषांच्या मानाने स्त्रियांमध्यें सौंदर्याचा अभाव विशेष जाणवतो. अर्थात् पडद्याची पद्धति असल्यामुळें तेथें स्त्रियांचें दर्शन होणेंच दुर्लभ असतें. आपल्याकडील खानदेशी माणसाशीं इकडील लोकांचें रूप व स्वभाव या बाबतींत खूपच साम्य आहे.

बिहारी लोकांसंबंधी विचार करूं लागलों कीं मला त्यांच्या प्रेमळ-पणाची व गबाळेपणाची प्रथम आठवण होतें. जितके अतिथ्यशील तितकेच आळशी, जितके सहृदय तितकेच सुस्त. ‘यह काम अभी तुरत हो जाता है’ असें एखाद्या बिहारी माणसानें सांगितलें कीं खात्रीनें तास दोन तास लागणार असें समजावें. यामुळें कोणी ‘तुरत’ ( ताबडतोब ) शब्द वापरला कीं छातींत धडकीच भरे. येथील लोकांच्या मनांत एक प्रकारची न्यूनमनोगंडाची वृत्ति आहे. आणि हा न्यून–मनोगंड लप-विण्यासाठीं आपण फार मोठे आहोंत असें दाखविण्याची धडपड ते एकसारखी करीत असतात. त्यामुळें उलट त्यांच्यांतील न्यूनमनोगंडच जास्त उठून दिसतो. आजपर्यंत येथें दोनच वर्ग होते. वरचा आणि खालचा. श्रीमंत व जमीनदार एका बाजूस आणि गरीब शेतमजूर दुसऱ्या बाजूस. मध्यम वर्गाचें अस्तित्व जवळ जवळ नव्हतेंच. गेल्या कांहीं वर्षांत हा मध्यम वर्ग उदयास येऊं लागला आहे आणि त्याच्यामुळेंच या लोकांमध्यें अस्मिता निर्माण झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाही.

## ‘चमचा’ संस्कृतीचा गंध नाहीं

बिहारी लोकांच्या गबाळेपणाचें एक ठळक उदाहरण द्यावयाचें तर असें सांगतां येईल कीं तेथें चमचा नांवाची वस्तु पाहावयास सापडत नाहीं. भातभाजी वगैरे जेवणाचे पदार्थ वाढतांना भसकन् हात घालून ते

वाढूं लागले कीं माझ्यासारख्याला संवय नसल्यामुळें मळमळूं लागे. येथें दगडासारखे घट्ट व पांढरे शुभ्र दही बाजारांत विकत मिळतें. ( घरीं विरजण लावण्याची प्रथा जवळजवळ नाहींच ) परंतु आमचा आचारी जेव्हां भांड्यांत हात घालून बोटांनीं दही वाढी तेव्हां तें दही खाण्याची इच्छाच मनांतून नाहींशीं होई. परंतु हें तर कांहींच नव्हे. खेड्यांमध्यें पातळ केलेलें तूपहि हाताच्या पंज्याचा चमच्यासारखा उपयोग करून वाढण्यांत येते असें जेव्हां मीं ऐकलें तेव्हां त्या कल्पनेनें मला कसेसेंच वाटलें. बिहारमध्यें भात हेंच मुख्य अन्न आहे. परंतु तेथें खडे नसलेला भात कधींच खावयास मिळणार नाहीं. कधीं कधीं तर असें वाटें कीं, कोवळ्या कोवळ्या दगडाचाच भात केलेला असून त्यांत चुकून अधून मधून शितें आलेलीं आहेत. येथें मोठी भांडीहि मिळणार नाहीत. दहा-वीस लोकांचा भात करावयाचा असल्यास एका लहानशा भांड्यांत चारपांच वेळा भात करतील. पहिला भात उकडून फडक्यावर पसरून ठेवतील आणि त्यावर नंतर तयार झालेला भात ओततील. भात हा पदार्थ गरम स्थितींत खावयाचा असतो हें तत्त्व जणूं ह्यांना मान्य नसावें असें वाटतें.

## एकीकडून बंगाल, दुसरीकडून उत्तर प्रदेश

बिहारी लोक आपल्या मागासलेपणाचें खापर मुख्यतः बंगाली व त्यांच्या खालोखाल उत्तर प्रदेशीय लोकांच्या आक्रमक वृत्तीवर फोडतात. कांहीं वर्षांपूर्वीं बंगाल, बिहार व ओरिसा हे प्रांत एकत्रच होते त्यावेळीं बंगाली लोक सर्वांत अधिक सुशिक्षित व इंग्रजाळलेले असल्यामुळे या तिन्ही प्रांतावर त्यांचेंच वर्चस्व प्रस्थापित झालें. त्यांतून त्यांच्या ठिकाणीं एक अहंकार उत्पन्न झाला आणि त्यामुळे बंगालेतर प्रांतांना त्यांच्या-बद्दल हेवा, ईर्षा व द्वेष वाटूं लागला. त्याचे अवशेष आजहि या तिन्ही प्रांतांत सापडतात. वस्तुतः कोणत्याहि विशिष्ट प्रांताचा माणूस मंदबुध्दीचा अथवा तैलबुद्धीचा आहे असा शिक्का मारणें अशास्त्रीय ठरेल. साऱ्या भारतवर्षाचें नेतृत्व करूं शकतील असे डॉक्टर राजेन्द्रप्रसाद व जयप्रकाशजी ज्या लोकांतून निर्माण होतात ते निर्बुद्ध आहेत असें म्हणणें निर्बुद्धपणाचेंच

ठरेल; परंतु बुद्धीचा वापर करण्याच्या बाबतींत आळस केल्यामुळें त्यांच्यावर असा आरोप केला जातो. बिहारमध्यें अगदीं परवापरवा-पर्यंत मोठमोठ्या हुद्यांच्या जागांवर व शिक्षणक्षेत्रांत बंगाली लोकांचेंच प्राबल्य होतें आणि व्यापारामध्यें व साहित्यिक क्षेत्रांत उत्तरप्रदेशी यांची गर्दी होती. एवढ्या मोठ्या प्रांतामध्ये विद्यापतीनंतर एकहि भारतीय कीर्तीचा हिंदी साहित्यिक निर्माण होऊं नये हें आश्चर्यच नव्हे काय? हल्लीं देखील श्रीरामवृक्ष जेनीपुरी, श्री. दिनकर, श्री. नागार्जुन, आचार्य शिवपूजन सहाय, श्रीं. गोपालसिंह नेपाली, श्री. आरसी प्रसादसिंह वगैरे अगदीं बोटावर मोजण्याइतकेच मोठे साहित्यिक या प्रांतांत दिसतात. कांहीं वर्षांपूर्वीं बिहारच्या शाळा-कॉलेजांतून चालणारी पुस्तकें प्रयाग-बनारसला प्रसिद्ध होत आणि उत्तर प्रदेशीय लेखकच तीं तयार करीत असत. या एका गोष्टीवरून साहित्यक्षेत्रामध्यें हा प्रांत कितीं मागासलेला होता याची कल्पना येईल. आतां मात्र बिहारी लेखक व प्रकाशक पुढें सरसावले आहेत आणि त्यांनीं बिहारच्या बाहेरहि आपला प्रभाव पाडण्यास सुरवात केली आहे. व्यापार व उद्योगधंदे यांच्या बाब-तींत मात्र अद्यापि मारवाडी, पंजाबी व उत्तर प्रदेशीय लोकांचेंच वर्चस्व तेथें दिसून येतें आणि त्याबद्दल बिहारी लोक मनांतून व जाहीरपणें जळफळतांना आढळतात. अर्थात् या बाबतींत आपणां महाराष्ट्रियाशीं त्यांचें पुष्कळच साम्य आहे; कारण महाराष्ट्राचा व्यापार-उदीमहि आज गुजराथीं व मारवाडी लोकांच्या हातांत आहे. आतांपर्यंत सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांचीं व ठेक्याचीं कामें बहुधा पंजाबी व बोहरी लोकां-नाच मिळत असत. परंतु आतां तेथें प्रान्ताभिमान जागृत झाल्यापासून जास्त दराचीं टेंडरें देणाऱ्या स्थानिक बिहारी लोकांनाहि कंत्राटें मिळूं लागलीं आहेत.

## चुकीची नमुनेदार हिन्दी

हिन्दी साहित्याच्या क्षेत्रांत बिहारी लोक जे मागें राहिले याचें मुख्य कारण त्यांची चुकीची अथवा अशुद्ध हिन्दी हेंच असावें. बिहार-मध्यें काटेकोर शुद्ध हिंदीचें ज्ञान असणारे फार थोडे लोक सांपडतील

आणि जे शुद्ध हिंदी बोलूं शकतात असें लोक तर त्याहूनहि फार थोडे. इतरांची गोष्ट जाऊं द्या. खुद्द मी बिहारमध्यें १५–२० दिवस राहिलों तर तेवढ्या अवधींत बिहारी हिंदीने मजवर पगडा बसविला आणि एकदां न कळत पुल्लिंगी दही शब्दाला मी स्त्रीलिंगी बनवून टाकलें. याचें कारण असें कीं अष्टौप्रहर ज्या लोकांशीं संबंध येतो त्यांच्यामध्यें शुद्ध हिंदीचा आग्रह धरणारे कोणी नसतात. आपोआप तोंडांतून जशीं जशीं वाक्यें निसटून जातील तशीं जाऊं देणें, त्यासाठीं मुळींच प्रयत्न न करणें हा येथील लोकांचा स्वभावच आहे.

अर्थात् याबद्दल बिहारी लोकांना दोष देणें योग्य होणार नाहीं. कारण बिहारमध्यें कोणाचीहि मातृभाषा हिंदी नाहीं. जिला खडी बोली असें नांव आहे आणि जी पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरेंच्या द्वारें छापील स्वरूपांत आपल्यासमोर येते व आंतरप्रांतीय संबंधासाठीं भारतीय घटना समितीने राज्यभाषा म्हणून जिला मान्यता दिलेली आहे अशी हिंदी येथील कोणतेंहि कुटुंब आपल्या घरांत वापरीत नाहीं. येथील लोक आपापल्या घरीं मगधी, भोजपुरी, मैथिली वगैरे भाषा बोलतात. या भाषांमध्यें बंगालीप्रमाणें लिंगभेद नसल्यामुळें जेव्हां हे लोक हिन्दी बोलतात तेव्हां त्यांना लिंगाचें भान राहत नाही आणि 'बडा अच्छा रोटी खिलायी' अशा सारखी एकाच वाक्यांत अनेक लिंगप्रयोग असलेली भाषा ते वापरतात. क्रियापदाचे नियमहि कोणी पाळीत नाहींत. कर्तरी प्रयोगांत कर्ता एक-वचनी व क्रियापद अनेक-वचनी आल्यास ऐकणाराच्या कानांत तें खुपत नाहीं. डॉक्टर राजेन्द्रप्रसादहि 'बाढ आयी'च्या ऐवजी 'बाढ आया' असें बोलतात !

## मराठीला जवळचे शब्द

बिहारी लोकांच्या हिंदीमध्यें येणारे कित्येक शब्द हिंदीपेक्षां मराठीलाच जास्त जवळचे वाटतात. उदाहरणार्थ किराया ( भाडें ) या शब्दाऐवजीं तेथें सर्रास 'भाडा' हा शब्द वापरला जातो. 'बाल' ( केस ) च्या ऐवजीं 'केश', चावल ( भात ) च्या ऐवजीं 'भात', बक्साच्या ऐवजीं 'पेटी' वगैरे अनेक परिचित शब्द कानांवर पडले. इतकेंच नव्हे

तर एकदां खादी-भांडारांतील विक्रेता जेव्हां मला म्हणाला कीं, ‘ इतना कपडा आपको पुरेगा नही, ’ तेव्हां मला मोठी गंमत वाटली; कारण पुरणें याअर्थी पूरना या क्रियापदाचा प्रयोग यापूर्वीं मी कधीं ऐकला अथवा वाचला नव्हता.

येथील अशुद्ध हिंदीच्या संसर्गांतून वर्तमानपत्रें व रेल्वेसुद्धां सुटलेल्या नाहींत. बिहारमधून प्रवास करतांना आगगाडीच्या डब्यांत जर पुढील-प्रमाणें पाट्या दृष्टीस पडल्या तर आश्चर्य वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. खालील सूचना गयेहून राँचीला जातांना आम्ही ज्या डब्यांत बसलों होतों त्यांतील आहेत. ‘ ४० आदमि बैठेगा. आगको फैलनेसे रोक-नेको सावधानी, कमरेके अंदर सिगारेट व बीडीके तुकडे फेकना विपद-जनक है। यदि अन्य यात्रियोंको आपत्ति हो तो कृपया धूम्रपान न करिये। ’

बोधिगयेच्या तिबेटी मंदिरांतील खालील पाटीवरहि बिहारी हिंदीची छाप स्पष्ट दिसून येते.

तिब्बीतियन महायाना
बुद्धीस्ट मंदिर बुद्धा गया

### महान अभिशाप-पडदा-

बिहारला मिळालेला सर्वांत भयंकर अभिशाप कोणता असें जर कोणी मला विचारील तर मी तेथील पडदा पद्धतीकडे बोट दाखवीन. या घातक प्रथेमुळें बिहारला जणूं अर्धांग झाला आहे. सर्व बिहारमध्यें कोणी हिंडला तरी त्याला हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याहि स्त्रिया पाहावयास मिळणार नाहींत. ज्या थोड्या स्त्रिया किंवा तरुणी दिसतील त्या बंगाली असतील किंवा खिश्चन तरी असतील अथवा अगदीं खालच्या वर्गांतील कामकरी बाया तरी असतील. खेड्यांची गोष्ट तर राहोच, पण शहरांतूनहि सुंदरी-मुखदर्शन हें उंबराच्या फुलाइतकेंच दुर्लभ आहे. राँची कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर आचार्य दादा धर्माधिकारी यांचें व्याख्यान झालें त्या वेळची गोष्ट. सबंध सभागृह विद्यार्थी, प्राध्यापक व शहरांतील प्रतिष्ठित मंडळी यांनीं भरून गेलेले होते. परंतु विद्यार्थिनी

मात्र तीन–चारच होत्या. शहरांतील मोठमोठ्या सभांना फक्त पुरुषच हजर राहतात. स्त्रियांसाठीं स्वतंत्र कॉलेजें आहेत. जेथें अशीं कॉलेजें नाहींत तेथें विद्यार्थिनी जवळ जवळ नसतांतच. रॉंची कॉलेजच्या हजार बाराशें विद्यार्थ्यांमध्यें सुमारें चाळीस विद्यार्थिनी आहेत. त्यांपैकीं सुमारे पस्तीस मुली बंगाली अथवा ख्रिश्चन जमातीच्या आहेत. या पडदापद्धतीमुळें आधुनिक जग व विचार यांच्याशीं स्त्रियांचा फारसा संबंधच येत नाहीं. शेकडो वर्षांपूर्वींच्या जमान्यांतच त्या वावरत आहेत. यामुळें जेव्हां एखादी परप्रांतीय स्त्री निर्भयपणें त्यांची सेवा करण्यास जाते तेव्हां त्या आश्चर्यानें थक्क होतात आणि अजबखान्यामधील एखाद्या विचित्र प्राण्याकडे पाहावें तशा त्या तिच्याकडे पाहूं लागतात. भूदानयज्ञाचा प्रचार करण्यासाठीं वर्ध्याच्या महिलाश्रमांतील कांहीं शिक्षिका, विद्यार्थिनी व कार्यकर्त्या गेले कांहीं महिने बिहारमध्यें हिंडत आहेत. त्यांना असा अनुभव आला कीं, जोंपर्यंत तेथील पडदापद्धति नष्ट होणार नाहीं, तोंपर्यंत तेथें कोणतेहि स्थायी स्वरूपाचें कार्य होणार नाहीं. पडदापद्धतीमुळें हुंड्याचें वर्चस्व कायम राहिलें आहे. सामान्य वर्गांतील मुलींनाहि पाच-सहा हजार रुपये हुंडा दिल्याशिवाय वर मिळत नाहीं, त्यासाठीं मुलीच्या बापाला आपला जमीनजुमला विकावा लागतो. येथील कित्येक लोक भूदानप्रचारकांना असें म्हणाले कीं; ‘ जर आम्ही तुम्हांला आमच्या जमिनी देऊन टाकल्या तर आमच्या मुलींचीं लग्नें कशीं होतील? तेव्हां तुम्ही जर हुंड्याची (त्याला इकडे तिलकप्रथा म्हणतात) चाल बंद कराल तर आमच्याजवळ असलेली जास्तींतजास्त जमीन भूदानयज्ञांत आम्ही देऊन टाकूं. ’

## बिहारी राजकारणांतील जातीयवाद

महाराष्ट्रांतील जातीयवादाने संत्रस्त झालेल्या निराश मनाला भगवान् बुद्ध आणि महावीर यांचा पुनीत बिहार निश्चितपणें शांति देईल अशी अपेक्षा करणें निरर्थक आहे. परंतु तेथील जातीयवादाचें किळसवाणें व ओंगळ स्वरूप पाहून त्यांच्यापेक्षा आम्ही किती तरी बरें असें वाटतें. आपल्याकडे सामान्यतः ब्राह्मण व ब्राह्मणेतर असें जातीयवादाचें स्वरूप

आहे. आणि जेथें जेथें ब्राह्मणांनी राजकीय सत्तास्पर्धेंतून, मानाच्या स्थानांवरून अंग काढून घेतलें आहे तेथें तेथें हा वाद जवळजवळ संपुष्टांत आला आहे आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतरांच्या नव्या पिढींत जातीयवादापेक्षा सामाजिक व आर्थिक प्रश्नासंबंधीचा जिव्हाळा वाढत असल्याचीं चिन्हें दिसत आहेत.

बिहारमधील जातीयवादांत ब्राह्मण समाजाला मुळींच स्थान नाहीं. असलेंच तर सत्तेचा समतोल (बॅलन्स ऑफ पॉवर) ठरविणारा एक अल्पसंख्य गट एवढेंच त्याचें महत्त्व आहे. विधिमंडळांतून हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेंच ब्राह्मण सभासद आहेत; परंतु त्यांच्या या विशिष्ट स्थानामुळें सध्याच्या मंत्रिमंडळांतहि एका ब्राह्मणाची वर्णी लागलेली आहे. आजपर्यंत बिहारमध्यें कायस्थ जमातीचें वर्चस्व होतें. यामुळें कांहीं वर्षांपूर्वीं येथील जातीयवादाचें स्वरूप कायस्थ व कायस्थेतर अशा स्वरूपाचें होतें. परंतु बहुसंख्येची लोकशाही देशामध्यें सुरू होतांच ज्यांची संख्या जास्त त्यांचें राज्य अशी स्थिति निर्माण झाली आणि बहुसंख्य जमातींना महत्त्व प्राप्त झालें. आपल्याकडील मराठ्यां-प्रमाणें येथें भूमिहार ही जमात आहे. या जमातीचे पुढारी बिहारचे सध्याचे मुख्य मंत्री श्री. श्रीकृष्णसिंह (श्रीबाबू) हे आहेत. परंतु नुसत्या भूमिहार जातीच्या पाठिंब्यावर मुख्य मंत्रिपदाची जागा टिकविणें त्यांना शक्य नाहीं. त्यामुळें त्यांनीं ब्राह्मणांचा व इतर अल्पसंख्य जमातींचा पाठिंबा मिळविलेला आहे. बिहारमधील दुसरी महत्त्वाची जात म्हणजे रजपूत ही होय. या जमातीचे पुढारी श्री. अनुग्रह नारायणसिंह हे बिहारच्या काँग्रेस मंत्रिमंडळांत अर्थमंत्री आहेत. श्रीबाबू आणि अनुग्रह-बाबू यांच्यांत सत्तेसाठीं चाललेली झटापट आतां सर्वश्रुत आहे. वस्तुतः हें भांडण या दोघां व्यक्तींमधील आहे. परंतु त्याला व्यापक स्वरूप देण्या-साठीं त्यांनीं आपापल्या जमातींना राबविलें आहे. एका काँग्रेस पक्षाच्या हुकमतीखालीं काम करीत असूनहि त्यांच्यांत अहिनकुलवत् संबंध निर्माण झाले आहेत. तरीपण त्यांच्या भांडणामुळें तेथील काँग्रेसपक्षीय मंत्रि-मंडळ कोसळलेलें नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या

महाराष्ट्रांत काँग्रेसमधून शेतकरी कामकरी पक्ष फुटून बाहेर पडला नसता तर कदाचित् येथेंहि असेंच मजेदार दृश्य पाहावयास मिळालें असतें. बिहारच्या परिस्थितीवरून महाराष्ट्रांतील जातीयवादी ब्राह्मणेतरांना एक धडा घेतां येण्यासारखा आहे. तो असा कीं, सत्तास्पर्धेतून ब्राह्मण समाज बाहेर पडला कीं मग ब्राह्मणेतरांमध्येंच सत्तेसाठीं कलह सुरू होतात आणि तेथेंहि मग त्यांत जी ब्राह्मणेतर जमात बहुसंख्य असते तिचें वर्चस्व प्रस्थापित होऊन अल्पसंख्य ब्राह्मणेतर जमातीचें नुकसान होते. बिहारमधील समाजवादी पक्षाला या जातीयवादापासून दूर ठेवण्याचा पुष्कळच यशस्वी प्रयत्न श्री. जयप्रकाश नारायण यांनीं केलेला आहे. परंतु त्यामुळेंच, जनतेमध्यें ते स्वतः अत्यंत लोकप्रिय असूनहि त्यांच्या पक्षाला तिकडे बहुमत मिळवितां आलें नाहीं. जातीयवादानें पोखरलेल्या या देशांत बहुसंख्यांकांची लोकशाही देखील प्रसंगीं कशी अपयशी ठरते याचें बिहार हें एक उदाहरण आहे.

## उज्ज्वल भविष्याची आशा

इतके असूनहि बिहारच्या भवितव्याबद्दल मी निराश नाहीं. बिहारी जीवनांतील सारें किल्मिश धुऊन काढण्यास समर्थ असलेला असा एक महापुरुष आज तेथें जाऊन पोंचलेला आहे आणि बिहारची भूमिसमस्या यशस्वीपणें सोडविण्याचा त्यानें चंग बांधलेला आहे. तो महापुरुष म्हणजे श्री. विनोबाजी भावे हे होत. बिहारबाहेरील व विशेषतः महाराष्ट्रांतील स्त्री–पुरुष कार्यकर्ते आज बिहारमध्यें हिंडून भूदान–यज्ञाचें कार्य करीत आहेत. त्यांच्यापैकीं स्त्री–कार्यकर्त्यांचा उपयोग करून घेऊन बिहारमधील पडद्याच्या प्रथेला मूठमाती देण्याची जयप्रकाशजींची इच्छा आहे. ती सफळ झाल्यास 'बिहारचा पुनर्जन्म' होईल आणि भगवान् बुद्धाच्या व भगवान् महावीराच्या काळचे सांस्कृतिक वैभव त्या प्रदेशाला पुनः प्राप्त होऊ शकेल.

★★★

# पावापुरीचें जलमंदिर : १३

## जैनांचें पवित्र क्षेत्र

हिंदुस्थानांतील जैनांच्या तीर्थक्षेत्रांचें अध्ययन ही एक अत्यंत महत्त्वाची व मनोरंजक गोष्ट ठरेल. जैन धर्म हा जरी हिंदु धर्माचाच एक पोटविभाग किंवा पंथ असला, तरी गेली दोन अडीच हजार वर्षें त्यानें आपलें स्वतंत्र अस्तित्व टिकवून धरलें आहे. बौद्ध धर्माप्रमाणें त्याला या देशांतून आपलें चंबूगबाळें आवरावें लागलेलें नाहीं आणि आज तर देशांतील अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत जैनपंथीय लोक अग्रेसर ठरले आहेत. उत्तर भारतांत जैनांचीं तीर्थक्षेत्रें असणें स्वाभाविकच आहे; परंतु दक्षिण भारतांतहि श्रवणबेळगोळा, मूडबिद्री वगैरे ठिकाणीं जैनांची पवित्र क्षेत्रें आजहि विद्यमान आहेत. याचा एक फायदा असा होतो कीं, वेगवेगळ्या प्रांतांतील व वेगवेगळ्या भाषा बोलणारे जैन लोक एकत्र येऊं शकतात आणि प्रांतीयतेच्या वर जाऊन अखिल भारताच्या दृष्टीनें विचार करूं शकतात. आणि यामुळेंच त्यांच्या कर्तबगारीला अफाट वाव मिळालेला आहे.

अशा या कर्तृत्वसंपन्न वैश्य जमातीचें एक पवित्र क्षेत्र बिहारमध्यें पाटणा (पटना) जिल्ह्यांत पावापुरी येथें आहे. पाटण्याहून नवादा गांवीं जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर बिहारशरीफ शहरापासून सुमारें आठ मैलावर (पाटण्यापासून ५८ मैलावर) पावापुरी नांवाचें खेडें आहे. तेथेंच जैनांचें प्रसिद्ध जलमंदिर आहे. भगवान् महावीरांनीं या ठिकाणीं देहत्याग केला व त्यांना येथें अग्निसंस्कार देण्यांत आला असें मानण्यांत येतें, यामुळें धार्मिक दृष्ट्या या स्थानाला अत्यंत महत्त्व आहे. जेथें महावीरांनीं देहत्याग केला, तें स्थान पावापुरी खेड्यांत आहे. त्या ठिकाणीं एक देऊळ बांधण्यांत आलेलें आहे, परंतु त्यांत कांहीं विशेष नाहीं. ज्या ठिकाणीं त्यांना अग्निसंस्कार देण्यांत आला, त्या ठिकाणीं मात्र एक अत्यंत सुंदर असें संगमरवरी जलमंदिर उभारण्यांत आलें आहे. जैनेतर प्रवासी मुख्यतः हें जलमंदिर पाहण्यासाठींच पावापुरीस जात असतात.

## सुंदर, डुमदार मंदिर

राजगृह व नालंदा या प्राचीन स्थानांपासून जवळच पावापुरा हें ठिकाण असल्याचें समजतांच तेथें जाण्याचा मी निर्णय घेतला. बिहार-शरीफहून राज्य ट्रान्सपोर्ट सर्व्हिसच्या बसनें पावापुरीला जावें असें मला सांगण्यांत आलें होतें. परंतु आदल्या दिवशीं, म्हणजे ता. १२।३।५३ रोजीं नालंदा स्टेशनवर कांहीं प्रवासी मला भेटले होते. त्यांनीं मला असें बजावून सांगितलें कीं, 'तुम्ही मोटारीवर विसंबून मुळींच राहूं नका. येथील बस सर्व्हिस अत्यंत अनियमित आहे आणि नवादाहून परत येणाऱ्या गाडींत जागा मिळेलच असें नाहीं. काल आम्हांला पावापुरीहून बिहार-पर्यंत तंगड्या तोडीत चालत यावें लागलें. तुम्ही टमटम (टांगा) किंवा रिक्शा करून पावापुरीस जा.'

त्या गृहस्थांचा उपदेश शिरसावंद्य मानून आम्ही सायकल-रिक्षा करून पावापुरीस गेलों. सकाळीं राजगृह व नालंदा येथें खूप पायपीट करून आम्ही थकून गेलो होतो. शिवाय ऐन दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास आम्ही बिहारला (बिहार हें बिहारशरीफचें संक्षिप्त रूप असून त्या भागांत हेंच जास्त प्रचलित आहे) पोंचलों होतों. अशा वेळीं रिक्शांतून ७-८ मैल जाणें कांहीं सुखदायक नव्हतें. परंतु कसेंहि करून त्या दिवशीं रात्रीं पाटण्याला पोचणें मला भाग होतें. कारण दुसऱ्या दिवशीं पहांटे पाटण्या-हून गयेला जाण्याचा कार्यक्रम निश्चित झालेला होता. म्हणून त्या तळपत्या उन्हांत डांबरी रस्त्यावरून प्रवास करण्यास आम्ही तयार झालों. अर्थात् रस्त्याच्या कडेला बऱ्यापैकीं झाडें असल्यामुळें फारसा त्रास झाला नाहीं.

बिहारपासून पावापुरीपर्यंत मोटारनें पावणे सात आणे पडतात. माझ्या-बरोबर तिवारी नांवाचे एक बिहारी गृहस्थ होते. म्हणजे आम्हां दोघांना जाण्यायेण्यास एकूण १ रु. ११ आणे खर्च आला असता. शिवाय, मोटार रस्त्यापासून सुमारें मैलभर चालावे लागतें. त्यांतहि वेळ व श्रम खर्ची पडले असते म्हणून जाण्यायेण्याचे ३ रुपये घेऊन रिक्शावाला येण्यास तयार झाला तेव्हां आम्हांला तो फार महाग वाटला नाहीं. आणि आम्ही एक तासांत रिक्शानें पावापुरीस पोंचलों. तेथील सुंदर

जलमंदिर पाहून मात्र आमचा सारा शीण दूर झाला.

**श्रीमंतीचे वैभव, ऐश्वर्याचें प्रदर्शन** :

जैन जमात मुख्यतः वैश्यवर्णीय आहे. यामुळें त्यांच्यांत संपत्तीला महत्त्व अधिक आहे. तसें पाहिल्यास बाह्य संपत्तीची, भांडवलशाहीची प्रतिष्ठा ही गोष्ट सर्वच जमातींत व सर्व जगभर अनादिकालापासून चालत आलेली आहे. यामुळें या बाबतींत अमुक एका जमातीला नांवें ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. परंतु जेथें श्रीमंत लोक वरचेवर व अधिक संख्येनें जातात तेथील पुजारी, व्यवस्थापक व नोकरचाकर गरीबांकडे पूर्णपणें दुर्लक्ष करतात, किंबहुना त्यांची अवहेलना करतात, असा अनुभव येतो. यांत त्यांचा कांहीं दोष आहे असें नव्हे. ज्या समाजांत श्रीमंती हेंच वैभव समजलें जातें, तेथें अशी वृत्ति निर्माण न झाली तरच आश्चर्य. आम्हालाहि या वस्तुस्थितीचा अनुभव पावापुरीस आला. आमच्या पूर्वीं आगऱ्याचे एक मोठे शेठ तेथें आलेले होते. त्यांच्या दिमतींत तेथील मंडळी इतकी गुंतून गेली होती कीं, आमच्याकडे लक्ष देण्यास कोणाला सवडहि झाली नाहीं.

येथील मंदिरांतहि ऐश्वर्याचें प्रदर्शन पाहून डोळे दिपतात. वस्तुतः एका विशाल सरोवराच्या मध्यभागीं वसलेल्या या टुमदार मंदिराचें दृश्य पुरेसें मनोहर आहे. त्याला बाह्य भपक्याची मुळींच जरूर नाहीं. परंतु देवळांतील सोन्या चांदीची उपकरणें, मखमलीचें छत आणि इतर भपका इकडेच सामान्य लोकांचे मन आकर्षित होतें. या जलमंदिरांत महावीरांच्या पादुका ठेवण्यांत आलेल्या आहेत. या मंदिरापर्यंत जाण्यास संगमरवरी फरशी असलेला प्रशस्त पूल बांधण्यांत आलेला आहे. सारे सरोवर कमलाच्या वेलींनी भरलेलें आहे. त्यावेळीं फुलें तर आम्हांला दिसलीं नाहींत; परंतु पृष्ठभागावर पानांची दाटी खूप झालेली होती. पाणी अत्यंत अस्वच्छ, हिरवेगार दिसत होतें. त्यांतच कांहीं लोक आंघोळ करीत असलेले पाहून अंगावर शहारे आले मनांत विचार आला; 'या देवळाच्या व्यवस्थेपायीं व संपत्तिसंचयाच्या हेतूनें जो पैसा खर्च केला जातो त्यापैकीं थोडा पैसा वापरून जर हे सरोवर स्वच्छ करण्यांत येईल

तर किती चांगलें होईल ! जलविहार तर करतां येईलच; पण नुसतें पाहूनहि मन प्रसन्न होईल.' अर्थात् माझी ही सूचना ऐकण्याइतकी फुरसत कोणाजवळ नाहीं, हें मला पुरेसें माहित आहे.

### बक्षिसीचें राज्य

ज्या माणसानें आम्हांला जलमंदिर दाखविले त्याला आम्ही थोडीशी बक्षिसी दिली. परंतु त्याला ती अगदींच क्षुल्लक वाटली. कारण तेथें आलेल्या जैन शेठजीनी गांवांतील मंदिरासाठीं शंभर रुपये, जलमंदिरासाठीं २१ रुपये व नोकरासाठीं चार रुपये दिले होते. मला पावापुरीसंबंधीं पुस्तकें व चित्रें ( फोटो ) हवीं होतीं. म्हणून तेथील लोकांना मी विचारलें–' येथें पुस्तकें व चित्रें मिळतील काय ? ' तेव्हां त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, ' मिळतील ना ! परंतु मी तुमच्याबरोबर असल्याशिवाय तुम्हांला ती मिळणार नाहींत. हे शेटजी गेले कीं मी तुमच्याबरोबर येऊन त्या माणसाशी गांठ घालून देतों. ' यामुळें ते शेटजी तेथून जाईपर्यंत मला अर्धा पाऊण तास थांबावें लागलें. त्यानंतर तो गृहस्थ मला घेऊन गेला आणि ज्याच्याजवळ चित्रें होतीं त्याच्याशीं गांठ घालून दिली. त्या गृहस्थाजवळ मला हवें असलेलें पुस्तक अथवा फोटोहि मिळालें नाहींत. यामुळें एक मामुली चित्र घेऊन परत फिरलों; इतक्यांत मला तेथें घेऊन गेलेला माणूस मला म्हणाला, ' साहेब, माझी बक्षिसी ? ' मी आश्चर्यानें त्याच्या तोंडाकडे पाहातच राहिलों. वस्तुतः या कामासाठीं त्याला एक मिनीटहि द्यावें लागलें नव्हतें. सहज जातां जातां त्यानें माझी चित्रवाल्याशीं गांठ घालून दिली होती. त्याचा तो लोभीपणा पाहून मला खूप राग आला. परंतु मला लौकर परतावयाचें असल्यामुळें मी त्याच्याशीं हुज्जत न घालतां हातीं आलेलें नाणें त्याच्या हातीं टाकून तेथून सटकलों. अर्थात् या सर्व बाबतींत नोकरांचाच दोष असेल असें मी मानीत नाहीं. त्यांच्या चरितार्थाची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांनीं ती नीट पूर्ण न केल्यामुळेंच बहुधा त्यांना हें लाजिरवाणें जिणें कंठावें लागत असलें पाहिजे.

### पाटण्यास परत

पावापुरीचीं मंदिरें पाहून आम्ही मुख्य रस्त्यावर आलों. इतक्यांत

नवादाहून पटना शहरीं जाणारी बस तेथें आली. चौकशी करितां तिच्यामध्यें जागा असल्याचें समजलें. आतां आमच्यापुढें एक पेचप्रसंग निर्माण झाला. रिक्शाचें भाडें वसूल करण्यासाठीं रिक्शांतून बिहारशरीफपर्यंत जावें तर नंतर बिहारपासून मोटार मिळण्याची व पाटण्याला वेळेवर पोंचण्याची शाश्वती नव्हती. रिक्शा तशीच सोडून द्यावी, तर तिचें पुरें भाडें द्यावें लागून शिवाय बसलाहि भाडें द्यावें लागणार. परंतु वेळेचें महत्त्व अधिक असल्यामुळें एका क्षणांत मी निर्णय घेतला आणि रिक्शावाल्यास त्याचें तीन रुपये देऊन परत जाण्यास सांगितलें आणि बसमध्यें बसलों. मंदिराच्या पुजाऱ्यांनीं व नोकरांनीं पुरेशी बक्षिसी न मिळाल्यामुळें जरी आम्हांला मनांतल्या मनांत लाखोली वाहिली असली तरी या अनपेक्षित फायद्यानें रिक्शावाला मात्र खूष झाला आणि त्याच्या खुषीनें आम्हीहि आनंदित झालों. ऐन उन्हाच्या वेळीं दोन शरीरें वाहून नेणें वस्तुतः त्याच्या जिवावरच आलें असलें पाहिजे. परंतु पोटाखातर तो तयार झाला होता. परत जातांना तो रिक्शा रिकामी घेऊन आरामांत शीळ घालीत गेला कीं पैशाच्या लोभानें वाटेंत मिळालेल्या 'शिटा' त्यानें घेतल्या, हें कळण्यास मार्ग नाहीं.

★ ★ ★

# ' नालन्दा हसतीव सर्वनगरीः ' : १४

लहानपणी हिन्दुस्थानच्या इतिहासांत बौद्धकालीन नालन्दा विद्यापीठाचें वर्णन वाचीत असतां भारताच्या प्राचीन गौरवाच्या कल्पनेनें हृदय किती आनंदित झाले होते ! पूर्वजांच्या कर्तबगारीचें शब्दचित्र नजरेसमोरून जात असतां छाती अभिमानानें कशी फुलून गेली होती ! परंतु कधींकाळीं या नालन्दा नगरीला भेट देण्याचें, तिचें दर्शन घेऊन पुनीत होण्याचें भाग्य आपल्याला लाभेल अशी कल्पना मात्र मनाला कधीं शिवली नव्हती. ज्याप्रमाणें स्वर्गाचें नुसतें वर्णनच वाचावयाचें असतें, त्याचें प्रत्यक्ष दर्शन कधींच घडावयाचें नसतें, त्याप्रमाणें महाराष्ट्रापासून हजारों मैल दूर असणाऱ्या महात्मा गौतम बुद्धाच्या विहारभूमीतील पवित्र स्थळांचें दर्शन घडणें ही शक्य कोटीतील गोष्ट आहे असें कधीं वाटलें नाहीं.

## प्रस्थान

परंतु गतवर्षी दिनांक ७, ८ आणि ९ मार्च १९५३ रोजीं बिहारमधील चांडिल या गांवीं अखिल भारतीय सर्वोदय समाजाचें जें वार्षिक सम्मेलन झालें त्याला उपस्थित राहावें लागलें आणि त्यामुळें बिहारमधील कांहीं प्रसिद्ध स्थळांना भेटी देण्याची संधि लाभली.

अपरिचित प्रान्तांतील ऐतिहासिक स्थळें पाहणे मोठें अडचणीचें होतें असा माझा अनुभव आहे. आपल्याला असें वाटतें कीं त्या त्या भागांतील लोकांना त्या स्थळांसंबंधीं जरूर ती माहिती असणारच; म्हणून आपण प्राथमिक तयारी न करतां बाहेर पडतों आणि प्रत्यक्ष अनुभव असा येतो कीं त्या स्थळासंबंधीं आपल्याला जेवढी माहिती असते तेवढी देखील तेथील स्थानिक लोकांना नसते. आणि मग आपले हाल कुत्रा खात नाहीं.

चांडिलहून आह्मी पटना ( पाटणा ) या बिहारच्या राजधानीस गेलो आणि तेथून सकाळीं ११ च्या सुमारास स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसनें निघून पन्नास मैल दूर असलेल्या बिहार शरीफ या शहरीं २–३० ला पोचलों. येथील बसेसच्या वेळा येथील मित्रांना नक्की माहित नसल्यामुळें पहिली बस थोडक्यांत चुकली होती. व ती चुकल्यामुळें तिला जोडून असलेली

आगगाडीहि चुकली व सबंध दिवस वाया गेला. त्यावेळीं तेथें स्टेट ट्रान्सपोर्ट ( बिहार राज्य सर्व्हिस ) नुकतीच सुरू झाली होती. यामुळें तिची घडी नीटशी बसलेली नव्हती. खुद्द पाटण्यामध्येंहि या संस्थेचें ऑफीस अद्यापि सुसज्ज झालेलें नव्हतें. रस्त्याच्या कडेला, गटाराच्या कांठीं बसूनच गाड्या सोडण्याचें काम नियंत्रक करीत होते. गाडी वाटेंत कुठे थांबवावी, किती उतारू घ्यावेत, यासंबंधीं कांहीं बंधन अद्यापि मान्य झालेलें दिसलें नाहीं.

## बिहार शरीफ

आपल्यापैकीं अनेकांनीं बिहारमधील हिंदु–मुस्लिम दंग्याच्या वेळीं वर्तमानपत्रामध्यें बिहार शरीफ या शहराचा उल्लेख वाचला असेलच. या गांवांत मुसलमानांची वस्ती बरीच असल्यामुळें पूर्वीं येथें वारंवार दंगे होत असत. स्वराज्यानंतर मात्र देशांतील इतर भागांप्रमाणें येथील दंगे बंद झाले आहेत. येथील लोक “ बिहार शरीफ ” एवढें सबंध नांव न उच्चारतां फक्त “ बिहार ” एवढेंच नांव वापरतात. यामुळें जेव्हां एखादा गृहस्थ म्हणतो कीं, “ मी बिहारला चाललों आहे. ” तेव्हां परप्रांतांतून आलेल्या माणसाला मोठी गंमत वाटते.

येथून ७ मैलांवर नालंदा नांवाचें एक रेल्वे स्टेशन आहे. रेल्वेच्या बरोबरीनेंच मोटाररस्ताहि जातो. या स्टेशनपासून सुमारें दीड मैलावर प्राचीन नालंदा विश्वविद्यालयाचें अवशेष आहेत. आम्ही दिनांक १२ मार्च रोजीं रात्रीं राजगृह येथेंच वस्तीला होतों. यामुळें परत बिहारशरीफला न येतां वाटेंत नालंदा येथें उतरलों. राजगृह व बिहारशरीफ यांच्या बरोबर मध्यावर नालंदा स्टेशन आहे. भग्नावशेषांपर्यंत जाण्यासाठीं टांगेहि मिळतात. परंतु आमच्याजवळ सामान फार थोडें होतें आणि सकाळची आल्हाददायक हवा यामुळें आम्ही चालतच त्या ठिकाणीं गेलों. रस्ता सुंदर, डांबरी आहे आणि त्याच्या दोहोंबाजूस मोठमोठे वृक्ष आहेत. यामुळें उन्हाचा त्रास झाला नाहीं.

## नालंदा विश्वविद्यालय

या ठिकाणीं दोन गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. एक म्हणजे

विश्वविद्यालयाचे अवशेष आणि दुसरी म्युझियम. रस्त्याच्या डाव्या बाजूस अवशेष विभाग आहे आणि उजव्या बाजूस आधुनिक पद्धतीच्या इमारतींत वस्तुसंग्रहालय आहे. उन्हें कडक होण्यापूर्वी हिंडून फिरून घेणें योग्य होईल असा विचार करून आम्ही प्रथम अवशेष पहावयास गेलों.

अगदीं जवळ जाईपर्यंत या ठिकाणीं कांहीं असेल अशी कल्पनाहि येत नाहीं. याचा अर्थ या विद्यापीठाच्या आसपासची भूमि पुष्कळच वर आलेली आहे. या भूमीच्या खालीं किती शहरें, किती नगरें, किती इमारती गाडलेल्या असतील याची कांहींच कल्पना येत नाहीं. जवळ जाऊन लहानश्या दरवाजानें विद्यापीठाच्या आवारांत प्रवेश केल्यानंतर मात्र अल्लाउद्दीनाच्या जादूच्या सहाय्यानें एखाद्या काल्पनिक महालांत प्रवेश करावा तसें वाटतें आणि समोरचा विशाल व भव्य स्तूप पाहून छाती दडपून जातें. सुमारें ७०–८० फूट उंच असलेल्या त्या ऐसपैस स्तूपावर चढून एकूण स्थानाचें विहंगावलोकन केले कीं, विद्यापीठाच्या आराखड्याची कल्पना येतें. हा इतका उंच स्तूप एकाच वेळीं अथवा एकाच व्यक्तीनें बांधलेला नसून वेगवेगळ्या वेळीं वेगवेगळ्या राजांनी, थरावर थर चढविले आहेत; आणि इतिहासज्ञांचें तर असेंहि मत आहे कीं आज जो स्तूप जमिनीच्या वर दिसतो तितकाच जवळ जवळ जमिनीच्या खालीहि आहे !

## प्रचंड छात्रालयें

नालंदा विश्वविद्यालय ते हिंदू-विश्वविद्यालय वगैरे सारख्या आधुनिक युनिव्हर्सिटींप्रमाणें रेसिडेन्शियल होतें. म्हणजे विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोयहि येथें होती. वर ज्या मुख्य स्तूपाचा उल्लेख केला आहे त्याच्या समोरच्या बाजूस दक्षिणोत्तर दहा विहारांचे अवशेष खोदून काढण्यांत आलेले आहेत. प्रत्येक विहार म्हणजे जणूं एक स्वयंपूर्ण छात्रालयच आहे. प्रशस्त अंगण, अष्टकोनी विहीर, ऐसपैस व्हरांडे, आणि सभोंवती लहान लहान खोल्या असें त्यांचें स्वरूप आहे. आजच्या जमान्यांतील पाश्चात्य देशांत आढळणाऱ्या अवाढव्य छात्रालयांच्या मानानें ही छात्रालयें फारशी मोठीं वाटणार नाहींत; परंतु सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीं,

जेव्हां पाश्चात्य जगामध्यें सर्वत्र अंधःकार पसरलेला होता अशा वेळीं, केवळ ज्ञानार्जनासाठीं—वैभवाचें प्रदर्शन करण्यासाठीं नव्हे—इतक्या भव्य इमारती आपल्या देशांतील राजांनीं बांधविल्या ही खास अभिमानास्पद गोष्ट आहे. या विहारांमध्यें कित्येक ठिकाणीं महिरपीचे (arch) दरवाजे आढळतात. यावरून त्याकाळीं वास्तुकलेनें पुष्कळच प्रगति केली असली पाहिजे असे अनुमान निघते. जमिनीच्या खालून जाणाऱ्या (अंडर-ग्राऊंड) मोऱ्याहि येथें पहावयास मिळतात. या विहाराच्या समोरच्या बाजूस लहान मोठे चैत्य व स्तूप यांचे अवशेष पाहावयास सांपडतात.

## कालनिर्णय

नालंदा शहराचा उल्लेख अडीच हजार वर्षांच्याहि पूर्वीपासून आढळतो. महावीर स्वामी आणि भगवान् बुद्ध यांच्या उदयापूर्वी हें शहर भरभराटीस आलेले असावें असें इतिहास संशोधकांचें मत आहे. कारण महावीर स्वामी आणि गौतमबुध्द यांनीं या शहरांत अनेक पावसाळे काढल्याचा उल्लेख त्या त्या पंथाच्या धर्मग्रंथांत आढळतो. आणि यामुळें जैन व बौद्ध लोक या शहरास पवित्र तीर्थक्षेत्र मानतात. तेव्हांपासून तेराव्या शतकापर्यंत म्हणजे सुमारे दोन हजार वर्षेंपर्यंत या ठिकाणीं वेगवेगळ्या वंशांनीं राज्य केलें. तेराव्या शतकांत बख्तियार खिलजीने या धार्मिक व सांस्कृतिक केंद्रावर हल्ला चढवून त्याची धूळधाण उडविली. तेव्हांपासून इंग्रजांच्या अमदानीपर्यंत या स्थानाकडे कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. जी दोन हजार वर्षें या नगरीने वैभवांत घालविलीं त्या अवधींत येथील इमारतींची पडझड झाली असणें स्वाभाविक आहे. यामुळें येथील विहार व स्तूप यांचे अनेक थर एकमेकांवर चढलेले दिसतात. एक विहार पडला कीं त्यावरच दुसरा बांधावयाचा असा क्रम दिसून येतो. यामुळें कित्येक ठिकाणीं आठवेळां विहार बांधल्याचे पुरावे सांपडतात. कांहीं काळपर्यंत नालंदा हें राजगृहाचेंच उपनगर समजलें जात असें.

## ज्ञानवैभवाची चुणूक

प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग ह्यानें हिंदुस्थानमध्यें इ. स. ६३०

पासून ६४५ पर्यंत भ्रमण केलें होतें. सम्राट हर्षवर्धनाच्या काळीं तो नालन्दा येथें येऊन बरेच दिवस राहिला होता. त्यानें या नगरीचें जें उत्कृष्ट वर्णन केलें आहे, तें वाचून मन आश्चर्यानें थक्क होतें. तो एके ठिकाणीं लिहितो, " येथील संघारामांत ( भिक्षुनिवासांत ) जे दहा हजार साधु निवास करतात, ते सर्व महायान पंथाचे अनुयायी आहेत; परंतु अठरा बौद्धागम, वेद आणि इतर आगम यांचें अनुशीलन ते करीत असतात...येथील साधूंचें आचरण अत्यंत शुद्ध असतें. यामुळें गेल्या ७०० वर्षांत, नालंदा विश्वविद्यालय सुरू झाल्यापासून, कोणीहि अपराधी निघाला नाहीं...येथें रात्रंदिवस महान् गूढ विषयांवर शास्त्रार्थ चालू असतात. यामुळें तरुण व वृद्ध यांच्या ज्ञानांत वृद्धि होत असते. ज्यांचें ज्ञान फक्त त्रिपिटकापर्यंतच मर्यादित असतें. त्यांना लाजेनें मान खालीं घालावी लागतें. या महाविहारांत भारतवर्षांतील वेगवेगळ्या प्रांतांतून शास्त्रप्रेमी विद्वान शास्त्रार्थासाठीं येत असतात. परंतु शास्त्रार्थामध्यें भाग घेण्यापूर्वीं त्यांची परीक्षा घेतली जाते, ही परीक्षा नालन्दाचे द्वारपाल घेत असतात. जोंपर्यंत या द्वारपालांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरें मिळत नाहींत, तोपर्यंत विद्वानांना शास्त्रार्थामध्यें भाग घेण्याची परवानगी दिली जात नाहीं. सुमारें ८० टक्के लोक या द्वारपालाच्या अवघड प्रश्नांची उत्तरें देऊं शकत नाहींत. यामुळें त्यांना निमुटपणें आल्या पावलीं परत जावें लागतें. उरलेल्या २० टक्के लोकांनाहि प्रत्यक्ष शास्त्रार्थामध्यें पराजित होण्याची भीति वाटत असतेच परंतु जे कोणी या सर्व चक्रांतून तावून सुलाखून बाहेर पडतात त्यांना यश, कीर्ति वगैरे सर्व प्रकारचे लाभ होतात. "

## उत्खननांत मिळालेल्या वस्तु

नालंदा विद्यापीठाचें उत्खनन चालू असतां त्यांतून मातीच्या हजारों मुद्रा सांपडल्या आहेत. त्या मुद्रांवर धर्मचक्रप्रवर्तनाचें चित्र आहे. मध्यभागी धर्मचक्र आणि दोहों बाजूस बसलेले एकेक हरिण हें नालंदा महाविद्यालयाचें बोधचिह्न असावें असें ह्मणतात. त्या खेरीज धातूच्या पाषाणाच्या व इतरहि प्रकारच्या अनेक मूर्ति येथें सांपडल्या आहेत.

त्यांतील कित्येक मूर्ती अगदीं नवीन तयार केल्याप्रमाणें व सजीव भासतात. कांशाच्या बुद्ध मूर्तीकडे पाहिलें असतां त्या जणूं आतां बोलणारच आहेत असा भास होतो. त्यांच्या चेहऱ्यावर शांतरसाचें साम्राज्य विलसत आहे. येथें सांपडणाऱ्या मूर्तींमध्यें महात्मा बुद्धाची भूमिस्पर्श अवस्थेंतील मूर्ति प्रेक्षकांचें लक्ष विशेष आकर्षून घेते. सिद्धार्थाला ज्यावेळीं ज्ञानप्राप्ति झाली त्या अवस्थेची द्योतक अशी ही मुद्रा ( Pose ) समजली जाते. ज्ञानप्राप्ति होण्यापूर्वी भगवान् बुद्ध जेव्हां मांडी घालून बसले तेव्हां त्यांनीं असा दृढ संकल्प केला होता कीं जोंपर्यंत ' बोधि ' अथवा संपूर्ण ज्ञान प्राप्त होत नाहीं तोंपर्यंत मी येथून हलणार नाहीं. भूमीला स्पर्श करून ते म्हणाले होते की, ' हे भूमि ! जर मी पापी नसेन तर मला हें ज्ञान प्राप्त होईल. माझे पुण्य व पाप याची साक्षिणी तूं आहेस. ' या दृढ किंवा वज्र संकल्पामुळें या आसनाला वज्रासन असेंहि म्हणतात.

## पदार्थसंग्रहालय

उत्खननांतून मिळालेल्या या साऱ्या वस्तू एका सुसज्जित इमारतींत ठेवलेल्या आहेत. नालंदाचे अवशेष पाहून परतलों आणि शांतपणें या पदार्थ संग्रहालयांतील वस्तूं पाहून घेतल्या. इमारतीच्या दाराशीच मातीचा एक भला मोठा हांडा ठेवलेला आहे. पूर्वीच्या काळीं लोक त्यांत धान्य ठेवीत असत. त्या हांड्याची उंची सुमारें दीड पुरुष आहे. एखादी मोठी कणिगच म्हणावयाची. अनेक तोट्या असलेली मातीची भांडींहि येथें पहावयास मिळालीं. नागराज, द्वारपाल, वगैरे नाना प्रकारच्या मूर्ती येथें आहेत. त्यांतील कांहीं राजगृहाच्या उत्खननांतून सांपडलेल्या आहेत. राजगृह येथें स्वतंत्र म्यूझियम नाहीं, यामुळें तेथील अवशेष पहावयाचे असल्यास नालंदालाच यावें लागतें.

## " नालंदा हसतीव सर्वनगरीः ! "

म्यूझियम पाहून आम्ही भारावलेल्या मनांनी व थकलेल्या पावलांनी परत फिरलों. मन फिरून फिरून दोन हजार वर्षांपूर्वीच्या काळांत प्रवेश करीत होतें आणि नालंदाच्या उत्खननांत मिळालेल्या राजा यशोवर्म्यांच्या

शिलालेखांतील हा श्लोक पुनः पुनः उच्चारीत होतें:—

यासावूर्जितवैरिभूप्रविगलद्दाना म्बुपानोल्लस-
न्माद्यद् भृङ्गकरीन्द्रकुम्भदलन प्राप्तश्रियाम्भूभुजाम् ।
नालन्दा हसतीव सर्वनगरीः शुभ्राभ्रगौरस्फुर-
च्चैत्यांशुप्रकरैस्सदागमकला विख्यातविद्वज्जना ।।

अर्थ—आपल्या शुभ्र उंच चैत्यांच्या किरणसमूहांच्या द्वारें नालंदा मोठमोठ्या राजांच्या नगरीकडे पाहून जणूं हंसत आहे. जेथें प्रसिद्ध धुरंधर विद्वान् वास करतात अशा हिच्या उंच प्रासादांच्या व विहारांच्या पंक्ती ज्या ठिकाणीं विद्याधर राहातात अशा सुमेरु पर्वताप्रमाणें शोभून दिसतात.

जुना जमाना आणि नवा काळ यांचीं चित्रें एकमेकांत मिसळून एक नवेंच दृश्य डोळ्यांसमोर उभे राहात होतें आणि ज्या कमलनालांच्या वैपुल्यावरून या नगरीला नालंदा असें नांव पडलें त्या कमलनालांनींच जणूं सारें मानस भरून गेलें होतें.

★★★

चांडिल (बिहार)चें सर्वोदय संमेलन आटोपल्यानंतर आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या बरोबर बिहारची राजधानी पटना (पाटणा) या शहरीं जाण्याची संधि मला मिळाली. तेथें दोन दिवस राहून संमेलनाचा अधिकृत अहवाल तयार करण्यासाठीं आम्हाला रॉंची या थंड हवेच्या ठिकाणीं जावयाचें होतें. पाटण्याहून रॉंचीला जातांना वाटेंत गया लागत होती. सुदैवानें माझे मातापिता ह्यात असल्यामुळें गयेशीं मला कांहीं कर्तव्य नव्हतें आणि धार्मिक रूढी व कर्मकांड यांच्या बाबतींत विशेष आस्था नसल्यामुळें गयेच्या यात्रेबद्दल कांहींच ओढ माझ्या ठिकाणीं नव्हती. राजकुमार गौतमाला ज्या ठिकाणीं 'सम्मसंबोधि' अथवा ज्ञान प्राप्त झालें व तो गौतमबुद्ध बनला त्या बोधिगयेचें दर्शन घेण्याची अभिलाषा मात्र मनांत अनेक वर्षांपासून होती. यामुळें बोधिगयेला जातां आल्यास ती संधि दवडावयाची नाहीं असें मी ठरविलें होतें.

माझ्या दृष्टीनें गयेला धार्मिक महत्त्व उरले नसलें तरी गेल्या कांहीं महिन्यांपासून या शहराला व गया जिल्ह्याला एक वेगळेंच महत्त्व प्राप्त झालेलें आहे. भूदान यज्ञाचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांनीं भगवान् बुद्धांच्या निवासानें पुनीत झालेल्या या तीर्थक्षेत्रीं फार महत्त्वाचे व चिरपरिणामकारी असे निर्णय गेल्या कांहीं महिन्यांत घेतले. त्यांपैकीं एक निर्णय असा कीं भारतांतील भूमिसमस्या सुटल्याखेरीज स्वस्थानीं—वर्ध्याजवळील पवनार या गांवीं—परत न जाण्याचें त्यांनीं ठरविलें. यामुळें आतां एकतर या प्रश्नाचा निकाल लागेल किंवा विनोबांचाच निकाल लागेल अशी स्थिति निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेशाच्या मानानें बिहारमध्यें विनोबांना जास्त खडकाळ जमीन लागली. परंतु दगडाधोंड्यांच्या महाराष्ट्रांतून निर्माण झालेला हा वीर पुरुष असल्या खडकांना थोडीच भीक घालणार ! त्यांनीं असा निर्धार केला कीं, या बिहार प्रदेशांतील जमिनीचा प्रश्न तरी सुटेल नाहींतर माझीं हाडें तरीं या ठिकाणीं पडतील. बिहारचा भूप्रश्न सुटल्याखेरीज या प्रदेशांतून बाहेर पडावयाचें

नाहीं असें विनोबांनीं ठरविलें आहे आणि बिहारचा प्रश्न सोडविण्याची एक पायरी म्हणून गया जिल्ह्याचा प्रश्न सोडविण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे. गया जिल्ह्यांत तीन लाख एकर जमीन मिळाल्यास कायद्याच्या मदतीशिवाय या जिल्ह्यांतील भूमिहीनांचा प्रश्न सोडवितां येईल असें त्यांना वाटतें व समाजवादी नेते बाबू जयप्रकाश नारायण यांचीहि तशीच खात्री झालेली आहे. वर्ध्यांच्या महिलाश्रम, ग्रामोद्योग संघ वगैरे विधायक कार्य करणाऱ्या संस्थांतील कार्यकर्ते या जिल्ह्यांत अनेक दिवसांपासून काम करीत आहेत आणि विनोबांनीं आपले पुत्रवत् चिटणीस श्री. दामोदरदास मूँधडा यांना त्या जिल्ह्यासाठीं खास नेमलें आहे. अशा प्रकारें गांधीजींच्या चळवळींत दांडीला व बार्डोलीला जें महत्त्व प्राप्त झालेलें होतें तें गयेला व गया जिल्ह्याला सध्यां प्राप्त झालेलें आहे. यामुळें तेथें काम करणाऱ्या मित्रांना भेटण्यासाठीं आम्हीं गयेला उतरावयाचें ठरविलें.

## प्रथम बोधिगया नंतर गया

येथील डाकबंगल्यांत गया जिल्हा भूदान यज्ञाची कचेरी व कार्यकर्त्यांचा मुक्काम असल्यामुळें आम्ही सरळ डाकबंगल्यांत गेलों. श्री. दादा धर्माधिकारी हे बिहारी लोकांचे फार आवडते वक्ते आहेत. त्यांनीं बिहारमध्यें जितके दौरे काढले व जितकीं व्याख्यानें दिलीं तितकीं कदाचित् महाराष्ट्रांतहि दिलीं नसतील. यामुळें त्यांच्या बरोबर बिहारमध्यें हिंडतांना आपण आपल्याच प्रांतांत हिंडत आहोंत इतकी आत्मीयता व जिव्हाळा प्रत्ययास येतो. बहुतेक सर्व मोठमोठ्या ठिकाणीं ते अनेकदां गेलेले आहेत, यामुळें त्यांच्या वक्तृत्वानें व प्रेमानें भारावून गेलेले अनेक लहानथोर कार्यकर्ते बिहारमध्यें सर्वत्र पसरलेले आहेत. दादा आले आहेत असें कळतांच अनेक लोक येऊन त्यांच्याभोंवतीं गोळा होतात. गयेलाहि तशीच स्थिति झाली. यामुळें गयेंतील व बोधिगयेंतील मुख्य मुख्य ठिकाणें पाहतांना दादांचें सान्निध्य लाभणार कीं नाहीं अशी शंका निर्माण झाली. कोणी म्हणेल कीं प्रसिद्ध स्थळें पाहण्यासाठीं दादांना राबविण्याची काय गरज? परंतु दादांच्या संगतींत महान् ऐतिहासिक

व धार्मिक स्थळें पाहण्याचें भाग्य ज्यांना एकदां लाभलें आहे त्यांना त्यांच्या सहवासाचा मोह टाळणें अशक्य होतें. आचार्य काकासाहेब कालेलकर यांच्याबरोबर प्रसिद्ध ठिकाणें पाहण्यामध्येंहि असाच आनंद मिळतो. परंतु त्या दोघांच्या व्यक्तिमत्वांत जसा जमीन अस्मानाचा फरक आहे तसाच त्यांच्या उपस्थितीचाहि अगदीं वेगवेगळा परिणाम होतो. काकासाहेब हे अव्वल दर्जाचे कलारसिक व सर्वसंग्रही वृत्तीचे आहेत. लहानशा वस्तूंतीलहि सौंदर्य उलगडून दाखवावें काकांनींच. त्यांच्या-जवळील माहितीचा सांठा तर सिंदबादला सांपडलेल्या हिऱ्यामोत्यांच्या राशींसारखा ‘अखूट’ कधींहि न संपणारा असतो. यामुळेंच कै. महादेवभाई देसाई त्यांना चालता बोलता ज्ञानकोश म्हणत असत. दादांच्या बाबतींत असें म्हणतां येणार नाहीं. परंतु ते सबंध देशभर अनेकदां फिरले आहेत यामुळें कोठें काय पाहण्यासारखें आहे याची त्यांना अचूक कल्पना आहे आणि आपल्याबरोबर असणाऱ्यांना आपल्याजवळ असलेली सर्व माहिती मोठ्या प्रेमानें द्यावयाची व स्वतःला कितीहि कष्ट पडले तरी जातीनें सर्व दाखवावयाचें, या त्यांच्या तळमळीपुढें व्यक्तिशः त्यांना जरी त्रास होत असला तरी त्यांच्या समवेत हिंडणाऱ्यांना एक अनिर्वचनीय सुख लाभत असतें. म्हणून गयेंतील व बोधिगयेंतील स्थानें दादांनीं स्वतःच मला दाखविलीं पाहिजेत असा मी हट्ट घेतला आणि त्यांनींहि तो आनंदानें मान्य केला.

प्रत्यक्ष गयेमध्यें पाहण्यासारखें कांहीं नाहीं व आम्हांला कोणतेंच धार्मिक कृत्य करावयाचें नव्हतें म्हणून गयेपासून सात मैलावर असलेल्या बोधिगयेला प्रथम जाऊन येण्याचें आम्ही ठरविलें. आमच्या बरोबर श्री. त्रिलोकीनाथ त्रिपाठी नांवाचे एक उत्तर प्रदेशीय पत्रकार होते. यामुळें बोधिगयेपर्यंतचा आमचा टमटममधील प्रवास मोठ्या मजेचा झाला. टमटम हें बिहारचें खास वाहन आहे. उत्तर प्रदेशांतील एक्क्या सारखेंच हें असतें; पुढचा भाग टांग्यासारखा असून त्याला घोडा जोडलेला असतो, मात्र मागचा भाग एक्क्यासारखा असतो. या टमटममध्यें चार उतारूंनीं बसावें असा सरकारी नियम आहे परंतु कमींत कमी सहा उतारू

(टांगेवाल्याखेरीज) तरी टमटममध्यें कोंबले जातातच. त्यांची जास्तींत जास्त संख्या वाटेल तितकी असूं शकते. आमच्या डोळ्यांदेखत ८ उतारू किंवा स्वाऱ्या असलेली टमटम भरवेगांत निघून गेलेली आम्ही पाहिली. इतके उतारू व ओझें तुफान वेगानें वाहून नेणारीं घोडीं मात्र कृष्णे-कांठच्या तट्टांप्रमाणें लहानसर व टुणटुणीत असतात. आणि यामुळेंच बहुधा ७ मैलाचें अंतर चालून जाण्यासाठीं माणसीं सहा आणे भाडें घेणें टमटमवाल्यांना परवडत असावें. आम्ही एक तासांत बोधिगयेला जाऊन पोंचलों.

## फल्गूचें रेताड पात्र

गयेहून बोधिगयेपर्यंतचा रस्ता पक्का डांबरी असून तो फल्गू नदीच्या कांठाकांठानें जातो. यामुळें फल्गूच्या रेताड पात्राची शोभा सहजच दृष्टीस पडते. फल्गु नदी अन्तःसलिला आहे. वर्षांतून २–३ महिने या नदीला पाणी असते आणि हिचें पात्र जरी जवळ जवळ पांच–सहा फर्लांग रुंद असलें तरी त्याला खोली मुळींच नाहीं. यामुळें नदीला पाणी असतें तेव्हांहि तें गुडघाभर अथवा जास्तींत जास्त कंबरेइतकें खोल असतें. मला वाटतें हिंदुस्थानांत फल्गु ही एकच प्रसिद्ध नदी असावी कीं जिच्यामध्यें बुडून मरण्याची अथवा जीव देण्याची मुळींच सोय नाहीं. आम्ही गेलों त्यावेळीं नदींत पाण्याचें एक टिपूसहि नव्हतें. परंतु पांढऱ्या शुभ्र रेतीचा तो लहानसा सागरहि कांहीं कमी आकर्षक वाटत नव्हता. नदीच्या कांठानें ताडाचीं उंच उंच झाडें होतीं व त्यांना ताडी काढण्यासाठीं मडकीं लावलेलीं होतीं. यामुळें कोंकणांतील समुद्रकांठच्या प्रदेशाचा भास होत होता. नदीला पूर आला कीं या सडकेवरहि पाणी येतें परंतु तें तास-दोन तासांपेक्षां जास्त वेळ टिकत नाहीं. नदीच्या पुराच्या वेळीं हीं ताडाचीं झाडें कशीं सुंदर दिसत असतील आणि आतां रखरखीत वाटणारें हें मैदान कसें हिरवेगार होऊन जात असेल या कल्पनेनें मन उल्हसित झालें आणि गरम वारे वाहात असतांहि मनाला त्यांची बाधा झाली नाहीं. बौद्ध साहित्यांत या नदीला नेरंजरा असें नांव आहे. तें बहुधा निर्जला–निर्जरा–निरंजरा–नेरंजरा या क्रमानें बदललें असावें.

१०१ ८५८८

फल्गु नदीचें एक वैशिष्टय आहे. तुम्हांला तहान लागली असल्यास ती तुम्हांला तसेंच परत पाठविणार नाहीं. तुम्हीं नुसत्या हातानें वीतभर खणा कीं थंडगार मधुर पाणी तुमच्या सेवेसीं हजर. यामुळें जागोजागीं अशीं लहान–मोठीं कुंडें तयार झालेलीं आपल्याला दिसतील. अर्थात् या नदींत दगड किंवा खडक मुळींच नसल्यामुळें हीं कुंडें फार वेळ टिकत नाहींत. जोराची वावटळ आली कीं तीं रेतीनें भरून जातात. परंतु तीं खोदण्यास मुळींच श्रम पडत नसल्यामुळें लोकांना त्याचें कांहीं वाटत नाहीं. नदीकांठीं चरत असलेल्या जनावरांकडे पाहून मी टमटम-वाल्याला विचारलें, ‘ या गुरांना प्यायला पाणी कुठलें ? ’ त्यावर त्यानें सांगितलें, ‘ आम्ही गांवचे सर्व लोक सामुदायिक मेहेनतीनें गुरांच्यासाठीं मोठमोठीं डबकी खणतों. त्यांतच हीं पाणी पितात. ’ तो टांगेवाला मुसलमान होता. परंतु त्याला त्या कोरड्या नदीचाहि फार अभिमान वाटत होता. पावसाळ्यांत नदीला पूर आला म्हणजे आपण कशा गंमती करतों, किती श्रद्धेनें गंगास्नान करतों वगैरे गोष्टींचें मोठें रसभरित वर्णन तो करूं लागला. आणि तें वर्णन ऐकून सीतेच्या शापानें कोरड्या पडलेल्या त्या नदीचें अदृश्य सौंदर्य आमच्याहि डोळ्यांसमोर साकार बनूं लागलें.

## महंताच्या गढीची सलामी

बोधिगयेच्या परिसरांत प्रवेश करतांच डाव्या हाताला एक भला मोठा व लांबलचक तट लागतो. त्याच्या संबंधीं चौकशी करितां तो या ठिकाणच्या महंताच्या गढीचा–भुईकोट किल्ल्यासारख्या राजवाड्याचा बाहेरील तट असल्याचें समजलें. हा महंत म्हणजे येथील एक फार बडें प्रस्थ आहे. बोधिगयेच्या मुख्य मंदिराची मालकी त्याच्याकडे आहे. वस्तुतः बौद्धधर्मीय मंदिराची मालकी एका हिंदु महंताकडे असणें अन्यायाचें आहे. परंतु बौद्ध धर्मीयांनीं हें प्रकरण न्यायालयांत नेलें असतां त्यांचा पराभव झाला आणि मंदिराची मालकी सदर महंताकडेच राहिली. मंदिराजवळ लाखों रुपयांची मालमत्ता आहे. त्या पैशावर महंत महाराज आणि त्यांचे चेले चैन करीत अससात त्यामुळें त्यांच्याविरुद्ध बौद्धाप्रमाणें इतरांचीहि तक्रार आहे, असें समजलें.

## खड्ड्यांत पडलेलें बुद्ध मंदिर

महंताच्या गढीसमोर झाडांच्या सांवलींत टमटम सोडून देऊन आम्ही पुढें गेलों. उजव्या बाजूस किंचित् चढून गेलें म्हणजे डाव्या बाजूस एक खोल व ऐसपैस खड्डा दृष्टीस पडतो. त्यांतच बुद्धगयेचें इतिहास प्रसिद्ध मंदिर आहे. त्याच्या एकूण स्थितीवरूनच आपल्या लक्षांत येतें कीं या ठिकाणीं हें मंदिर मातीमध्यें गाडलें गेलें असलें पाहिजे. सुमारें ऐंशी वर्षांपूर्वी (इ. स. १८७० सालीं) भारत सरकारनें सर अलेक्झांडर कनिंगहॅम व डॉ. राजेंदुलाल मित्र यांच्या देखरेखीखालीं हें मंदिर ऊर्जितावस्थेस आणलें. तेव्हांपासून भारतांतील व जगांतील बौद्धधर्मानुयायांचें लक्ष त्याच्याकडे वेधलें. मंदिरापर्यंत पोंचण्यासाठीं अरुंद घाटासारख्या पायऱ्या आहेत. त्याच्या प्रवेशद्वाराजवळ सांचीच्या पद्धतीची दगडी चौकट आहे. तिच्यावरील बारीक नक्षीकाम व कारागिरी प्रेक्षणीय आहे. मंदिराच्या भोवती सुंदर दगडी कठडा असल्याचे अवशेष सध्यां पहावयास मिळतात. या मंदिराच्या संरक्षणाची जबाबदारी इतिहास संशोधन खात्याकडे नसून पी. डब्ल्यू. डी. कडे आहे ही एक आश्चर्याची गोष्ट आहे.

## मामुली स्थापत्य

उत्तर भारताच्या मानानें हें बोधिगयेचें मंदिर पुष्कळच भव्य व नीटनेटकें आहे. परंतु ज्यानें दक्षिण भारतांतील मदुरेचें मीनाक्षी मंदिर किंवा तिरुवअनंतपुरम् (त्रिवेंद्रम्) चें अनंतशयनम् मंदिर पाहिलें असेल त्याला हें मंदिर अगदींच सामान्य प्रतीचें वाटेल. फाहियेन व ह्युएनत्स्यांग यांच्या प्रवासवर्णनावरून हें मंदिर इ. स. च्या दुसऱ्या शतकांत बांधलें गेलें असावें असें दिसतें. परंतु अमरसिंह नांवाच्या पुरुषानें इसवी सनाच्या पांचव्या शतकांत हें मंदिर बांधलें असावें असा विद्वानांचा तर्क आहे. याचा अर्थ भारताच्या स्थापत्यकलेला उतरती कळा लागल्यानंतर हें मंदिर बांधलें गेलें आहे. यामुळें त्यांत महान गुण आढळत नाहीं. त्याचा एकच गुण चटकन् डोळ्यांत भरतो आणि तो म्हणजे त्याचा साधेपणा. सुमारें १७० फूट उंच असलेलें हें मंदिर कलाकुसरीच्या बाबतींत इतकें साधें आहे कीं त्याचा साधेपणाहि दोष वाटावा.

## भगवी छाटी घातलेली बुद्ध-मूर्ति

मंदिराच्या विशाल गाभाऱ्यांत प्रवेश करतांच पूर्वेस तोंड असलेली, गळयांत भगवी छाटी अडकविलेली भूमिस्पर्श मुद्रेंतील भगवान् बुद्धाची सुबक, रेखीव व भव्य मूर्ति दृष्टीस पडली. आम्ही गेलों होतों त्यावेळीं हें मंदिर हिंदु पुजाऱ्यांच्या ताब्यांत होतें. यामुळें बुद्धाच्या मूर्तीला कपडे पेहेरवून आणि गंध लावून ते त्याला हिंदु बनवीत असत आणि त्याच्या समोरच महादेवाची पिंडी स्थापून तिच्यावर अभिषेकहि करीत. याला आळा घालणें इंग्रजी अमदानींत शक्य नव्हतें. परंतु आतां तें देऊळ बौद्धांकडे देण्यांत आल्यामुळें बुद्धाच्या मूर्तीची पूजा बौद्ध पद्धतीनें होऊं लागली आहे.

मूर्तीचें दर्शन घेऊन बाजूच्या जिन्यानें वर चढून गेलें कीं गौतमबुद्धाच्या पूर्वजन्मापैकीं दोन बोधिसत्त्वांचें दर्शन घडतें. गेल्या खेपेस त्यांनाहि भगव्या कफन्या घालून त्यांची 'शुद्धि' करण्यांत आली होती. मंदिराच्या गच्चीवरून खालील परिसराची शोभा मात्र फार छान दिसते. मंदिराला प्रदक्षिणा घालीत मागच्या बाजूस गेलें कीं त्या ठिकाणीं बोधिवृक्ष नांवाचें एक लहानसें पिंपळाचें झाड दिसतें व त्याच्या खालींच वज्रासन नांवाची एक मोठी शिळा आहे. हें वज्रासन ७½ फूट लांब, ५⅚ फूट रुंद व ३ फूट उंच आहे. मंदिर आणि बोधिवृक्ष यांच्या मधोमध हें वज्रासन आहे. या झाडाखालीं व या शिळेवर बसून भगवान् गौतम बुद्धांनीं साधना केली व येथेंच त्यांना वैशाखी पौर्णिमेस ज्ञान-प्राप्ति झाली असें समजलें जातें. या भागाला त्या काळीं उरुवेला असें नांव होतें. अर्थात् या शिळेवर बसून सिद्धार्थाला ज्ञान झालें असण्याची शक्यता आहे. परंतु ज्या वृक्षाखालीं तो बसला होता तो वृक्ष मात्र कधींच नाश पावला आहे. खुद्द अशोकानेंच बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वी त्या वृक्षाचा नाश केल्याचें इतिहास सांगतो, तर कांहीं लोकांच्या मतें अशोकाच्या पट्टराणीनें हें झाड तोडून टाकलें होतें व अशोकानें त्याचें पुनरुज्जीवन केलें होतें. त्यानंतरहि अनेक हिंदु राजांच्या रोषाला बळी पडण्याचें या वृक्षाच्या नशिबीं लिहिलें होतें. अखेर जेव्हां इंग्रज सरकारनें १८७० सालीं या

मंदिराचा जीर्णोद्धार केला तेव्हां येथें पिंपळाचें झाड नव्हतें, म्हणून जें झाड लावण्यांत आलें तेंच सध्यां अस्तित्वांत आहे. मूळ झाडाची एक फांदी पूर्वी सम्राट अशोकाची कन्या संघमित्रा हिनें पूर्वी सिलोनमध्यें नेली होती. ती अनुराधापुर येथें आज दोन हजार वर्षांनंतरहि जिवंत आहे असें म्हणतात.

या मुख्य मंदिरापासून जवळच तिबेटी लोकांचें एक बौद्ध मंदिर आहे. त्या मंदिरासमोर ब्रह्मी, चिनी, तिबेटी वगैरे बौद्ध धर्मीय देशांच्या धार्मिक पताका फडकत होत्या. आपल्याकडे 'रामनाम' छापलेलीं धोतरें व उपरणीं असतात तशा त्या पताका दिसत होत्या. तिबेटी मंदिर माडीवर आहे. आम्ही तेथें गेलों, तेव्हां बारीक डोळ्यांचे, चपट्या चेहऱ्यांचे व तांबूस वर्णाचे तिबेटी लोक समोर काव्यासारखा काळामिट्ट चहा ठेवून अधूनमधून त्याचे घुटके घेत घेत वेदपठन केल्याप्रमाणें कांहीं मंत्र जपत होते. मधमाशांच्या गुंजारवासारखा त्यांचा आवाज कानांना सुखवीत होता. त्यांना पाहून मला आपल्याकडील जुन्या संस्कृत पाठशाळांची आठवण झाली. त्या ठिकाणीं गौतम बुद्धांची एक नवीन झोंकबाज कापडी मूर्ति तयार केली जात होती. तिच्यावरील रंग भयंकर भडक होते. परंतु ते डोळ्यांना खुपत नव्हते. तिबेटी साधु ती मूर्ति रंगविण्यांत दंग झालेले होते. मूर्ति समोरील व आसपासची आरास तिबेटी पद्धतीची आहे. मूर्तीच्या समोर एका भल्या मोठ्या हौदांत तूप भरून ठेवलेलें होतें व त्या तुपांत मोठ्या फुलवातीसारखा दिवा अखंड तेवत होता. मंदिराच्या दारावर अशुद्ध व बेढब अक्षरांत संगमरवरी दगडांत कोरलेली पुढील पाटी आहे—

तिब्बीतियन महायाना
बुद्धीस्ट मंदिर बुद्धा गया
स्थापित १९४५.

तिबेटी लोकांनीं नागरी अक्षरांत लिहिलेली पाटी या दृष्टीनें या पाटीचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. परंतु हें कोरीव काम करण्यापूर्वी भाषेचें शुद्धलेखन व अक्षरांचें वळण या बाबतींत त्यांनीं स्थानिक हिंदी

भाषिकांचा सल्ला घेतला असता तर अधिक बरें झालें असतें हा विचार मनांत आल्यावांचून राहिला नाहीं.

## गयेंतील विष्णुपद

तिबेटी मंदिर पाहून आम्ही जवळच असलेल्या महाबोधी सोसायटीच्या पुस्तक भांडारांत गेलों आणि तेथें कांहीं पुस्तकें व चित्रें खरेदी करून परतलों. परत येतांना आम्हांला टमटम मिळाली नाहीं यामुळें सायकल रिक्शा करावा लागला. समोरचें उलटे वारें सुरूं झालेलें असल्यामुळें रिक्शावाल्याला खूपच त्रास होत होता. तो न बघवल्यामुळें आम्ही थोडा वेळ पायीं चाललों आणि बऱ्याच वेळानें स्वस्थानीं पोंचलों. रात्रीच्या गाडीनें पुढें रँचीस जावयाचें असल्यामुळें गयेंतील मुख्य ठिकाण जें विष्णुपदाचें मंदिर तें पाहून घेण्याचें आम्ही ठरविलें आणि लागलीच बाहेर पडलों. आमच्या बरोबर गयेंतील एक कॉंग्रेस पुढारी व बिहारच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद श्री. कुमार झा हे होते. ते गयेचेच असल्यामुळें त्यांना सर्व पंडे लोक ओळखत होते, यामुळें आम्हांला पंड्यांचा मुळींच त्रास झाला नाहीं आणि निर्वेधपणें व झटझट सर्व पाहून घेतां आलें.

गयासुराची कथा मोठी हृदयद्रावक आणि देवांच्या आसुरी वृत्तीवर प्रकाश पाडणारी आहे. वस्तुतः हा गयासुर बळिराजाप्रमाणें अत्यंत भगवद्भक्त व पापभीरु होता. परंतु त्याच्या तपस्तेजाला घाबरून देवांनीं त्याचा नाश करण्याचा चंग बांधला—आणि त्यासाठीं जंगजंग पछाडलें. त्यांनीं त्याच्याकडून यज्ञासाठीं त्याचें शरीर मागून घेतलें आणि त्यावर मोठा यज्ञ केला व त्याचें शरीर सरोवरांत टाकून दिलें. परंतु अशा प्रकारें त्याला मारून टाकल्यानंतरहि त्याचें मस्तक हलूं लागलें तेव्हां देवांनीं स्वर्गांतील देवरूपिणी धर्मशिला त्याच्या डोक्यावर आणून टाकली तरीहि गयासुर निश्चळ झाला नाहीं. अखेर स्वतः विष्णु, गायत्री, सावित्री, सरस्वती, लक्ष्मी, सीता, यक्ष, गंधर्व, इंद्र, बृहस्पति वगैरे सर्व देव-देवता त्या शिळेवर येऊन उभ्या राहिल्या. तेव्हां गयासुरानें त्यांच्याकडून असा वर मागून घेतला कीं, 'आतां तुम्ही येथून हलूं नका. या ठिकाणीं जे

कोणी स्नान व पूर्वजांचें तर्पण करतील त्यांच्या हजार पिढ्यांचा उद्धार होईल असा वर मला द्या.' त्याप्रमाणें देवांनीं त्याला तसा वर दिला. तेव्हांपासून पूर्वजांना मुक्ति मिळवून देण्याचें स्थान म्हणून गयेला प्रसिद्धी लाभली.

या ठिकाणीं येतांना श्रीविष्णु आपल्या बरोबरच आपली गदा घेऊन आले होते म्हणून या मंदिराला गदाधराचें मंदिर असें म्हणतात. फल्गु नदीच्या अगदीं कांठावर उंच जागीं हें देऊळ आहे. यामुळें येथून नदीची शोभा छान दिसते. आम्ही गेलों त्यावेळीं देऊळ धुण्याचा कार्यक्रम चालला होता, यामुळें काशी विश्वेश्वराच्या देवळापेक्षां हें देऊळ कमी गलिच्छ आहे असा आमचा समज झाला. तो खरा कीं खोटा गदाधर जाणे ! सर्वांत उंच ठिकाणीं धर्मशिला आहे. तिच्यावर एक भलें मोठें पाऊल आहे. श्रीविष्णु प्रथम येथें अवतरले त्यावेळीं त्यांच्या पावलाचा जो ठसा उमटला तेंच हें पाऊल. यालाच विष्णुपद असें म्हणतात. या विष्णुपदावर लोक पिंड ठेवतात आणि गायी येऊन ते पिंड खाऊन जातात. हा कार्यक्रम दिवसभर चाललेला असतो. ती गंमत थोडा वेळ पाहून आम्ही मंदिराला रामराम ठोकला आणि बाजारांत गेलों. या ठिकाणीं तिळकूट नांवाची एक उत्कृष्ट मिठाई मिळते. तिळ व गूळ किंवा साखर एके ठिकाणीं कुटून ही बनविली जाते. थंडीच्या दिवसांत ही पौष्टिक व रुचकर मिठाई सर्वजण आवडीनें खात असतात. राजगिऱ्यासारख्या खोबी नांवाच्या एका तृणधान्याची मिठाईहि येथें मिळते. ही पचायला अत्यंत हलकी व उन्हाळ्यांत थंड असते. यामुळें आम्ही थोडेसें तिलकूट व बरीचशी मिठाई खरेदी केली आणि घरीं परतलों. गया शहराची रचना इतर तीर्थक्षेत्राप्रमाणेंच दाट, कोंदट व आरोग्याला विघातक आहे. परंतु कांहीं कांहीं रस्ते चांगलेच रुंद दिसले. रात्रीं एका मारवाडी मित्राकडे मिष्टान्न भोजन करून आम्ही गयासुराच्या या राजधानीचा घाईघाईनें निरोप घेतला.

★★★

# बोधगया : १६

## वैशाखी पौर्णिमेची महान् घटना

बौद्ध धर्मामध्यें वैशाखी पौर्णिमेस फार महत्त्व आहे. ज्या धर्मानें व तत्त्वज्ञानानें एके काळीं सारे आशिया खंड व्यापलें होतें व आजहि चीन, जपान, ब्रह्मदेश व सिलोन या देशांतील जनतेच्या अंतःकरणांत प्रेमादराचें स्थान मिळविलेलें आहे त्या धर्माचें व तत्त्वज्ञानाचें ज्ञान (बोधि) शाक्यसिंह सिद्धार्थ ऊर्फ गौतम यांना वैशाखी पौर्णिमेस प्राप्त झालें म्हणून या दिवसाला बोधिजयंति असें म्हणण्यांत येते. या महान् घटनेची स्मृति म्हणून दर वैशाखी पौर्णिमेस बौद्धधर्मीय लोक मोठा उत्सव करतात आणि तत्त्वचिंतनामध्यें तो दिवस घालवितात. ज्या ठिकाणीं भगवान् गौतमांना हें ज्ञान (बोधि) प्राप्त होऊन बुद्ध (ज्ञानी) ही संज्ञा त्यांना प्राप्त झाली तें बुद्धगयेचे स्थान बौद्ध धर्मामध्यें अत्यंत पवित्र क्षेत्र मानलें जातें. ही बुद्धगया अथवा बोधगया बिहारमधील सुप्रसिद्ध गया स्टेशनपासून सात मैल दूर फल्गु नदीच्या काठीं आहे. तेथपर्यंत जाण्यास उत्तम डांबरी सडक असून अगदीं अल्प भाड्यांत जाणारी बस, रिक्शा, (सायकल रिक्शा) टांगा वगैरे वाहनें तेथें मिळतात. बौद्धांप्रमाणेंच हिंदूहि या स्थानाला पवित्र मानतात आणि येथें पिंडदान वगैरे करतात.

वैशाखी पौर्णिमेस बुद्धजयंती असेंहि म्हणण्यांत येते. याच दिवशीं बुद्धचरित्राशी संबंध असलेल्या ज्या अनेक गोष्टींचा जन्म झाला त्यांत बुद्धगयेंतील सुप्रसिद्ध पिंपळाचें झाडहि होतें. या झाडाखालीं बसून गौतमाला 'बोधि' (ज्ञान) प्राप्त झाली म्हणून या झाडाला 'बोधिवृक्ष' असें म्हणतात. या बोधिवृक्षामुळेंच या स्थानाला इतकें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. वस्तुतः सारा बिहार प्रदेश म्हणजे बुद्ध व महावीर यांच्या धर्मचक्र प्रवर्तनाची कर्मभूमि आहे. येथें ठिकठिकाणीं बुद्ध व महावीर यांच्या ऐतिहासिक निवासस्थानाची ऐतिहासिक चिन्हें आढळतात. परंतु बुद्धगयेपासून कोट्यावधि लोकांच्या मनाला व आत्म्यास समाधान मिळवून देणाऱ्या ज्ञानाची ज्योत उजळल्यामुळें आजहि हें स्थान अत्यंत

पवित्र मानलें जातें.

या वर्षी २८ मे १९५३ रोजीं म्हणजे गौतमाला बोधि प्राप्ति झाल्याच्या २४७९ व्या जयंतीच्या दिवशीं एक अत्यंत महत्त्वाची घटना भारतांत घडली आणि तिच्या योगें बौद्ध जगतामध्यें भारताचें नांव अधिक उज्ज्वल झालें. ती घटना अशी कीं या दिवशीं भारत सरकारनें १९४९ च्या बुद्ध गया मंदिराच्या खास कायद्यानुसार एका मोठ्या सरकारी अधिकाऱ्याच्या अध्यक्षपदाखालीं नेमलेल्या चार हिंदु व चार बौद्ध लोकांच्या एका समितीकडे हें बुद्धगयेचें इतिहास–प्रसिद्ध मंदिर सोपविण्यांत आलें. आणि अशा प्रकारें गेलीं कित्येक शतकें चालत आलेल्या अन्यायाचें परिमार्जन करण्यांत आलें. त्या सुमारास आपण इंग्लंडच्या राणीच्या राज्यारोहणांत इतके धुंद होऊन गेलों होतों कीं, प्रत्यक्ष आपल्या देशांत घडणाऱ्या या महान् ऐतिहासिक घटनेकडे आपल्यापैकीं कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. मग तिचें महत्त्व कळणें तर दूरच राहिलें.

बोधगयेजवळ सम्राट अशोकानें सुमारे २२०० वर्षांपूर्वी त्या ठिकाणीं एक मंदिर बांधलें होतें. ५०० वर्षांनंतर तें मंदीर पुनः बांधण्यांत आलें. अितिहासतज्ञांच्या मतें सध्यां बोध गयेमध्यें जें बुद्ध मंदीर आहे तें हें १७०० वर्षांपूर्वी पुनः बांधलेलें मंदिर होय. कांहीं शतकांपूर्वी चिनी प्रवासी ह्युयनत्संग यां देशांत आला होता. त्यावेळीं त्यानें या मंदिराचें जें वर्णन लिहून ठेवलें आहे तें सध्याच्या मंदिराशीं तंतोतंत जुळणारेंच असल्यामुळें या विधानास पाठिंबा मिळतो.

## हिंदु महन्ताचा कबजा

तेव्हांपासून याठिकाणीं देशांतून व परदेशांतून बौद्ध धर्मानुयायी नेहमीं येत असत व कांहीं भिक्षू येथें निवासहि करीत. परंतु या भागांत मुसलमानांचें राज्य स्थापन झाल्यानंतर बौद्ध लोक निघून गेले. पुढें सुमारें तीन–चारशें वर्षेपर्यंत या मंदिराकडे कोणी लक्ष दिलें नाहीं. त्याच्याभोंवती जंगल वाढलें आणि त्या जंगलामध्यें तें लुप्त झालें. त्यानंतर सुमारें चारशें वर्षांपूर्वीं एक संन्यासी तेथे गेला आणि त्यानें

तेथील जंगल साफसूफ करून तेथें बोधगया मठाची स्थापना केली. व तो तेथें राहू लागला. हळूहळू त्या मठाच्या अध्यक्षानें—महंतानें मंदिराच्या आसपासची पुष्कळशी जमीन जायदाद बळकावली आणि त्यानें मंदिरावरहि कबजा केला.

## इंग्रज लेखकानें प्रथम लक्ष वेधलें

पुढें पुढें त्या मंदिरावरील आपली पकड घट्ट करण्यासाठीं तेथील बुद्धमूर्तीला संपूर्ण हिंदु मूर्ति बनविण्याचा प्रयत्न महंतानें सुरू केला. मी कांहीं दिवसापूर्वी तेथें जाऊन हें मंदीर पाहून आलों. त्या वेळीं गौतम बुद्धाच्या सुन्दर मूर्तीच्या गळयांत भगवी कफनी अडकवलेली होती. त्याच्या कपाळावर गंधाचा टिळा लावला होता आणि हिन्दु पद्धतीनें त्याची षोडशोपचारयुक्त पूजा करण्यांत आलेली होती. यामुळें त्या मूर्तीचें खरें सौंदर्य जवळजवळ नाहींसें झालें होतें. शिवाय इतर हिंदु मंदिरांतून आढळणारी अव्यवस्था व गलिच्छपणाहि तेथें दिसत होता. बौद्धधर्मीय लोक बुद्धाच्या मूर्तीसमोर बसून त्याचें ध्यान करीत असतात, तीच त्यांची उपासना. परन्तु त्या देवळाची स्थिति अशी कीं कोणालाहि शांतपणें पांच मिनिटेंहि बसवणार नाहीं. शिवाय ध्यान करण्यापूर्वी बौद्ध धर्मीयांना मूर्तीच्या गळयांतील कफनी आणि गंध वगैरे काढून टाकून तिला नैसर्गिक अवस्था प्राप्त करून द्यावी लागे. यामुळें बौद्ध लोक अत्यंत बेजार होऊन गेले होते. शिवाय तेथें ऐतिहासिक दृष्टया अनेक महत्त्वाची शिल्पें व भग्नावशेष पडलेले होते त्याकडे कोणाचेंच लक्ष नव्हतें.

या खेदजनक परिस्थितीकडे ' दि लाईट ऑफ एशिया ' या काव्याचे सुप्रसिद्ध इंग्रज लेखक सर एडविन आर्नोल्ड यांनीं १८८५ सालीं त्या वेळच्या भारत सरकारचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकारनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. पुढें सर एडविन यांनीं ब्रिटिश वर्तमानपत्रांत अनेक लेख यासंबंधीं लिहिले. त्याचा परिणाम होऊन १८९१ सालीं महाबोधि सोसायटी स्थापन करण्यांत आली. बुद्धगयेच्या पवित्र तीर्थस्थानाचा पुनरुद्धार करणें हें या सोसायटीचें मुख्य ध्येय होतें. सुप्रसिद्ध सिलोनी बौद्ध भिक्षु श्री. अनगारिक धर्मपाल हे या संस्थेचे आधारस्तंभ

होते. या मंदिराची व्यवस्था बौद्ध धर्मीय लोकांच्या ताब्यांत आल्याशिवाय त्याचा पुनरुद्धार होणें शक्य नाहीं ही गोष्ट श्री. अनगारिक धर्मपाल यांनीं बौद्ध व हिंदु लोकांना पटवून देण्याचा अहर्निश प्रयत्न केला. हा प्रश्न न्यायालयांतहि नेण्यांत आला. परंतु मालकी हक्काच्या रूढ कायद्यामुळें त्यांत मठाच्या महंताचाच जय झाला. तरीहि श्री. धर्मपाल यांनीं आपली खटपट चालूच ठेवली.

## स्वतंत्र भारतानें कायदा केला

गया कॉंग्रेसच्या वेळीं झालेल्या ठरावाप्रमाणें डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनीं याबाबतींत चौकशी करून हा प्रश्न मिटविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यांना अपयश आलें. त्यावेळीं गांधीजी असें म्हणाले होते कीं, ' भारत स्वतंत्र झाला म्हणजे एका क्षणांत हा प्रश्न निकालांत काढता येईल.' त्यांचे हें म्हणणें आज खरे ठरलें आहे—फरक एवढाच कीं, त्यांचा एक क्षण सहा वर्षांचा ठरला.

अशा प्रकारें सर्व अडचणींचें निवारण होऊन २८ मे १९५३ रोजीं या कायद्यानुसार नेमण्यांत आलेल्या समितीकडे या मंदिराची व्यवस्था आली. त्यावेळीं बुद्धगया मंदिराचे अध्यक्ष महंत हरिहर गिरी यांनीं असें जाहीर केलें कीं, ' पांच पांडवांचें मंदिर, हवनकुंड आणि धर्मशाळा एवढी व्यवस्था मी नवीन व्यवस्थापक समितीकडे सोपवित आहे. हें मंदिर साऱ्या जगाच्या आदरास पात्र आहे. नव्या व्यवस्थेखालीं त्याची भरभराट होईल. त्यायोगें हिंदु व बौद्ध लोकांमध्यें समजुतदारपणा व सहानुभूति यांचें नवीन युग निर्माण होईल व भगवान बुद्धाच्या व इतर महापुरुषांच्या पवित्र स्मृतीचे तें एक केंद्र बनेल अशी मी अंतःकरणापासून आशा करतो. '

ज्या बुद्ध मंदिराच्या प्राप्तीसाठीं गेलीं साठ वर्षें श्री. अनगारिक धर्मपाल आणि महाबोधी सोसायटी यांनीं खटपट चालविली होती तें हें मंदिर उत्तर भारतांतील एक अत्यंत सुंदर मंदिर आहे. कित्येक शतकें तें जंगलांत दडून पडले होतें. त्याच्या सभोवतालची जमीन खूप उंच ( सुमारें पंधरा फूट ) आहे. यामुळें हें मंदिर एखाद्या मोठ्या खड्डयांत

असल्यासारखें भासतें. पावसाळ्यामध्यें शेजारून वाहणाऱ्या निरंजरा नदीचें पाणी देवळांत शिरूं नये म्हणून मंदिराभोवती हा बांध जाणून-बुजून घालण्यांत आला होता असें म्हणतात. या मंदिराची उंची १७० फूट आहे. देवळाच्या गाभाऱ्यांत भूमिस्पर्श–मुद्रेमध्यें मांडी घालून बसलेल्या गौतमबुद्धाची सुंदर मूर्ति आहे. मंदिराच्यावर जाण्यास पायऱ्या असून वरच्या बाजूस दोन कोपऱ्यांत बोधिसत्त्वाच्या दोन सूचक मूर्ति आहेत. आम्ही तेथें गेलों त्यावेळीं या मूर्तींनाहि भगव्या कफन्या घालून हिंदु बनविण्यांत आलेलें होतें आणि तेथील पुजारी त्यांच्यासंबंधीं कांहीं काल्पनिक दंतकथाहि सांगत होता. मंदिरावरून आजूबाजूचें दृश्य फार मनोरम दिसतें. मंदिराच्या सभोवती भक्कम फरसबंदी असून मंदिराच्या बाहेरील भिंतींच्या कोनाड्यांतून लहानलहान बुद्धमूर्ति आहेत. मंदिरांतील मूर्तीचें तोंड पूर्वेस आहे. ज्यावेळीं भगवान बुद्ध ज्ञानप्राप्तीच्या तपस्येसाठीं बसले होते त्यावेळीं ते अगदीं याच अवस्थेंत होते असें म्हणतात.

ज्या पिंपळाच्या झाडाखालीं बसून शाक्यसिंह गौतमानें तपश्चर्या केली व बोधि ( ज्ञान ) प्राप्त करून घेतली त्याला बोधिवृक्ष असें म्हणतात. आजहि या ठिकाणीं तो बोधिवृक्ष दाखविण्यांत येतो. परन्तु तो मूळचा बोधिवृक्ष नसून १८७० सालीं कनिंगहॅमनें येथील डागडुजी सुरू केली असतां मूळचा जुना वृक्ष उन्मळून पडल्यामुळें त्यानें नवीन लावलेलें तें झाड आहे. हें झाड मंदिराच्या पश्चिमेस असून तें सुमारें १०० फूट उंच आहे.

भारत हा जसा धार्मिक सहिष्णुतेबद्दल प्रसिद्ध आहे तसाच धार्मिक माथेफिरूपणाबद्दलहि कांहीं कमी प्रसिद्ध नाहीं. बौद्ध, जैन, हिंदु ( अर्थात् वैदिक ), मुसलमान, आर्य, अनार्य यांच्या हाणामाऱ्यांची व खुनशीपणाची अनेक उदाहरणें आपल्या इतिहासांत आहेत. या बोधिवृक्षाच्या नशिबींहि पहिल्यापासून लोकांच्या रोषाला बळी पडण्याचें लिहिलेलें दिसतें. फाहियान यानें आपल्या प्रवास वर्णनांत असें लिहिलें आहे कीं, ' सम्राट अशोक आपल्या पूर्वायुष्यांतील पापांच्या प्रायश्चित्तासाठीं व चित्तशुद्धीसाठीं नेहमीं बोधिवृक्षाच्या दर्शनाला जात असे. त्याच्या राणीला जेव्हां हें कळलें तेव्हां

ती अत्यंत क्रुद्ध झाली आणि अशोकाच्या गैरहजेरींत तिनें तें झाड आपल्या नोकरांकडून तोडवून टाकलें. राजानें जेव्हां हें दृश्य पाहिलें तेव्हां त्याच्या मनावर इतका परिणाम झाला कीं तो त्याच ठिकाणीं बेशुध्द होऊन खालीं पडला. पुढें तो शुध्दीवर आल्यानंतर त्यानें त्या झाडाच्या बुंध्याभोंवती विटांचा पार बांधविला आणि त्याच्या मुळाशीं शेकडो घागरी गायीचें दूध घालण्याची व्यवस्था केली. तो जमिनीवर पडून राहिला आणि झाडाला अंकुर फुटेपर्यंत न उठण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. त्यानें प्रतिज्ञा करतांच त्या झाडाच्या बुंध्यांतून अंकुर फुटू लागले. तेव्हांपासून आजपर्यंत तें झाड निदान दहा 'चांग' तरी उंच वाढलें आहे."

कांहीं ठिकाणीं असें लिहिलेलें आढळतें कीं स्वतः अशोकानेंच बौद्धधर्माची दीक्षा घेण्यापूर्वीं हें झाड तोडून टाकलें होतें. परंतु तें मेलें नाहीं. पुढें त्यानें बौध्दधर्म स्वीकारल्यानंतर त्याची कन्या संघमित्रा हिनें मूळ बोधिवृक्षाची एक फांदी सिलोनमधील अनुराधापूर या ठिकाणीं नेऊन लावली. आज दोन हजार वर्षांनंतरहि त्या ठिकाणीं ती फांदी भल्या मोठ्या वृक्षाच्या रूपानें उत्तम स्थितींत आहे.

बंगालचा हिंदु राजा शशांक यानेहि हा बोधिवृक्ष तोडून टाकला होता. परंतु त्यावेळींहि त्याचा नाश होऊं शकला नाहीं. कारण त्याच्या मुळांतून पुनः नवीन वृक्ष जन्मास आला.

बुध्द मंदिर आणि बोधिवृक्ष यांच्या दरम्यान बोधिवृक्षाखालीं ७ फूट ५ इंच लांब, ४ फूट १० इंच रुंद आणि ३ फूट उंच अशी एक काळ्या दगडाची शिळा आहे, या शिळेवर बसून भगवान गौतमांनीं तपश्चर्या केली व त्यांना ज्ञान लाभलें, असें समजलें जातें. यामुळें ती शिळा व तें स्थान सर्वांत अधिक पवित्र समजलें जातें. ही शिळा म्हणजे सुप्रसिद्ध वज्रासन होय. जवळच असलेल्या महंताच्या समाधी-जवळ एक गोल दगड आहे. हा दगड मूळ वज्रासनाचाच एक भाग आहे असें समजलें जातें. मंदिराच्या डागडुजीच्या वेळीं महंतानें तो तेथून हलविला असें म्हणतात.

या वज्रासनावर बसून तपस्या करीत असतां ' मारा ' नें ( ऊर्फ सैतानाने ) त्या आसनावर आपला हक्क सांगून सिद्धार्थाशीं भांडण आरंभिलें. परंतु आपण जन्मोजन्मीं केलेल्या सत्कृत्यांमुळें आपल्याला तें आसन प्राप्त झालेलें आहे म्हणून आपण तें मुळींच सोडणार नाहीं असें गौतमानें माराला निक्षून सांगितलें. त्यावर मारानें त्याला आपलें म्हणणें खरें आहे हें सिद्ध करण्याचें आव्हान देऊन साक्षीदार आणण्यास सांगितलें. परंतु त्यावेळीं गौतमाला कोण साक्षीदार मिळणार ? म्हणून तो जमिनीकडे बोट दाखवून म्हणाला, ' ही भूमीच माझा साक्षीदार ! ' त्याबरोबर एक भयंकर भूकंप झाला आणि मार पराभूत होऊन पळून गेला. मनुष्याच्या हृदयांतील वासना, कुप्रवृत्ति आणि चांगल्या गोष्टींच्या विनाशासाठीं खटपट करण्याची दुष्टबुद्धि या सर्वांचें प्रतीक म्हणून ' मार ' या काल्पनिक पात्राचा उल्लेख बौद्ध वाङ्मयांत आढळतो. अशा प्रकारें सर्व वासनांवर विजय मिळविल्यानंतरच बुद्धास ज्ञान ( बोधि ) प्राप्त झालें. या मंदिरांतील बुद्धाची मूर्ति बसलेली असून तिनें आपलें बोट भूमिकडे केलेलें आहे. त्या मूर्तीजवळच अनगारिक धर्मपाल यांनीं जपानहून आणलेली बुद्धाची एक चंदनाच्या लाकडाची सुंदर मूर्ति आहे.

★ ★ ★

## राजगृह, नालंदा व पावापुरी

रात्र थोडी आणि सोंगें फार अशी माझी स्थिति झाली होती. सर्वोदय समाजाच्या कामानिमित्त मला बिहारला जावें लागलें. तेव्हां तेथें पाहण्यासारखी स्थळें कोणतीं आहेत याची चौकशी करितां राजगृह, नालंदा व पावापुरी यांचीं नांवें मला सांगण्यांत आलीं. पैकीं पहिलीं दोन नांवें तर शाळेंत शिकत असतां इतिहास वाचनांत येऊन गेलेलींच होतीं. यामुळें प्रथम या दोन स्थळांना भेट द्यावी आणि वेळ उरल्यास पावापुरी पाहून घ्यावी असें मी ठरविलें. ता. १२ व १३ मार्च हें दोनच दिवस माझ्याजवळ शिल्लक होते.

## पोंचण्यास विलंब

वस्तुतः, नीट योजना ठरवून या स्थळांना भेटी दिल्या तर दोन दिवसांत व्यवस्थितपणें सर्व कांहीं पाहतां येतें. परंतु ज्यांच्या सल्ल्यावर अवलंबून मी कार्यक्रम ठरविला, त्यांनाच नीट माहिती नव्हती. यामुळें पाटण्यापासून ६६ मैल अंतरांवर असलेल्या राजगीर गांवीं पोंचण्यास मला ९ तास लागले. सकाळीं १० वाजतां मी घरांतून बाहेर पडलों होतों तो सायंकाळीं ७ वाजतां राजगीरला पोंचलों.

## ‘राजगृहा’चें वैभव लोपलें

येथें तुम्ही राजगृह हा संस्कृत शब्द उच्चारला, तर त्यापासून फारच थोड्या लोकांना बोध होईल. कारण सर्व लोक या गांवाला राजगीर असेंच म्हणतात. आणि बख्तियापूर बिहार लाईट रेल्वेहि ( B. B. L. R.) तुम्हांला राजगीरकुंड या नांवाचेंच तिकीट देईल आणि त्यांत चूक तरी काय आहे? राजगृहाचें कोणतें वैभव तेथें आतां शिल्लक उरलें आहे? बुद्ध, महावीर, बिंबिसार, अजातशत्रु या महान् पूर्वजांचें नांव उच्चारावें अशी कोणती पुण्याई आज या अदृश्यप्राय नगरींत उरली आहे? त्यापेक्षां ज्या कारणासाठीं, ज्या गरम पाण्याच्या कुंडासाठीं लोक आणि विशेषतः रोगी या ठिकाणीं येतात त्या कुंडाशींच या स्टेशनाचें नांव

जोडणें अधिक प्रामाणिकपणाचें नव्हे काय ?

## गल्लीबोळांतून जाणारी आगगाडी

आम्ही पाटण्याहून दुपारी साडे अकरा वाजतां स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसनें निघून पन्नास मैल दूर असलेल्या बिहारशरीफ या गांवीं अडीच वाजतां पोहोचलों. घरीं व गाडींत सर्वजण अगदीं छातीवर हात ठेवून सांगत होते कीं तुम्ही काळजी कशाला करितां? बिहारकडून म्हणजे (बिहारशरीफ गांवाहून) वाटेल तितक्या मोटारी, टांगे तुम्हांला घेऊन जाण्यास तयार असतील. परंतु प्रत्यक्ष जाग्यावर जाऊन चौकशी केली तेव्हां कळलें कीं साडेचार वाजतां येणारी रेल्वे जास्तींत जास्त लौकर जाणारें वाहन आहे. म्हणून त्याच गाडीनें आम्ही राजगीरला गेलों. ही रेल्वे आपल्याकडील बार्शी लाइट रेल्वेपेक्षांहि रद्दी आहे. तिला फक्त दोन किंवा तीनच डबे असतात. सामान ठेवायला बर्थ नाहींत कीं धोक्याच्या प्रसंगीं ओढण्याची साखळी नाहीं. तुमची एखादी वस्तु खालीं पडली तर तुम्ही खालीं उतरून ती खुशाल घेऊन परत येऊं शकतां. मुंबईच्या ट्रामगाड्यापेक्षांहि या आगगाडीचा वेग कमी असतो. बिहारशरीफ ते राजगीर हे १५ मैल अंतर तोडण्यास या गाडीनें दोन तास घेतले. यावरून हिच्या वेगाची कल्पना येईल. यामुळें जरी ही गाडी वाटेंत लागणाऱ्या गांवांच्या गल्लीबोळांतून जात असली, तरी मुलांना तिची अजीबात भीति वाटत नाहीं व एखादी गंमत असावी त्याप्रमाणें तीं धावत्या गाडीला शिवून जातात. कुंपण अथवा प्लॅटफार्म याची स्टेशनला जरूर असते ही गोष्ट या रेल्वेला मान्य नाहीं. यामुळें तिकिटें तपासण्याचें काम गाडींतच केलें जातें. इतके असून भाडें मात्र जबरदस्त म्हणजे मैलास ८ पै प्रमाणें (इतर रेल्वेचें इन्टर क्लासचें) घेतलें जातें.

## जपानी मंदिरांत मुक्काम

आम्ही राजगीरला पोंचलों तेव्हां सूर्यास्त होऊन अंधाराचें साम्राज्य पसरूं लागलें होतें. महाराष्ट्रापासून आम्ही सुमारें हजार मैल दूर पूर्वेकडे होतों. ठरल्याप्रमाणें आम्ही तेथील स्टेशनपासून अर्धा मैल दूर असलेल्या जपानी बौद्ध मंदिरांत मुक्कामास पोंचलों.

## स्वामी विश्वानंद

या मंदिराचे बंगाली व्यवस्थापक स्वामी विश्वानंद हे मोठे आस्थेवाईक, प्रेमळ व आतिथ्यशील संन्यासी आहेत. त्यांच्या मुस्लिमविरोधी व जपानानकूल हालचालीमुळें युद्धकाळीं इंग्रज सरकारनें त्यांना तुरुंगांत डांबून ठेवलें होतें. तेथून सुटून आल्यापासून ते या जपानी पद्धतीच्या मंदिराची व्यवस्था पाहात आहेत. हे गृहस्थ बौद्ध भिक्षु असले तरी हिंदुधर्माचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. कारण बौद्ध धर्म हा हिंदुधर्माचाच एक पोटविभाग आहे असें ते मानतात. स्वामी विवेकानंद व रामकृष्ण परमहंस यांचे ते परम भक्त आहेत. हिंदुमहासभेचे बॅ. वि. दा. सावरकर यांचेशीं त्यांची फार जुनी मैत्री आहे. ज्या वेळीं सावरकर अंदमानमध्यें शिक्षा भोगीत होते, तेव्हां स्वामी विश्वानंद सरकारी पी. डब्ल्यू. डी. खात्यांत नोकरी करीत होते. त्या कामाच्या निमित्तानें ते अंदमानला गेले असतां तुरुंगामध्यें त्यांची सावरकरांशीं भेट झाली होती. त्यानंतरहि त्यांची मैत्री अखंड राहिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. गोळवलकर गुरुजी व बंगाल-बिहारमधील कार्यकर्ते यांच्याशीहि त्यांचा परिचय आहे. यामुळें महाराष्ट्रीय व्यक्तीबद्दल त्यांच्या मनांत एक आत्मीयतेची भावना निर्माण झाली आहे, असें माझ्याशीं त्यांनीं केलेल्या प्रेमळ वागणुकीवरून मला वाटलें.

## महाराष्ट्रीयांविषयीं आदर

बागेतील हिरवळीला जेव्हां ते पाणी घालूं लागले तेव्हां मी त्यांना म्हणालों, 'मला हें काम फार आवडतें. तेव्हां मला थोडा वेळ हें काम करूं देतां का?' त्यावर ते खूष होऊन म्हणाले, "छेः छेः! आज तुम्ही पाहुणे आहांत. तुम्ही कांहींहि काम करतां कामा नये. तुम्ही महाराष्ट्रीय लोक अत्यंत कामसू असता हें मला माहीत आहे. तुमच्यासारखे व्यवस्थित, टापटिपीचे व कष्टाळू लोक मला अन्यत्र पहावयास मिळाले नाहींत. तुम्हां लोकांच्या कर्तबगारीबद्दल माझ्या मनांत नितांत आदर आहे.'

## या स्तुतीला पात्र आहोंत काय?

त्यांच्या या स्तुतीला आम्ही मराठे कितपत पात्र आहोंत हें ज्याचें त्यानेंच ठरवावें. परंतु जगभर हिंडून आलेला एक परप्रान्तीय बौद्ध भिक्षु

आपल्या प्रांताबद्दल असे प्रशंसेचे उद्‌गार काढतो याचा मला अभिमान वाटला हें कबूल केलें पाहिजे. अर्थात् ज्या पक्षाच्या व मताच्या महाराष्ट्रीय लोकांवरून त्यांनीं हें मत बनविलें आहे, त्यांच्या जमातींतील मी नाहीं, हें त्यांना सांगणें मला अप्रशस्त वाटलें.

### ग्रामीण विद्यापीठांची योजना

त्यांच्या त्या जपानी मंदिराचे आवारांत एक विद्यालय असून त्याची जबाबदारीहि स्वामीजीवर आहे. या विद्यालयांत केवळ पुस्तकी शिक्षण न देतां शरीरश्रम, हस्तव्यवसाय, कारागिरी वगैरे जीवनोपयोगी शिक्षण दिलें जातें. या विद्यालयाची व्याप्ति वाढवून त्या ठिकाणीं एक ग्रामीण विद्यापीठ स्थापन करण्याचा त्यांचा विचार आहे व त्यासाठीं शंभर सव्वाशें एकर जमीन मिळविण्याच्या ते खटपटींत आहेत.

### वास्तु आणि शिल्प

ज्या जपानी मंदिराचे ते व्यवस्थापक आहेत तें मंदिर दुसऱ्या महायुद्धापूर्वीं कांहीं जपानी मंडळींनीं बांधलें, त्याची रचना जपानी पद्धतीनें करण्यांत आली आहे आणि आंतील मूर्ति व तिच्या समोरील आरास जपानी आहे. हंड्या-झुंबराप्रमाणें लटकणारे दिवे वगैरे सारें सामान वस्तुतः लाकडी आहे; परंतु त्यावर अशा खुबीनें रंगीत कागद चिकटविलें आहेत कीं तें पितळेचें असल्याचा भास होतो. येथें एक लहानसा नगारा असून सकाळ संध्याकाळ कांहीं मंत्र म्हणत तो नगारा वाजविणें हीच उपासना समजली जाते. बुद्धाच्या मूर्तीसमोरच विवेकानंद व रामकृष्ण यांच्या लहान तसबिरी ठेवलेल्या आहेत.

### सतधारा

राजगृहाची आधुनिक प्रसिद्धी येथील गरम पाण्याचे झरे व कुंड यामुळें आहे. कांहीं वर्षांपूर्वीं डॉक्टर जगदीशचन्द्र बसु यांनीं या पाण्यावर प्रयोग करून तें रेडिओॲक्टिव्ह असल्याचें सिद्ध केलें आहे. तेव्हांपासून या स्थानाकडे लोकांची रीघ लागूं लागली आहे. स्वतः डॉक्टर बसू कित्येक वर्षें नियमानें येथें येऊन राहत असत.

आम्ही सकाळीं उठून सुर्योदयापूर्वींच त्या झऱ्यावर गेलों. जपानी

मंदिरापासून ते झरे सुमारें तीन फर्लांगावर असतील. थंडगार वारें मद मंद वाहात होतें, यामुळें अंगावर गुलाबी कांटा उठत होता. अशा वेळीं गरम पाण्याचें स्नान म्हणजे मोठी चैनच होती. या झऱ्यांना ‘सतधारा’ असें नांव आहे. हा शब्द ‘शतधारा’ या शब्दाचा अपभ्रंश असावा. कारण जरी प्रत्यक्षांत गोमुखांतून वाहणारे दहाबाराच झरे दिसत असले तरी इतरत्र अनेक लहान लहान झरे आढळतात. पुरुष व स्त्रिया यांच्या स्नानाची वेगवेगळी व्यवस्था असून कपडे धुण्यासाठीं स्वतंत्र सोय आहे. या झऱ्याचें पाणी इतकें कढत आहे कीं, गरम पाण्याची संवय नसलेल्यांचें अंगच भाजून निघावें. गोमुखांतून येणाऱ्या पाण्यानें प्रथम अंग धुवून घ्यावयाचें आणि मग खालच्या बाजूस असलेल्या केंदारकुंडांत स्नान करावयाचें अशी पद्धत आहे. या कुंडामध्यें सुमारें छातीइतकें खोल पाणी आहे. तळाशीं वाळू असून खालून गरम पाण्याचे फवारे वर येत असतात. यामुळें तळपाय भाजतील कीं काय असें वाटतें. या पाण्यांत फार वेळ स्नान केल्यास अपाय होतो असें तेथील भटजीनें सांगितल्यामुळें मनसोक्त डुंबण्याची इच्छा असूनहि थोड्याच वेळांत बाहेर यावें लागलें. वर येऊन पुन्हां गोमुखांतून येणाऱ्या झऱ्यांच्या खालीं बसून अंग धुतलें आणि पुसून कपडे करूं लागलों तेव्हां अंगांतून घाम निघूं लागला व सारें शरीर अगदीं हलकें वाटूं लागलें. प्रवासाचा सारा शीण नष्ट झाला आणि मन व शरीर ताजेतवानें झालें.

## प्राचीन राजधानीचें आरोग्यकेंद्रांत रूपांतर

येथील झऱ्यांच्या व कुंडाच्या पाण्यांत स्नान केल्यानें सारे चर्मरोग व संधिवात वगैरे आजार बरे होतात, अशी समजूत असल्यामुळें दूरदूरहून लोक येथें येऊन राहतात व नियमानें स्नान करतात. यामुळें एके काळीं महान् सम्राटाची राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेलें हें स्थान आतां आरोग्यकेंद्र (हेल्थ सेंटर) म्हणून प्रसिद्धीस येऊं लागलें आहे. या झऱ्या-जवळ प्राचीन तपोदाराम (तपोवन) होतें आणि त्या ठिकाणीं भगवान् बुद्ध (इ. स. पू. ५६३ ते ४८३) नेहमीं येऊन राहात असत असा उल्लेख प्राचीन ग्रंथांतून आढळतो.

## पांच टेकड्यांनीं वेढलेलें राजगृह

गरम झऱ्यावर स्नान करण्याचा मुख्य कार्यक्रम आटोपल्यानंतर आम्ही जवळच्याच टेकडीवर चढलों आणि तेथून जुन्या राजगृहाची जागा पाहून घेतली. जुनें राजगृह पांच टेकड्यांच्या मध्यभागीं वसलेलें होतें. कांहीं लोकांच्या मतें टेकड्यांची संख्या पांच नसून सात आहे. सर्व टेकड्या एकमेकींना जोडल्यासारख्या असल्यामुळें त्यांची संख्या निश्चित करणें सोपें नाहीं. महाभारतामध्यें या टेकड्यांची नांवें वैभार, वराह, वृषभ, ऋषिगिरी आणि चैत्यक अशीं दिलेलीं असून सध्यां त्यांना वैभार, विपुल, रत्न, छठ्ठा, शैल, उदय आणि सोना अशीं नांवें आहेत. सध्यां या ठिकाणीं जमिनीच्यावर कांहींहि भग्नावशेष दिसत नाहींत. ओसाड जंगलच सर्वत्र पसरलेलें आहे: यामुळें कधींकाळीं या ठिकाणीं महान् सम्राटाची राजधानी असेल अशी शंकाहि येत नाहीं. स्वामी विश्वानंद मला म्हणत होते कीं, 'तुम्ही जर आजच्या दिवस येथें राहिलांत तर येथून चार-पांच मैल अंतरावर भगवान् बुद्धांच्या ध्यानाची जागा आहे, ती मी तुम्हांला नेऊन दाखवीन. इतरहि अनेक महत्त्वाचीं ठिकाणें आहेत. परंतु त्यासाठीं डोंगर-दऱ्या तुडवीत पुष्कळ चालावें लागेल." माझी इच्छा तर होती; परंतु मुळींच सवड नसल्यामुळें आम्ही त्या स्थानाचें विहंगावलोकन करण्यावरच समाधान मानलें.

## राजगृहाचा पूर्वेतिहास

या ठिकाणीं ब्रह्माचा चौथा पुत्र वसु यानें प्रथम राजधानी वसविली. त्यानंतर बृहद्रथानें व त्याच्या वंशजांनीं येथें राज्य केलें. त्याच्याच वंशांत जरासंध होऊन गेला. इतिहासकालामध्यें सम्राट बिंबिसारानें ( इ. स. पू. ५४३ ते ४९१ ) या ठिकाणीं राज्य केलें. त्याचा मुलगा अजातशत्रु ( इ. स. पू. ४९१ ते ४५९ ) बापाला कैद करून व ठार मारून गादीवर बसला. त्यानें जुन्या राजगृहाच्या बाहेर एक नवें राजगृह बसविलें आणि त्याच्या भोंवतीं एक प्रचंड तट उभारला. या तटाची लांबी सुमारें ३ मैल असून रुंदी १५ ते १८ फूट व उंची ११ फूट होती. आजहि या तटाचे अवशेष ठिकठिकाणीं पहावयास मिळतात. येथील उत्खननामध्यें

इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकांतील प्राचीन वस्तू मिळाल्या आहेत. यांतील कांहीं मूर्ती वगैरे नालंदाच्या म्यूझियममध्यें ठेवलेल्या आहेत.

## महाराष्ट्रीय बिहारी भटजी

येथील केदारकुंडामध्यें स्नान करीत असतां तेथील बिहारी पंड्यानें माझी चौकशी केली. मी महाराष्ट्रीय आहे असें कळतांच तो मला म्हणाला, ' माझें येथील नांव जरी बलदेव पंडा असें असलें तरी वस्तुतः आम्ही महाराष्ट्रीयच आहोंत. माझें खरें नांव मुरलीधर उपाध्ये असें आहे. आतां येथें आमची फार थोडी कुटुंबें उरलीं आहेत. यामुळें मुलांमुलींचीं लग्नें करणेंहि अशक्य होऊन बसलें आहे. या बाबतींत तुम्ही महाराष्ट्रांतील लोक आम्हांला कांहीं मदत करणार नाहीं काय? आमच्या मुलींचीं लग्नें महाराष्ट्रांत झालीं तरच हा प्रश्न सुटेल. परंतु तिकडील लोक आमच्या मुली करून घेत नाहींत. शिवाय आमची संख्या घटल्यामुळें इतर लोक आम्हाला येथून हुसकावून लावतील अशी भीति निर्माण झाली आहे. या बाबतींत तुम्ही काय करूं शकाल ? " मी त्यांना म्हणालों, " तुम्ही बिहारी लोकांचे रीतिरिवाज, पडदा, हुंडा वगैरे गोष्टी स्वीकारल्या आहेत. मराठी भाषा तुम्हांला येत नाहीं. अशा स्थितींत येथील समाजाशीं एकरूप होण्यांतच तुमचें कल्याण आहे. तरी पण तशी खास अडचण असेल तर तुम्ही महाराष्ट्रांत येऊन विचारविनिमय करा. तुमची भिक्षुकी वृत्ति नष्ट झाली तर मला मुळींच दुःख होणार नाहीं. तुम्ही जर बुद्धिमान् असाल तर इतर कोणत्याहि क्षेत्रांत गेलांत तरी कर्तबगारी करून दाखवाल. तेव्हां ही भीति मनांतून काढून टाका. " त्यानंतर त्यांनीं देवळांत असलेलें आपलें छोटेसें ग्रंथालय मला नेऊन दाखविलें. त्यांत संस्कृत, हिंदी, इंग्रजीची सामान्य पुस्तकें दिसलीं. सतधारेजवळ शिव-मंदिर, संध्यादेवी मंदिर, विष्णुपद वगैरे देवळें आहेत. त्यांत कांहीं विशेष नाहीं. टेकड्यांवरून दिसणारें जुन्या राजगृहाचें दृश्यच फार सुंदर दिसतें.

## सर्व धर्मांचें तीर्थस्थान

पहाटें झोपेंतून जागा झालों तों दूरच्या मशिदींतून येणारी बांग कानां-वर पडली. पहाटेच्या निःस्तब्धतेंत प्रार्थनेसाठीं देण्यांत आलेलें तें निमंत्रण

कानांना अत्यंत मधुर लागलें; आणि लक्षांत आलें कीं आज राजगृह हें सर्व धर्मांचें तीर्थक्षेत्र बनलें आहे. भगवान् महावीर स्वामींनीं राजगृह व नालंदा या ठिकाणीं चौदा पावसाळे घालविले होते आणि जैनांचे विसावे तीर्थंकरमुनि सुव्रत यांची जन्मभूमि राजगृह होय असें समजलें जातें. यामुळें जैन लोक या स्थानाला पवित्र मानतात. बिहारचे महान् मुस्लिम संत मखदूम शाह शरफुद्दीन हे या ठिकाणीं निवांतपणें ध्यान व तप करण्यासाठीं बारा वर्षें राहिले होते आणि हजरत मुहम्मद येथें येऊन गेले होते अशी समजूत मुसलमानांमध्यें असल्यामुळें ते लोकहि या स्थानास पवित्र मानतात. अशा प्रकारें हिंदु, बौद्ध, जैन व मुसलमान धर्मीयांचें हें तीर्थक्षेत्र बनलें आहे.

गरम झऱ्याच्या पाण्यानें स्नान करून आम्ही जपानी मंदिरांत परतलों, तों न्याहारी तयार होती. गरम गरम पराठे (तुपांत तळलेली चपाती) व भाजी समोर दिसल्याबरोबर आम्ही त्यावर ताव मारला आणि स्वामी-जींचे आभार मामून आम्ही निघालों. परंतु ते आम्हांला पोंचवावयास वाटेंतील ब्रह्मी बुद्धमंदिरापर्यंत आले. हें बर्मीज मंदिरहि सुंदर असून येथील आरास ब्रह्मदेशीय पद्धतीची आहे. त्यांतील लांकडी वस्तूंवरील सोनेरी काम मोठें प्रेक्षणीय आहे. येथें एक ब्रह्मी भिक्षुणी राहात असते.

## रेंगाळणाऱ्या मनानें निरोप घेतला

अशा प्रकारें रात्रीं ७ वाजल्यापासून सकाळीं ७ वाजेपर्यंतचा अर्धा दिवस आम्ही या प्राचीन नगरीच्या सान्निध्यांत घालविला आणि जुन्या स्मृतींचा दरवळणारा सुगंध बरोबर घेऊन रेंगाळणाऱ्या मनानें परंतु झपझप चालणाऱ्या पावलांनीं स्टेशनवर पोंचलों. तेथून आठ वाजतां गाडी सुटली. तिच्यांतून आम्हीं आठ मैल दूर असलेल्या नालंदा शहराचे अवशेष पाहावयास गेलों. गाडीहि आमच्या मनाप्रमाणेंच रेंगाळत, लळतलोंबत चालली होती. आम्हांला वाटलें, ' या प्राचीन नगरीपासून दूर जाण्याचें हिच्याहि जीवावर आलें आहे असें दिसतें. कशीबशी नाइलाजानें चालली आहे बिचारी ! '

★★★

# बिहारची राजधानी पाटणा : १८

## शहरवाढीला वावच नाहीं

जगांत आणि विशेषतः हिंदुस्थानांत जीं कांहीं अजत्र शहरें आहेत त्यांत बिहारची राजधानी असलेलें " पाटलीपुत्र " अथवा " पटना " शहर याची गणना अवश्य करतां येईल. राजधानीचें शहर ऐसपैस पसरलेलें आणि चोहोबाजूंनीं ज्याची वाटेल तशी वाढ होऊं शकेल असें असलें पाहिजे. परंतु पाटणा शहराचें वैशिष्ट्यच असें कीं रेषेप्रमाणें त्याला लांबी आहे, परंतु रुंदी जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. त्याची लांबी वीस मैलांहूनहि जास्त आहे आणि रुंदी मात्र एकदीड मैल आणि कांहीं जागीं त्याहूनहि कमी आहे. याचें कारण असें कीं हें शहर गंगानदीच्या कांठीं उंचावर वसलेलें आहे. याची उंची इतकी आहे कीं गंगेला कितीहि भयंकर महापूर आला तरी या शहरांत पाणी शिरत नाहीं. नदी व शहर यांत मुळींच अंतर नाहीं. गंगेला जावयाचें म्हणजे तीन मजली माडी उतरून खालीं यावयाचें असेंच वाटतें. म्हणजे अगदीं नदीला लागूनच शहराची रचना करण्यांत आलेली आहे. शहराच्या मुख्य रस्त्यांतून जातांना अनेकदां नदीचें पात्र आपल्या दृष्टीस पडते. शहराच्या दुसऱ्या बाजूचा भाग इतका सखल आहे कीं पावसाळ्यांत तो सर्व पाण्यानें भरून जातो. यामुळें त्या बाजूस शहर वाढविण्याचा प्रयत्न करतांच येत नाहीं. पश्चिमेच्या बाजूस जवळच एक नदी आहे. तिला महापूर आला म्हणजे मात्र पाटण्याला पाण्यांत बुडावें लागतें. म्हणून त्याबाजूनेंहि शहराला वाढण्यास मार्ग नाहीं.

## बोगद्यांतून चालल्यासारखें वाटतें

या शहराचें आणखी एक वैशिष्ट्य असें कीं एका मोठ्या राजमार्गाच्या दोन कडांना सारें शहर वसलेलें आहे. शहराच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जाणारा ' अशोक पथ ' एवढाच येथील महत्त्वाचा रस्ता होय. " एका रस्त्याचें शहर " असें या शहराला नामाभिधान देण्यास हरकत नाहीं. या एकाच रस्त्यानें सारी वाहतूक होते. देवळें, मशिदी, शाळा,

युनिव्हर्सिटी वगैरे सर्व प्रकारचीं ठिकाणें या रस्त्यावरच आहेत. मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली वगैरे शहरांची लांबीहि वीस मैल किंवा वीस मैलांहून अधिक आहे. परंतु तीं शहरें म्हणजे लहान लहान उपनगरांचा समुदाय आहेत आणि एका उपनगरापासून दुसरें उपनगर अनेक मैल दूर असूं शकतें व त्यामधील जागा पुष्कळ वेळां अगदीं रिकामी असूं शकतें. परंतु 'अशोकपथा' वरील घरें एकमेकांना चिकटलेलीं आहेत. या वीस मैलांच्या अंतरांत मध्यें मोकळी जागा नांवालाहि आढळत नाहीं. मग उद्यानें अथवा मैदानें दिसण्याचा संभवच कोठला? गांवच्या एका टोकाला 'गांधी मैदान' नांवाचें प्रचंड मैदान आहे तेवढेंच काय तें. बाकी सर्व शहर हें एखाद्या बोगद्यासारखें वाटतें. मैलन् मैल गेलें तरी घरें संपत नाहींत, रस्ता फुटत नाहीं किंवा चौक लागत नाहीं. माझ्या-सारख्या कमजोर स्मरणशक्ति असणाऱ्याला हें शहर फार सोयीचें वाटतें. कारण फक्त एकच रस्ता असल्यामुळें रस्ता चुकण्याची भीति या शहरांत मुळींच नसते.

### एका वेळीं २ मोटारी जाणें अशक्य

बरें, हा रस्ता तरी चांगला ऐसपैस रुंद असावा! मुळींच नाहीं. शहराप्रमाणें या रस्त्यालाहि रुंदी नाहीं. यामुळें बोगद्याची उपमा अगदीं सार्थ वाटते. हा रस्ता इतका अरुंद आहे कीं एका वेळीं एस्. टी. ची एकच मोटार व्यवस्थितपणें जाऊं शकते. यामुळें आगगाडीच्या रूळाप्रमाणें या रस्त्याचा वापर करावा लागतो. सिटी बस सर्व्हिसच्या वेळां ठरलेल्या असल्यामुळें आगगाडीप्रमाणें त्यांचें क्रॉसिंग रस्त्याच्या त्यांतल्यात्यांत रुंद भागांत होऊं शकेल अशी खबरदारी घेण्यांत येते. परंतु परगावीं जाणाऱ्या मोटारीहि शहराच्या एका टोकापासून सुटत असल्यामुळें फार घोटाळा होतो. समोर एखादी बैलगाडी, रिक्षा, हातगाडी चालत असली आणि त्याच वेळीं दोन मोटारी समोरासमोर आल्या कीं अर्धापाऊण तासाची निश्चिती झालीच म्हणून समजावें. लग्नसराईच्या दिवसांत तर मोटारींतून प्रवास करणाऱ्यांची कुचंबणा पराकोटीला जाऊन पोंचते. समोर एखादी वरात जात असली म्हणजे मागून येणारी मोटारहि त्या वरातींतीलच

एक भाग बनते आणि वाटेंत देऊळ अथवा घर लागून त्या वरातीची पांगापांग होईपर्यंत त्या मोटारीलाहि मुंगीच्या पावलानें वरातीचें अनुकरण करावें लागतें. यामुळें तुम्ही अमूक एका क्षणीं अमक्या ठिकाणीं जावयाचें ठरवून घरांतून बाहेर पडलांत तर त्या क्षणीं तेथें पोहोचालच अशी शाश्वती मुळींच देतां येत नाहीं. मी भारतांतील अनेक शहरें पाहिलीं आहेत. परंतु इतक्या अरुंद व इतक्या दाट रहदारीचा रस्ता अद्यापि माझ्या पहाण्यांत नाहीं.

## मनात सतत अपघाताची भीति

बरें, हा रस्ता सरळ नाकासमोर जाणारा असता तरी फारशी अडचण भासली नसती. परंतु या रस्त्याला अत्यंत धोक्याची अशी भयंकर वळणें आहेत. कांहीं वळणावर पुढून कोण येत आहे किंवा कोणतें वहान चाललें आहे याची मुळींच कल्पना येत नाहीं. यामुळें अपघात घडण्याची टांगती तलवार सतत मानेवर असते. म्हणून मोटारींत बसल्यापासून उतरेपर्यंत ड्रायव्हरला सारखा हॉर्न वाजत ठेवावा लागतो. कोणी म्हणेल इतकीं भयंकर वळणें अजून कां चालू ठेवलीं आहेत ? त्याला उत्तर असें कीं गंगा नदीच्या काठानें वसत जाण्याचा निर्णय या शहरानें घेतला असल्यामुळें ती नदी जशी वेडीवांकडी वहात जाईल तसें त्या शहरालाहि अठरावक्र स्वरूप धारण करावें लागलें आहे. यामुळें हीं वळणें कधींकाळीं नाहीशीं करतां येतील कीं नाहीं याविषयीं शंकाच आहे.

## सर्वत्र उघडी गटारें, अस्वच्छता

उत्तर भारतांतील शहरें सामान्यतः अस्वच्छता आणि गलिच्छपणा यांचीं आगरेंच असतात. त्या मानानें दक्षिण भारतांत स्वच्छता व नीटनेटकेपणा अधिक आढळतो. ही गोष्ट घरें व रस्ते दोहोंनाहि लागू आहे. या विधानाचा उत्कृष्ट पुरावा म्हणून भारताची राजधानी असलेल्या दिल्ली शहराच्या जुन्या वस्तीकडे बोट दाखवितां येईल. प्रयाग आणि काशी या शहरांतील गलिच्छपणाहि दिल्लीपेक्षां कांहीं कमी नाहीं. परंतु पाटण्याची अस्वच्छता कांहीं औरच आहे. जागेच्या टंचाईमुळें या

गलिच्छपणास एक मोठी सबब मिळाल्यासारखी झाली आहे. परंतु जेथें जागा भरपूर आहे अशा कदमकुआँ भागातहि गलिच्छपणाला कांहीं तुटवडा नाहीं. बिहारचे सुप्रसिद्ध कवि श्री. आरसीप्रसाद सिंह जेथें राहतात त्या घराच्या दारांतच घाणेरड्या पाण्याचा एवढा मोठा नाला आहे कीं, अपरिचित माणूस रात्रीं अपरात्री गेल्यास त्यांत बुडून जावयाचा. सबंध पाटणा शहरांत उघडीं गटारें आहेत. 'अशोकपथा'च्या दोन्ही बाजूस गांवातील सांडपाणी व मलमूत्र घेऊन वाहणारी उघडी गटारें पाहिलीं कीं आपण अजून सोळाव्या शतकांतच वावरत आहोंत असें वाटतें. या घाणीमुळें मलेरिया, क्षय वगैरे रोगांनीं येथें कायमचें ठाणें दिलें आहे. वस्तुतः शहराच्या मर्यादित जागेचा फायदा घेऊन म्युनिसिपालिटीला तें जास्त स्वच्छ ठेवतां आलें असतें. कारण रांचीप्रमाणें जेथें पांच–पन्नास मैलांच्या रस्त्याची निगा ठेवावी लागते तेथें इतर सुखसोयीकडे लक्ष देणें नगरपालिकेला परवडत नाहीं. परंतु येथें फक्त एकाच रस्त्याची स्वच्छता पहावयाची असल्यामुळें जमिनीखालचें गटार तयार करणें नगरपालिकेला खर्चाचें वाटण्याचें कारण नाहीं. या बाबतींत एक अडचण पुढें येऊं शकेल. ती म्हणजे गटारासाठीं रस्ता उकरल्यास साऱ्या शहराचें व बाहेरगावचेंहि दळणवळण कांहीं दिवस तहकूब ठेवावें लागेल. परंतु आधुनिक विज्ञानाच्या युगांत रात्रींतून थोडाथोडा रस्ता उकरून काम करणें अशक्य समजण्याचें कारण नाहीं. गंगेच्या उंचसखलपणाप्रमाणें गांवांतहि उंचसखल भाग आहे. यामुळें जमिनीखालचें गटार काढता येत नाहीं असेंहि म्हणतात. परंतु शास्त्रज्ञांची मदत घेतल्यास यांतूनहि मार्ग निघू शकेल, यांत शंका नाहीं.

## गंगा नदीचें एक मैल रुंद पात्र

विपुल पाण्यानें तुडुंब भरलेली गंगानदी शहराला घासून वहात असल्यामुळें येथें पाण्याचा तुटवडा मात्र मुळींच भासत नाहीं. विहिरींनाहि पाणी भरपूर असते व नळांचीहि व्यवस्था चांगली आहे. परंतु या पाण्याच्या सुबत्तेमुळें डांस, चिलटे, अस्वच्छता व रोगराई यांचीच वाढ झालेली आहे. या ठिकाणीं गंगानदीचें पात्र कमींतकमी एक मैल रुंद

आहे. यामुळें जवानांना पोहण्याची हौस उत्तम प्रकारें भागवितां येतें. रोज नियमितपणें भाविक अंतःकरणानें गंगास्नान करणारे लहानथोर स्त्री–पुरुष पुष्कळ दृष्टीस पडतात. नदीमध्यें नौकाविहाराचीहि सोय आहे. परंतु येथील अव्यवस्थितपणामुळें पद्धतशीर वागणाऱ्यांना फार त्रास होतो. आम्ही कांहीं मंडळी महेंद्र घाटावर होडींत बसण्यासाठीं गेलों होतों. अडीच रुपयांना अर्धापाऊण तासासाठीं आम्ही एक होडी ठरविली. परंतु होडीवाल्याला वरच्या कमिशनचा लोभ आवरेना. त्यानें इतरहि अनेक लोक होडींत भरले आणि नाव चालवायाला याची आवश्यकता आहे अशी बतावणी केली. त्याची लबाडी लक्षांत येतांच आम्ही नावेंतून बाहेर पडलों व पुन्हां त्याच्या वाटेला जावयाचें नाहीं असें ठरविलें.

## धान्याचें प्रेक्षणीय कोठार

पाटणा शहराची रचनाच अशी कांहीं विचित्र आहे कीं तेथें प्रेक्षणीय स्थळांचें अस्तित्वच संभवत नाहीं. वस्तुतः गौतम बुद्धाच्या व अशोकाच्या काळापासून हें शहर अत्यंत भरभराटीला आलेलें होतें व नंतरहि त्याला वाईट दिवस आल्याचें दिसत नाहीं. यामुळें येथें कांहींतरी प्रेक्षणीय स्थळें असावयास हवीं होतीं. परंतु त्यासंबंधीं चौकशी करतां तीन गोष्टींचीं नांवें सांगण्यांत आलीं. एक म्युझियम अथवा पदार्थसंग्रहालय. बिहारमध्यें ठिकठिकाणीं जें खोदकाम झालें आहे त्यांत सांपडलेल्या वस्तू या अजायब घरांत ठेवण्यांत आल्या आहेत. परंतु देशांत इतर ठिकाणीं जी वस्तु-संग्रहालयें आहेत, त्या मानानें येथील म्युझियम अगदींच सामान्य आहे. दुसरें स्थळ म्हणजे अगमकुआँ नांवाची विहीर. या विहिरीचा अंत लागत नाहीं असें म्हणतात. तिसरी वस्तु म्हणजे येथील गोलघर. हें गोलघर म्हणजे धान्याचें एक कोठार आहे. नेहमीं पडणाऱ्या दुष्काळाच्या तरतुदीसाठीं इंग्रजांनीं हें प्रचंड कोठार १७७४ सालीं बांधलें. तें १७७६ सालीं पुरें झालें. यांत हजारो खंडी धान्य मावतें. परंतु त्या वेळीं या कोठाराचा उपयोग करण्याची पाळीच आली नाहीं. पुढें १९४२ नंतर रेशनिंग सुरूं झालें आणि या कोठाराचा उपयोग धान्यसांठा ठेवण्यासाठीं होऊं लागला. सध्यां तेथें धान्यसाठा व कांहीं कचेऱ्या आहेत. त्याच्या बाहेरील बाजूनें

वर चढण्यासाठीं पायऱ्या आहेत. तळापासून वरपर्यंत दीडशें पायऱ्या आहेत. यावरून या कोठाराच्या उंचीची कल्पना येईल. १९३० सालीं सरकारला झुकांडी देऊन या गोलघरावर तिरंगी झेंडा फडकविण्यांत येत असे. येथून पाटणा शहराचें विहंगम दृश्य फार छान दिसतें. या गोलघराचा आकार पालथ्या हॅटसारखा किंवा स्तूपासारखा आहे.

## गुरुद्वारांतील प्रसन्नता, स्वच्छता

परंतु सर्वांत महत्त्वाचें स्थान म्हणजे येथील शिखांचा गुरुद्वारा होय. शिखांचे दहावे गुरु गुरुगोविंदसिंह यांचें जन्मस्थान पाटणा आहे. त्यांच्या जन्मस्थानीं मोठा भव्य गुरुद्वारा बांधण्यांत आला आहे. शिखांचीं गुरुद्वारें स्वच्छता व टापटीप याविषयीं प्रसिद्ध आहेत. तेथील शिस्तहि मोठी कडक असते. पाटण्याच्या गुरुद्वारांत प्रवेश करतांच मन प्रसन्न होतें. तेथें उघड्या डोक्यांनीं जातां येत नाहीं म्हणून आम्ही आमच्याबरोर टॉवेल व हातरुमाल ठेवले होते. परधर्मीय लोकांच्या सोयीसाठीं तेथें टोप्याहि ठेवण्यांत आल्या आहेत. गुरुद्वाराच्या आवारांत कोठेंहि थुंकावयाचें नाहीं, अशी सक्त ताकीद आहे. मंदिरांत प्रवेश करण्यापूर्वीं पाय धुवावे लागतात. त्याप्रमाणें पाय धुतल्यावर नेहमीच्या संवयीप्रमाणें मी चूळ भरली, त्याबरोबर तेथील रक्षक पुढें आला आणि त्यानें मला सांगितलें कीं, 'येथें थुंकण्याची जी मनाई आहे ती चूळ भरण्यालाहि लागू आहे. पुन्हां अशी चूक करूं नका.' त्यावेळीं तेथें शीख भजन चालू होतें. परंतु बाजाच्या पेटीवर चाललेलें तें भजन इतकें भडक वाटत होतें कीं त्यामुळें भक्तिभाव जागृत होत असेल अशी शंका मनांत आली नाहीं. तेथें गुरुग्रंथसाहेबावर चवऱ्या ढाळण्याचा कार्यक्रम चालू होता. एका मूर्तिपूजेंतून गुरु नानकांनीं शिखांना बाहेर काढलें, तर त्यांनीं पुस्तकाचीच पूजा करण्यास सुरुवात केली. भारतीय मन किती मूर्तिपूजक आहे याचा हा पुरावाच म्हणावयास हरकत नाहीं. येथील मुसलमान वा ख्रिश्चनहि वेगळ्या स्वरूपांत मूर्तिपूजकच आहेत, असें दिसून येतें.

## शैक्षणिक केंद्र, दोन विद्यापीठें

पाटणा हें बिहारचें शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र आहे. येथें पटना

विश्वविद्यालय, व बिहार विश्वविद्यालय अशी दोन विद्यापीठें असून सध्या त्यांची आपआपसांत भांडणें सुरू आहेत. येथें "सर्चलाईट" व 'इंडियन नेशन' ही दोन इंग्रजी दैनिकें उत्तम प्रकारें चालू आहेत. यावरून इंग्रजीचें प्रस्थ अजून बरेंच असल्याचें दिसतें. 'नवराष्ट्र' व 'आर्यावर्त' हीं हिंदी व कांहीं उर्दू दैनिकेंहि येथें चालतात. 'अवंतिका' 'पाटल' 'नईधारा' वगैरे भारदस्त हिंदी मासिकें येथून निघतात आणि श्रीरामवक्ष, बेनीपुरी, श्री. दिनकर, श्री. नागार्जुन, श्री. लक्ष्मीनारायणसुधांशु, श्री. आचार्य शिवपूजन सहाय, श्री. अनूपशर्मा मंडल वगैरे अनेक प्रसिध्द व महत्त्वाचे साहित्यिक येथेंच रहातात. त्यामुळें हिंदीचा विकास व प्रचार करणारी राष्ट्रभाषा परिषद ही संस्थाहि येथेंच आहे. यामुळें साहित्यिक व सांस्कृतिक दृष्ट्या या शहराला फार महत्त्व आहे. प्रदेशाची राजधानी असल्यामुळें राजकीय महत्त्व आहे हें वेगळें सांगावयास नकोच. श्री. राजेंद्रप्रसाद व श्री. जयप्रकाश नारायण यांचें मुख्य ठाणें हेंच आहे. एवढें सर्व पाहिल्यानंतर असें वाटतें कीं इतकें महत्त्व पेलण्याचें सामर्थ्य या शहरांत मुळींच नाहीं. एक तर सारी शक्ति-बुद्धि खर्च करून या शहराचें बाह्य स्वरूप पालटण्यांत आलें पाहिजे किंवा तें शक्य नसेल तर बिहारनें दुसरें एखादें केंद्र स्वत:साठीं निर्माण केलें पाहिजे.

★ ★ ★

## भल्या पहांटे उजाडलें

कलकत्त्याला माझ्या ओळखीचें कोणी नव्हतें आणि पटना, राजगृह, नालंदा, पावापुरी, गया–बुद्धगया वगैरे ठिकाणीं हिंडण्यांत पुष्कळ पैसे खर्च होऊन गेले होते. शिवाय घरून निघाल्यालाहि खूप दिवस झाल्यानें घरीं परतण्याची ओढ लागलेली होती. यामुळें कलकत्त्याच्या इतक्या जवळ गेलों असूनहि मी रॉंचीहून सरळ चॉंडिल–टाटानगर मार्गानें पुण्यास परत फिरण्याचें ठरविलें होतें; परंतु ऐन वेळीं बरोबरच्या मित्रांनीं कलकत्त्यास जाण्याचा निर्णय घेतल्यामुळें, मीहि लहानपणापासून ज्या कलकत्त्याचें वर्णन वाचीत आलों होतों, जेथील कालीचीं भीषण वर्णनें ऐकत आलों होतों व भेसूर चित्रें पहात आलों होतों, त्या कलकत्त्यावर आपण जणू उपकारच करीत आहोंत अशा थाटांत नाइलाजानें, कुरकुरत त्यांच्याबरोबर जाण्याचें ठरविलें.

रॉंचीहून कलकत्ता फक्त १५१ मैल आहे. परंतु रॉंची हें आडमार्गा-वरील शहर असल्यामुळें कलकत्त्याला जायला फार वेळ लागतो. शिवाय वाटेंत मुरी जंक्शनवर गाडीहि बदलावी लागते. यामुळें प्रवास त्रासदायक होणार अशीच कल्पना होती; परंतु मुरीला मुळींच गर्दी झाली नाहीं आणि आम्ही मोठ्या आरामांत बारा तास आगगाडींत काढून पहांटे साडेपांचला कलकत्त्याच्या हावडा ( हावडा–हावरा–हौरा ) स्टेशनांत उतरलों. मला वाटलें होतें कीं, इतक्या पहांटे आम्हांला नेण्यासाठीं कोणी येणार नाहीं व आम्हांला बराच वेळ ताटकळत बसावें लागेल. परंतु हावडा स्टेशनांत गाडी शिरण्यापूर्वीं खिडकींतून बाहेर तोंड काढून पाहिलें तों चांगलें फट-फटीत उजाडल्याचें दिसून आलें. माझें घड्याळ मागें आहे कीं गाडी लेट झाली आहे याचा क्षणभर मला उलगडा होईना; पण दुसऱ्याच क्षणीं लक्षांत आलें कीं आपण मुंबईपासून सुमारें सव्वा हजार मैल पूर्वेस आलों आहोंत आणि येथें मुंबईपेक्षां सुमारें सव्वा ते दीड तास आधीं सूर्योदय–सूर्यास्त होत असतो.

## उतारूंपेक्षां हमालांची संख्या जास्त

गाडी स्टेशनांत शिरल्याबरोबर हिंदी पद्धतीप्रमाणें हमालांनीं एकदम गाडीवर, म्हणजेच उतारूवर हल्ला चढविला. बिचारे उतारू! आमच्या गाडींत इतके कमी उतारू होते कीं त्यांच्यापेक्षां हमालांचीच संख्या जास्त दिसत होती! गेल्या कित्येक वर्षांत असें दृश्य पहावयास न मिळाल्यामुळें ही गोष्ट मनांत राहून गेली. अर्थात् हें दृश्य आमच्या सुस्थितीचें द्योतक आहे कीं हलाखीची नांदी आहे याचा उलगडा करून घेण्याच्या भानगडींत मी पडलों नाहीं; परंतु येथील हमालांचे फाटके कपडे आणि फाटकीं शरीरें पाहून मात्र मनाला फार वाईट वाटलें. त्या मानानें मुंबईचा हमाल कितीतरी धष्टपुष्ट, तरतरीत व सुखी दिसतो. हमालांच्या या हलाखीचें कारण शोधावयास मात्र फार दूर जावें लागलें नाहीं.

## तें भयंकर दृश्य

तिकिट—कलेक्टरच्या हातांत तिकिटें देऊन आम्ही बाहेर आलों तोंच तें भयंकर दृश्य दिसलें. निर्वासित! स्टेशनाचें सारें आवार पूर्व—बंगालमधून आलेल्या निर्वासितांनीं व्यापून टाकलेलें आहे. तेथें त्यांनीं राजरोस बिऱ्हाडेंच थाटलीं आहेत. प्रेतांप्रमाणें निस्तेज व सुकलेलीं शरीरें तेथें घाणीमध्यें लोळत होतीं. चुली पेटल्या होत्या, सकाळच्या न्याहारीची तयारी—भात—पेज—चालली होती आणि त्या चुलीजवळच लहान मुलें प्रातर्विधि उरकीत होती. तें बीभत्स दृश्य पाहून अंगावर शहारेच आले. आणि आमच्या स्वतःच्या व सरकारच्या असहाय्यतेबद्दल चीड व तिटकारा आला. त्यांतच कांहीं निर्वासितांनीं दुकानेंहि थाटलीं होतीं. आणि अशा प्रकारें त्यांनीं आपलें स्वतंत्र गांवच तेथें वसविलें होतें. ते सर्व निर्वासित अगदीं खालच्या वर्गांतील—आर्थिक व सामाजिक दृष्ट्या निकृष्ट वर्गांतील—दिसत होते. कारण त्यांच्यांत बंगालीपणाचा वारसा सांगूं शकेल असा एकहि तेजस्वी चेहरा अथवा टपोरे पाणीदार डोळे दिसले नाहींत. कदाचित् त्यांना आपल्या घरादारांना मुकून इकडे पळून यावें लागल्यामुळें त्यांची अशी स्थिति झाली असेल! परंतु अगदीं स्टेशनांतच हें किळसवाणें दृश्य दिसल्यामुळें बाहेरून येणाऱ्या व्यक्तीच्या मनांत बंगालचें सरकार

आणि बंगाली लोक यांच्याविषयीं आदराची अथवा कौतुकाची भावना निर्माण होत नाहीं एवढें मात्र खरें. अर्थात् कलकत्त्यांतीलहि कांहीं लोकांना या गोष्टीची जाणीव असावी असें दिसलें; कारण दुसऱ्याच दिवशीं तेथील 'अमृतबजार पत्रिके' मध्यें एका गृहस्थानें या परिस्थितीकडे सरकार व कॉर्पोरेशन यांचें लक्ष वेधण्यासाठीं लिहिलेलें एक पत्र प्रसिद्ध झालेलें मी वाचलें.

## जुनाट व गलिच्छ शहर

कलकत्त्याचें हें मुख्य स्टेशन मुंबईच्या बोरीबंदर स्टेशनासारखेंच आहे. परंतु मुंबईच्या मानानें तें अगदीं जुनाट व कोंदट वाटलें. मुंबईच्या स्टेशनची शान व भपका यांचा अर्धा हिस्साहि त्याच्या वांट्यास आलेला नाहीं. शहरांतून जातांनाहि मनावर अशीच छाप पडली. इमारती जुनाट व रस्ते गलिच्छ. जेथें वस्ती आहे तेथें ती खूपच दाट आहे. यामुळें गलिच्छपणांत भर पडत जातें. एका बाबतींत मात्र कलकत्ता भाग्यवान् आहे आणि ती म्हणजे त्याचीं मोठमोठीं मैदानें. शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्यें ऐसपैस व विस्तृत अशी मैदानें, क्रीडांगणें वगैरे असल्यामुळें मुंबईप्रमाणें येथें अष्टौप्रहर अवघडल्यासारखें वाटत नाहीं. परंतु एवढ्या मोठ्या शहरांत लोकल गाड्या नसल्यामुळें ट्राम व बसेस् यांच्यावर खूपच ताण पडत असावा असें दिसतें. आमची उतरण्याची व रहाण्या-जेवण्याची सोय हावडा स्टेशनपासून ५-६ मैल दूर असलेल्या बालीगंज भागांत एका लक्षाधीश मारवाडी गृहस्थांकडे करण्यांत आलेली होती; आणि आम्ही कलकत्त्यांत असेपर्यंत आमच्या दिमतीस त्यांच्या मोटारगाड्या होत्या; यामुळें आम्हांला ट्रॅम-बस् वगैरे वाहनांचा उपयोग करावा लागला नाहीं व थोड्या अवधीमध्यें पुष्कळच स्थळांना भेटी देतां आल्या.

उपरोल्लेखित बालीगंज भागामध्यें मोठमोठ्या श्रीमंत लोकांचे बंगले आहेत. परंतु मुंबईप्रमाणें येथें श्रीमंत, मध्यम व गरीब असा स्पष्ट भेद आढळला नाहीं. मुंबईस मलबार हिल अथवा मरीन ड्राइव्हसारख्या भागांत एखादा साधा मास्तर अथवा कारकून रहात असल्याचें कुणी सांगितल्यास आपला त्यावर विश्वासहि बसणार नाहीं. परंतु येथें मात्र

बालीगंज भागांत मध्यमवर्गीय लोकहि रहात असलेले आढळतात. याचें कारण असें कीं, येथील सर्व व्यापार मारवाडी लोकांच्या हातांत आहे आणि मुंबईवर प्रभुत्व गुजराती धनिकांचें आहे. मारवाडी व गुजराती श्रीमंतांच्या मनोवृत्तींत कांहीं बाबतींत फरक आहे. गुजराती मनुष्य श्रीमंत बनला कीं तो आपण स्वतंत्र श्रेष्ठ वर्गाचे आहोंत असें समजूं लागतो, तो जास्तींत जास्त ' ॲरिस्टोक्रॅट ' बनण्याचा प्रयत्न करूं लागतो; परतु मारवाडी धनिकांमध्यें–विशेषतः अल्प-शिक्षित मारवाड्यांमध्यें–खालच्या वर्गांत मिसळून रहाण्याची प्रवृत्ति अधिक असते. आपल्याजवळील संपत्ति वाढली कीं आपला वर्ग बदलतो इतकी तीव्र वर्गभावना ( Class Consciousness ) त्याच्या ठिकाणीं नसते. यामुळें त्याच्या शेजारीं त्याच्यापेक्षां गरीब माणूसहि राहूं शकतो. गेल्या कांहीं वर्षांत कलकत्त्यांतील मारवाड्यांमध्येंहि ही वर्गभावना वाढूं लागली आहे आणि मुंबईच्या मरीन ड्राइव्हप्रमाणें बड्या भांडवलवाल्यांची स्वतंत्र वसाहत असली पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें आहे. आणि त्या दृष्टीनें बालीगंज भागांत बंगल्यांची आंखणीहि सुरू असल्याचें समजलें. कलकत्ता शहराच्या मानानें बालीगंज भाग पुष्कळच स्वच्छ, शांत व सुंदर आहे; परंतु येथील बंगलेहि फार दाटीनें एकमेकांना लागून बांधलेले असल्यामुळें श्रीमंतीचा तोरा त्यांच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं.

### आशियांतील एक आश्चर्यः हावडा ब्रिज

कलकत्त्यांतील कोणत्या एका गोष्टीनें माझें लक्ष सर्वांत जास्त आकर्षित करून घेतलें असेल तर ती म्हणजे हुगळी नदीवरील पूल होय. हावडा स्टेशनपासून हा पूल फार जवळ आहे; म्हणून याला हावडा ब्रिज असें म्हणतात. सुप्रसिद्ध गंगा नदीलाच या ठिकाणीं हुगळी असें नामाभिधान प्राप्त झालेलें आहे. येथें ही नदी खूप खोल आहे. इतकी कीं लहान-लहान बोटी हिच्यांतून संचार करूं शकतात. या बोटींना स्वैरपणें हिंडता येईल अशी या पुलाची रचना आहे. नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर या पुलानें आपले पाय रोवलेले आहेत आणि जणूं त्याच्या ढांगामधून बोटी जात–येत असतात. नदीच्या पात्रामध्यें या पुलाला खांबाचा अथवा अन्य

कसलाच आधार नाहीं. लक्ष्मणझूल्यासारखा हा पूल अधांतरीं आहे. यामुळें लक्ष्मणझूल्याप्रमाणें तो हलत असेल असें प्रथम वाटलें, परंतु तसें कांहीं दिसलें नाही. दोन–अडीच फर्लांग लांबीचा व एका वेळीं पांच-सहा लॉऱ्या जाऊं शकतील एवढ्या रुंदीचा हा अजस्र पूल म्हणजे आशियांतील एक आश्चर्य समजलें जातें. पुलाच्या डोकीवर तार-खांबा-सारख्या खूप उंच व अवाढव्य अशा खांबांचें जणूं जाळेंच आहे. यावरील खांबांतील लोहचुंबक शक्तीनें हा पूल अंधातरीं लोंबत असतो असें म्हणतात. त्याच्या एकूण स्वरूपावरून असें वाटतें कीं, साध्या प्रकारचा पूल उलटा करून तेथें ठेवला आहे. म्हणजे त्याचे खांब वर आहेत आणि कठडा खालीं आहे. या पुलावरून ट्रॅम जाऊं लागली कीं खालील बाजूस असणाऱ्यांना विजेचा गडगडाट झाल्याचा भास होतो.– इतका जोराचा खडखडाट तिच्यामुळें होतो. या पुलाच्या मुळाशीं असलेलें शास्त्रीय तत्त्व मात्र आम्हांला नीट आकलन झालें नाहीं. कांहीं लोकांनीं असें सांगितलें कीं स्प्रिंगप्रमाणें हा पूल ताणलेला आहे यामुळें तो वाटेल तितकें ओझें सहन करूं शकतो. परंतु मग आम्हांला असें वाटलें कीं, जर इतक्या साध्या उपायानें इतका प्रचंड पूल तयार करतां येत असेल तर अन्यत्र एवढा आटापिटा काय म्हणून केला जात असेल ? याचा अर्थच हा कीं, अशा प्रकारच्या पुलाच्या उभारणीला खूपच खर्च येत असला पाहिजे. आम्ही या पुलावरून अनेक वेळां आलों–गेलों; परंतु त्याची ती भव्यता व शान पहाण्याची आमची हौस कांहीं पुरी झाली नाहीं.

## कालीमंदिर कीं कसाईखाना ?

कलकत्त्याला जाऊन कालीमातेचें दर्शन घ्यायचें नाहीं म्हणजे काशीला जाऊन विश्वेश्वराचें दर्शन न घेण्यासारखेंच आहे. परंतु कालीच्यासमोर बकऱ्यांचा बळी दिला जातो व तें किळसवाणें दृश्य आपल्याच्यानें पहाव-णार नाहीं म्हणून त्या देवळांत जावें कीं नाहीं याविषयीं आमच्यांत चर्चा चालली होती. इतक्यांत कुणीतरी सांगितलें कीं कालीपुढें फक्त मंगळवारीं व शुक्रवारींच बकरीं कापलीं जातात. म्हणून आम्ही ते दोन दिवस वग-ळून सोमवारीं त्या देवळांत गेलों. फक्त उत्तर-भारतांतील देवळेंच कोंदट

व गलिच्छ असतात, असा माझा आतापर्यंत (गैर)समज होता; परंतु कालीचें देऊळ पाहून पूर्व–भारतहि उत्तरेच्या फार मागें नाहीं असा अनुभव आला. देवळाच्या सभोंवतीं लहानलहान होम पेटलेले होते आणि भक्तगण व भटजीमहाराज मिळून स्वर्गाची शिदोरी बांधीत होते. त्यांच्याकडे दुर्लक्ष करून आम्ही मंदिरांत शिरलों तों तेथेंहि तोबा गर्दी! त्यांतच पुन्हां त्या एवढ्याशा मंदिराचें आवार पोथ्या वाचीत बसलेल्या भटजींनीं अडवून टाकलें होतें. यामुळें मोठ्या मुष्किलीनें माणसाला इकडून तिकडे जातां येत होतें. खेंड्यांतील प्राथमिक शाळेंतील मुलें गणित अथवा शुद्धलेखन घेतांना जशीं तोंडें फिरवून ओळीनें बसतात तसे येथील भक्त लोक आपल्या पोथ्या घेऊन वाचीत बसलेले पाहून गंमत वाटली आणि आपल्या भक्तीचें जाहीर प्रदर्शन करण्याची त्यांची हौस व चिकाटी बघून कौतुक वाटलें.

## निरपराध कोंकरांचे बळी

देवीच्या मूर्तीसमोर जाण्यापूर्वी नाण्यांचा खणखणाट कानीं पडला. जणूं पत्र्याच्या छपरावर गारांचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणें देवीपुढील मोठ्या थाळीमध्यें लहानमोठ्या नाण्यांचा खणखण आवाज होत होता. जास्त पैसे देणाऱ्याला जास्त वेळ दर्शन मिळत असावें. कारण पैसे न देणाऱ्याला तेथून लौकरच हुसकून लावण्यांत येत होतें. अर्थात् देवीपुढें पैसे न टाकणारे बहुधा आम्हीच असूं. यामुळें आम्ही चटकन् बाजूला झालों. इतक्यांत तेथें एक लहानसें करडूं आणण्यांत आलें आणि आमच्या डोळ्यांदेखत देवीसमोरच्या उंबऱ्यावर कचदिशीं त्याची मान तोडण्यांत आली. भक्तीचा तो बाजार पाहून मी आधींच विटलों होतों; त्यांत हें बीभत्स दृश्य पाहून जास्तच किळस आली. तेथील गर्दीनें तर जीव गुदमरूं लागला होता. यामुळें आम्ही पुन्हां एकवार देवीचें दर्शन घेऊन तेथून आपली सुटका करून घेतली. येथें देवीची एखादी मूर्ति असेल अशी आमची कल्पना होती. परंतु प्रत्यक्ष पहातां असें दिसलें कीं एका मोठ्या शिळेवर देवीचा चांदीचा मुखवटा चढविला असून ती शिळा रक्तानें माखलेली आहे. एवढ्या मोठ्या सुशिक्षित व सुधारलेल्या शहरांत

मध्ययुगांतील ही रानटी प्रथा इतक्या प्रचंड प्रमाणांत चालू असलेली पाहून मन आश्चर्यानें थक्क झालें आणि उद्विग्नहि झालें !

देवळांतून बाहेर पडतांच जणूं या साऱ्या दृश्यांवर कळस चढविणारें असें दृश्य नजरेस पडलें. देवीपुढें जे बकरे मारले जात त्यांचीं मुंडकीं ओळीनें ठेवून व समोर एक विळी घेऊन एक बाई बसली होती आणि त्या मुंडक्यांचे बारीकबारीक तुकडे करून विकीत होती. भगत लोक प्रसाद म्हणून ते मांसाचे तुकडे मोठ्या आदरानें घेऊन जात होते. धर्मासंबंधीं उबग आणण्यास हें एकच दृश्य पुरेसें आहे असें मला वाटलें. धर्माच्या नांवावर मारल्या गेलेल्या त्या निरपराध कोंकरांचे बाहेर आलेले निष्पाप डोळे जणूं जाब विचारीत होते कीं, 'आम्हीं तुमचे काय घोडें मारलें होतें म्हणून तुम्ही आमची अशी विटंबना करीत आहांत ?'

## १८३ वर्षांचा अक्षयवट

कलकत्ता पहाण्यासाठीं आमच्याजवळ फार थोडा वेळ होता म्हणून अन्यत्र पहावयास न मिळणाऱ्या गोष्टी तेवढ्या पाहून घेण्याचें आम्हीं ठरविलें. त्याप्रमाणें सायंकाळीं कलकत्त्यापासून १०–१२ मैलांवर असलेल्या बोटॅनिकल गार्डनमधील अक्षयवट पहाण्यास आम्ही गेलों. यापूर्वी मी मद्रासजवळील अड्यार येथील प्रचंड वटवृक्ष पाहिला होता. परंतु कलकत्त्याचा वृक्ष त्याच्यापेक्षांहि मोठा आहे असें मला सांगण्यांत आल्यानें मनामध्यें विशेष अपेक्षा निर्माण झाली होती. प्रत्यक्ष तें वडाचें झाड पाहिल्यानंतर मात्र कांहींसा अपेक्षाभंगच झाला. कारण हा वड म्हणजे एखादें झाड नसून अनेक झाडांचा मांडवच आहे असा भास होतो. अड्यारचा वड खूप उंच, भरभक्कम, जाडजूड आणि शानदार वाटतो. तर येथील वड म्हणजे मनुष्यनिर्मित लताकुंजासारखा वाटतो. या झाडाचा मूळ बुंधा कुजून नाहींसा झालेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. मूळ खोडाचा जमिनीपासून साडेपांच फूट उंचीवर ५१ फूट घेर असून झाडाचा एकूण विस्तार सुमारें ११७५ फूट आहे. झाडाची जास्तींत जास्त उंची ९२ फूट असून जमिनीपर्यंत पोंचून एकजीव झालेल्या पारंब्यांची संख्या ( १९५२ सालीं ) ११५७ फूट होती.

हें झाड सुमारें १८३ वर्षांचें असावें असें तेथें लिहिलेल्या पाटीवरून दिसतें.

झाडाला पारंबी फुटली कीं तिच्या संरक्षणासाठीं मोठे, गोल बांबू मधोमध चिरून तिच्या दोहोंबाजूस बांधून ठेवण्यांत येतात. आणि तिनें जमिनीमध्यें पूर्णपणें मूळ धरलें कीं बांबू काढून टाकण्यांत येतात. अशा प्रकारें या झाडाचा घेर वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालू आहे. माणसाची मेहनत व अक्कलहुषारी यांचा नमुना म्हणून हें झाड अवश्य पहाण्यासारखें आहे. परंतु गुजराथेंतील कबीरवड किंवा अड्यारचा अक्षयवट यांची भव्यता व शान त्याच्या ठिकाणीं नाहीं एवढें मात्र खरें!

★ ★ ★

# तीन स्मारकें : २०

## आधुनिक बंगालचे तीन महापुरुष

गेल्या दोनशें वर्षांत बंगाल प्रांतानें भारताला व जगाला इतकें महा-पुरुष दिले आहेत कीं त्यांच्या कल्पनेनेंच मस्तक नत व्हावें. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत 'सुजलां सुफलां मलयजशीतलां' व 'सस्यशामला' वंगभूमीनें आपल्या कुशींतून वीरांना व महात्म्यांना जन्म दिला आहे. त्यांच्यापैकीं तीन महापुरुषांच्या स्मारकांचें दर्शन घेऊन मी नुकताच परत आलों. ते महापुरुष म्हणजे स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद आणि बाबू सुभाषचंद्र बोस. यापैकीं पहिले दोघे भारताच्या आध्यात्मिक आघाडीवरील सेनापति असून तिसरे राजकीय आघाडीवरील शूर वीर आहेत. रामकृष्ण आणि विवेकानंद यांच्या थोरपणाची कल्पना आजच्या पिढीला सहजासहजीं येणार नाहीं. परंतु पंचवीस वर्षांपूर्वीं ज्या पिढीनें भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामांत उडी घेतली होती तिच्यांतील बहुतेक सर्व तरुणांवर या दोन सत्पुरुषांच्या जीवनाची व उपदेशाची विलक्षण छाप पडलेली दिसून येते. अनेकांना त्यांच्यापासूनच राष्ट्रसेवेची स्फूर्ति मिळाली आहे. या दृष्टीनें हे दोन महापुरुष आजच्या पिढीलाहि पूज्य व आदर-णीय वाटले पाहिजेत.

## दक्षिणेश्वराचें शांत व रम्य स्थान

स्वामी विवेकानंदांचे गुरु स्वामी रामकृष्ण परमहंस आयुष्यभर ज्या ठिकाणीं राहिले त्याला दक्षिणेश्वर असें नांव आहे. हा भाग तसा कलकत्त्यांतच मोडतो. परंतु हौरा रेल्वे स्टेशनपासून तो ५-६ मैल लांब आहे. आमच्याजवळ स्वतःची खाजगी मोटार असल्यामुळें आगगाडी किंवा बस यासाठीं आम्हांला खोळंबून राहावें लागलें नाहीं. आम्ही थोड्याच वेळांत दक्षिणेश्वरास जाऊन पोहोचलों. या ठिकाणीं कोळ्यांची राणी रासमणी हिनें बांधविलेलें कालीमातेचें छोटेसें पण सुन्दर मंदिर आहे. कोळ्यांच्या राणीचें देऊळ असल्यामुळें कालीची पूजा करण्यास

कोणी ब्राम्हण मिळेना. अखेर अल्पवयस्क गदाधर कालीपूजेस तयार झाला आणि आजन्म तो तेथेंच राहिला. ' माते दर्शन दे ' असा ध्यास घेऊन त्यानें याच मंदिरांत कालीची उपासना केली आणि अखेर शेवटीं कालीमातेचें दर्शन मिळविलें. हा गदाधर म्हणजे स्वामी रामकृष्ण परमहंस. येथील कालीची मूर्ति सुंदर आहे. तिच्या पायाखालीं एक पुरुष सांपडलेला आहे. प्रथम माझी अशी समजूत होती कीं तो पुरुष राक्षस असावा. परन्तु नंतर असें उमजलें कीं राक्षसांचा संहार केलेल्या कालीला संहाराचा मद चढला व ती तांडव करूं लागली. त्या भरांत खुद्द शंकराच्या छातीवरच तिचा पाय पडला आणि तें लक्षांत येतांच तिनें लाजेने जीभ बाहेर काढली अशी एक कथा आहे. या मंदिराच्या समोर सभामंडप आहे. सामान्यतः मंदिराच्या गाभाऱ्याला लागूनच सभामंडप असतो. परंतु येथें मंदिर व सभामंडप या मध्यें १५–२० फुटांचें अंतर आहे. या सभामंडपात रामकृष्ण कथाकीर्तन करीत असें म्हणतात.

## राधागोविंदजींचें मंदिर

या देवळाला लागूनच राधा–गोविंदजीचें म्हणजे राधा–कृष्णाचें देऊळ आहे. रामकृष्णांच्या जीवनांतील कांहीं भाग स्वतःला राधा समजून कृष्णाची उपासना करण्याच्या भक्तिमार्गामध्यें व्यतीत झालेला होता. त्यावेळीं राणी रासमणीनें त्यांच्यासाठीं हें मंदिर बांधवून दिलें होतें. या देवळांत विशेष असें कांहीं नाहीं. या दोन्ही देवळांच्या समोर बारा ज्योतिर्लिंगांची बारा लहान लहान देवळें आहेत. त्यांतील काळ्याभोर दगडाचीं शिवलिंगें सुंदर आहेत. या देवळाच्या आवारांतच स्वामी रामकृष्णांची खोली आहे. ते ज्या चौरंगावर बसून ज्ञानोपदेश देत ते दोन्ही तेथें आहेत. त्यांचें अंथरूणपांघरूण व रोजची वापरण्याचीं भांडीं वगैरेहि तेथें आहेत. येथील सर्व व्यस्था व वातावरण थेट बंगाली व भारतीय आहे. स्वामीजींच्या धर्मपत्नी व शिष्या श्रीमति शारदामणिदेवी ऊर्फ श्रीमाता यांची खोली येथून जवळच आहे. ही खोली इतकी लहान आहे कीं जरा ऐसपैस माणसाला येथें सरळ झोंपतांहि येणार नाहीं. परंतु त्या साध्वीनें त्या एवढ्याशा खुराड्यांत सारा जन्म काढला. इतकेंच नव्हे तर,

स्वतः पतिपत्नी व अभ्यागत यांच्याकरितां स्वयंपाकपाणी करण्यासाठींहि त्यांनीं त्याच खोलीचा वापर केला हें ऐकून आश्चर्यानें थक्कच झालों.

स्वामीजींचे गुरु तोतापुरी यांनीं स्वामीजींना ज्या खोलीमध्यें संन्यास-धर्माची व योगाची दीक्षा दिली ती खोलीहि तेथून जवळच आहे. त्या खोलीच्या बाहेर असलेल्या वडाच्या झाडाखालीं रामकृष्ण परमहंस व विवेकानंद ध्यानासाठीं बसत असत. येथून गंगेचें दृश्य फारच मनोहर दिसते. येथील गंगाघाट सुंदर आहे. डाव्या बाजूला असलेला वेलिंग्टन ब्रिज फार छान आहे. घाटावरून समोरच्या कांठावरील बेलूर मठ दिसतो तेथें होडीनें जातां येते. परंतु आमच्याजवळ वेळ फार थोडा होता आणि स्वतःची मोटार होती यामुळें तो जलविहाराचा मोह टाळणें जरूर होतें. सर्व पाहून झाल्यानंतर आम्ही शहाळ्याचें पाणी प्यालों आणि अतृप्त अंतःकरणानें स्वामी रामकृष्ण परमहंसांची मूर्ति मनांत घोळवीत तेथून परतलों. शहरापासून जवळ असल्यामुळें आणि व्यवस्था नीट न राखल्या-मुळें मंदिराबाहेरील पंचवटीला मुंबईच्या चौपाटीचें दृश्य प्राप्त झालें आहे. उष्टी—खरकटी पानें व कागद इतस्ततः विखुरलेले होते. ते पाहून मनाला विषाद वाटला. मी स्वतः जरी धार्मिक किंवा अध्यात्मिक प्रवृत्तीचा नसलों तरी अशा विशिष्ट ठिकाणीं लोकांनीं जास्त संयमानें व शिस्तीनें वागलें पाहिजे, असेंच मला नेहमीं वाटतें. त्यांत महात्म्यांना मान अप-मान होत नसेलहि कदाचित्, परंतु या बेशिस्तपणामुळें आमच्या राष्ट्रीय आत्म्याचा मात्र ऱ्हास होत असतो.

## बेलूर मठाचें वैशिष्ट्य

दक्षिणेश्वराकडून बेलूरला जातांना वाटेंत कलकत्त्यांतील हौरा ब्रिजपेक्षां किंचित् लहान असाच साधा वेलिंग्टन पूल लागतो. या पुलावरून जाणाऱ्यायेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस २ पैसे, मोटारीला ८ आणे व लॉरीला १२ आणे कर भरावा लागतो. हौरा पुलावरून जाणाऱ्यांना जो कर भरावा लागत नाहीं तो या पुलावरून जाणाऱ्यांना कां भरावा लागत असावा, याची कांहींच कल्पना आली नाहीं. कर वसूल करणाऱ्या नोकराजवळ चौकशी केली, परंतु त्यांनाहि कांहीं सांगतां आलें नाहीं.

वेलूर मठ विश्वविख्यात स्वामी विवेकानंदांची सृष्टि. येथील सारे वातावरण अगदीं आधुनिक, पाश्चात्य पद्धतीची छाप पडलेलें असें आहे. स्वच्छता, टापटीप व शिस्त यांचें दर्शन येथें पदोपदीं घडते. दक्षिणेश्वराप्रमाणें गलिच्छपणा व अस्ताव्यस्तपणा येथें नांवालाहि नाहीं. साऱ्या जगभर रामकृष्ण मिशनचीं जीं केंद्रें चालतात त्यांचें संचालन येथून होतें. त्यामुळें येथील व्यवस्थापक अत्यंत हुशार व व्यवहारकुशल असतात. रामकृष्ण–विवेकानंदांच्या मार्गानें जनसेवा व आत्मोन्नति साधण्याची इच्छा बाळगणारे तरुण येथील मठांत भरती होतात. त्यांना धर्म-वेदांताबरोबरच व्यावहारिक जीवनाचें व हस्तोद्योगांचेंहि शिक्षण देण्यांत येतें आणि मिशनऱ्यांच्या वृत्तीनें सेवाकार्यास योग्य बनविण्यांत येतें. हा मठहि नदीकांठींच आहे आणि येथून गंगेचें दृश्य मोठें मनोहर दिसतें.

## रामकृष्णांची अप्रतिम प्रतिमा

येथील मुख्य प्रेक्षणीय गोष्ट म्हणजे स्वामी विवेकानंदांनीं १८९७ सालीं सोळा लाख रुपये खर्चून आपल्या गुरूचें–स्वामी रामकृष्ण परमहंसांचें–बांधलेलें भव्य मंदिर होय. मंदिराचा सगळा खर्च विवेकानंदांच्या अमेरिकन शिष्यांनीं केला आणि मंदिराच्या उभारणीच्या कामींहि परदेशी स्थापत्यविशारदांचा हात प्रामुख्यानें असला पाहिजे, हें चटकन् लक्षांत येतें. अत्याधुनिक पद्धतीनें बांधलेलीं अशी मंदिरें क्वचितच पहावयास मिळतात. या मंदिराचे बांधणींत भारतीय स्थापत्य आणि रोमन कॅथॉलिक स्थापत्य यांचा मधुर संगम झालेला आहे. एखाद्या सुंदर युरोपियन युवतीनें नऊवारी काळी चंद्रकला नेसून ठसठशीत कुंकुमतिलक लावावा तसें हें मंदिर वाटतें.

आणि मंदिरांतील पुरुषभर उंचीची गौरवर्णी संगमरवरी दगडाची स्वामी रामकृष्णांची मूर्ति म्हणजे शिल्पकलेचा एक अप्रतिम व अद्‍भुत नमुनाच आहे. इतकी सहज व स्वाभाविक मुद्रा फार थोड्या शिल्पांत पहावयास मिळते. त्यांचें उघडें तोंड आणि किलकिले डोळे यामुळें समोर मूर्ति नसून जिवंत स्वामीच बसले आहेत व ते आपल्याशीं कांहींतरी बोलल्याशिवाय राहणार नाहींत, असा क्षणभर भास होतो.

## विवेकानंदांची खोली आणि समाधि

येथून जवळच स्वामी विवेकानंदांची स्वतःची रहाण्याची खोली आहे. या खोलींतील फर्निचर व इतर सामान यावर पाश्चात्त्यांची बरीच छाप पडलेली दिसते. स्वामीजींची बसण्याची जागा, कॉट, सोफासेट्स, ज्याच्या समोर उभे राहून ते व्यायाम करीत तो आरसा वगैरे सर्व गोष्टी जेथल्या तेथें जपून ठेवलेल्या आहेत.

परन्तु इतक्या अद्यावत् पद्धतीनें रहाणाऱ्या स्वामीजींची समाधि मात्र अगदीं साधी आहे. किंबहुना साधेपणाचा अगदीं कडेलोट झाला आहे असें म्हणतां येईल. विवेकानंदांनीं आपल्या गुरूची भव्य व आलीशान प्रतिमा करून बसविली याबद्दल स्वामी रामकृष्णांचे अनेक शिष्य त्यांच्यावर रुष्ट झाले होते असें म्हणतात. परन्तु त्यांनीं स्वतःच्या बाबतींत मात्र मूर्तिपूजेला वाव ठेवला नाहीं. आपण निवर्तल्यानंतर आपली समाधि कशी बांधावी याचा आराखडा विवेकानंदांनीं आधींच तयार करून ठेवला होता. त्याप्रमाणें त्यांच्या समाधीवर एक संगमवरी रक्षाकुंभ व त्या कुम्भावर सोनेरी रंगाचें ॐ हें अक्षर एवढ्या दोनच वस्तु आहेत. तेथें मूर्ति, वचन वगैरे कांहींएक नाहीं. हा साधेपणा मला फारच आवडला.

## नेताजींचें निवासस्थान

राष्ट्रगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस जिवंत आहेत कीं नाहींत याबद्दल राजकीय पुढाऱ्यांमध्यें जरी अद्यापि वादंग सुरू असले तरी माझ्यासारख्या सामान्य भारतीय माणसाला नेताजींच्या अस्तित्वाची फारशी शक्यता वाटत नाहीं हें मात्र खरें. यामुळें भवानीपूर भागांतील नेताजींचें निवासस्थान पहातांना आपण एका महान् वीर पुरुषाचें स्मारक पहात आहोंत अशी भावना माझ्या ठिकाणीं विद्यमान होती. बोसकुटुंबाचें वंशपरंपरागत मालकीचें हें घर जुन्या पद्धतीच्या वाड्याप्रमाणें भासतें. कै. शरश्चंद्र बोस यांनीं हें घर सुभाषबाबूंचें स्मारक म्हणून समाजाला अर्पण केलें आहे.

फाटकांतून आंत शिरतांच पोर्चमध्यें मुख्य दरवाजासमोर नेताजींचा लष्करी गणवेशांतील सुमारें दीड पुरुष उंचीचा सैनिकी सलामी घेत असलेला रुबाबदार पुतळा आहे. जिन्यांतून वर चढतांना १८५७ च्या

बंडांतील पराक्रमी स्त्री–पुरुषांची आकर्षक चित्रें पहावयास मिळतात. पहिल्याच मजल्यावर नेताजींची खोली आहे. ज्यावेळीं नेताजी या घरांतून अखेरचे अंतर्धान पावले त्यावेळीं या खोलीची जशी स्थिति होती तशीच ती आतांपर्यंत ठेवण्यांत आलेली आहे. त्यांचा झोपण्याचा पलंग, ज्यावर ते ध्यानधारणा करीत ते व्याघ्रचर्म, त्यांचे कपडे, पादत्राणें, घड्याळ वगैरे सर्व वस्तू जपून ठेवण्यांत आल्या आहेत. त्या पाहिल्यानंतर क्षणभर असा भास होतो कीं नेताजी येथेंच रहात आहेत व कांहीं कामासाठीं नुकतेच बाहेर गेले आहेत.

## हिंदी दासबोध व गीतारहस्य

दुसऱ्या खोलीमध्यें नेताजींना मिळालेली वेगवेगळ्या भाषांतील मानपत्रें व तऱ्हतऱ्हेचे सोन्याचांदीचे करंडक ठेवलेले आहेत. तेथेंच त्यांच्या नित्य वाचनांतील पुस्तकें कांचेच्या कपाटांत ठेवलेलीं आहेत. त्यांत कॉंग्रेसचा इतिहास, रवींद्रांचें बंगाली साहित्य वगैरे पुस्तकें तर आहेतच पण सर्पदंशावरील एक पुस्तकहि तेथें दिसलें. हिंदी दासबोध व हिंदी गीतारहस्य पाहून महाराष्ट्रीय या नात्यानें पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा इतिहास पाहून पुणेकर या नात्यानें मला उगीचच अभिमान वाटला. दासबोध व गीतारहस्य या दोन्ही ग्रंथांविषयींचें माझें ज्ञान, वाचन यथातथाच आहे व नूतन मराठी शाळेचा विद्यार्थी असल्यामुळें मला डेक्कन एज्युकेशन सोसायटीबद्दल आपलेपणा वाटण्याचें तसें कांहींच कारण नाहीं. परन्तु परप्रांतांत गेल्यानंतर आपल्या प्रांतांतील प्रत्येक लहानसहान गोष्टीबद्दल आपल्याला विनाकारणच जिव्हाळा व अभिमान वाटू लागतो. त्यांत पुन्हां गुलाम भारताचे लाडके नेताजी जीं पुस्तकें आपल्या नित्यवाचनाच्या संग्रहांत ठेवीत त्यांच्याशीं महाराष्ट्राचा संबंध असलेला पाहून कोणाला गर्व वाटणार नाहीं ? नेताजींच्या खोलीशेजारीच त्यांचे थोरले बंधु कै. बाबू शरच्चंद्र बोस यांची खोली असून तिच्यांत त्यांना मिळालेलीं मानपत्रें वगैरे आहेत. सध्यां या इमारतींत आझाद हिंद फौजेच्या माजी सैनिकांची कचेरी आहे. तें यथायोग्यच वाटलें.

★ ★ ★

# शांतिनिकेतन : २१

## रवींद्रनाथांची कर्मभूमि

कलकत्त्याला गेल्यानंतर शांतिनिकेतनला भेट न देणें म्हणजे आग्र्याला जाऊन ताजमहाल न पहाणें किंवा कन्याकुमारीला जाऊन सूर्योदय–सूर्यास्त–दर्शनाचा आनंद न लुटणेंच होय. तसें शांतिनिकेतन कलकत्त्यापासून कांहीं जवळ नाहीं. ज्या बोलपूर स्टेशनवर उतरून शांतिनिकेतनला यावयाचें असतें तें बोलपूर स्टेशन हावडा स्टेशनपासून वायव्य दिशेस एक्याणव मैल दूर आहे आणि तेथें पोंचण्यास किमान तीन-साडेतीन तास तरी लागतात.

ता. २४–३–५३ रोजीं हावडा।किऊल पॅसेंजरनें सकाळीं ७-२० ला कलकत्त्याहून निघून आम्ही १०-४६ ला बोलपूरला पोचलों. आमच्याच डब्यांत अहमदाबादहून कलकत्त्यास कार्यक्रमासाठीं आलेल्या 'रंगमंडल' या हौशी नाटक मंडळाचे कलावंत शांतिनिकेतनला जाण्यासाठीं बसले होते. त्यांना कलकत्त्यास बोलाविणारे श्री. नवनीतलाल दोशी पूर्वी पुण्यास व मुंबईस राहिले होते. १९३०–३२ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्यें भाग घेऊन त्यांनी येरवड्याची हवाहि खाल्ली होती. यामुळें मराठी भाषेशीं त्यांचा चांगला परिचय होता. आम्ही आपापसांत मराठी बोलत होतों तें ऐकून श्री. दोशीनीं मराठींत आमची चौकशी केली.

बोलपूरला उतरून स्टेशनच्या बाहेर पडलों तों समोरच शांतिनिकेतनची स्टेशनवाघीण उभी होती. रंगमंडळच्या लोकांनीं आधीं कळवून ठेवल्यामुळें त्यांच्यासाठीं ती आलेली होती. अर्थात एव्हांना आमची त्यांच्याशीं इतकी दोस्ती झाली होती कीं त्यांनीं आम्हांला आपल्यापैकींच समजून मोटारींत घेतलें. स्टेशनपासून दीड–दोन मैलांवर शांतिनिकेतनचें नवें गेस्ट हाउस आहे. तेथें जाऊन आम्ही उतरलों. तेथील गेस्ट हाउसमध्यें राहाण्याचें रोजचें भाडें एक रुपाया असून जेवणाला दीड–दोन रुपये व दुपारच्या चहाला आठ आणे पडतात.

बेचव भात आणि सालीसकट बटाट्याची भाजी नाइलाजानें पोटांत भरून आम्ही शांतिनिकेतन पहावयास निघालों. दुपारीं अडीच ते साडे-चारपर्यंतच शांतिनिकेतन उघडें असतें. यामुळें या वेळांत सर्व पाहून घ्याव-याचें होतें. नव्या अतिथिगृहापासून शांतिनिकेतन सुमारें मैलभर दूर आहे आणि तेथून श्रीनिकेतन मैल दीडमैल लांब आहे. रंगमंडलाच्या लोकां-साठीं स्टेशन वाघिणीची सोय आधींच करण्यांत आलेली होती. त्यांनीं आम्हांला बरोबर घेतलें. यामुळें तेवढ्या थोड्या अवधीत जें कांहीं बघतां येण्यासारखें होतें तें आम्ही बघूं शकलों. रवींद्रनाथांचे चिरंजीव श्री. रथींद्रनाथ ठाकूर यांच्या मानलेल्या कन्येचे-नंदिनीचे-यजमान श्री. गिरि-धारी लाला येथें दंतवैद्य म्हणून काम करतात. ते गुजराथी असल्यामुळें 'रंगमंडला'च्या कलावंतांना सारें शांतिनिकेतन दाखविण्याची जबाबदारी त्यांनीं प्रेमानें अंगिकारली होती.

शांतिनिकेतन म्हणजे हिरव्यागार, दाट छायेच्या वृक्षांची राई असेल, त्याच्या सभोवार बंकिमचंद्रांची सुजला-सुफला,मलयजशीतला व शस्यश्यामला वंगभूमि पहावयास मिळेल अशी आमची अपेक्षा होती. परंतु येथील ओसाड माळ आणि रखरखीत मैदान पाहून आमच्या कल्पनेंतील नंदन-वन दिवास्वप्नाप्रमाणें उडून गेलें आणि असल्या वैराण जागेंत राहूनहि रवींद्रबाबूंची चिरयौवना प्रतिमा शेवटपर्यंत टवटवींत राहिली याबद्दल त्यांच्या विषयींचा आदर अनेक पटींनीं वाढला.

प्रथमदर्शनीं जरी या जागेबद्दल प्रतिकूल मत झालें तरी थोड्या वेळानें तिच्यांतील गुण व तिचें वैशिष्टयहि ध्यानांत आल्याशिवाय रहात नाहीं. या ठिकाणीं झाडेंझुडपें अथवा डोंगरदऱ्या मुळींच नाहींत. यामुळें क्षितिजा-जवळ आकाश आणि भूमि यांची भेट होते. सूर्योदय व सूर्यास्त यांचें दर्शन स्पष्टपणें होतें आणि असें सांगतात कीं तेथें ऋतूंतील परिवर्तन चटदिशीं जाणवतें. म्हणजे या मैदानाची प्रवृत्ति कवीच्या मनाप्रमाणेंच तरल व संवेदनशील आहे. प्रत्येक ऋतूवर रवींद्रबाबूंनीं ज्या असंख्य सुंदर कविता लिहिल्या आहेत त्यांचें कांहीं श्रेय अशा प्रकारें या ओसाड माळरानालाहि मिळू शकतें.

## श्रीनिकेतनची उद्योगशाळा

आम्ही प्रथम श्रीनिकेतनला गेलों. येथें हस्तोद्योग व यंत्रोद्योग यांचा समन्वय करणारी उद्योगशाळा चालते. येथें नाना प्रकारचें रंगीबेरंगी कापड विणणारे हातमाग व यंत्रमाग आहेत. कापड कापण्यासाठीं यंत्रें बसविलेलीं आहेत. कातड्यावर उत्तम नक्षी व कारागिरी केली जाते. मातीच्या भांड्यावर लाखेनें व वॉर्निशचें सुंदर काम केलें जातें. येथें एक मुका व बहिरा विणकर आहे. तो सर्वांत जास्त वेगानें आणि अत्यंत नाजूक कलाकुसरीचें नक्षीकाम करतो. आम्ही खादीवाले असल्यामुळें आम्हांला त्या गिरणीच्या सुताच्या कापडाबद्दल कांहीं विशेष आकर्षण वाटलें नाहीं. मातीचीं भांडीं घेण्याची मात्र खूप इच्छा झाली, परंतु सामान्यपणें ज्या वाटीची किंमत दोनतीन आण्यापेक्षां जास्त असणार नाहीं तिची रुपाया सव्वा रुपाया किंमत लावलेली पाहून आम्ही तो नादहि सोडून दिला.

## दोन महाराष्ट्रीय संगीत शिक्षक

श्रीनिकेतन पाहून झाल्यानंतर आम्ही मोटारनें शांतिनिकेतनास आलों. तेथें चित्रकला व संगीत यांचे वर्ग पाहिले. शांतिनिकेतनांतील वर्ग झाडाखालीं चालतात. आणि तेथें मातीच्याच झोपड्या बांधलेल्या आहेत असें ऐकलें होतें. परंतु हे सर्व वर्ग चांगल्या प्रशस्त सिमेंट-कॉंक्रीटच्या खोल्यांतून चालत असलेले पाहून विरस झाला. कदाचित् उन्हामुळें त्यांना तसें करावें लागलें असेल. परंतु एकतर तेथें झाडें फारशी नाहींत आणि जी झाडें आहेत त्यांच्याखालीं गवत वाढून वाळलेलें दिसतें. यावरून त्यांचा वापर सध्यां होत नसावा असें दिसतें. कदाचित् रवींद्रबाबू असतांना मोकळ्या मैदानांत वर्ग भरत असतील. नाहीं म्हणावयाला हिंदीचे एक शिक्षक आपल्या एका विद्यार्थ्याला झाडाखालीं बसून शिकवीत होते. येथील वर्गांतून विद्यार्थ्यांची संख्या मात्र थोडी दिसली. यावरून प्रत्येक विद्यार्थ्याकडे शिक्षकाला भरपूर लक्ष देतां येतें. नागपूरकडील श्री. वझलवार आणि इंदूरकडील एक गृहस्थ असे दोन महाराष्ट्रीय संगीतशिक्षक म्हणून अनेक वर्षांपासून येथें काम करीत आहेत. सुप्रसिद्ध चित्रकार श्री. नंदलाल बसू यांना भेटण्याची आम्हांला फार इच्छा होती, परंतु

ते सध्यां आजारी असल्यामुळें कोणाला भेटत नाहींत असें कळल्यामुळें त्यांच्या चिरंजीवांना पाहूनच दुधाची तहान ताकावर भागवावी लागली. त्यांचे चिरंजीवहि उत्कृष्ट चित्रकार असून ते चित्रकलेचे वर्ग घेत होते. तेथें नाट्यकलेचें अध्ययन-अध्यापन विशेषत्वानें चालतें. किंबहुना रवींद्रांची नाटकें बसवून त्यांचा उपयोग करणें हा तेथील एक महत्त्वाचा कार्यक्रम असतो. त्यांच्याद्वारें विद्यार्थ्यांना नृत्य, संगीत व साहित्य यांचें ज्ञान आपोआपच होतें. त्यासाठीं नुकतेंच एक मोठें सिमेंट–कॉंक्रीटचें भव्य स्टेज बांधण्यांत आलें आहे. तें पाहून आम्ही शांतिनिकेतनच्या ग्रंथालयांत आलों. या ग्रंथालयांत जगांतील व भारतांतील बहुतेक सर्व भाषांची पुस्तकें आहेत. ग्रंथालयाची व्यवस्थाहि फार चांगली दिसली.

## तिबेटी व चिनी ग्रंथांचा संग्रह

'चीना-भवन' शांतिनिकेतनचें एक विशेष आकर्षण आहे. भारताच्या पारतंत्र्य काळांत ज्यावेळीं सारे स्वतंत्र देश गुलाम भारताकडे तुच्छतेनें पहात होते, अशा वेळीं खंडप्राय चीन देशाशीं मैत्रीचे संबंध जोडण्यांत गुरूदेव ठाकुरांनीं यश मिळविलें होतें. त्या यशाचें प्रतीक म्हणून या चीना-भवनाकडे पाहिलें पाहिजे. मुख्य प्रवेशद्वारांतून आंत शिरतांच समोरच्या बाजूस सबंध भिंतीवर श्री. नंदबाबूनीं काढलेलें बुद्ध-मार-संग्रामाचें चित्र अत्यंत प्रेक्षणीय आहे. माडीवर चिनी आणि तिबेटी पुस्तकांचा व हस्तलिखितांचा फार मोठा संग्रह आहे. चीन–जपान युद्धाच्या वेळीं चीनमधील अत्यंत महत्त्वाचीं अशीं प्राचीन हस्तलिखितें सुरक्षिततेसाठीं येथें आणून ठेवलेलीं आहेत. त्यावेळीं चँग-कै शेक यांचें चीनवर राज्य होतें. त्यांनीं या 'चिना-भवनाला' बरीच मोठी देणगी दिलेली होती. अनेक वर्षांपासून चिनी संस्कृतीच्या अध्ययनाचें एक केंद्र या दृष्टीनें या भवनाला फार महत्त्व आहे. सध्यां सुप्रसिद्ध चिनी प्राध्यापक तान युन शान तेथील प्रमुख असून, त्यांनींच आम्हांला सर्व संग्रह दाखविला आणि मोठ्या आस्थेनें माहिती सांगितली. हजारों वर्षांपूर्वीं कांहीं संस्कृत ग्रंथ भारतांतून तिबेट व चीन या देशांत गेले. तेथें त्यांची तिबेटी व चिनी भाषांत भाषांतरें झालीं, परंतु तें संस्कृत ग्रंथ मात्र जगांतून लोप पावले. आतां

त्या तिबेटी व चिनी भाषांतरांवरून त्याचें पुन: संस्कृतमध्यें भाषांतर करण्याचें प्रचंड काम प्रा. तान युन शान यांनीं अंगावर घेतलें आहे. प्रा. शान राष्ट्रवादी असले तरी नव्या कम्युनिस्ट चीनशीं अथवा तेथील लोकांशीं त्यांचे संबंध चांगले आहेत. मध्यंतरी जें लाल चीनचें शिष्टमंडळ भारतांत आलें होतें त्याच्याशीं ते फार आत्मीयतेनें वागले असें श्री. लाला यांच्याकडून समजलें.

## ‘उत्तरायणा’चें रम्य वातावरण

‘चीना-भवनांतून’ निघाल्यानंतर आम्ही जुनें अतिथिगृह पाहिलें. याची जागा मोठी रम्य आहे. आजूबाजूस बरींच झाडें आहेत. हें शांतिनिकेतनच्या मध्यभागीं असल्यामुळें अभ्यागतांच्या दृष्टीनें फार सोयीचें होतें. तें बंद करून लांब माळावर नवें अतिथिगृह कां बांधलें असावें तें समजलें नाहीं. येथून जवळच दोन मोठे सप्तपर्णाचे वृक्ष असून, त्यांच्याभोंवती पार बांधलेला आहे. या वृक्षाचें बंगाली नांव ‘छतिम’ वृक्ष असें आहे. या झाडाखालीं गुरुदेवांचे पिता महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर यांना मन:शांति लाभली व त्यांनीं आपला आश्रम येथें बांधला म्हणून गुरुदेवांनीं ही जागा शांतिनिकेतनासाठीं पसंत केली असें म्हणतात. तेथून आम्ही ‘उत्तरायण’ या ठिकाणीं आलों. ‘उत्तरायणा’च्या आवारांत ‘उदयन’ नांवाचा टुमदार बंगला आहे. या बंगल्यांत गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर रहात असत. याचें तोंड पूर्वेस आहे, म्हणून त्याला ‘उदयन’ नांव दिलें आहे. सध्यां येथें रवींद्रनाथांचे चिरंजीव रथींद्रनाथ ठाकूर राहतात. हेच सध्यां शांतिनिकेतनचे मुख्य संचालक आहेत. बंगल्याच्या डाव्या बाजूच्या खोलींत रवींद्रबाबूंच्या वापरांतील वस्तू ठेवण्यांत आल्या आहेत. सध्यां त्या खोलीची दुरुस्ती चालली असल्यामुळें ती फक्त सकाळींच उघडी असते म्हणून आम्हांला ती पहातां आली नाहीं. उत्तरेच्या बाजूस मातीची एक सुंदर झोपडी असून तिचें नांव ‘श्यामली’ असें आहे. या झोपडींत पूर्वीं गांधीजी रहात असत. सध्यां तेथें रवींद्रबाबूंच्या भागिनी रहातात. पश्चिमेच्या बाजूस ‘प्रदीचि’ नांवाचा बंगला आहे. ‘उदयन’ तयार होण्यापूर्वीं रवींद्रबाबू या ‘प्रदीचि’ मध्यें रहात असत. सध्यां तेथें रवींद्रबाबूंचे जावई श्री. गिरीधारी लाला रहातात. यामुळें आम्हांला ही

बंगली आंत जाऊन पहातां आली.

या सर्व आवारालाच ‘ उत्तरायण ’ नांव आहे. येथें आल्याबरोबर मनाला एक प्रकारचें समाधान व शांतता लाभली. दिवसभरची खरख व त्रास क्षणांत नाहींसा झाला आणि आपण जणूं प्रत्यक्ष रवींद्रबाबूंच्या सान्निध्यांतच आलों आहोंत असा भास होऊं लागला. थोड्यांत वेळांत अंधार झाला आणि अष्टमी-नवमीचें शांत-स्निग्ध चांदणें हळूहळू सारें आसमंत व्यापूं लागलें. दिवसभरच्या धांवपळीनें थकलेभागलेले आम्ही सर्वजण ‘ प्रदीचि ’ बंगल्याच्या अंगणांतील रेतीवर बसलों आणि रवींद्र-बाबूंना अत्यंत प्रिय असलेल्या कार्यांत–गायनांत दंग होऊन गेलों.

## रवींद्रांच्या काव्यानें मन भारतें

जयंतीप्रसाद भट्टाचार्यानें कांहीं आसामी व बंगाली लोकगीतें फार सुंदर म्हटलीं. परंतु तेवढ्यानें माझें समाधान झालें नाहीं. मी त्याला म्हणालों, “ शांतिनिकेतनला येऊन रवींद्रबाबूंचें गीत न ऐकणें म्हणजे मदुरेला जाऊन मीनाक्षीचें मंदिर न पाहण्यासारखेंच होईल. तेव्हां तुम्ही रवींद्रबाबूंच्या कांहीं कविता म्हटल्याच पाहिजेत.” माझ्या विनंतीला मान देऊन त्यानें ‘वसंत जाग्रत द्वारे’, ‘तोमार प्रेमे धन्य करे जारे’ आणि इतर अनेक कविता व गीतें म्हणून दाखविलीं. आमची ती बैठक जवळजवळ दोनअडीच तास चालली होती. अष्टमीच्या त्या प्रशांत चांदण्यांत वेळ कसा निघून गेला हें आम्हांला कळलेंच नाहीं आणि जर रात्रीं परत जाण्याची घाई आम्हांला नसती तर आम्हीहि कालिदासाप्रमाणें ‘ रात्रिरेवव्यरंसीत् ’ असें म्हणूं शकलों असतों. सारें वातावरण संगीतानें इतकें धुंद झालें होतें.

अखेर एकदाचे आम्ही अतिथिगृहांत पोंचलों. जेवणें झालीं आणि रात्रीं दहासाडेदहाच्या सुमारास आम्ही स्टेशनवर परतलों. अतिथिगृहाच्या व्यवस्थापकाला मी म्हणालों, ‘ या खेपेला फार घाई झाली. पुन्हां केव्हां-तरी सवडीनें येण्याची इच्छा आहे. त्यावेळीं तुम्हांला आधीं कळवून मगच येऊं. ’ माझें बोलणें ऐकून त्याला आनंद झाल्यासारखें दिसलें. परन्तु माझें मन मला म्हणत होतें, ‘ तूं ’ कशाला येणार इथं ? पुन्हां येण्यासारखं इथं काय आहे ? गुरुदेव गेले आणि त्यांच्याबरोबर

शांतिनिकेतनची शान गेली, आकर्षण गेलें. आतां फक्त एक ऐतिहासिक स्थळ म्हणून याचं महत्त्व उरलं आहे. मध्यवर्ती सरकारनें याची आर्थिक जबाबदारी उचलल्यापासून तर एक सरकारी विद्यापीठ याशिवाय याला कांहींच वैशिष्ट्य उरलेलं नाहीं. त्यापेक्षां रवींद्रबाबूंच्या त्या स्वप्नाची जी मूर्ति त्यांच्या साहित्याच्या रूपानं तुझ्या हृदयांत साकार झाली असेल ती टिकून रहावी असाच प्रयत्न कर म्हणजे झालं.' *

## पक्ष्यांची किलबिल ऐकली नाहीं

आम्ही बोलपूर स्टेशनवर आलों तेव्हां आम्हांला कळलें कीं कलकत्त्याला जाणाऱ्या गाडीला खूपच उशीर आहे. तें ऐकून मला चुटपुट लागली. कारण आचार्य दादा धर्माधिकारी यांनीं आम्हांला सांगितलें होतें कीं, 'शांतिनिकेतनची पहाट तुम्ही अवश्य पाहिली पाहिजे. पहाटेच्या वेळीं पक्ष्यांची जी मधुर किलबिल तेथें चालते ती ऐकली नाहीं तर त्या स्थानाचें वैशिष्ट्यच समजणार नाहीं. इतके शेकडो हजारो पक्षी यावेळीं अचानकपणें कोठून येतात आणि दिवसा कोठें निघून जातात हें एक आश्चर्यच आहे.' यंत्रयुगांत सांपडल्यामुळें आम्हांला ही किलबिल ऐकतां आली नाहीं याचें दुःख होतच होतें, पण त्यांतहि गाडी उशीरा आल्यामुळें विनाकारण अंधारांत पेंगत बसावें लागलें, याची चुटपुट विशेष होती !

---

* रवींद्रनाथांच्या हाताखालीं शिकलेले शांतिनिकेतनचे एक जुने विद्यार्थी व शिक्षक श्री. सुहृत्कुमार मुखर्जी शांतिनिकेतनहून तारीख २७-४-५४ रोजीं मला लिहिलेल्या एका पत्रांत म्हणतातः—

" Though Santiniketan is my old place, yet I feel out of sorts. Everything is so changed that it will take sometime for me to feel at home in the new atmosphere of a ' Govt. university.' The humble Ashram of our childhood is lost in the lybarints of massive buildings and tumult of hundred and one activities of a small town which has grown around it. My wife and I cannot really accomodate ourselves in the new surroundings and atmosphere. "—यावरून जुनें शांतिनिकेतन आणि सध्यांचें शांतिनिकेतन यांतील फरक चटकन् ध्यानांत येऊं शकेल.

—लेखक

## तीर्थांना भेट देण्याची इच्छा

उत्तर भारतांत गेल्यानंतर काशी व प्रयाग या तीर्थांना भेट देण्याची इच्छा सामान्यतः प्रत्येक हिंदूच्या मनांत निर्माण होते आणि त्यांत अस्वाभाविक असें काय आहे ? लहानपणापासून या क्षेत्राचें माहात्म्य व पावित्र्य आमच्या मनावर ठसविण्याचा पद्धतशीर प्रयत्न आजवर केला जात असे आणि हल्लींहि जुन्या लोकांच्या मनांत या क्षेत्रांविषयीं जी आदराची भावना विद्यमान आहे ती दिसत असल्यामुळें ही क्षेत्रें आहेत तरीं कशीं हें पहाण्याची उत्सुकता रूढार्थानें धार्मिक नसलेल्या व्यक्तींच्या ठिकाणींहि दिसून येते. शिवाय हीं स्थळें महाराष्ट्रापासून बरीच दूर असल्यामुळें त्यांच्याविषयीं अपरिचयामुळें उत्पन्न होणारी जिज्ञासाहि आमच्या मनांत वास करीत असते आणि एक प्रकारची प्रेमादराची भावना उराशीं बाळगूनच आपण या क्षेत्रांत प्रवेश करतो. परंतु प्रत्यक्ष तेथील वातावरण पाहिलें आणि क्षेत्रस्थ ब्राह्मणांची अथवा पंड्यांची वर्तणूक पाहिली कीं सारा उत्साह मावळतो आणि क्षेत्राविषयींची पावित्र्याची भावना जास्त काळ तग धरूं शकत नाहीं. या क्षेत्रांना भेट देऊन आलेले लोक पुनः तेथें जाण्याचें नांव काढीत नाहींत याचें कारण तरी हेंच असतें.

## पंडे व नावाड्यांचा उपद्रव

परंतु या क्षेत्रांत कांहीं स्थानें अशी आहेत कीं धर्मनिरपेक्ष भावनेनें त्यांना भेट देतां येते आणि कितींदा जरी तेथें गेलें तरी मनाला कंटाळा अथवा वीट येत नाहीं. अशा स्थळांपैकीं माझ्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाचें स्थळ म्हणजे नदी होय. काशीचें गंगास्नान आणि प्रयागचें त्रिवेणी स्नान यांचा आनंद कोणत्याहि धर्ममताच्या व्यक्तीला केव्हांहि लुटता येण्यासारखा आहे. यामुळें जेव्हां जेव्हां प्रयागला जाण्याचा प्रसंग येतो तेव्हां तेव्हां त्रिवेणी स्नान करण्याची संधि मी दवडीत नाहीं. परंतु गेल्या खेपेला त्रिवेणी संगमावरील भटजींचा व नाववाल्यांचा इतका कटु अनुभव आला कीं त्याच्या कल्पनेनेंच स्नानाच्या आनंदावर विरजण पडतें आणि दुरूनच

गंगायमुनांचें दर्शन घेऊन परत फिरण्याची इच्छा होते.

गेल्या खेपेस आचार्य दादा धर्माधिकारी व मध्यप्रदेशचे माजी अन्न-मंत्री श्री. गोपाळराव काळे यांच्याबरोबर मी त्रिवेणीवर गेलों होतों. मध्यप्रदेश कायदे मंडळाचे सभासद व अलाहाबाद विश्वविद्यालयांतील प्राध्यापक महेश मिश्रहि बरोबर होते. यामुळें कांहीं भांडणतंटा न होतां सुखासमाधानानें स्नान करतां येईल, असें वाटलें होतें. परंतु ती आशा निष्फळ ठरली. भांडकुदळ पंड्यांचा व लोभी नावाड्यांचा मूळ स्वभाव कोठें जाणार? त्यांनीं अवाच्या सव्वा पैसे मागून भांडणास सुरुवात केली. वस्तुतः आम्हांला कांहीं धार्मिक विधि करावयाचा नव्हता, नुसतें स्नान करावयाचें होतें. यामुळें ब्राह्मणांशीं आम्हांला कांहीं कर्तव्य नव्हतें. आपणांला हे लोक पुसत नाहींत हें पहातांच पंड्यांनीं तेथील नावाड्यांना चिथावून दिलें आणि ते भरमसाठ पैसे मागूं लागले. प्रा. मिश्र स्थानिक रहिवासी असल्यामुळें त्यांना नेहमींचा दर माहीत होता. शिवाय ते विधान सभेचे सभासद असल्यामुळें त्यांनीं पंड्यांना व नावाड्यांना कायद्याचीहि माहिती देण्याचा प्रयत्न केला आणि त्यामुळें ते लोक जास्तच भडकले. प्रकरण अगदीं हातघाईवर आलें. काशी-प्रयागचा ब्राह्मण पंडा संस्कृतीनें व आचारविचारानें नावड्यापेक्षां फारसा वेगळा नसतो. त्याच्या एकूण पेहरावावरून आणि रंगरूपावरून तो ब्राह्मण आहे असें म्हणण्याची छाती कोणीहि महाराष्ट्रीय करूं शकणार नाहीं. यामुळें त्यांच्याशीं सभ्यपणानें वागणें फारच अवघड होऊन बसतें. विस्तीर्ण गंगा नदी पार करून संगमाच्या ठिकाणीं जावयाचें म्हणजे होडीची गरज लागतेच. नाहींतर वस्तुतः कोणीहि जाऊन संगमावर स्नान करून येऊ शकला असता. गंगा व यमुना या नद्या फार प्रचंड, अफाट विस्ताराच्या आहेत. यामुळें त्यांचा संगम जेथें होतो तेथें जाण्यासाठीं नावेची मदत घ्यावी लागते. या नद्या आपली पात्रें सारखीं बदलीत असतात आणि दर ऋतूंत त्यांच्या संगमाची जागा बदलत असते. यामुळें संगमाच्या ठिकाणीं स्थायी घाट अथवा अन्य व्यवस्था करणें शक्य होत नाहीं. ज्या ठिकाणीं संगम जाईल तेथें तराफ्यांचा व नावांचा तरंगता घाट तयार करून नेण्यांत येतो आणि तेथेंच

वेणीदान ( स्त्रियांनीं आपले केस--कांहीं जटा--कापून गंगेला अर्पण करणें ) श्राद्ध वगैरे धार्मिक विधि उरकण्यांत येतात. त्यावेळीं झालेल्या भांडणामुळें पुनः स्नानासाठीं जाण्याचा उत्साह उरलेला नव्हता, परंतु कुंभमेळयाची जी भयंकर दुर्घटना नुकतीच झाली होती तिची जागा प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा मनांत होती म्हणून मी पुनः परवा त्रिवेणी संगमावर जाऊन आलों.

## कुंभ मेळ्याच्या आठवणींची पाटी

अलाहाबाद अथवा प्रयाग शहराच्या बाजूस गंगानदीच्या पुराचें पाणी गांवांत शिरूं नये म्हणून फार मोठा व भक्कम बांध घालण्यांत आलेला आहे. येथून गंगा नदीचें विशाल पात्र फारच सुंदर दिसतें. समुद्राच्या काठीं दिसते तशी पांढरीशुभ्र पिठासारखी बारीक रेती बांधापासून खूप दूरवर पसरलेली आहे. या वाळवंटांत पंडे लोकांच्या पताका असलेले तंबू दृष्टीस पडतात. या बांधावरून नदींत प्रवेश करण्याचा मार्ग घसरगुंडीसारखा उताराचा आहे. एरव्ही या रस्त्यानें नदीच्या पात्रापर्यंत टांगे, रिक्षा वगैरे मजेंत जातात. परंतु कुंभ मेळ्याच्या वेळीं येथून जाणाऱ्या येणाऱ्यांना पुष्कळच त्रास होत असला पाहिजे. या बांधावरून खालीं उतरतांना डाव्या हातास असलेल्या एका लहानशा दगडावर कोरलेल्या पाटीकडे माझें लक्ष गेलें. जवळ जाऊन पाहिलें तो तिच्यावर हिंदींत लिहिलें होतें, 'कुंभ बलिदेवी ३ फरवरी १९५४.' बरोबरचे मित्र म्हणाले, "हीच ती जागा जेथें ती दुर्दैवी घटना घडली." आज त्या जागेची स्थिति पहातां तेथें शेकडों माणसें चेंगरून कां मेलीं असतील याची कल्पना सहजासहजी येत नाहीं. परंतु मेळ्याच्या वेळीं तेथें एक फार मोठा सुमारें पुरुषभर खोलीचा खड्डा होता. त्यांत पाणी भरलेलें होतें आणि बांधावर चढणाऱ्या उतरणाऱ्या यात्रेकरूंच्या धक्काबुक्कींतून बाहेर पडलेले लोक सरळ या खड्ड्यांत येऊन पडले व निजधामास गेले. ती जागा पाहिल्यानंतर माझ्या मनांत एकच प्रश्न निर्माण झाला. तो म्हणजे रहदारीच्या रस्त्यापासून इतक्या जवळ इतका मोठा खड्डा असा मोकळा कां ठेवला असावा? कदाचित् आमच्या लोकांवरील अंधश्रद्धेची झांपड दूर व्हावी म्हणूनच अधिकाऱ्यांना तशी बुद्धि झाली असावी.

## दोन्ही प्रवाहांत फरक दिसत नाहीं

बांधावरून किंवा जवळच्या किल्ल्यावरून संगमाकडे पाहिलें कीं यमुनेची कृष्णवर्ण आणि गंगेची शुभ्र जलधारा स्पष्ट दिसते असें म्हणतात. मला मात्र त्या दोनहि पाण्यांत कांहीं फरक दिसला नाहीं. दोन्ही प्रवाह एकजीव मिसळल्यानंतर ते एकजीव झाल्यासारखे, त्यांच्यांत मुळींच फरक नसल्यासारखें मला दिसलें. प्रत्यक्ष संगमाच्या जागींहि मला दोन प्रवाह ओळखून आले नाहींत. मात्र संगमावरील उथळ पाण्यांत पोहण्याचा व डुबक्या मारण्याचा आनंद कांहीं विशेष असतो असा माझा अनुभव आहे. खालीं रेती असल्यामुळें पाणी अगदीं स्वच्छ निवळ असते आणि प्रवाहाची ओढहि विशेष जाणवत नाहीं.

## वठून गेलेला अक्षय वटवृक्ष

त्रिवेणी संगमाखालोखाल प्रयागचें महत्त्वाचें स्थान म्हणजे गंगेच्या कांठीं अकबरानें इ. स. १५१५ सालीं बांधलेल्या किल्ल्यांत बंदिस्त असलेला अक्षयवट होय. एकेकाळीं गंगा-यमुनेचा प्रवाह या अक्षय वटाला स्पर्श करून वहात होता. त्या वेळीं असंख्य भाविक हिंदु लोक या वडावरून नदीच्या पाण्यांत उडी घेत आणि आत्महत्त्या करीत. या अत्महत्त्येमुळें पाप न लागतां उलट पुण्य लाभतें, मोक्ष मिळतो, अशी लोकांची भावना असे आणि आत्महत्त्या हा गुन्हा ठरविण्याइतका सामाजिक कल्पनेचा विकास त्या काळीं झालेला नव्हता, यामुळें कित्येक वर्षेंपर्यंत ही धार्मिक आत्महत्त्या चालू राहिली. इसवी सनाच्या सातव्या शतकांत हिंदुस्थानांत आलेल्या ह्युएन त्संग या चिनी प्रवाशानें असें लिहून ठेवलें आहे कीं, "मंदिरासमोर एक फार मोठा वृक्ष आहे. त्याच्याविषयीं लोकांची अशी धारणा आहे कीं हें एका नरमांसभक्षक राक्षसाचें निवासस्थान आहे. या झाडाच्या सभोवती माणसांच्या अस्थी पडलेल्या आहेत. मंदिरासमोर आत्मोत्सर्ग ( आत्महत्त्या ) केलेल्या लोकांची हीं हाडें आहेत असें सांगण्यांत येतें. आत्मोत्सर्गाची ही प्रथा फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे." महमूद गझनवीच्या सैन्याबरोबर इ. स. १०१७ सालीं हिंदुस्थानांत आलेला प्रसिद्ध अरबी

इतिहासकार अलबैरुनी यानेंहि या अक्षय वडाचा उल्लेख केलेला आहे. त्यावरून हा वृक्ष खूपच प्रचंड असून त्याच्या पारंब्या गंगा–यमुनेच्या प्रवाहांना स्पर्श करीत होत्या, असें दिसतें. अकबरानें किल्ला बांधला त्यावेळीं तेथें एक वडाचें झाड होतें आणि त्यावरून उड्या मारून लोक गंगेंत जीव देत असत, असें अकबराचा मंत्री अबूल फजील यानेंहि लिहून ठेवलें आहे. आतां गंगेचा प्रवाह या किल्ल्यापासून खूप दूर गेलेला आहे आणि अक्षय वटहि जवळ जवळ नामशेष झालेला आहे. जवळ जवळ म्हणण्याचें कारण असें कीं किल्ल्यामधील एका भुयारांत वडाच्या झाडाचें एक जाडजूड खोड सुरक्षितपणें राखून ठेवण्यांत आलेलें आहे. त्यालाच भाविक लोक अक्षय वट समजून त्याची पूजा करतात. त्या झाडाच्या फांद्या कोठें आहेत ? खोडाला पालवी कशी नाहीं ? वगैरे प्रश्न सामान्य माणसांच्या मनांत उत्पन्न होऊं शकतात. परंतु तेथील पुजाऱ्यांनीं व भाविकांनीं त्यांचीं उत्तरें आधींच देऊन ठेवलेलीं आहेत. या वड्याच्या फांद्या बोधिगयेमध्यें आहेत किंवा पुण्यवान माणसांनाच या झाडाच्या फांद्या व पानें दिसतात, अशा तऱ्हेची ठरीव ठशांचीं उत्तरें आपणांला मिळतात. परंतु अक्षय वटाच्या नांवावर जो धर्माचा व्यापार चाललेला आहे त्यांत खंड पडूं नये म्हणून ही सर्व मल्लीनाथी केलेली आहे, हें आपण चटदिशी ओळखूं शकतो.

या अक्षय वडाच्या ऐसपैस भुयारांत जुन्या ऋषींच्या, अवतारांच्या व संतांच्या सुंदर काळ्याभोर प्रशस्त दगडी मूर्ति आहेत. त्या मात्र प्रेक्षणीय आहेत. त्यांतील शेषनागाची मूर्ति मला विशेष आवडली.

## अशोक स्तंभावरील लेख, आज्ञा

सम्राट अशोकानें प्रयागहून ३६ मैल दूर असलेल्या कौशांबी या ठिकाणीं ३५ फूट उंचीचा एक शिलास्तंभ उभारला होता. हा स्तंभ एकाच अखंड दगडांत कोरलेला असून त्यावर अशोकानें धर्मलेख कोरलेला आहे. हा स्तंभ सध्यां प्रयागच्या किल्ल्यांतच ठेवलेला आहे. या शिलालेखांत अशोक म्हणतो, “माझ्या राज्याभिषेकाच्या २६ व्या वर्षी हा धर्मलेख लिहविण्यांत आला आहे. माझे अनेक मोठे मोठे अधिकारी

लाखो व्यक्तींवर नेमण्यांत आले आहेत. न्याय आणि शासन या बाबतींत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलेलें आहे. यामुळें त्यांना स्वार्थ अथवा भय न बाळगतां आपापलें काम करतां येईल आणि देशांतल्या प्रजेचें हित आणि सुख पहातां येईल."

त्यानंतर या स्तंभावर सम्राट समुद्र गुप्त यानेंहि आपला अभिलेख लिहविला आणि मूगल सम्राट जहांगीर यानेंहि आपल्या राज्यारोहणाची घटना याच स्तंभावर कोरून ठेवली आहे.

## उताणा झोपलेला प्रचंड मारुती

किल्ल्याच्या बाहेर नदीच्या पात्रांतच मारुतीचें एक देऊळ आहे. याचें वैशिष्ट्य असें कीं येथील मारुती नेहमीं देवळांत असतो तसा उभा नसून जमिनीवर उताणा झोपलेला आहे. दोन अडीच पुरुष लांबीचा तो शेंदरानें माखलेला लालभडक मारुती मोठा मजेशीर दिसतो.

या धार्मिक स्थानांव्यतिरिक्त कांहीं आधुनिक स्थानेंहि प्रेक्षणीय आहेत. अकबराचा मुलगा जहांगीर युवराज असतांना त्यानें स्वतःच्या ऐषआरामासाठीं बांधलेली खुसरू बाग ऐतिहासिक स्थानामध्यें विशेष महत्त्वाची आहे. आपला मुलगा खुसरू याला जहांगिरनें ही बाग दिली होती. पुढें बापाविरुद्ध बंड केल्याबद्दल खुसरूला ठार मारण्यांत आलें आणि त्याला याच बागेंत पुरण्यांत आलें.

## आनंद भवनचें ऐतिहासिक महत्त्व

नेहरू घराण्याचें वंशपरंपरागत घर आनंदभवन हेंहि प्रेक्षणीय आहे. एके काळीं साऱ्या देशाचें राजकारण या आनंदभवनांतून चालत असे याच दृष्टीनें या स्थानाचें महत्त्व. आतां राजकारणाचा केंद्रबिंदु दिल्लीला बदलून गेल्यामुळें आनंदभवनाचें पूर्वीचें महत्त्व राहिलेलें नाहीं. परंतु नेहरू पिता-पुत्रांचें निवासस्थान या दृष्टीनें जें ऐतिहासिक महत्त्व आनंदभवनाला मिळालेलें आहे तें नेहमींच अक्षय राहील. येथून जवळच जवाहरलाल-जींच्या स्वर्गीय पत्नी कमलादेवी नेहरू यांच्या स्मरणार्थ बांधलेलें टोलेजंग कमला नेहरू इस्पितळहि मोठें प्रेक्षणीय आहे. सबंध देशभर हिंदीच्या परीक्षा चालवून हिंदीचा प्रचार करण्यासाठीं एके काळीं प्रसिद्धीस आलेल्या हिंदी

साहित्य संमेलनाचें मुख्य कार्यालय येथेंच आहे. अलाहाबाद विश्वविद्यालय आहे, मिशनऱ्यांनीं चालविलेली ॲग्रिकल्चर इन्स्टिट्यूट आणि फोर्ड फाउंडेशनच्या मदतीनें चाललेली विकास योजना—जमनापार पुनर्निर्माण—यांच्या कचेऱ्याहि येथें आहेत. संस्कृतप्रचुर हिंदीचा पुरस्कार करणारे राष्ट्रीय हिंदुत्वनिष्ठ राजर्षि पुरुषोत्तमदास टंडन येथें असतात आणि त्यांच्याच जातीचे पण उर्दूमिश्रित हिंदुस्थानीचा पुरस्कार करणारे व हिंदु—मुस्लिम ऐक्याचे कट्टे पुरस्कर्ते पंडित सुंदरलालहि येथेंच राहतात. हिंदी—उर्दूचे मोठमोठे विद्वान या शहरांत असतात. गंगायमुनेच्या संगमाप्रमाणें हिंदी—उर्दूचा संगम घडवून आणण्याचे प्रयत्नहि येथेंच चालू असतात. त्या दृष्टीनें या शहराला निदान एकवेळ तरी भेट देणें अत्यंत उद्बोधक ठरतें.

★ ★ ★

काशीयात्रेविषयीं प्रत्येक हिन्दूच्या मनांत मोठी जिज्ञासा व उत्सुकता असते. ती व्यक्ति भाविक असेल तर त्या उत्सुकतेंत अंधश्रद्धेची भर पडते आणि नास्तिक असेल तर तर्ककठोर चिकित्सक दृष्टीनें ती काशी-यात्रेकडे पाहूं लागते.

परंतु प्रत्येकाला काशीची ओढ ही असतेच. आजचा सर्वसामान्य सुशिक्षित मध्यमवर्गीय हिंदु हा कर्मठ भाविक अथवा धर्मभोळाहि नसतो अथवा लालभडक चार्वाकहि नसतो. त्याची वृत्ति पुष्कळ अंशीं तटस्थतेची व शक्यतर जुन्या भावनांशीं व नव्या कल्पनांशीं समरस होण्याची असते. 'काशीस जावें नित्य वदावें' ही म्हण त्यानें लहानपणापासून वडील माण-सांच्या तोंडून अनेकदां ऐकलेली असते. अशी ही काशी आहे तरी कशी हें पाहण्याची उत्सुकता त्याच्या ठिकाणी भरपूर असते. मी पहिल्यांदा काशीला गेलों तेव्हां माझ्यामध्यें परंपरांगत अंधश्रद्धा आणि नवीन स्थान पाहण्याची जिज्ञासा यांपैकीं कोणती गोष्ट अधिक बलवान होती हें सांगणें कठिण आहे. परंतु काशींतील सर्व देवळें मी मोठ्या भाविकपणानें पाहिलीं, गंगेचें स्नान आपण स्वतःच नव्हे तर आपले बेचाळीस पिढ्यांचे पितर स्वर्गास जाणार आहेत या भावनेनें तेथील गढूळ पाण्यांत बुचकळी मारली आणि भक्तिभावनेनें तीर्थप्रसादाचें सेवन केलें एवढी गोष्ट मात्र खरी. अर्थात् या गोष्टीला पंधरा वर्षें होऊन गेलीं. पहिलेपणाचें कुतूहल उरलें नाहीं. अशा वेळीं परवां पुनः काशीमध्यें फेरफटका मारून आलों आणि त्यामुळें जुन्या आठवणींना एक प्रकारें उजाळा मिळाला.

काशीचा विश्वनाथ हा सर्व हिंदूंचा मानबिंदु व म्हणून हिंदुधर्माचा प्रतिनिधि समजण्यास हरकत नाहीं. या विश्वनाथाचें मंदिर पाहिलें कीं हिंदुधर्माच्या अवनतीचें प्रत्यक्ष दर्शन घडतें. इतकें कोंदट, गलिच्छ व दाटीनें गजबजलेलें देऊळ भारतांतच काय पण जगांतहि नसेल. सायंकाळीं अथवा सकाळीं गर्दीच्या वेळीं या देवळांत जो कोणी जाऊन येईल त्याला नरकाची मुळींच भीति वाटणार नाहीं; तो 'नरकप्रूफ' झाला असें

समजण्यास हरकत नाहीं. माणसांच्या अंगांतील घामाची घाण कमी पडेल म्हणूनच कीं काय पुजारी लोक देवाला वाहिलेलीं फुलें व बेल सर्वत्र फेंकून कुजवत असतात आणि भगतगण इकडे तिकडे पाणी सांडून चिखल व निसरडें करीत असतात. दक्षिण भारतांतील देवळें कशीं ऐसपैस, स्वच्छ व प्रसन्न असतात. त्यांच्याशीं तुलना करतां काशी विश्वेश्वराचें देऊळ अगदींच क्षुद्र व घाणेरडें वाटतें. देऊळ असें असलें पाहिजे कीं जेथें नास्तिकाच्या मनालाहि शांति लाभावी. विश्वेश्वराच्या देवळाचा एकूण पसारा दोनतीन खणांहून जास्त नाहीं. यामुळें तेथें गर्दी झाल्यास कांहीं आश्चर्य नाहीं. देवाचा बाजार आपल्या देशांत सर्वत्रच मांडलेला असतो तसा येथेंहि आहे. तुम्ही किती पैसे देतां यावर तुम्हांला देवाचें दर्शन किती जवळून घेऊं द्यावयाचें याचा निर्णय भटजी लोक करीत असतात. आंतील बाजारामुळें बाहेरच्या प्रत्यक्ष बाजाराला एक विशेष शोभा आलेली आहे. देवळापर्यंत पोंचावयाचें म्हणजे एका अत्यंत अरुंद गल्लींतून जावें लागतें. या गल्लींत कपडे व दागिने, भांडीं यांचीं दुकानें खच्चून भरलेलीं आहेत. तुमच्या मनांत खरोखरच भक्तिभाव उदित झाला असेल आणि स्वर्गांतील सीट रिझर्व करण्याची भयंकर घाई तुम्हांला झाली असेल तर तुमच्या इष्टमित्रांवर दया करण्यासाठीं हीं दुकानें सदैव सज्ज असतात. दुकानांतील भपका व भडकपणा पाहून तुमचा भक्तिभाव बहुधा विरघळून जातो आणि तुम्ही नेहमींच्या सरावाप्रमाणें व्यापारी घासाघीस करून सौदा ठरवूं लागतां. या बोळांत शिरल्यापासून मंदिरांत जाऊन परत बाहेर येईपर्यंत तुम्हांला सूर्यप्रकाश अथवा मोकळी शुद्ध हवा मिळेल अशी भीति बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. हवेशिवाय जगणाऱ्या तेथील मानवी प्राण्यांबद्दल कोणाच्याहि मनांत आदर उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं.

वस्तुतः या देवळांत इतकी घाण असते कीं अत्यंत गलिच्छ माणूस सुद्धां तेथें पुनः जाण्यापूर्वीं दहा वेळां विचार करील. परंतु तेथें देखील हरिजनांना मज्जाव आहे हें ऐकून हंसावें कीं रडावें हें कळत नाहीं.

गेल्या कांहीं महिन्यांपासून काशीविश्वनाथच्या मंदिरांत हरिजन प्रवेश

घडवून आणण्यासंबंधीं विचार चालू आहे. येथील पुजारी इतके मूढ कीं त्यांनीं हरिजन प्रवेशाचा प्रश्न उठतांच विश्वनाथाच्या गाभाऱ्याभोंवतीं लोखंडी जाळी ठोकून त्यालाच बंदीवान् बनवून टाकलें. आतां पुजाऱ्यां-खेरीज कोणालाच आंत जातां येत नाहीं. अर्थात् तुमच्याजवळ भरपूर पैसे असतील तर तुम्हाला आंत प्रवेश करणें मुळींच अवघड नाहीं. परंतु सामान्य माणसाला आतां जाळींतूनच देवाचें दर्शन घेतलें पाहिजे. एक महाराष्ट्रीय बाई तेथून आल्यानंतर आपला अनुभव सांगू लागल्या कीं, ' विश्वनाथाच्या गाभाऱ्याच्या दरवाजांत एक पुरभैयासारखा पंडा उभा होता. त्याला मी म्हटलें, देवासाठीं ही फुलांची माळ आणली आहे तेवढी तुम्ही देवाला घाला. तर त्या मेल्यानें बेफिकीरपणानें ती माळ तिथेंच दरवाजाच्या कडीला अडकवून टाकली. त्याच्याशीं मी खूप भांडल्ये.' मी त्यांना म्हणालों, ' तुम्ही त्याच्याशीं भांडण्यापेक्षां त्याच्या हातावर चवली–पावली टाकली असती तर तुमची माळ देवावर जाऊन पडली असती. ' यथा राजा तथा प्रजा–' जशा सरकारी कचेऱ्या तशीं आमचीं देवळें ! ”

## याचेंहि समर्थन करतां येतें !

देवळाच्या गाभाऱ्यांत पुजाऱ्याशिवाय कोणीच जाऊं नये या विचार-सरणीचें समर्थन कै. न. चिं. केळकर यांनीं केलें होतें आणि तें बरोबर आहे असें माझ्या एका मित्रांनीं सांगितलें.

विसाव्या शतकांत हरिजनांना देवापासून दूर ठेवण्यासाठीं विद्वान् लोक काय काय युक्तिवाद करतात हें पाहिलें कीं सामान्य माणसाची बुद्धि थक्क होऊन जाते. कारण या युक्तिवादाच्या मुळाशीं हरिजनांविषयीं तुच्छता व विटाळाची कल्पना हीच मुख्य असते. विशेषतः माणसाच्या स्पर्शानें देव विटाळतो ही कल्पनाच मध्ययुगीन व बुद्धिहीनतेची द्योतक आहे. परंतु मोठेमोठे विद्वानहि तिचें समर्थन करतात. याहून आपल्या अधोगतीचा दुसरा कोणता पुरावा हवा ?

देवळाबाहेरील घाटावरील भिकारी आणि भटजी ( अर्थात् ब्राह्मण नांवाचे भिकारी ) यांच्या तावडींतून तुम्ही सहीसलामत सुटलांत तर

मात्र एक सात्त्विक आनंद तेथें तुम्हाला उपभोगतां येतो. तो म्हणजे स्नानाचा. येथील गंगा खूप खोल व विशाल आहे. तिच्यांत पोहण्याचा आनंद कांहीं औरच असतो. चांदण्या रात्रीं होडींत बसून जलविहार करण्याची सोय येथें आहे. स्नानाच्या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवावी लागते. ती अशी कीं सकाळच्या वेळीं सगळेच लोक स्नान करीत असतात त्यावेळीं तेथें न जातां दुपारीं किंवा सायंकाळीं निवांतपणें जावें म्हणजे पंड्यांचा त्रास होत नाहीं आणि पाणीहि गढूळ नसते.

काशीला विश्वनाथापासून काळभैरवापर्यंत शेकडों नव्हे हजारों-लाखों देवांचीं देवळें आहेत. परंतु त्यांत प्रेक्षणीय अशीं फारच थोडीं आहेत. विश्वनाथाच्या देवळाला लागून असलेली औरंगजेबाची मशीद सामान्यच आहे; परंतु जेथें सध्यां ती मशीद आहे तेथें पूर्वीं विश्वनाथाचें देऊळ होतें आणि मुसलमानांच्या विटाळाच्या भीतीनें विश्वनाथानें समोरच्या ज्ञानवापी नांवाच्या विहीरींत उडी मारली असें म्हणतात. त्या दृष्टीनें हीं दोन ठिकाणें प्रेक्षणीय आहेत असें म्हणतां येईल. मराठ्यांचा झेंडा अटकेपार गेल्यावरहि काशीचें विश्वेश्वराचें देऊळ मशिदीखालींच गाडलेलें राहिलें ही गोष्ट मोठी सूचक आहे. जुनें शल्य काढून टाकण्यासाठीं पेशव्यांनीं काशीवर स्वारी केली होती. त्या वेळीं काशीचे ब्राह्मण उघड्याबोडक्यानें आक्रोश करीत पेशव्यांसमोर गेले आणि, “ तुम्ही औरंगजेबाची मशीद पाडाल तर आमचीं मस्तकें धडावर राहणार नाहींत म्हणून तुम्ही आलांत तसे परत जा ” अशी त्यांनीं पेशव्यांना विनंति केली. त्यामुळें पेशव्यांना हात हलवीत परत यावें लागलें असें म्हणतात. यामुळें औरंगजेबाची मशीद हा भटजींच्या भ्याडपणाचा प्रत्यक्ष पुरावा म्हणूनच तेथें उभी आहे.

आधुनिक स्थळांपैकीं भारतमातेचें मंदिर हें एक उत्कृष्ट ठिकाण आहे. मद्रासचे गव्हर्नर श्री. प्रकाश यांचे वडील बाबू भगवानदास यांनीं हें मंदिर बांधलेलें आहे. यांत भारताचा संगमरवरी दगडांत कोरलेला भला मोठा नकाशा आहे. डोंगर, नद्या, समुद्र वगैरे स्थळें प्रमाणबद्ध रीतीनें रेखीवपणें दाखविण्यांत आलीं आहेत. यामुळें आपला भारत खरोखरी कसा आहे याची स्पष्ट कल्पना हा नकाशा पाहून येते. काळ्या व पांढऱ्या

संगमरवरी दगडांतील हें कोरीव काम खरोखरी कौतुकास्पद आहे.

## हिंदु विश्वविद्यालय

काशी म्हणजे बोळांचें जाळें. आमच्या पुण्याचे किंवा कोल्हापूरचेंच बोळ जगामध्यें सर्वांत अरूंद गलिच्छ व कोंदट आहेत अशी प्रौढी आम्ही मिरवीत होतों. परंतु त्याचवेळीं काशी नांवाची देवनगरी या बाबतींत आमच्यापेक्षांहि कांकणभर पुढेंच होती याची कल्पना आम्हांला नव्हती. अशा बोळांच्या चक्रव्यूहांतून बाहेर पडून जेव्हां आपण महामना पंडित मदनमोहन मालवीय यांनीं स्थापन केलेल्या बनारस हिन्दु विद्यापीठाच्या विस्तीर्ण आवारांत प्रवेश करतों तेव्हां मन मोठें प्रसन्न होतें आणि मनावरील एखादें प्रचंड दडपण नाहीसें झाल्याचा भास होतो. हिन्दु विद्यापीठाची अर्धगोलाकार रचना अत्यंत सोयीची व मनोहर आहे. येथील इमारतीहि भव्य व शानदार आहेत. येथें ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांतील शिक्षण मिळण्याची सोय आहे. पंडित ओंकारनाथ ठाकूर यांच्या संचालकत्वाखालीं नुकतेंच संगीत कॉलेजहि येथें स्थापन झालें आहे. यामुळें कोणत्याहि ज्ञानासाठीं येथील विद्यार्थ्याला बाहेर जावें लागत नाहीं. प्राध्यापकांचें राहण्याचे बंगलेहि चांगले प्रशस्त व सर्व सुखसोयींनीं युक्त असे आहेत. सर्व देशांतून हजारों विद्यार्थी येथें शिक्षण घेण्यासाठीं येत असतात. त्या दृष्टीनें हें विद्यापीठ म्हणजे अखिल भारतीय स्वरूपाचें ज्ञानसत्र किंवा सम्मेलनच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. भारतांतील प्रत्येक भाषा बोलणारे येथें सांपडतात. एक काळ असा होता कीं येथील प्राध्यापकांमध्यें दक्षिण भारतीय व महाराष्ट्रीय व्यक्तींचा भरणा अधिक असे. पंडित मालवीयजींना महाराष्ट्रीयांच्या विद्वत्तेबद्दल व कार्यकुशलतेबद्दल विशेष आदर वाटत होता. यामुळें हिंदु विद्यापीठ म्हणजे महाराष्ट्रीय विद्वानांचें मायपोट बनलें होतें. परतु हळू हळू प्रांतीयवाद वाढत गेला आणि उत्तर प्रदेशीय प्राध्यापक व विद्यार्थी यांची संख्या वाढत गेली. आज शेंकडा ७०–८० टक्के प्राध्यापक व विद्यार्थी उत्तर प्रदेशीयच आहेत. शिक्षणाचा वाढता प्रसार लक्षांत घेतां ही

परिस्थिति अपरिहार्यच आहे असें म्हणावें लागेल.

## शैक्षणिक राजधानी

पुणें ही जशी महाराष्ट्राची शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी तशी काशी ही उत्तर प्रदेशाची शैक्षणिक व सांस्कृतिक राजधानी आहे.

हिन्दीच्या क्षेत्रांत भरीव कार्य करणारी नागरी प्रचारिणी सभा येथेंच आहे. हिंदी-ऊर्दूत समान ख्याति मिळविणारे कादम्बरीसम्राट प्रेमचंद आणि 'कामायनी' हें महाकाव्य लिहिणारे हिंदीचे महाकवि स्व. जयशंकर प्रसाद हे काशीचेच. हिन्दी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घालून तिला आजच्या उन्नत अवस्थेप्रत घेऊन जाणारे श्री. बाबूराव विष्णु पराडकर व श्री. गर्दे येथलेच राहणारे. हिन्दी पत्रकारांचे महर्षि म्हणून ओळखले जाणारे 'आज'चे संपादक श्री. बाबूराव पराडकर हे महाराष्ट्रीय आहेत ही गोष्ट कोणाहि महाराष्ट्रीयाला अभिमान वाटण्यासारखी आहे.

★ ★ ★

# सारनाथ : २४

पूर्वीच्या काळीं आपले जे लोक यात्रेच्या निमित्तानें काशीला जात असत ते काशीहून पांच मैल दूर असलेल्या सारनाथ या ठिकाणाला भेट देऊन येत असत कीं नाहीं हें कळण्यास मार्ग नाहीं. परंतु अलीकडे असा अनुभव येतो कीं, जे सुशिक्षित लोक यात्रेच्या निमित्तानें किंवा अन्य कारणानें काशीला जातात ते सारनाथला जाऊन आल्याशिवाय रहात नाहींत. याचें कारण असें कीं, अन्यधर्मीय लोकांबद्दल आणि त्यांच्या तीर्थक्षेत्रांबद्दल आपल्या लोकांत एक प्रकारची मित्रत्वाची व आपलेपणाची भावना हळूहळू वाढत आहे. विशेषतः अडीच हजार वर्षांपूर्वीं ज्या भगवान् बुद्धानें सामाजिक विषमतेविरुद्ध पहिल्या प्रथम बंडाचा झेंडा उभारला त्याच्याबद्दल आणि त्याच्या तत्त्वज्ञानाबद्दल आजच्या समताप्रेमी जनांना कौतुकमिश्रित आदर वाटूं लागला आहे, आणि जगांतील पन्नास कोटी लोक ज्या स्थानाला अत्यंत पवित्र मानतात व ज्याच्या दर्शनासाठीं अनंत हालअपेष्टा सोसून हजारों मैलांवरून भारतांत येतात तें स्थान आहे तरी कसें हें पहायची इच्छा शिक्षित भारतीयांमध्यें वाढूं लागली आहे, हें एक शुभचिन्हच समजलें पाहिजे.

बौद्ध लोकांच्या दृष्टीनें तीन स्थानें अत्यंत पवित्र आहेत : गौतम बुद्धांना जेथें बोधि (ज्ञान) प्राप्ति झाली ती बोधगया, त्यांनीं आपल्या धर्मचक्रप्रवर्तनास जेथें प्रथम सुरुवात केली तें सारनाथ, आणि जेथें त्यांनीं देहत्याग करून निर्वाणप्राप्ति करून घेतली तें गोरखपूरजवळील कुशिनारा हें स्थान. हिंदुस्थानांत येणारा प्रत्येक बौद्धधर्मीय या तीन स्थानांचें दर्शन घेतल्याशिवाय रहात नाहीं.

### ‘सारनाथ’ हें नांव कसें पडलें ?

ज्या ठिकाणीं सध्यां सारनाथ आहे त्याला पूर्वीं ‘ऋषिपत्तन’ असें म्हणत असत. या ऋषिपत्तनामध्यें मृगदाव नांवाचें एक उपवन होतें. त्यासंबंधीं अशी आख्यायिका सांगतात कीं, येथील राजा या वनांतील हरिणांची निर्दयपणें शिकार करीत असे, म्हणून भगवान् बुद्धांनीं आपल्या

एका पूर्वजन्मामध्यें त्या राजाला चार समजुतीच्या गोष्टी सांगून त्यानें रोज फक्त एकच हरिण मारावें असें बंधन त्याच्यावर घातलें. त्या राजानेंहि तें बंधन मान्य केलें. पुढें एकदां एका गर्भवती हरिणीवर मरण्याची पाळी आली. तेव्हां ती बोधिसत्त्वाकडे (पूर्वजन्मींच्या बुद्धाकडे) गेली आणि तिनें संरक्षण मागितलें. तेव्हां बोधिसत्त्वानें राजाकडे जाऊन त्याला त्याच्या वचनाची आठवण करून दिली आणि तो म्हणाला, 'राजा, या हरिणीची हत्या घडल्यास एकाच वेळीं दोन जीव मारले जातील. तूं तर एका दिवशीं एकच हत्या करायचं कबूल केलं आहेस. म्हणून तुला या हरिणीला मारतां येणार नाही.' राजाला हें म्हणणें पटलें आणि त्यानें त्या हरिणीला सोडून दिलें. तेव्हांपासून बुद्धाला 'सारंग (हरिण) नाथ' असें नांव पडलें आणि सारंगनाथाचा अपभ्रंश होऊन त्याचें सारनाथ असें रूप बनलें. अर्थात् या आख्यायिकेला ऐतिहासिक आधार कांहीं नाहीं हें सांगणें नलगे.

## धर्मचक्रप्रवर्तनास प्रारंभ

ज्ञानप्राप्ति होण्यापूर्वीं गौतमबुद्ध पांच तपस्वी साधूंबरोबर तप करीत होते. परंतु तपाचरणानें जगाच्या दुःखाचा प्रश्न सुटणार नाहीं असें पाहून त्यांनीं अन्नग्रहण केलें. त्याबरोबर ते पांच तपस्वी त्यांना सोडून निघून गेले आणि सारनाथला जाऊन राहिले. पुढें बुद्धांना ज्ञानप्राप्ति होतांच तें ज्ञान इतरांना देण्यापूर्वीं या पांच तपस्व्यांना द्यावें या हेतूनें भगवान् बुद्ध सारनाथला आले. त्यांचें म्हणणें त्या तपस्व्यांना पटलें आणि ते बुद्धाचे शिष्य बनले. अशा प्रकारें बौधधर्मचक्रप्रवर्तन सुरू झालें. म्हणून बौद्ध लोक या स्थानाला अत्यंत पवित्र मानतात. ही गोष्ट इसवी सनापूर्वीं सहाव्या शतकांतली, म्हणजे सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीची आहे. त्यानंतर या स्थानाला चांगले भरभराटीचे दिवस आले. सातव्या शतकांत आलेल्या ह्युएनत्संग या चिनी यात्रेकरूनें असें लिहून ठेवलें आहे कीं, सारनाथमध्यें या वेळीं बौद्ध भिक्षूंचे तीस मठ होते व त्यांत तीन हजार भिक्षू रहात होते. शिवाय हिंदूचींहि शंभर देवळें तेथें होतीं, असें त्यानें लिहून ठेवलें आहे.

## वाईट दिवस आले

सारनाथला हिंदूंचीं देवळें होऊं लागलीं याचा अर्थ, बौद्धधर्माला ओहोटी लागून हिंदुधर्मानें त्याला गिळून टाकण्यास सुरुवात केली, असाच होतो. पुढें मुसलमान लोक या देशांत आल्यानंतर त्यांनीं हिंदूंच्या देवळांप्रमाणें बौद्धमंदिरांचाहि नाश करण्यास सुरुवात केली. सुलतान महम्मद गझनवी ( ११ वें शतक ) आणि मुहम्मद घोरीचा सरदार कुतुबुद्दिन (इ. स. ११९४ ) यांनीं जंगलीपणानें बहुतेक साऱ्या इमारती धुळीला मिळविल्या. फक्त दोन स्तूप शिल्लक उरले. या स्तूपांनीं पुढें सहाशें वर्षेंपर्यंत ऊन आणि पाऊस यांच्या माऱ्याला तोंड देऊन टिकाव धरला. परंतु ऐतिहासिक वस्तूंच्या संरक्षणाविषयींचा आपला बेफिकीरपणा येथेंहि नडला आणि बनारसच्या राजाचा दिवाण बाबू जगत्‌सिंह यानें १७९४ च्या जानेवारींत काशीमध्यें एक मोहोल्ला बांधण्यासाठीं त्यांतला एक स्तूप मोडून त्याच्या विटा वापरल्या. सदर स्तूपाचें नांव ‘ धर्मराजिक स्तूप ’ असें असून स्वतः सम्राट् अशोकानें तो बांधविला होता. त्याचा व्यास ११० फूट होता. या विनाशाचा एक चांगला परिणाम असा झाला कीं, ऐतिहासिक साधनांचें महत्त्व जाणणाऱ्या इंग्रजांचें लक्ष या स्थानाकडे गेलें आणि त्यांनीं जुन्या अवशेषांचें रक्षण करण्याचें ठरविलें व अधिक उत्खननास प्रारंभ केला.

## ‘ मूलगंध कुटि ’

सुप्रसिद्ध उत्साही धर्मप्रचारक श्री. अनगारीक धर्मपाल कांहीं जपानी बौद्ध भिक्षूंबरोबर १८९१ सालीं सारनाथ येथें गेले. त्यानंतर या स्थानाला ऊर्जितावस्था येण्यास सुरुवात झाली असें म्हणतां येईल. पुढें १९१४ सालीं त्यांनीं ‘ मूलगंध कुटि ’ नांवाचें एक मंदिर सारनाथला बांधायचें ठरविलें. सारनाथाच्या खोदकामांत त्यांना हें नांव एका दगडावर कोरलेलें आढळलें होतें, त्यावरून आपल्या संकल्पित मंदिराला हें नांव देण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें हें मंदिर बांधण्यांत आलें आणि आज सारनाथचें सर्वांत मोठें आकर्षण हें मंदिरच बनलें आहे.

## ‘ चौखंडी ’ ऊर्फ सीतेचें स्वयंपाकघर

काशीहून सारनाथला जायचें असल्यास रेल्वेचा मार्गहि आहे. परंतु त्यांत वेळ फार मोडतो आणि सारनाथ स्टेशनपासून प्रत्यक्ष सारनाथपर्यंत एक-दीड मैल पायपीट करावी लागते म्हणून काशीहून सायकल-रिक्शा, एक्का अथवा टॅक्सी करून जाणें श्रेयस्कर. आम्ही दोघेंच असल्यामुळें आम्हांला रिक्शा करणेंच सोईचें वाटलें. रिक्शावाल्यानें जाण्यायेण्याबद्दल प्रथम चार रुपये मागितले. परंतु थोड्याच वेळांत तो दोन रुपयांना तयार झाला. या भागांत वाहनें खूपच स्वस्त आहेत. त्यामुळें तीनचार तास खर्च करून दोन रुपये मिळाले तरी रिक्शावाला खूष होता. जास्त मंडळी असली तर एक्का (एक प्रकारची घोडागाडी) करणें सोईचें असतें.

सारनाथाच्या किंचित् अलीकडे एका लहानशा टेंकडीवर एक अष्टकोनी टॉवरच्या आकाराची इमारत आहे. तिला ‘ चौखंडी ’ असें म्हणतात. अशिक्षित लोक तिला ‘ सीताजीका चूल्हा ’ अथवा ‘ सीताजीका रसोईघर ’ असें म्हणतात. त्या इमारतीच्या आंतबाहेर कांहीं नाहीं; नुसत्या भिंतीच आहेत. त्या भिंतींच्या एकूण रचनेवरून ही इमारत फार प्राचीन नसावी हें चटकन् ध्यानांत येतें. येथें सांपडलेल्या शिलालेखावरून हा टॉवर अकबर बादशहानें इ. स. १५८८ सालीं आपला पिता हुमायून याच्या सारनाथ–भेटीच्या स्मरणार्थ बांधला होता. अर्थात् हुमायुनानें सारनाथला कां भेट दिली असेल याचा कांहींच अंदाज करतां येत नाहीं. हा टॉवर एका प्राचीन स्तूपावर उभारलेला असून त्यावर झेंडा लावण्याची सोय आहे. तो स्तूप येथें कोणी व कां बांधला असेल याची निश्चित कल्पना नाहीं. परंतु भगवान् बुद्धांनीं आपलें धर्मचक्रप्रवर्तनसूत्र ज्या पांच तपस्व्यांना ऐकविलें व ज्यांना बौद्धधर्माची दीक्षा दिली त्यांच्याशीं याच ठिकाणीं बुद्धाची भेट झाली असावी व त्या पवित्र घटनेच्या स्मरणार्थ अशोकानें अथवा इतर कोणीतरी हा स्तूप बांधला असावा असें मानण्यांत येतें.

## छोटेंसें परंतु महत्त्वाचें म्यूझियम

सारनाथाच्या आवारांत प्रवेश करतांच उजव्या हाताला वस्तुसंग्रहालयाची

टुमदार व सुंदर इमारत लागते. येथील उत्खननांत सांपडलेल्या वस्तू या म्यूझियममध्यें ठेवण्यांत आल्या आहेत. हें म्यूझियम इ. स. १९१० सालीं बांधण्यांत आलें आहे; परंतु तें इतक्या उत्कृष्ट अवस्थेंत आहे कीं, नुकतेंच बांधलें असावें असा भास होतो. यांत तीन दालनें आहेत. परंतु ऐतिहासिक वस्तूंचा निवडक संग्रह करण्यांत आल्यामुळें त्याला फार महत्त्व आहे. यांत प्रवेश मिळविण्यासाठीं माणशीं दोन आणे द्यावे लागतात. मुख्य दरवाज्यांतून आंत शिरतांच स्वतंत्र भारतानें आपलें राजचिन्ह म्हणून स्वीकारलेलें तीन ( वस्तुतः चार ) सिंहमुखांनीं युक्त असलेलें अशोकचक्र (इ.स. पूर्वीं तिसऱ्या शतकांतील) समोर दृष्टीस पडतें. यांतील एका सिंहाचें तोंड मागील बाजूस असल्यामुळें चित्रांत तें दिसत नाहीं. अशोक–स्तंभावरील हा भाग सारनाथला सांपडलेला आहे. याच्यासंबंधीं आश्चर्याची गोष्ट अशी कीं, शेंकडों वर्षांनंतरहि आज हा स्तंभ अगदीं कोराकरकरीत वाटतो. तो खरोखरीच उत्खननांत सांपडलेला आहे, कीं नवीन सीमेंटचा केलेला आहे अशी शंका आमच्या मनांत उत्पन्न झाली. म्हणून ‘ क्युरेटर ’ ( संग्रहालयाधिकाऱ्या ) कडे जाऊन आम्हीं त्याबद्दल चौकशी केली. तेव्हां तो भाग खरोखरीच उत्खननांतच सांपडलेला असून पूर्वींच्या काळीं दगड घांसून चकचकीत करण्याची कला किती विकसित झालेली होती हें त्याच्यावरून लक्षांत येतें असें आम्हांला सांगण्यांत आलें. या दालनांत बुद्धाचे अनेक पुतळे आहेत. त्यांपैकीं धर्मचक्रप्रवर्तक ( धर्मोपदेश ) करीत असलेला बुद्ध, आणि पुरुष-दीड पुरुष उंचीचे उभे असलेले बुद्धाचे पुतळे महत्त्वाचे आहेत. येथें एक भली मोठी दगडी छत्री आहे. तिच्यावरील नक्षीकाम अत्यंत सुबक व प्रेक्षणीय आहे. धर्मोपदेश करीत असलेल्या बुद्धाची मूर्ति इतकी सुंदर आहे कीं, आतांपर्यंत सांपडलेल्या बुद्धमूर्तींत तिचा क्रम सर्वांत प्रथम लागतो असें म्हणतात. यांतील बुद्धानें मांडी घातलेली असून हातांनीं धर्मचक्रमुद्रा केलेली आहे. दुसऱ्या दालनामध्यें दैत्याचा विनाश करणाऱ्या शिवाची दीड पुरुष उंचीची आकर्षक मूर्ति आहे. ही मूर्ति अपूर्णावस्थेंत आहे. मुहम्मद घोरीच्या हल्ल्यामुळें ती अर्धवट राहिली असावी असें वाटतें. याखेरीज

इतरहि अनेक महत्त्वाच्या वस्तू या संग्रहालयांत आहेत.

## भग्नावशेषांच्या आवारांत

रस्त्याच्या उजव्या हाताला म्यूझियम आहे. आणि डाव्या हाताला तारेचें कुंपण असलेलें भग्नावशेषांचें आवार आहे. त्या आवारांत शिरलें कीं जिकडेतिकडे असंख्य भग्नावशेष दृष्टीला पडतात. कांहीं अवशेष तेथेंच एकत्र जमवून ठेवलेले आहेत तर कांहीं इतस्ततः विखुरलेले आहेत. लहानमोठे स्तूप तर असंख्य आहेत. येथूनच जगत्‌सिंहानें 'धर्मराजिक स्तूप' नांवाचा एक प्रचंड स्तूप मोडून त्याच्या विटा नेल्या होत्या. येथून जवळच एक जैन मंदिर आहे. हें मंदिर सन १८२४मध्यें बांधलेलें असून त्यांत जैनांचें अकरावें तीर्थंकर श्रेयांसनाथ यांची काळ्या संगमरवराची मूर्ति आहे. येथून एक मैल दूर असलेल्या सिंहपूर नांवाच्या खेड्यांत श्रेयांसनाथांना तीर्थंकरत्व प्राप्त झालें असल्यामुळें हें स्थान पवित्र मानण्यांत येतें. कला किंवा ऐतिहासिक अवशेष या दृष्टीनें या देवळांत कांहीं वैशिष्ट्य नाहीं; परंतु बौध्द, हिंदु व जैन या तीन धर्मांचा या ठिकाणीं जो संगम झाला आहे, ( कारण येथें हिंदूंचें देऊळहि आहे ) त्या दृष्टीनें याला महत्त्व आहे.

## धम्मेक स्तूप

या मंदिराच्या समोरच्या बाजूलाच सारनाथचा सुप्रसिद्ध धम्मेक स्तूप आहे. स्तूप म्हणजे एक प्रकारची भरीव समाधि किंवा थडगें. एखाद्या महापुरुषाच्या अस्थी ज्या ठिकाणीं पुरण्यांत येतात त्यावर घुमटाच्या आकाराची जी समाधि बांधण्यांत येते तिला 'स्तूप' असें म्हणतात. हा स्तूप विटा व चुना यांचा बनविलेला असतो. त्याच्यावर चढावयाचें नसतें. त्यामुळें वर चढण्यासाठीं पायऱ्या नसतात. या स्तूपाचें मूळ नांव धर्ममुख स्तूप असें आहे. हा स्तूप कोणी व केव्हां बांधला याचा पत्ता अद्यापि लागलेला नाहीं. परंतु तो गुप्त राजांच्या काळीं बांधण्यांत आला असावा असें म्हणतात. हा स्तूपहि बराच मोडकळीस आलेला आहे. परंतु आतां त्याच्या संरक्षणाची तरतूद करण्यांत आली असल्यामुळें यापुढें तो सुरक्षित राहील असें वाटतें. इंग्रजांचें राज्य आमच्यावर आलें नसतें तर हा

स्तूपहि धर्मराजिक स्तूपाप्रमाणें घरें बांधण्याच्या कामीं आला असता आणि बौद्धधर्मीयांचें एक अत्यंत पवित्र स्थान नष्ट झालें असतें. या स्तूपावरील नक्षीकाम मोठें सुंदर आहे; परंतु तें जागोजागीं मोडून पडलेलें आहे. बौद्धधर्मीय लोक या स्तूपाची पूजा करतात.

## अप्रतिम कलेचा नमुना : 'मूलगंध कुटि'

यानंतर आपण सारनाथचें आकर्षण म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'मूलगंध कुटि' या मंदिराकडे वळतों. बुद्धाचे अनुयायी त्याला रहाण्यासाठीं जीं घरें अथवा झोंपड्या बांधीत त्यांना ते 'गंधकुटि' ऊर्फ सुगंधित झोंपडी असें म्हणत असत. सारनाथला भगवान् बुद्धांनीं आपला पहिला पावसाळा घालविला होता. म्हणून येथील या बुद्धमंदिराला 'मूलगंधकुटि' असें नांव देण्यांत आलें. हें मंदिर बाहेरून तर कलापूर्ण व आकर्षक आहेच, पण आंतून त्यापेक्षाहि मोहक आहे. तेथील धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेंतील भगवान् बुद्धाची मूर्ति अत्यंत सुंदर आहे. हिंदु देवळाप्रमाणें तीर्थप्रसाद, निर्माल्य, वगैरे भानगडी येथें नाहींत. इतरहि कोणत्या प्रकारचा फापटपसारा येथें दिसत नाहीं. सर्व कसें स्वच्छ, निर्मळ व सुव्यवस्थित आहे. या सर्वांवर कळस म्हणजे येथील भिंतींवर कोसेत्सु नोसु या जपानी चित्रकारानें काढलेलीं अजिंठा पद्धतीचीं अप्रतिम सुंदर चित्रें. भगवान् बुद्धाचें जवळजवळ सारें जीवनचरित्र सुमारें पंचवीस चित्रांत त्यानें चित्रित केलें आहे. या चित्रांचे सौम्य शांत रंग मनाला मोहवितात यांत आश्चर्य नाहीं; परंतु चित्रकार जपानी असूनसुद्धां चित्रांतील चेहऱ्यावर विदेशीपणाची पुसटहि छाप दिसत नाहीं, प्रत्येक चेहरा संपूर्ण भारतीय वाटतो हें त्याचें वैशिष्ट्य आहे. भगवान् बुद्धांना त्यांच्या उपवासानंतर सुजाता खीर अर्पण करीत आहे तें चित्र, आजारी भिक्षूची सेवाशुश्रुषा करीत असलेल्या बुद्धाचें चित्र, ज्ञानप्राप्ति झाल्यानंतर गौतमबुद्ध आपल्या घरीं गेले असतां त्यांच्या स्वागतार्थ त्यांचे वडील व मुलगा राहूल हे पुढें येतात त्या वेळचें चित्र, वगैरे कितीतरी अप्रतिम चित्रें तेथें पहावयास मिळतात.

## चिनी मंदिरांतील हंसरा बुद्ध

येथून थोड्याच अंतरावर चिनी लोकांचें बुद्धमंदिर आहे. येथील बुद्धमूर्ति शुभ्र संगमरवरी असून तिच्या चेहऱ्यावर चिनीपणाची छाप स्पष्ट दिसून येते. ही मूर्ति हंसरी आहे. कारण चिनी बौद्ध हा गंभीर नसून हंसरा आहे. स्वच्छता व टापटीप या दृष्टीनें हें मंदिरहि प्रेक्षणीय आहे; परंतु कलेच्या दृष्टीनें येथें कांहीं नाहीं. पूर्वीं आपल्याकडे जशीं रविवर्म्यांचीं पौराणिक चित्रें लोकप्रिय होतीं, त्याच छापाचीं चित्रें (तसविरी) या मंदिरांत टांगलेलीं आहेत. अशिक्षित व असंस्कृत लोकांना हीं चित्रें पहाण्यांत गंमत वाटते; परंतु कलारसिकाला तीं पहावत नाहींत. बोधगयेच्या चिनी मंदिरांतहि अशींच चित्रें टांगलेली आहेत.

याखेरीज येथें एक महादेवाचें देऊळ, महाबोधी सोसायटीचा दवाखाना, बिडलांनीं बांधलेलीं धर्मशाळा, जैन धर्मशाळा, ब्रह्मी धर्मशाळा मूलगंधकुटी–विहार, लायब्ररी वगैरे अनेक गोष्टी आहेत. परंतु त्यांत वैशिष्ट्यपूर्ण असें कांहीं नाहीं. येथील पहाण्याची मुख्य वस्तु म्हणजे स्तूपच होय. बौध्दांच्या जुन्या वैभवाचें तें प्रतीक आतां पुनः नव्यानें जगासमोर आलें आहे.

ग्रंथालय ठाणे
दा. क्र. 18148
९९१४०
दि. ३-५ 200
२६७१५४

समाप्त

# महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर.

## — प्रकाशन —

सौ. मालतीबाई दांडेकर

| | |
|---|---|
| १ दुभंगलेलें जग | ३-० |
| २ मातृमंदिर | ५-० |
| ३ तेजस्विनी | ५-० |
| ४ अमोल आहेर | ३-० |
| ५ कृष्णरजनी | ५-० |
| ६ उद्यांची कन्या | ३-० |
| ७ लोकसाहित्याचें लेणें | ६-० |
| ८ विद्युत्‌रेखा | १-८ |
| ९ कन्येस प्रेमभेट | १-४ |
| १० उदयकुमार | १-० |

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

| | |
|---|---|
| ११ आधार | ४-८ |
| १२ प्रतिपदा | २-८ |
| १३ सीमारेषा | ६-० |
| १४ मी तुझाच आहे | २-० |
| १५ नरसी भगत | ०-६ |

वि. ज. सहस्रबुद्धे

| | |
|---|---|
| १६ पद्यमीमांसा | १-४ |
| १७ दुहिता | २-० |

व्यं. रा. खंडाळीकर

| | |
|---|---|
| १८ आघाडीवर | २-० |

गणपतराव बोडस

| | |
|---|---|
| १९ झांशीची राणी | १-८ |

प्रेमा कंटक

| | |
|---|---|
| २० अग्नियान | ३-० |
| २१ गांधीवाद-समाजवाद | ३-० |

श्री. रा. पोतनीस

| | |
|---|---|
| २२ महागाई कां ? | १-८ |

शांतिलाल भंडारी

| | |
|---|---|
| २३ निर्णय | ३-० |
| २४ वेगळेंच रामायण | ० १२ |

आय्. सी. शेख

| | |
|---|---|
| २५ पाकिस्तानची छाया | २-८ |

माधवराव बागल

| | |
|---|---|
| २६ कला आणि कलावंत भाग २ रा | ३-० |

वि. अ. कुलकर्णी

| | |
|---|---|
| २७ मराठी काव्यसमीक्षा | ६-० |

सौ. मालतीबाई चोळकर

| | |
|---|---|
| २८ चित्रलेखा | ३-८ |

टॉलस्टॉय

| | |
|---|---|
| २९ सैतान | २-० |

डॉ. अष्टपुत्रे

| | |
|---|---|
| ३० चारुमित्रा | २-८ |

भाऊ धर्माधिकारी

| | |
|---|---|
| ३१ बंदला बळी | ३-० |

सरदार प्रतापसिंग

| | |
|---|---|
| ३२ जोहार | २-८ |

पं. जवाहरलाल नेहरू

| | |
|---|---|
| ३३ आव्हान | -८ |

खलील जिब्रान

३४ बंडखोर आत्मे २–८

३५ सलमा २–८

के. रा. पालकर

३६ शाळा व शारिरिक शिक्षण २–०

कै. पंडित मुंडले

३७ कार्ल मार्क्स व त्याचें कार्य २–०

दादासाहेब मावळंकर

३८ कांहीं पाऊलें भाग १ ला २-८

३९ ,, ,, २रा ३-०

४० मानवतेचे पाझर २–८

महात्मा गांधी

४१ विद्यार्थ्यांशीं हितगूज २-०

४२ स्त्रियांशीं हितगूज २–८

ग. आ. लाड

४३ ग्रामराज्य २–०

४४ समाजमनाचा ध्येयतारा ५-०

रणजित देसाई

४५ रूपमहाल २–८

नानावटी व अंजेरिया

४६ हिंदी ग्रामीण जीवनाचा प्रश्न ७–०

ऑर्थर कोसलर

४७ भर दुपारच्या अंधारांत ६-०

सी. पं. खेर

४८ पैसा ४–८

आपटे गुरुजी

४९ भारताचा लाडका मुलगा १–८

दा. वि. कुलकर्णी

५० आमचे नेताजी १–०

भारतन् कुमारप्पा

५१ पुंजीवाद, समाजवाद कीं ग्रामवाद ? ५–०

ना. ल. व्हटकर

५२ अपराधी २–०

## आमचे सण व इतर बालवाङ्मय

१ गुढी पाडवा ०–६

२ वसंत गौरी ०–४

३ सती सावित्री ०–१०

४ नागपंचमी ०–६

५ मंगलमूर्ती ०–८

६ तिळगूळ घ्या गोड बोला ०–४

७ हरितालिका ०–८

८ महाशिवरात्र ०–५

९ होळी ०–५

१० नाताळ ०–८

११ आमचे गांधीजी ०–८

१२ फुलराणी ०–५

१३ पोपटाचा डोळा ०–४